UNIVERSAL
LIBRARY
OU_192454
UNIVERSAL
LIBRARY

# देवाचीं माणसें

अनुवाद
विजय तेंडुलकर

गं. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई ४

मूल्य अडीच रुपये

© 1955, by the Executors of the
Estate of Will Cather.

मुद्रक :
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस,
१९४ सदाशिव, पुणें २

प्रकाशक :
वि. ग. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २ मुंबअी ४

# उपोद्‌घात

## मुक्काम रोम

१९४८ साल. उन्हाळ्याचे दिवस. संध्याकाळ. रोमचें दर्शन घडविणाऱ्या सबाइन टेकड्यांवरच्या एका वाड्यावरच्या उद्यानात तीन कार्डिनल्स आणि अमेरिकेकडून आलेला एक अमेरिकन बिशप असे चौघे एकत्र भोजनाला बसले होते. गच्चीवरून दिसणाऱ्या रमणीय दृश्यासाठीं तो वाडा प्रसिद्ध होता. हे चौघे बसले होते तें उद्यान गच्चीच्या दक्षिण टोकाखालीं सुमारें वीस फूट खालीं होतें. वर वेलींनीं मढलेला मोठा उतार आणि या उताराला च खडकाची एक सपाटी येऊन तिथें हें उद्यान वसलेलें होतें. वरच्या भागाशीं हें उद्यान ब्ऱ्याच दगडी पायऱ्यांनीं जोडलेलें होतें. कुंडींतल्या कण्हेरीच्या आणि संत्र्यांच्या झाडांत मधोमधच्या वाळूनें झाकलेल्या चौकोनांत भोजनाचें टेबल ठेवलेलें होतें. वरच्या विस्तीर्ण ओक वृक्षांनीं त्याला दाट छाया दिली होती. पलीकडल्या कठड्यापलीकडे खूप खालीं, खोल, मोठी सपाटी पसरली होती. नितळ आणि अखंड. नजर रोखील असें थेट रोमपर्यंत कांहीं नव्हतें.

तसे बरेच लौकर स्पॅनिश कार्डिनल आणि त्यांचे ते पाहुणे भोजनाला जमले होते. सूर्य मावळायला अजून तास तरी होता. त्या तासांत रंगाची नुसती उधळण होणार होती, होत होती. नितळ सपाटीपलीकडे रोमची आकृति आकाशाला उगाच कुठें कापीत होती तेवढीच. स्पष्ट असा दिसत होता केवळ 'सेंट पीटर्स'चा कळस. एकाद्या मोठाल्या फुग्याच्या जरा बसकट माथ्याप्रमाणें तो निळसर सावळा कळस वाटत होता. त्याच्या नितळ पृष्ठभागावर उगीच कुठें धातूची चकाकी रेंगाळत होती. उतरत्या संध्याकाळीं अशा तऱ्हेनें भोजनाला बसण्याची कार्डिनलची कांहींशी विक्षिप्त पद्धत होती. या वेळीं उन्हाच्या बदलांमुळें आणि सूर्याच्या गतीमुळें वातावरणांत एक चैतन्य भासे. या बदलांचा, गतीचा परिपूर्ण उत्कर्ष होई तो तरी किती नेत्रदीपक! भव्य! एकाच वेळीं उत्कट आणि तरल! त्या

वेळची लाली एकाच वेळीं झळाळीनें युक्त आणि शतगुणित अशा नंदादीपाच्या सोज्वल प्रभेची आठवण देणारी असे. ओकच्या झाडांत हा प्रकाश घुसे, अगदी जणूं आरपार होई. फांद्या उजळून उठत, पालवीला धूसरता येई. संत्र्यांच्या झाडांचीं हिरवीं पानें आणि कण्हेरीचीं गुलाबी फुलें या तेजानें मढून सोन्याचीं होत. आसमंतांतलीं झुळझुळीत वस्त्रें, धातूंचे नितळ भाग आणि कांचकाम या साऱ्यावर छायाप्रकाशाची गंमतशीर शिवाशीव चाले. मस्तकांना उन्ह लागूं नये म्हणून त्या चौघांनीं आपापलीं ठराविक पद्धतीचीं लंबचौकोनी शिरोभूषणें पहेनलीं होतीं. तिघा कार्डिनल्सनीं नारिंगी किनारी आणि नारिंगी बटनांची पायघोळ काळीं महावस्त्रें परिधान केलीं होतीं आणि बिशपनें एक लांब काळा कोट गुलाबी बंडीवर चढवलेला होता.

त्यांच्यांतलें बोलणें काहीं कामासंबंधानेंच चाललें होतें. काम असें की बाल्टिमोरच्या प्रादेशिक मंडळाकडून एक विनंति अपेक्षित होती——न्यू मेक्सिकोमध्यें एक ‘ ॲपॉस्टॉलिक व्हिकरेट ’ स्थापन करण्यांत यावें अशा अर्थाची. दक्षिण अमेरिकेशीं नुकत्याच जोडण्यांत आलेल्या उत्तर अमेरिकेंतला एक भाग——हा न्यू मेक्सिको. हा भाग तसा त्या चौघांपैकी कोणालाच ——मिशनरी बिशपला देखील——तसा फारसा माहितीचा किंवा परिचयाचा नव्हता. इतालियन आणि फ्रेंच कार्डिनल त्याचा उल्लेख ‘ ल् मेक्सिक ’ असा करीत होते तर भोजनाचे स्पॅनिश यजमान ‘ नवस्पेन ’ म्हणून त्याला संबोधीत होते. या भागांत ‘ व्हिकरेट ’ सुरू करण्याबाबत या तिघांतही तसा विशेष उत्साह नव्हता आणि मिशनरी फादर फेरँडला तो पुनःपुन्हा जागवावा, डिंवचावा लागत होता. फादर फेरँड जन्मानें आयरिश, कुळीनें फ्रेंच. खूप फिरला-वावरलेला. दक्षिण अमेरिकेच्या नव्या जगांत उल्लेखनीय कामगिरी केलेला. या चौघांत बातचीत चालली होती फ्रेंचमध्यें; चालू घडामोडींची चर्चा कार्डिनल्सनीं अस्खलित लॅटिनमध्यें करण्याचा काळ केव्हांच मागें पडला होता.

फ्रेंच आणि इतालियन कार्डिनल मध्यम वयाचे आणि मोठ्या तंदुरुस्त शरीर प्रकृतीचे होते. त्यांतला नार्मन होता तो अंगानें भरलेला, प्रशस्त होता. व्हेनिशिअन कार्डिनल होता कृश, पिक्कट, बांकदार नाकाचा. त्यांचा यजमान, गार्सिया मारिआ द अलांद अद्याप तसा तरुण होता. कांति गव्हाळी. त्याचा लांबट चेहरा मात्र, त्याच्या पूर्वजाच्या तैलचित्रांतल्या चेहऱ्याची बरीच सुधारलेली आवृत्ति वाटावी असा होता, कारण त्याची आई इंग्लिश होती. डोळे, जिवणी यांत इंग्लिश वळणाचा सुखद उमदेपणा प्रतीत होई.

सोळाव्या ग्रेगरीच्या कारकीर्दीच्या उत्तर काळांत द अॅलांदचें व्हॅटिकनमध्यें मोठें वजन होतें, परंतु मग दोन वर्षांमागें ग्रेगरी ख्रिस्तवासी झाल्यावर द अॅलांद या आपल्या वडिलार्जित वाड्यावर येऊन राहिला होता. नव्या 'पॉण्टिफ'च्या एकेक सुधारणा त्याला पटत नव्हत्या, धोक्याच्या आणि अव्यवहार्य वाढत होत्या; म्हणूनच राजकारणांतून त्यानें अंग काढून घेतलें होतें. आपलें कार्य 'सोसायटी ऑफ द प्रॉपगेशन ऑफ द फेथ (क्रिस्ती तत्त्वज्ञानाच्या प्रसारार्थ ग्रेगरीनें स्थापन झालेली संस्था) पुरतें मर्यादित केलें होतें. मोकळ्या वेळांत कार्डिनल टेनिस खेळे. इंग्लंडमध्यें असतांना, पोरवयांत, या खेळाचें त्याला वेडच होतें. लॉन टेनिस अद्याप प्रचारांत आलें नव्हतें; आणि कार्डिनल खेळे तो खेळ घरांत खेळण्याचा होता. लांबलांबून, अगदीं स्पेन आणि फ्रान्सहून या खेळाचे हौशी चहाते कार्डिनलशी दोन डाव टाकण्याकरतां येत. इतकें कार्डिनलचें या खेळावरचें प्रभुत्व होतें.

या तिघानंतरचा उरलेला चौथा माणूस, बिशप फेरँड, यांच्या मानानें बराच वृद्ध आणि हडसभडस वाटत होता. वृद्ध वाटत नव्हते त्याचे निळेशार स्वच्छ डोळे. 'ग्रेट लेक्स' च्या बर्फाळ टापूंत त्याचें कार्यस्थळ होतें. आणि या भागांत, ऐन हिंवाळ्यांत, तीव्र वाऱ्या वादळांना तोंड देत एकट्यानें घोड्यावरून फिरण्यामुळें त्याच्या कायेंतला मृदुपणा पार हरपला होता. तजेला गेला होता. कांहीं कामानिमित्त तो इथें बसलेला होता आणि आपला मुद्दा तो वारंवार पुढें सरकवीत होता. इतरांपेक्षां त्याचे घांस भराभर संपत होते त्यामुळें रदबदली आणि युक्तिवाद करायला त्याला बराच वेळ सांपडत होता. त्याच्या पानांतलें वाढलेलें इतकें लौकर संपत गेलें कीं फ्रेंच कार्डिनल म्हणाला, "नेपोलियनला जेवतांना सांगाती म्हणून हा उत्तम ठरला असता!"

बिशप दिलगिरीसाठीं हात वर फेंकून खदखदून हसला. म्हणाला, "मंडळी रीतभात मी विसरलों असण्याची अगदीं शक्यता आहे. कारण माझ्या मनावर मोठा भार आहे. न्यू मेक्सिकोचा तो अवाढव्य विस्तार अमेरिकेला जोडला गेला आहे त्याचें खरें महत्त्व तुम्हाला इथं तसें कळणें अशक्य. तिथल्या 'व्हिकरेट'ला कांहीं वर्षांत 'एपिस्कोपल सी'चा दर्जा देण्यांत येईल. या 'सी'चा अंमल मग केवढ्या टापूवर चालेल, आहे माहीत? रशिया वगळला तर उरलेल्या मध्य आणि पश्चिम युरोपहून हा भाग मोठा असेल! या भागांतल्या बिशपच्या हातून फार महान घडामोडींचें मार्गदर्शन घडेल."

व्हेनिसचा कार्डिनल पुटपुटला, "घडामोडी तशा ढीग झाल्या आहेत. पण त्यांतून निष्पन्न कांहीं होत नाहीं. फक्त डोकेदुखी आणि पैशांच्या मागण्या."

मिशनरी फेरँड त्याच्याकडे वळला. नम्रपणेंच म्हणाला, " युअर एमिनन्स, इकडे जरा ध्यान देऊन ऐका आणि समजावून घ्या अशी प्रार्थना. मी म्हणतों हा टापू सोळाव्या शतकांत फ्रान्सिस्कन फादर्सनीं प्रथम धर्मप्रसाराचें क्षेत्र बनवला. त्यानंतर तीनशें वर्षे त्याच्याकडे सतत दुर्लक्ष होत आलें आहे. आणि तरीही अद्याप तिथली ख्रिस्ती श्रद्धा नष्ट झालेली नाही. हा भाग स्वतःला अद्याप केविलवाण्या अट्टाहासानें 'कॅथॉलिक'च म्हणवतो. कोणाचें मार्गदर्शन वा सल्लामसलत नसतांना, आपल्या परीनें धर्मकृत्यें पार पाडीत असतो. जुनीं चर्चेस मोडकळून पडलीं आहेत. आहेत ते धर्मगुरू असंघटित आणि नेतृत्वहीन आहेत. धर्मकृत्यांबाबत ते हयगय करतात आणि त्यांतले कांहीं तर उघड उघड रखेल्या बाळगतात, आतां तिथें प्रागतिक सरकार आलें असल्यामुळें ही घाण वेळीच न निस्तरली तर, साऱ्या उत्तर अमेरिकेंत आपल्या हितसंबंधांना ढका पोंचेल."

फ्रेंच कार्डिनलनें विचारलें, " पण हीं मिशन्स अद्याप तर मेक्सिकोच्याच अखत्यारांत आहेत, होय ना ? "

मारिआ द ॲलांदनें याला जोडून विचारलें, " म्हणजेच ड्युरँगोच्या बिशपच्या 'सी 'च्या अखत्यारांत ? "

मिशनऱ्यानें उसासा टाकला. तो म्हणाला, "युअर एमिनन्स, ड्युरँगोचा बिशप आतां म्हातारा झाला. आणि त्याच्या पीठापासून सँता फे पंधराशें इंग्रजी मैल लांब आहे. गाडीच्या सडका नाहींत. कालवे नाहीत. ज्यांतून प्रवास करावा अशा नद्या नाहींत. खेंचरांवर माल लादून सारा व्यापार-व्यवहार चालतो. आहेत त्या वांटा धोक्याच्या, बेभरंवशाच्या. त्या बाजूचा ओसाड भाग तर विशेष भयंकर. म्हणजे पाण्याच्या टंचाईचें किंवा इंडियन लोकांकडून होणाऱ्या कत्तलीचें नाहीं म्हणत मी. हें तर तिकडे नेहमीचें होऊन बसलें आहे. पण सारी भुई आहे तीच अध्येमध्यें फाटलेली. तिला असंख्य विवरें आणि भगदाडें. एकेक विवर कधीं दहा फूट खोल तर केव्हां हजार फूट खोल ! असल्या मार्गानें मालवाहू खेंचरें घेऊन वेळी अवेळीं जायचें म्हणजे कल्पना करा. बरें, चुकवूं, टाळूं म्हणावें तर कांहीं चुकत आणि टळत नाहीं. आतां समजा ड्युरँगोच्या बिशपनें एखाद्या चुकार पाद्र्याला पत्र पाठवून बोलवून घ्यायचें म्हटलें, तर त्याला कोण आणून हजर करणार ? निदान आज्ञेचें पत्र त्या पाद्र्याच्या हातीं पोंचलें याची तरी खात्री कोण देणार ? टपाल येतें जातें तें फांसेपारधी, सोन्यामागें भटकणारें लोक अशा मिळेल त्या माणसांकरवीं. "

नॉर्मन कार्डिनलनें चषक रिता करून ओठ निपटले.

" तर मग रहिवाशांचें काय ! " त्यानें विचारलें. " हे सगळे जर फिरते लोक तर त्या भागांतले रहिवासी असे कोण उरले ? "

" एकंदर सुमारें तीस इंडियन जमाती, राज्यें, मसिए. यांतल्या प्रत्येकाला त्याची बोली, त्याचे रीतिरिवाज. आणि या सर्वांत परस्परवैमनस्य. इतकें कीं मुडदे पडतात. त्याशिवाय मेक्सिकन्स. हे जात्या श्रद्धाळू लोक. त्यांच्यावर कसले संस्कार नाहींत, बापजाद्यांच्याच श्रद्धेला चिकटून जगतात ते. "

मारिआ द अॅलांद म्हणाला, "ड्युरँगोच्या बिशपकडून मला एक पत्र आलें आहे. त्यांत त्यानें नव्या नेमणुकीकरतां त्यांच्या व्हिकरची शिफारस केली आहे."

बिशप फेरँड यावर उद्गारला, " युअर एमिनन्स, या जागीं स्थानिक रहिवाशांपैकीं धर्मगुरू नेमल्यास ती फार दुर्भाग्याची गोष्ट होणार आहे. या भागांत धर्माच्या कामांत हे लोक फारसे उपयोगाचे ठरलेले नाहींत. त्यांतून तुम्ही म्हणतां तो व्हिकर वयोवृद्ध आहे. नवा व्हिकर हवा तो तरणाबांड हवा. अंगापिंडानें भक्कम, जोमदार, आणि मुख्य म्हणजे हुषार. त्याची गांठ असणार रानवटपणाशीं. आडमुठ्या अज्ञानाशीं. त्याचे झगडे होणार बेमुर्वत धर्मगुरूंशीं. आणि राजकीय घालमेलींतही त्याला गुंतवण्यांत येण्याचा सतत संभव. तो माणूस हवा तो असा हवा की प्राणाचीही तमा न करतां त्यानें पवित्र धर्मांशाची तामिली केली पाहिजे. "

स्पॅनिश कार्डिनलनें पाहुण्यावर नजर लावली तेव्हां त्याच्या तपकिरी बाहुल्यांत एक वेगळी छटा उमटून गेली. तो म्हणाला, "मला वाटतें, इतकें ज्याअर्थी तुम्ही बोलतां त्याअर्थी तुमच्या मनांत कोणी उमेदवार असला पाहिजे. "

" बरोबर ओळखलेंत, मसिए--" बिशप तत्काळ म्हणाला. " फ्रेंच मिशनऱ्यांबाबत आपणा दोघांचें मत सारखें असल्याचें जाणून मला संतोष वाटतो आहे. "

कार्डिनल सहजपणें म्हणाला, "हूं. उत्तम धर्मप्रसारक असतात ते. आमच्या स्पॅनिश पूर्वजांतून चांगले हुतात्मे निघाले पण फ्रेंच जेसुइटांचें कार्य याहून मोठें म्हटलें पाहिजे. संघटक म्हणून त्यांच्यासारखे तेच. "

व्हेनिशियन कार्डिनलनें पृच्छा केली, " जर्मन्सपेक्षां उजवे, म्हणतां ? " त्याचा जात्या ओढा ऑस्ट्रियन रक्ताकडे होता.

स्पॅनिश कार्डिनल म्हणाला, " जर्मन्स व्यवस्थितपणांत उजवे. परंतु योजकता सांगावी तर ती फ्रेंच मिशनऱ्यांचीच. स्थल-काल-परिस्थितीनुरूप ते उत्तम प्रकारें जुळवून घेतात. तारतम्यानें विचार करण्याचा प्रयत्न करतात. तो जणू

त्यांचा नादच असतो." एवढें बोलून तो पुन्हा बिशपकडे वळला. म्हणाला, " पण महाराज, हें मद्य तुम्ही कां उपेक्षित आहां ? वीस वर्षांचा तुमचा कॅनडांतला शीण धुवून जावा म्हणून मुद्दाम हें ठेवणींतलें मद्य मी आज बाहेर काढलें. तुमच्याकडे असलें मद्य नसेलच मिळत ? "

तसा भरलेला ठेवून दिलेला चषक हातीं घेत बिशप सस्मित म्हणाला, " फार सुरेख मद्य आहे हें, युअर एमिनन्स; मलाही समजतें. परंतु असल्या सांख्याच्या मद्याची रुचि गेली आहे माझी मध्यंतरीच्या काळांत. आमच्या तिकडे थोडीशी व्हिस्की नाहींतर हडसन बे कंपनीची रम काम भागवते. पॅरिसमध्यें शांपेनची लज्जत मात्र मला खरीखुरी उमगली हें मला कबूल केलें पाहिजे. चाळीस दिवस समुद्रावर होतों आम्ही. त्यांतून सागरी प्रवासाचें आणि माझें वांकडें. "

"तर मग तुम्हांला ती घ्यायला हवी." यजमानानें नोकराला खूण केली. बिशपला विचारलें, " थंड आवडते का तुम्हांला ? आणि तुमच्या उमेदवार व्हिकरला ! तो त्या नव्या नेमणुकीच्या भागात काय पिणार, काय खाणार ? "

बिशप म्हणाला, "तो खाईल म्हशीचें वाळवलेलें मांस, आणि मिरचीबरोबर फ्रिजोल्स. तहान लागली तर आनंदानें मिळेल तेव्हां मिळेल तसलें पाणी पिईल. त्याचें तिथलें जीवन फारसें सुखाचें जाणार नाहीं, युअर एमिनन्स. तो प्रदेश पावसाच्या धारा पिऊन घेतो तसें त्याचें तारुण्य आणि सामर्थ्य पिऊन घेईल. सर्व प्रकारच्या त्यागाची, प्रसंगीं हौतात्म्याची तयारी त्याला ठेवावी लागेल. गेल्या सालीं सान फर्नोदेझ द ताओसच्या इंडियनांनीं अमेरिकन गव्हर्नर आणि इतर डझनभर गोऱ्या माणसांना कापून आणि उसवून टाकलें. स्थानिक पाद्याला त्यांनीं बाकी ठेवलें याचें कारण एकच. तो पाद्रीच त्यांच्या उठावाचा म्होरक्या होता ! त्यानेंच या कत्तलीचा कट आंखून दिला होता. न्यु मेक्सिको हा असा आहे ! "

" तुमचा उमेदवार सध्यां कुठें असतो, फादर ? "

" माझ्याच ' डायकोज ' मध्यें लेक ऑंटारियोच्या किनाऱ्यावरल्या टापूंत धर्मगुरू म्हणून तो काम पहातो. आज नऊ वर्षे मी त्याचें काम बघतों आहे. तक्रारीला म्हणून जागा नाहीं. त्या मानानें वय म्हणावें तर जेमतेम पस्तिशीचें, सेमिनरीमधून तो बाहेर पडला तो आमच्याकडेच दाखल झाला. "

" त्याचें नांव ? "

" जीं मारि लतूर. "

आसनांत मागें रेलून मारिआ द ॲलांदनें आपल्या सडसडीत बोटांचीं टोकें एकमेकांवर जुळवलीं आणि कांहीं विचार करीत सर्वांकडे एकदां पाहिलें.

" परंतु फादर फेरॅड, गोष्ट अशी कीं या नव्या जागेवर बाल्टिमोरचें कौन्सिल शिफारस करील त्यालाच नेमण्याकडे वरिष्ठांचा साहजिक कल असणार. "

" तें खरेंच, युअर एमिनन्स; पण तुम्ही कौन्सिलकडे शब्द टाकला तर—— चौकशी म्हणून म्हणा, सूचना म्हणा——"

यावर स्मित करीत कार्डिनल म्हणाला, " तर कांहीं ना कांहीं वजन पडेल म्हणतां ? यांत शंका नाहीं; पण हा तुमचा लतूर हुशार आहे म्हणतां ? त्यावर काय आपत्ति आणतां आहां ही तुम्ही ! पण, मला वाटतें, त्याच्या सध्यांच्या अवस्थेहून नवी अवस्था फार अवघड किंवा कष्टाची ठरूं नये. अर्थात् तुमच्या टापूविषयींचें माझें ज्ञान म्हणजे फेनिमोअर कूपरच्या कादंबऱ्यांतून गोळा केलेलें. इंग्लिशमधले त्यांचें अनुवाद मी रस घेऊन वाचतों. पण मला सांगा, या तुमच्या उमेदवाराकडे बुद्धिमत्ता चांगल्यापैकीं आहे म्हणतां ? कलेची जाण आहे का त्याला ? निदान जुजबी ? "

" परंतु मसिए, त्याची आवश्यकता त्याला कुठून भासणार ? त्यांतून तो मूळ औव्हर्नरचा आहे. "

तिघां कार्डिनल्समध्यें मोठें हास्य पिकलें. त्यांनीं चषक पुन्हां भरून घेतले. पाहुण्या मिशनऱ्याच्या चिकाटीच्या एकसुरी आग्रहानें, आर्जवांनी त्यांचीं मनें सुखावलीं आणि सुस्तावलीं होतीं.

यजमान——स्पॅनिश कार्डिनल——म्हणाला, " मंडळी जरा इकडे ध्यान द्या. एक छोटीशी गोष्ट सांगतों. तोंवर हे बिशप माझ्याकडली शँपेन चाखून मला उपकृत करतील. महाशय, तुम्ही आतां उत्तर दिलेंत तो प्रश्न विचारण्याला माझ्याकडे तसेंच कारण आहे. व्हॅलेनिकाच्या माझ्या वडिलार्जित घरांत मोठमोठ्या पेंटर्सनीं काढलेलीं बरींच चित्रें आहेत. तीं मुख्यतः माझ्या आजोबांनीं जमवलीं. आजोबा त्या काळच्या मानानें श्रीमंत तर होतेच पण कलेचे मर्मज्ञ आणि रसिकही होते. त्यांनीं जमवलेला एल ग्रेकोचा संग्रह तर साऱ्या स्पेनमध्यें बिन-तोड ठरावा. आजोबांचें वय झालें असतां एल दिवशीं न्यू स्पेनचा एक मिशनरी भिकेची याचना करीत आमच्या दारीं आला. अमेरिकेच्या दोन्ही भागांतले मिशनरी तेव्हां, आमच्यासारखेच, सर्वसाधारणतः विपन्नावस्थेंतच असत, बरें का बिशप फेरॅड. या माणसानें आपल्या एकेक पराक्रमाच्या हकिकतींनीं आजोबांवर वजन मारलें आणि आमच्या आश्रयावर त्याचा जम मोठा चांगला बसला. ' चॅप्लेन ' च्या गैरहजेरींत तोच धर्मकृत्यें उरकूं लागला. म्हाताऱ्याकडून बरेच पैसे त्यानें काढले, शिवाय इतर चीजवस्तू. द्यावें तें तो घेत असे. माझ्या

आजोबांकडे त्यानें त्याचें इंडियन टापूंतलें चर्च सजवण्याकरतां एका पेंटिंगची मागणी केली. आजोबा म्हणाले ‘ आहेत त्यांतलें निवडा आणि घेऊन जा. ’ मनांत त्यांचा हिशोब असा कीं आपल्याला देतां येईल असेंच कांहींतरी हा धार्मिक, भाबडा, रांगडा माणूस निवडणार. पण झालें भलतेंच. त्या केसाळ मिशनऱ्यानें नेमकें उत्तम तेंच चित्र निवडलें. समाधिस्थ असा तरुण सेंट फ्रान्सिस. एल ग्रेकोचेंच तें पेंटिंग. मॉडेल म्हणून अल्बुकर्कच्या अत्यंत देखण्या डयूकला बसवून तें केलेलें. आजोबा कुरकुरले. त्यांनीं विरोधही दर्शवला. धार्मिक दृष्ट्या इंडियनांना चट्कन समजण्याजोगें, आवडण्याजोगें असें दुसरें एकादें चित्र उचलण्याला त्यांनीं त्या मिशनऱ्याला सुचवलें. त्याच्या मतें त्या रानवट लोकांना नाजुक–अगदीं बायकी––सौंदर्याच्या सेंट फ्रान्सिसमध्यें काय राम वाटणार होता ?

“ परंतु व्यर्थ. मिशनऱ्यानें आजोबांना ऐकवलें तें वाक्य आमच्या कुटुंबांत कायम राहून गेलें आहे : ‘ तुम्ही हें चित्र मला नाकारतां कारण हें फार चांगलें चित्र आहे. पण लक्षांत ठेवा, तुम्हांला हे प्रिय आहे त्याहून देवाला अधिक प्रिय आहे. ”

“ पेंटिंग त्यानें नेलें. आजोबाच्या चित्रांच्या हस्तलिखित यादींत त्या क्रमांकापुढें लिहिलें आहे : फ्रे तेओदोकिओला दिलें––नव्या स्पेनमधील प्युएब्लो द सिआमधल्या त्याच्या चर्चच्या शृंगाराकरतां.

“ फादर फेरँड, या चित्राच्या संबंधांत डयुरँगोच्या बिशपशीं माझा या आधीं कांहीं पत्रव्यवहार झाला आहे. त्याला मी सर्व हकिकत कळविली होती. त्यानें लिहिलें कीं, सिआचें चर्च फार मागेंच उद्ध्वस्त झालें असून त्यांतल्या सामानाची विल्हेवाट लागली. बहुधा चित्राचा नाश झाला असावा. किंवा कुठें तरी ढिगाऱ्यांतून नाहीतर सांदीकोपऱ्यांत तें लपून राहिलें असावें तर तुमचा फ्रेंच उमेदवार या बाबतींत जाणता असेल आणि या नव्या जागेवर त्याला नेमण्यांत आलें तर कदाचित् तो माझें हें चित्र शोधून काढण्याचे प्रयत्न करील. ”

बिशपनें मान हलवली. म्हणाला, “तसें कांहीं मी हमीपूर्वक सांगूं शकत नाही. कारण मलाच त्या माणसाच्या या अंगाची नीटशी कल्पना नाहीं. तशा त्याच्या आवडीनिवडी बऱ्याच वरच्या दर्जाच्या आणि भरीव आहेत हें मला कळलें आहे, पण एरवीं तो फार अबोल आणि जेवढ्यास तेवढें वागणारा आहे, त्यामुळें स्पष्ट कल्पना नाहीं. आमच्या भागांत काम करणें तसें सोपें नाही. ”

“ तें कांहीं असलें फादर, तरी पण फेनिमोअर कूपरच्या कादंबऱ्यांतून

दिसतात ते तुमचे इंडियन्स मला मोठे आवडलेले आहेत. चला, आतां कॉफी घेण्याकरितां आपण गच्चीवर जाऊं आणि तिथून सूर्यास्ताची मौज पाहूं. ''

आकुंचित पायऱ्यांवरून कार्डिनलनें आपल्या पाहुण्यांना वर नेलें. संधि-प्रकाशांत ती विस्तीर्ण फरशीची गच्ची तळ्यासारखी नितळ निळी भासत होती. उन्ह आणि बरोबर सावल्याही लोपल्या होत्या. खालच्या देखाव्यांतले उंचसखल भाग आतां गुलाबी दिसत होते. आभाळांत बॅसिलिकाच्या कळसामागून लाल सोनेरी रंगांची नुसती उधळण होत होती.

तारे चमकूं लागेपर्यंत ते धर्माधिकारी तिथेंच फिरत, बोलत होतें. अनेक विषय त्यांच्या संभाषणांत येऊन गेले; परंतु राजकारण मात्र त्यांनीं टाळलें. कठिण प्रसंगीं हें टाळण्याकडेच जबाबदार माणसांचा कल असतो. खुद्द पोपशीं संबंधित अशा लोम्बार्ड युद्धाचा अवाक्षरानेंही उल्लेख झाला नाहीं. त्याऐवजीं तरुण 'व्हर्दि 'च्या संगीतकावर बोलणें झालें, धर्मनिष्ठ होऊन तथाकथित चमत्कार करूं लागलेल्या अँडयुलेशियामधल्या एकेकाळच्या नर्तकीवर चर्चा झाली. या संभाषणांत त्या पाहुण्या मिशनऱ्यानें बोलणें टाळलें; इतकेंच नव्हे तर त्यांत त्याला कांहीं रसही लागला नाहीं. मनाशीं त्यानें स्वतःलाच विचारलें कीं दूर एकीकडे राहून, या चौरस माणसांच्या गप्पांचा कंटाळा यावा इतके आपण मागासलों का ? आपापल्या स्थानाकडे सारे पांगण्याआधीं मारिआ द अॅलांदनें त्याच्या कानांत, इंग्रजींत, एकच वाक्य ऐकवलें, ''तुमचें मन द्विधा झालें आहे, फादर फेरँड. तुमच्या नव्या उमेदवाराबद्दल इतक्यांतच निरुत्साही आणि प्रतिकूल बनलांत ? पण आतां उशीर झाला आहे. जीं मारि लतूर--बरोबर ना ? ''

# प्रथम खण्ड

.......................... ...................

.१.

१८५१ च्या शरदांतली माध्यान्ह. मेक्सिकोच्या मध्यभागांत कुठें तरी. पहावी तिकडे ओसाडी. या ओसाडींतून तो एकुलता एक घोडेस्वार ओझ्याचें खेंचर ओढीत वाट तुडवीत होता. तो वाट चुकला होता आणि चुकलेली वाट सुधारण्याच्या खटपटींत होता. यासाठीं मदत अशी त्याला जवळच्या कंपासची आणि दिशांच्या अंदाजें ज्ञानाचीच काय ती होत होती. अडचण होती ती फार मोठी होती——भोंवतालचा टापू अगदीं वैशिष्ट्यहीन होता. किंवा इतक्या एकसारख्या वैशिष्ट्यांनीं तो भरलेला होता की खूण म्हणून कसली ती पटत नव्हती. सर्व बाजूंना पहावें तिकडे लाल मातीचीं छोटीं छोटीं टेकाडें पसरलीं होती. नजरेच्या चौफेर कक्षेंत एकाद्या ठिकाणीं इतकीं एकसारखीं टेकाडें कुठें असूं शकतील यावर एरवीं विश्वास बसला नसता. परंतु इथें ही वस्तुस्थिति होती. फटफटत्या पहांटेपासून तो हीं असलीं टेकाडेंच तुडवीत होता आणि इतकी वाटचाल करूनही जणूं एका जागीं उभें असल्यासारखें सारें दृश्य ठराविक वाटत होतें. तीस एक मैलांची मजल तुटली होती. कुठें विवरें टाळण्याकरतां हेलपाटे घ्यावे लागले होते. आणि असेंच वाटत होतें कीं असेंच अनिश्चित कालपर्यंत चालणार. वेगळें कांहीं दिसणें, भासणें अशक्य. हीं टेकाडें——हीं होतीं एकसारखी एक, पण एकदां अशीं वाटत तर एकदां तशीं, आतां तीं मेक्सिकन ओव्हन्ससारखीं—भट्ट्यांसारखीं —वाटत होतीं. विटकरी लाल आणि झुडपांअभावीं बरीचशीं भगभगीत. नाहीं म्हणायला 'ज्युनिपर' चीं रोपें कुठें कुठें दिसत होतीं. गंमत म्हणजे या रोपांनाही मेक्सिकन भट्टीचाच बसकट त्रिकोणी आकार होता. भूमितींतलें एकादें स्वप्न पहात असल्याचा अनुभव त्या प्रवाशाला सकाळपासून येत होता. विटकरी बसकट त्रिकोणी टेकाडें. त्यावर हिरवीं बसकट त्रिकोणी झुडपें. आणि टेकडांची अशी दाटी कीं जणूं एकमेकांना लटकताहेत, ढकलताहेत, उलथून पाडायला निघालीं आहेत.

जात्या वस्तूंच्या आकारांकडे विशेष लक्ष ठेवणारा तो प्रवासी भोंवताल
या ठराविक त्याचत्यापणामुळें त्या उन्हातान्हांत बांवून, गोंधळून गेला हो
मेंदूवरचा या त्रिकोणाकृतींचा दाब किंचित् हलका करण्याकरतां प्रवाश
डोळे किंचित्काळ घट्ट मिटून घेतले.

त्यानें डोळे पुन्हा उघडले तेव्हां त्याची नजर खिळली ती ठरीव त्रिकोण
न बसणाऱ्या ज्युनिपरच्या एका झाडावर. याची वाढ फार दाट नव्हत
गांठीगांठींची दहा एक वाव उंच फांदी लांबून तिला वर दोन आडवे फ
फुटले होते. फांटे फुटण्याच्या जागीं किंचित वर तुरळक हिरवी पालवी होत
एका जिवंत झाडानें हा असा हुबेहुब क्रूसाचा आकार घेतला होता.

प्रवासी घोड्यावरून उतरला. खिशांतून त्याने एक जुनें, चुरगळलेलें पुस्त
बाहेर काढलें. डोक्यावरची टोपी उतरवून या झाडाच्या पायथ्याशीं त
गुडघ्यांवर टेकला.

त्याच्या अंगावरच्या बकऱ्याच्या कातड्याच्या रायडिंग कोटच्या आंत काळ
डगला आणि चर्चमनची कॉलर आणि गळपट्टा होता. तरुण धर्मगुरू प्रार्थनेंत
रंगला होता. साधा धर्मगुरू नव्हे, हजारांत एक म्हणावा असा धर्मगुरू--हे
एका दृष्टिक्षेपांतच सांगतां येत होतें. त्याचें नत झालेले मस्तक सामान्य माणसाचें
नव्हतें--असामान्य बुद्धिमत्तेची देणगी या माणसाला असली पाहिजे हें त्यावरून
कळत होतें. भुंवयांच्या ठेवणीवरून हा माणूस उदार, चिंतनशील वाटत होता
तर त्याचे रेखीव नाकडोळे एक प्रकारचा निश्चयीपणा व्यक्त करीत होते.
कोटाच्या बाह्यांतून डोकावणाऱ्या हातांत स्वभावाची एक विशेष सात्त्विक ठेवण
प्रतीत होत होती. एकंदरीनें एकाद्या संस्कारसंपन्न घरंदाज घराण्यांतला हा पुरुष
वाटत होता. हा होता धडाडीचा, अत्यंत संवेदनाक्षम मनाचा, सोज्वळ--
त्या तशा वैराण वातावरणांतही त्याचें सारें हालणें चालणें वैशिष्ट्यपूर्ण होत
होतें. साऱ्या वस्तुजाताबद्दल आदर आणि कदर बाळगणारा हा पुरुष होता
तरी कोण ! ईश्वराचें स्वरूप मानून एका झाडापुढें नम्र झालेला हा घोडेस्वार
कोण ?

जवळ जवळ अर्धा तास त्याची प्रार्थना एकाग्रतेनें चालली होती. नंतर
तो त्यांतून जागा झाला तेव्हां खूप तवाना वाटत होता. मोडक्या तोडक्या
स्पॅनिशमध्यें त्यानें थकलेल्या खेंचराशीं संभाषण सुरू केलें. तो विचारीत होता,
चुकलेली वाट सुधारण्यासाठीं अधिक पायपीट करणें त्याला पटत होतें कीं
नाहीं ? त्याचें काय म्हणणें होतें ? त्याच्या सांठ्याचें पाणी संपलें होतें, आणि

जनावरांच्या तोंडीं आदल्या दिवसाच्या सकाळपासून पाण्याचा थेंब लागला नव्हता. रात्रीं या टेकाडांतच त्यानें पाण्याची अपेक्षा न ठेवतां कोरडा मुक्काम केला होता. तीं जनावरें तहानेनें मोठीं व्याकुळ होऊन गेली होतीं; परंतु पाणी मिळेपर्यंत तीं गात्रें गाळणार नव्हतीं, थांबणार नव्हतीं. असें तडफडण्यापेक्षां पाण्याच्या शोधांत रखडणेंच उचित वाटत होतें.

टेक्सासमधल्या प्रदीर्घ प्रवासांत पाण्याच्या दुर्भिक्षाचा अनुभव या प्रवाशाला तसा आला होता; कारण त्यांच्या काफिल्याला वाटेंत वारंवार पाण्याच्या तुटपुंज्या पुरवठ्यावर दिवसचे दिवस निभवावे लागले होते. परंतु आतांचे हाल कांहीं वेगळेच होते. सकाळपासून अंगांत कणकण भासत होती. तोंडाची रुचि तापानें जावी तशी गेली होती. मधून मधून चक्कर करत होती. हीं त्रिकोणी टेकाडें झुंडीनीं जवळ येऊन मागें पडत असतांना त्याला प्रश्न पडला होता, औव्हर्नच्या डोंगरांतल्या या रखडपट्टीचा अंत कुठें आहे कीं नाहीं? येशूच्या क्रूसावरून फोडलेल्या टाहोची त्यानें स्वतःला जाणीव करून दिली. ‘ J'ai soif ! ’ येशूनें फार कांहीं सहन केलें. फक्त एकच व्यथा त्याच्या ओठांबाहेर फुटली, ‘ J'ai soif ! ’ मी तृषार्त आहे. दीर्घ तपस्येनें तयार केलेल्या इच्छाशक्तीच्या ताकदीवर त्या तरुण धर्मगुरूनें आपल्या जाणिवेंतून स्वतःला काढून घेतलें आणि येशूच्या–परमेश्वराच्या–वेदनेचाच तो विचार करूं लागला. येशूची तहान एवढेंच सत्य उरले आणि त्याची व्याकुलता तिचाच एक अपरिहार्य भाग बनली.

घोडा अडखळला; त्याची विचारतंद्री भंगली. जवळच्या जनावरांविषयीं त्याला स्वतःपेक्षां अधिक जाणीव, कणव होती. त्यांच्यांतला तोच काय तो अक्कलहुषारी असलेला, जाणता, तोच विचारी. तोच एकटा माणूस. आणि त्यानेंच त्यांना या न संपणाऱ्या उंचसखल वैराण प्रदेशांत आणून टाकून त्यांच्या यातना वाढवल्या होत्या. विमनस्क स्थितीत आपल्याच विचारात राहून वाट चुकलों ही कल्पनाच त्याला डांचत होती. त्याच्यापुढें विचार होता त्याच्या परिस्थितीचा. ‘ बिशोप्रिक ’ कसं मिळवावं? ‘व्हिकरेट ’ नसलेला तो ‘ व्हिकर ॲपॉस्टोलिक ’ होता. त्याच्या ‘कळपां’तल्यांना तो नकोसा झाला होता आणि म्हणून त्याला बाहेर काढून लावण्यांत आलें होतें.

या प्रवाशाचें नांव जीं मारि लतूर. वर्षामागें नेमलेला न्यू मेक्सिकोचा अधिकृत व्हिकर ॲपॉस्टोलिक. ॲगाथोनिकाचा बिशप. सिनसिनाटीमधून हा नेमणुकीचा विधि झाला. तेव्हांपासून तो त्याच्या ‘व्हिकरेट’च्या तपासांत

होता. सिनसिनाटीमध्यें न्यु मेक्सिकोची वाट त्याला कोणी सांगूं शकलें नाहीं--कारण कोणी त्या वाटेनें त्याआधीं मुळीं गेलेंच नव्हतें. फादर लतूर अमेरिकेंत आल्यापासून न्युयॉर्क ते सिनसिनाटी असा एक रेल्वेमार्ग तयार झाला होता; पण तो सिनसिनाटीशींच संपला होता. एका अज्ञात भूखंडाच्या मध्यभागीं न्यु मेक्सिको होता. ओहियोच्या व्यापाऱ्यांना तिकडे जाण्याचे दोन मार्ग ठाऊक होते. एक सेंट लुईपासून निघणारा 'सँता फे'चा मार्ग--पण तो भलताच धोक्याचा होता. कारण इंडियन लोकाचे हल्ले या मार्गांत मोठ्या प्रमाणावर होत. फादर लतूरच्या स्नेह्यांनीं सुचवलें कीं नदीमार्गानें न्यु ऑर्लिन्सला, तिथून मोठ्या बोटीनें गॅल्व्हेस्टनला, तिथून पुढें टेक्सस पालथा घालून सान आंतोनियोला आणि असें करीत रिओ ग्रँड व्हॅलीच्या वाटेनें न्यु मेक्सिको गाठण्याचा प्रयत्न व्यवहार्य होता. हाच प्रवास त्यानें केला होता, पण अडथळे केवढे आले होते! दुर्दैवाचे तडाके किती आणि केवढाले बसले होते!

गॅल्व्हेस्टन बंदराशीं त्याचें जहाज खडकावर फुटून बुडालें होतें. जवळचीं पुस्तकें सोडलीं तर सारी चीजवस्त त्यांत त्यानें गमावली होती. पुस्तकें तरी काय, प्राण पणाला लावला तेव्हांच हातीं लागलीं. व्यापाऱ्याच्या एका काफिल्याच्या संगती सोबतीनें त्यानें टेक्सस ओलांडलें होतें आणि सान आन्तोनियोशीं पोंचतांना, उलटणाऱ्या गाडींतून उडी टाकण्याच्या प्रयत्नांत तो जखमी झाला होता. दुखावलेला पाय बरा होईतोंवर तब्बल तीन महिने त्याला तिथेंच एका गरीब आयरिश कुटुंबाकडे मुक्काम करावा लागला होता.

मिसिसिपीच्या प्रवासाला आरंभ केल्यानंतर जवळ जवळ वर्षानें तो तरुण धर्मगुरू, उन्हाळ्यांतल्या एका सूर्यास्ताला, त्याच्या, उद्दिष्टाचें दर्शन घेऊं शकला. सॅन्ता फे! समोर, वैराण माथ्याच्या, सुरकुतल्या हिरव्या गार डोंगरांच्या पायथ्याशीं टेकाडांसारख्या बुटक्या बुटक्या भुरकट आकृति घोळका करून बसल्यासारख्या दिसत होत्या. वादळांत प्रचंड लाट उसळून फुटावी तसें या डोंगरांचें स्वरूप होतें. त्यांचा हिरवा रंग गडद आणि फिक्या अशा दोन छटांचा होता. दोन्ही छटांचे पुंजकेच्या पुंजके सर्वभर एकमेकांत न मिसळतां पसरलेले दिसत होते.

गाड्या पुढें सरकल्या आणि सूर्यही आणखी अस्तमान झाला; तशी डोंगरांच्या पायथ्याच्या लाल गुलाबी रंगाच्या टेकड्या उठून दिसूं लागल्या. मध्यंतरींच्या एका सखल भागांतून दोन प्रचंड बाहूंसारख्या त्या वर आल्या होत्या. त्या सखल भागांत सँता फे होतें! तुरळक, तुटक वाटणारें तें छोटेंसें विटकरी गांव...

मध्यंतरी हिरवळींचा चौकोन...सपाटीपासून खूप वर उठून आलेल्या मातीच्या दोन कळसांचें चर्च एका टोकाला. चर्चपासून लांबच्च लांब मुख्य सडक सुरू होत होती. झऱ्यापासून ओढा व्हावा तसें त्या चर्चपासून तें गांव वाढत, भरत, पसरत पुढें आलें होतें. संधिप्रकाशांत चर्चच्या कळसांना आणि घरांच्या छतांना गुलाबी कळा आली होती. मागच्या टेकड्यांच्या अर्धवर्तुळाकृति गुच्छापेक्षां ही कळा जरा अधिक गडद वाटत होती. मधून मधून पॉप्लर्सचे तुरे या रंगाच्या उधळणीला झुलून, डोलून शोभा आणीत होते.

हें सर्व डोळे भरून पहातांना तो तरुण बिशप एकटा नव्हता; त्याच्या शेजारीं घोड्यावर होता फादर जोसेफ व्हेलंट, त्याचा बालमित्र. या प्रवासांत त्यानें त्याला साऱ्या हालअपेष्टांत आपली सोबत संगत दिली होती. हे दोघे मिळून सँता फेमध्यें प्रवेश करते झाले--ईश्वराच्या सत्तेचे सेवक म्हणून !

तर मग फादर लतूर 'फे' पासून मैलोगणति अंतरावरच्या या वाळ-वंटांत, या वैराणीत कसा आला? त्यांत त्याच्यापाशीं माणसांचा आधार नव्हता, साधनांची सोबत नव्हती, तो वाट चुकला होता आणि परत योग्य वाटेला जाण्याचा मार्गही त्याला सांपडत नव्हता.

तो सँता फेला पोंचला आणि हकिकत अशी घडली : तिथल्या मेक्सिकन धर्मगुरूंनीं त्याचा अधिकार मानण्याचे नाकारलें. कोणी व्हिकरेट ॲपॉस्टोलिक वा बिशप ऑफ ॲगाथोनिका आपण ओळखत नसल्याचे त्यांनीं सरळ सांगून टाकलें. त्यांचें म्हणणें, ते होते डयुरँगोच्या धर्मगुरूंच्या अखत्याराखालीं आणि त्याहून वेगळें कांहीं त्यांना त्याच्याकडून कळलेलें नव्हतें. फादर लतूर जर त्यांचा नवा धर्मगुरू; तर त्याबद्दलचीं त्याची अधिकारपत्रें कुठें होतीं? फादर लतूरला माहीत होतें कीं हीं अधिकारपत्रें योग्य त्या सूचनांसहित डयुरँगोच्या धर्मगुरूकडे पाठवण्यांत आलीं होतीं. परंतु त्यापलिकडे त्याबाबत कांहीं घडलेलें नसावें हें त्यानें आतां जाणलें. या जगांत टपालखातें नव्हतें. डयुरँगोच्या बिशपला विचार-ण्याचा तांतडीचा आणि खात्रीचा मार्ग म्हणजे त्याला जाऊन भेटणें हाच्च होता. म्हणून जवळ जवळ वर्षाच्या यातायातीनंतर सँता फे गांठल्यावर कांही दिव-सांनीं फादर लतूर तसाच्च पुन्हा एकवार नव्या प्रवासाला एकटाच्च घोड्यावरून निघाला--हा नवा प्रवास निदान तीन सहस्त्र मैलांचा होता.

त्याला आधींच्च सांगून ठेवण्यांत आलें होतें कीं, रिओ ग्रँड मार्गाला जागो-जाग अनेक फाटे फुटत होते आणि त्याचा मार्ग चुकण्याची दाट शक्यता होती. म्हणून पहिले कांहीं दिवस तो फार जागरूक आणि सावध राहिला. मग त्याची

जागरूकता ओसरली असावी, आणि एका चुकीच्या फाट्याला तो वळला, पुढें आला. वाट चुकली हें त्याला उमगलें तेव्हां जवळचें अन्न संपून गेलें होतें आणि जनावरें परत फिरण्याला नाराज व्हावींत इतकीं थकलीं होतीं. हाही मार्ग कुठें तरी पोंचेलच असें मानून तो त्या मार्गानेंच पुढें पुढें चालला होता आणि मार्ग तर अधिकाधिक अस्पष्ट होत होता.

अचानक फादर लतूरला त्याच्या घोडींत कांही बदल जाणवला. प्रदीर्घ प्रवासानंतर प्रथमच तिनें माथें वर उचललें आणि ती खूर चाळवून फुरफुरूं लागली. मागचें ओझ्याचें खेंचर तसेंच करूं लागलें. दोन्ही जनावरांनी वेग वाढवला. त्यांना पाण्याचा सुगावा तर लागला नसेल?

असा जवळ जवळ तासभर उलटला, आणि मग दोन सुन्याच आकाराच्या टेकड्यांमधून वळसा घालून पुढें होतांच दोन्ही जनावरें खिंकाळूं लागलीं. खालीं, वाळूच्या लाटालाटांच्या त्या अवकाशांत हिरवळीची एक रेषा आणि एक वहाता जलप्रवाह दिसत होता. जलप्रवाहाची रुंदी तशी फार नव्हती आणि लतूरनें याआधी पाहिलीं होती त्याहून ही हिरवळ अधिक हिरवीजर्द होती. घोडीच्या मानेची, बाहुस्यांची वारंवार थरारणारी कातडी त्याला न जाणवती तर हें त्यानें मृगजळ मानले असते, तहानेपोटचा भास मानला असता.

पुढें त्या तरुण धर्मगुरूला जवळून तिथें दिसलें तें थंडगार वहातें पाणी, क्लोव्हरचीं शेतें, कापसाचे मळे, बाभळीचीं झुडपें, उजळ हिरव्या बागामधलीं छोटीं छोटीं, ओढ्याकडे मेंढरांचा कळप हांकून नेणारा मेंढपाळ पोरगा.

कांहीं क्षणांत, फार पाणी पिण्यापासून जनावरांना परावृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न तो करीत असता, डोक्यावर काळी शाल घेतलेली एक तरुण मुलगी त्याच्याकडे धांवत आली. इतका दयार्द्र चेहरा किती दिवसांत आपल्याला दिसला नव्हता, असें त्याला वाटलें. तिनें अभिवादन केलें तें अस्सल क्रिश्चन पद्धतीनें. आणि विचारलें, "आपण कुठून आलात, सिनोर?"

प्रवासी स्पॅनिशमध्यें उत्तरला, "बाळे, वाट चुकलेला मी धर्मोपदेशक आहें. तहानेनें जीव व्याकुळ झाला आहे."

"धर्मोपदेशक?" ती कळवळली. "छे! शक्य नाही! आणि तरीही मी तुम्हांला प्रत्यक्ष पाहतें आहे! याआधीं कधीं अशी घटना इथें घडली नाहीं. माझ्या बाबांच्या प्रार्थनेला प्रभूनें दिलेली ही 'ओ' असावी. पेद्रो, पळ, पळ, बाबांना आणि साल्व्हातोरला कळव जा."

.२.

तासाभरानें, वाळूच्या त्या टेकड्या अंधारल्यावर, तो तरुण धर्मगुरू त्या मेक्सिकन वसाहतीच्या प्रमुख स्थानीं जेवायला बसला होता. त्या वसाहतीचें नांव Agua Secreta (लपलेला ओघ) असें असल्याचें त्याला कळलें आणि तें नांव त्याला अत्यंत अन्वर्थक वाटलें. टेबलाशीं त्याच्यासमवेत त्याचा यजमान, म्हातारा बेनिटो, त्याचा वडील मुलगा आणि दोन नातू इतकींजणें होतीं. म्हातारा विधुर होता आणि ओढ्याशी धर्मगुरूला भेटलेली त्याची तरुण मुलगी जोसेफा हीच घराकडे पहात असे. आतांच्या जेवणांत मांसाचे फ्रिजोल्स, भाकऱ्या, बोकडाचें दूध, ताजें लोणी आणि पिकलेलीं सफरचंदें असे प्रकार होते.

पांढऱ्या शुभ्र भिंतींच्या या घरांत पाऊल ठेवल्यापासून फादर लतूरला एक प्रकारची मानसिक शांति मिळाली होती. घरांतला ओकेओकेपणा, साधेपणा, यांतच त्याचा गोडवा होता. त्यांना जेवण वाढणाऱ्या आणि आतां भिंतीशीं अंधारांत उभ्या राहिलेल्या गंभीर मुद्रेच्या जोसेफामध्यें असाच गोडवा त्याला वाटला होता. आतां ती त्याच्यावरच आपली आतुर नजर खिळवून उभी होती. मेणबत्तीच्या प्रकाशांत, सभोंवार बसलेल्या त्या चार पुरुष माणसांत फादर लतूरला कमालीचें घरच्यासारखें वाटत होतें. त्या सर्वांचें वागणें सौम्य आणि अदबशीर होतें, आवाज मृदु आणि रुचण्याजोगे होते. फादर लतूरनें जेवणा-आधीं प्रार्थना केली तेव्हां चौघे टेबलाशीं जमिनीवर गुडघे टेकून बसले होते. त्यांतला म्हातारा आजोबा तर म्हणत होता कीं त्यांच्या घरांतले राहून गेलेले धर्म-विधी उरकले जावेत म्हणून खुद्द ईश्वरानेंच फादर लतूरला या वाटेनें आणलें होतें. तशी त्यांची वसाहत आसपासच्या भागांत कोणाला माहीत नसल्याचें तो म्हणाला. ते कसवीत त्या जमिनींचीं करारपत्रें त्यांच्याकडे नव्हतीं आणि तो म्हातारा, अमेरिकन्स जमीन काढून घेतील म्हणून भ्यायलेला होता. त्यानें सांगितलें त्याप्रमाणें, त्यांच्या वसाहतींत कुणालाही लिहितां वाचतां येत नव्हतें. त्याचा सर्वांत थोरला मुलगा बायको शोधण्याकरतां लांब अल्बुकर्ककडे निघून गेला होता आणि तिथेंच त्यानें लग्नही केलें होतें. परंतु तेथल्या धर्मगुरूनें त्याच्याकडे मोबदला वीस पेसॉस एवढा मागितला होता. वीस पेसॉस म्हणजे

घराला कांचेच्या खिडक्या आणि सामानसुमान हवें म्हणून त्यानें सांठवलेल्यांतली निम्मी रक्कम अशी गेली. त्याचा धडा घेऊन त्याच्या भावांनीं आणि नात्यांतल्या मुलांनीं रीतसर लग्नें न करतांच घरांत बायका आणल्या, नांदवल्या होत्या.

फादर लतूरच्या प्रश्नांना उत्तरें देत त्या चौघांनीं आपली साधीसीधी कहाणी त्याला विदित केली. इथें सुखासाठीं आवश्यक तें सर्व कांहीं त्यांच्याकडे होतें. मेंढ्यांच्या कातड्यांपासून ते लोकर कार्ढात, तिचे कपडे विणीत, पोटापुरतें धान्य स्वकष्टानें पिकवीत. त्याशिवाय तंबाकू सुकीं फळें वगैरे बाजूच्या गोष्टी होत्याच. वर्षांतून एकदां पोरें सारें धान्य दळून आणण्याकरतां अल्बुकर्कला घेऊन जात. येतांना त्यांतलें कांहीं विकून ती कॉफी, साखर अशा कांहीं चैनीच्या वस्तू घेऊन येत. शिवाय मधमाशा पाळल्या होत्या, त्यामुळें साखर महाग असेल तेव्हां तिच्याऐवजीं मधाचा उपयोग होत असे. म्हाताऱ्या बेनिटोचा आजा चिउआहुआहून सामानाच्या बैलगाड्या लादून प्रथम त्या वस्तीच्या जागीं येऊन राहिला. तो किती सालीं आला हें बेनिटोलाही सांगता येत नव्हतें. पण तो म्हणाला, "फ्रेंचानीं त्याच्या राजाला ठार मारलें त्यानंतर थोड्याच दिवसांतली ही घटना आहे. घर सोडण्यापूर्वीं आजोबानीं राजाच्या या हत्तेबद्दल ऐकलें होतें आणि म्हातारपणीं ते त्याच्या हकि।ती आम्हांला सांगत."

फादर लतूर म्हणाला, "मला वाटतें मी फ्रेंचमन आहें हें तुम्ही लोकांनीं ओळखलेलें दिसतें."

तसें नव्हतें. त्यांनीं फादर लतूरबद्दल फारसें कांहींच जाणलें नव्हतें. त्यांना जाणवलें होतें एकच : कीं हा अमेरिकन नव्हे. म्हाताऱ्या बेनिटोच्या नातवांतला मोठा नातू योज् या पाहुण्यावर मोठ्या अनिश्चितपणें नजर खिळवून होता. तो दिसायला सुरेख होता आणि त्याच्या काहींशा उदास डोळ्यांवर झुलणारें काळ्या केसांचें झुलूप अधिकच मोहक भासत होतें. तो आतां प्रथमच बोलला.

"पॅड्रे अल्बुकर्कला सारे म्हणतात आम्ही सगळे आतां अमेरिकन झालों. पण तें खरें नव्हे. मी तर केव्हाही अमेरिकन होणार नाहीं. अमेरिकन म्हणजे पाखंडी."

फादर लतूर घाईनें म्हणाला, "छे छे, मुला उत्तरेकडे अमेरिकनांबरोबर मीं दहा वर्षें काढलीं आहेत. मला तर त्यांच्यांत कित्येक श्रद्धावान् कॅथॉलिक्स आढळले."

त्या तरुण मुलानें मान हलवली. तो म्हणाला, "आमच्याशीं लढत होते तेव्हां त्यांनीं तर आमचीं चर्चेस उध्वस्त करून टाकलीं. त्यांत घोडे बांधले.

आता आमचा धर्मही आमच्यापासून हिरावून घेतील ते. नाहीं नाहीं, पॅड्रे, आम्हांला आमचा धर्म हवा, पद्धत हवी. ”

फादर लतूर ओहिओमधल्या प्रॉटेस्टण्ट्सशीं असलेले त्यांचे स्नेहसंबंध सांगूं लागला तेव्हां त्यांना तें पटलेंच नाही. एका वेळीं दोन विचारांना त्यांच्या डोक्यांत जागा नव्हती. त्यांच्या दृष्टीनें धर्माचा पंथ एकच : कॅथॉलिक पंथ. बाकी जग पाखंडी होतें. एक गोष्ट त्यांना समजत होती, या फादरनें त्याच्या बोचक्यांतून त्याचीं अधिकारवस्त्रें आणलीं होतीं, ‘ आल्टर-स्टोन ’ आणला होता, इतरही आवश्यक गोष्टी आणल्या होत्या. उद्यां सकाळीं ‘ मास ’ साजरा केल्यावर तो त्यांच्या ‘ कन्फेन्शन्स ’ ऐकून घेणार होता, पोरांना ‘ बॅप्टाइज करणार होता, लग्नांवर धार्मिक शिक्कामोर्तब करणार होता.

जेवणानंतर एक मेणबत्ती उचलून फादरनें शेकोटीवरच्या फडताळांतल्या देवाच्या मूर्ति न्याहाळण्याला सुरुवात केली. अगदी गरिबांतल्या गरीब मेक्सिकन घरांतदेखील आढळणाऱ्या संतांच्या तसल्या लाकडी मूर्ति नेहमींच त्याला वेधक आणि अभ्यसनीय वाटत आल्या होत्या. एकासारख्या एक दिसणाऱ्या दोन मूर्ती त्यानें असल्या मूर्तींत अद्याप कुठें बघितल्या नव्हत्या. बेनिटोच्या घरच्या या मूर्ति इथें साठ वर्षांपूर्वी चिहुआहुआहून आलेल्या होत्या. कुणा श्रद्धाळू माणसाने त्या कोरल्या, रंगवल्या होत्या. मुळांत त्यांचा रंग उजळ पण आतां जुनेपणानें विटूं लागला होता. खेळांतल्या बाहुल्यांप्रमाणें या मूर्तींना कपडे नेसवलेले होते. ओहिओच्या चर्चेसमधून दिसत त्या, कारखान्यांतल्या बनावटीच्या मूर्तींपेक्षां या मूर्ति फादरला अधिक आवडत. औव्हर्नच्या जुन्या चर्चेसच्या दर्शनी भागावर कोरीव काम होतें त्यांत असल्या मूर्ति कोरलेल्या असत. ही लांकडी ‘ व्हर्जिन ’ म्हणजे खरीखुरी व्यथित माता होती—उंच, ताठ आणि प्रखर. मानेपासून कमरेपर्यंत विशेष उंच त्याहूनही कमर ते पाय या भागात उंच. पौर्वात्य चर्चच्या कांहीं कोरीव, कठीण मूर्तींच्या वळणाची ही मूर्ति होती. तिचा पोषाख काळा होता. त्यावर पांढरा ‘ॲप्रन’ होता. डोक्यावर काळा ‘ रेबोसो ’—गरीब मेक्सिकन बायका वापरीत तसला— होता. त्या मूर्तीच्या उजवीकडे होता सेंट जोसेफ. डावीकडे एक भेसूर दिसणारी अश्वारूढ मूर्ति होती. हिचा पोषाख मेक्सिकन ‘ रँचरो ’ चा म्हणजे खूप नक्षीकाम असलेली, मांड्यांशीं सैल अशी व्हेल्वेटची तुमान, व्हेल्वेटचीच बंडी रेशमी खमीस आणि उंच शेंड्याची, रुंद कडांची मेक्सिकन ‘ सॉंब्रे रो ’ टोपी—असा होता. रिकिबीशीं एक लांकडी स्क्रू पिळून घोड्यावर ही मूर्ति पक्की बसवली होती.

या मूर्तीकडे फादर लतूरनें लावलेली टक बेनिटोच्या धाकट्या नातवाच्या ध्यानीं आली. तो म्हणाला, "माझें नांव ज्याच्यावरनं ठेवलें तो संत-- सानतियागो."

फादर म्हणाला, "हो हो. सानतियागोच हा. माझ्यासारखा धर्मप्रसारक होता तो. आमच्या देशांत आम्ही त्याला सेंट जॅक्स म्हणतों. हातांत एक दंड आणि थैली धरलेली असते त्यानें--पण या भागांत त्याला घोडा लागणारच. ठीकच आहे."

मुलगा त्याच्याकडे साश्चर्य पहात होता. तो म्हणाला, "अहो पण हा संतच मुळीं घोड्यांचा. तुमच्या देशांत हें असें नाहीं वाटतें ?"

फादरनें मान हलविली. म्हणाला, "नाहीं. मला या गोष्टीची कल्पनाही नव्हती. हा घोड्यांचा संत कसा काय ?"

मुलानें सांगितलें, "हा घोड्यांना आशीर्वाद देतो आणि घोडया गाभण रहातात. इथल्या इंडियन्सचा सुद्धां यावर विश्वास आहे. कांहीं वर्षें जर का या संताकडे दुर्लक्ष झालें तर घोडया वितांना कांहीं ना कांही बिघाड होतो असा त्यांचासुद्धां अनुभव आहे."

रात्रीं झोंपण्यापूर्वीं चिंतन आणि प्रार्थना संपवून फादर लतूर बेनिटोच्या मऊ मऊ बिछान्यावर लेटला. अपेक्षेहून रात्र किती वेगळी निघाली याचा विचार तो करीत होता. वैराण माळावर पाण्यावांचून कुठें तरी रात्र काढावी लागेल, ज्युनिपरच्या झाडाखालीं प्रभुसारखें पाण्याविना तडफडत झोंपावें लागेल ही अपेक्षा. परंतु आतां तर तो एका उत्तम निवाऱ्याला, आरामशीरपणें, मऊ बिछायतीवर पहुडलेला. अंतःकरणांत बांधवांविषयींचा शांत जिव्हाळा दाटून राहिला होता. फादर व्हेलंट इथें असता तर म्हणाला असता, "हा चमत्कार !" क्रूसाच्या आकाराच्या त्या झाडापुढें बसून केलेल्या प्रभूच्या धांव्याचें हें फळ फादर व्हेलेंटनें मानलें असतें. फादर लतूरलाही हा चमत्कारच वाटत होता; परंतु त्याच्या प्रिय जोसेफला मात्र चमत्कार म्हणजे कांहीं तरी लोकविलक्षण आणि भव्य हवें असे. निसर्गाला अनुसरून नव्हे, त्याविरुद्ध. तो असता तर त्यानें फादर लतूरच्या घोडीला या वाटेनें आणणाऱ्या 'व्हर्जिन मेरी'च्या वस्त्राचा रंगही सांगितला असता. या साऱ्या प्रसंगाचें जणूं 'चक्षुर्वैसत्यम्' वर्णन त्याला करतां आलें असतें.

दुसऱ्या दिवशीं दिवस मावळतां; फादर लतूर एकटाच ओढ्याच्या कांठानें फिरत होता आणि त्याच्या मनांत सकाळच्या एकेक घटना घोळत होत्या. त्या लांकडी व्यथित व्हर्जिन मेरीपुढें बेनिटोनें आणि त्याच्या मुलानें फुलें आणि

मेणबत्त्या ठेवून तिला क्रूसात्मक अभिवादन केलें होतें. ‘मास’ला गांवांतला प्रत्येकजण--एकटी साल्व्हातोरची दुखणाईत बायको वगळली तर--आला होता. फादरनें मग ‘कन्फेशन्स’ ऐकल्या होत्या, लग्नें लावलीं होतीं, ‘बॅप्टिजम्स’ केले होते,--दुपारपर्यंत हें सारें चाललें होतें. मग ‘क्रिस्चनिंग’ची मेजवानी. ‘योज’नें आदल्या रात्रीं एक करडू मारलें होतें आणि आपलें काम उरकतांच जोसेफा तें शिजवण्यांत वहिनीला मदत करायला गेली होती. फादर लतूरनें त्यांतला आपला भाग मिरची न घालतां वाढायला तिला सांगितला तेव्हां त्या मुलीनें, असें तें खाण्यांत अधिक धर्म आहे का म्हणून विचारलें. घाईघाईनें फादरनें खुलासा केला कीं फ्रेंच माणसांना साधारणतः फार तिखट चालत नाहीं. यामागें, तिला आवडणारा एक पदार्थ ती उगींच वर्ज्य करील ही भीतीच होती.

मेजवानीनंतर झोंपाळलेल्या मुलांना घरोघर नेण्यांत आलें, मोठमोठ्या ‘कॉटनवुड’च्या झाडाखालीं प्रौढ पुरुष धूम्रपानाकरतां एकत्र आले. फादरला एकान्त हवासा वाटत होता. म्हणून तो सोबत नाकारून एकटाच फेरफटका मारायला निघाला होता. वाटेंत धान्य झोडण्याची जागा त्याला लागली होती. इथें हे लोक पिकलेलीं रोपें झोडीत, वाऱ्यावर दाणा साफ करीत. तेवढ्यांत मागें फादरनें ओरडा ऐकला म्हणून तो वळला. दिवसभर कोंडून राहिल्यामुळें आंबलेले मेंढे सैरावैरा चौफेर उधळत होते आणि पेद्रो त्यांना हांकत होता. धनुष्यांतून बाण सुटावेत तसे ते भरारा ओढ्यापार झाले. बिशपकडे त्यांनीं त्यांच्या जात्याच मिस्किल स्मिताच्या मुद्रेनें मुरडून पाहिलें. जवान मेंढे सडपातळ आणि बांधेसूद होते. त्यांचीं शिंगें वक्र गुळगुळीत आणि हनुवट्या टोंकदार होत्या. त्यांच्या मुद्रात कितीतरी प्रकार होते; परंतु त्या साऱ्या प्रकारांतही एक मिस्किलपणा कायम होता. ‘अंगोरा’ जातीच्यांना पांढरीफेक लांबसडक रेशमी लोकर होती. त्या उन्हांत त्यांना उड्या घेतांना पाहून ‘अॅपोकॅलिप्स’ मधलें एक प्रकरण स्मरत होतें--‘लॅम्ब’च्या रक्तांत न्हाले-ल्यांच्या शुभ्रपणाबद्दलचें. आपल्या मिश्र धर्मशास्त्राचें फादरला हंसू आलें. परंतु हे मेंढे मूर्तिपूजकांच्या कामासक्तीचीं प्रतीकें असले तरी, फादरनें स्वतःला समजावलें, त्यांच्या लोकरीनें अनेक निष्ठावान् क्रिश्चनांना ऊब दिली होती आणि रुग्णाइत अर्भकांना त्यांच्याच दुधानें ताकद येत होती.

गांवापासून वरच्या बाजूला मैलभर चालल्यावर त्याला ओढ्याचें मूळ लागलें. सभोंवतालीं साऱ्या बाजूच्या त्रिकोणी टेकड्या आणि मध्येंच आगापिच्छा न लागूं

देणारा हा पाण्याचा भळभळा उसळणारा प्रवाह. त्यावर 'कॉटनवुड'च्या झाडाचा एक चिंचोळ्या पानांचा 'वॉटर विलो' म्हणून प्रकार. या भूगर्भातल्या झऱ्याला इथें, अशा जागीं प्रकाशांत येण्याची संधि लाभली होती. परिणाम : हरळी, झाडें, फुलें, मानवी जीवन, छोटीं छोटीं घरकुलें आणि त्यांतून ईश्वरापुढें धूप घालावा तसा सकाळसंध्याकाळ आभाळाकडे तरळत जाणारा धूर.

ओढ्याच्या त्या मुखाशीं फादर किती तरी वेळ बसून होता. मावळत्या सूर्यानें आपली अखेरची सौम्य क्षीण धग गुलाबी छटांच्या घरकुलांच्या छतांवर आणि झगझगीत बागांवर धरली होती आणि सारें न दिपतां उजळून निघालें होतें. म्हाताऱ्या बेनिटोनें त्याला भाले, विजयचिन्हें, झऱ्यानजीक जमीन उकरतांना सांपडलेली तलवारीची मूठ--बहुधा स्पॅनिश--असें कांहीं कांहीं दाखवलें होतें. या जागीं मेक्सिकन्स पोंचण्याआधींच कोणीतरी मानवी जीव रहात होते हें यावरून स्पष्टच होतें. इतिहासाहून इथलें जीवन जुनें होतें. फादरला हें त्याच्या 'बिशॉप्रिक'चें छोटेंसें रूप वाटलें. शेकडों मैलांची तृषार्त भूमि, मग एक झरा, एक गांव, नातवंडांना शिकवण्याकरतां आपलें परंपरागत ज्ञान आठवूं पहाणारे वृद्ध. स्पॅनिश 'फ्रायर्स'नीं या भागांत पेरलेली, रक्ताचें शिंपण घालून वाढवलेली श्रद्धा वायां गेली नव्हती कीं नष्टही झालेली नव्हती. हवा होता कोणी नव्यानें या भूमीची, या श्रद्धेची जीव कष्टवून मशागत करणारा. सॅन्ता फेमधल्या उठावाचें आतां फादर लतूरला कांहीं वाटत नव्हतें; त्या उठावाचे नेतृत्व करणाऱ्या ज्येष्ठ, समर्थ स्थानिक धर्मगुरूचेंही, ताओसच्या फादर मार्तिनेंझचेंही कांहीं वाटत नव्हतें. फादर लतूरचें स्वागत करून त्याला हांकलून लावण्याकरतां हा मुद्दाम तेव्हां वेशीपर्यंत घोडदौड करीत आला होता! त्याचें तें मोठें मस्तक स्पॅनिश वळणाचा हिंस्र चेहरा, रेड्यासारखे रुंद बाहुटे, या साऱ्यानें त्याचा अवतार मोठा भयप्रद वाटे. परंतु फादरला आतां वाटलें कीं त्याच्या अमानुष सत्तेचे दिवस आतां जवळ जवळ संपुष्टांत आले आहेत.

## .३.

क्रिसमसच्या दिवसाची सायंकाळ. मेजशीं बसून नवा धर्मगुरू पत्रें लिहीत होता. सॅंता फेला परतल्यापासून त्याचा पत्रव्यवहार फुगला होता. परंतु आतां ज्यांवर

वांकून बारीक अक्षरांत तो विचारी सस्मित मुद्रेनें कांहीं लिहीत होता ते कागद ' मॉंसिनेरी 'कडे किंवा आर्चबिशपांकडे वा कोठल्या धर्म-पीठाच्या प्रमुखाकडे जाणार नव्हते. हे कागद जाणार होते फ्रान्सला, औव्हर्नला, त्याच्या गांवीं. तिथल्या एका विशिष्ट धुरकट, वळणावळणाच्या, चेस्टनटच्या छायेंत पसरलेल्या दगडी सडकेच्या गल्लींत.

मेक्सिकोंतल्या दीर्घ प्रवासाहून तो परत आल्यावर फक्त नऊच दिवस उलटले होते. ड्युरँगोला म्हाताऱ्या मेक्सिकन ' प्रिलेट 'नें कांहींशा दिरंगाईअंतीं, त्याचीं अधिकारपत्रें अवश्य त्या लेखी सूचनांसह त्याच्या स्वाधीन केलीं होतीं आणि हिंवाळ्याच्या आरंभाच्या आल्हाददायक उन्हांतून मजल दरमजल करीत, पंधराशें मैल तुडवून फादर लतूर सँटाफेला परत आला होता. परतल्यावर वैरभावाऐवजीं स्नेहभावच त्याच्या प्रत्ययास आला. मध्यंतरींच्या काळांत फादर व्हेलंटनें लोकांची मर्जी चागलीच संपादन केलेली होती. तिथला मेक्सिकन म्हातारा धर्मगुरू खुषीनें निवृत्त होऊन जुन्या मेक्सिकोंत त्याच्या कुटुंबियाना भेटायला निघून गेला होता. त्याच्या कारकीर्दीचे बरेवाईट परिणामही त्याच्याबरोबरच गेले. त्याच्या निवासस्थानाचा ताबा फादर व्हेलंटनें घेतला होता आणि स्थानिक सुतार आणि स्त्रिया यांच्या मदतीनें त्या घराची उत्तम घडी बसवली होती. अमेरिकन व्यापारी आणि फोर्ट मार्सीचा लष्करी प्रमुख यांनीं बिछायती, अभ्रे, कांही इतर सामानसुमान पाठवून आपलें औदार्य प्रकट केलें होतें.

हें घर जुनें, उन्हांत वाळवलेल्या कच्च्या विटाचें होतें, स्थानिक घरांच्या पद्धतीचेंच होतें, दुरुस्तीची गरज त्याला बऱ्याच जागीं होतीं तरीही तसें तें आरामशीर ठरण्याजोगें होतें. एका बाजूची टोकाकडची एक खोली फादर लतूरनें आपल्याकरतां वेगळी राखून ठेवली होती. आजची ही क्रिसमसची दुपार तिन्हीसांजेंत मिसळत असतां, याच खोलींत बसून फादर लतूर कांहीं लेखनकार्य करीत होता. खोली प्रशस्त आणि लांबट होती. शाडूच्या भिंती आंतून इंडियन कामकरणींच्या कुशल पंजांनीं बऱ्याच नितळ करून ठेवल्या होत्या. त्यांतला राहून गेलेला उंचसखलपणा मानवी हातांनीं सर्वस्वीं घडविलेल्या वस्तूंचें वैशिष्ट्य सांगत होता. रहाणाऱ्याला एकप्रकारचा जिवंतपणा, एकप्रकारचा विश्वास--वाटावा असा भरीवपणा या भिंतींत होता. खिडक्या, दारें, शेकोटी, इथें त्यांना मुद्दाम एक गोलाई आणण्यांत आलेली होती. फादरच्या अनुपस्थितींत भिंतींना पांढऱ्या रंगाचा हात देण्यांत आला होता, आणि शेकोटींतल्या धगीची लालसर छटा या पांढऱ्या पृष्ठभागांवर लाटालाटांनीं नाचत होती. आढीं होतीं सेडरच्या अवजड ओंडक्यांचीं

बनवलेली. त्यावर ' अॅस्पेन ' चीं रोपटीं--जवळ जवळ एकाच आकाराचीं--दाटीदाटीनें पसरून ठेवलीं होतीं. जमिनीवर जाडजूड इंडियन ब्लँकेटें टांकलेलीं होतीं. दोन जुनीं, सुंदर नक्षीकामाचीं ब्लँकेटें भिंतीवर लटकवलेलीं होतीं.

शेकोटीच्या दोन्ही अंगांना भिंतीत फडताळें काढण्यांत आलीं होतीं. मखरवाल्या एकांत फादरचा क्रूस होता आणि लांकडी दार असलेल्या दुसऱ्यांत कांहीं मौल्यवान, सुंदर ग्रंथ-फादरचें उरलेलें ग्रंथालय खोलीच्या एका कोपऱ्यांत उघड्या खणांतून पसरलेलें होतें.

घरांतलें सामानसुमान बहुतेक सारें फादर व्हेलंटनें निघून गेलेल्या मेक्सिकन धर्मगुरूकडूनच विकत घेतलें होतें. तें अवजड होतें, कांहींसें किचकटही होतें. पण अनाकर्षक नव्हतें. प्रत्येक वस्तू कुऱ्हाडीच्या घडणीची होती, कारण त्या काळांत उभ्या उत्तर मेक्सिकोंत एकही 'टर्निंग-लेथ' किंवा ' सॉ-मिल ' नव्हती. वस्तूंचे सुटे भाग प्रथम घडवून ते आजच्यासारखे लोखंडी खिळ्याबिजागरांनीं जोडण्याऐवजीं तेव्हां लांकडी खिळ्यांनीं जोडीत. फादर लतूर लिहीत बसला होता तें मेज स्थानिक घडणीचें नव्हतें; अमेरिकन घडणीचें, वॉलनटचें होतें. फादर व्हेलंटच्या सूचनेवरून किल्ल्यांतल्या अधिकाऱ्यांनीं तें पाठवून दिलें होतें. मेणबत्त्यांचीं चांदीचीं टोपणें तर फादरनें फ्रान्सहूनच आणलेलीं होतीं. त्याला तीं त्याच्या एका आवडत्या आतेनें दिलीं होतीं.

कागदावर फादर लातूरची लेखणी भरारा धांवत होती, मागें जांभळ्या शाईचीं फ्रेंच लिपीतील वळणदार अक्षरें एका हारीनें उरत होतीं.

"प्रिय बंधू, माझ्या राखीव खोलीत बसून हें पत्र लिहीत असता, शेकोटींतल्या 'पिनॉन' लाकडांचा गंध खोलभर पसरून राहिला आहे. (सेडर लाकडाचा हा प्रकार आम्ही इथें केवळ जळणाकरतांच वापरतों. त्याचा गंध भरपूर पण उग्र नव्हे; मृदु. या 'धूपा'च्या धुंद वातावरणांत आम्ही आमचीं अत्यंत क्षुद्र कृत्यें-देखील उरकीत असतों.) असें वाटतें आहे की इथला हा आराम, ही शान्ति अनुभवण्याकरितां तूं आणि माझी प्रिय ताई इथें हवीं होतात. आम्ही धर्मप्रसारक इथें फ्रॉक-कोट आणि रुंद कडांची टोपी वापरतों आणि अमेरिकन व्यापाऱ्यां-सारखे दिसतों. रात्रीं घरीं येऊन माझा जुनाच झगा अंगावर चढवणें म्हणजे केवढें तरी सुख वाटतें. मगच मला आपण कोणी धर्मगुरू असल्यासारखें वाटूं लागतें--कारण उभा दिवस, ' व्यापारी ' !--आणि गंमत म्हणजे हा झगा चढवला म्हणजेच आपण फ्रेंचमन असल्यासारखेंही वाटतें. सारा दिवस भाषा अमेरिकनांची, विचारही अमेरिकन म्हणावेत असे--अगदीं मनसुद्धां जणूं

अमेरिकन होऊन जातें. अमेरिकन व्यापाऱ्यांची, त्यांपेक्षां किल्ल्यांतल्या अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांचीं, माणुसकी पाहिली कीं मनोभावें असें होतेंच. वेगळेपण टिकवावें असें वाटतच नाहीं. वर वरही तें टिकत नाहीं. या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यांत माझ्या हातून कांहीं साहाय्य व्हावें अशी इच्छा आहे. माझें साहाय्य त्यांना किती होऊं शकेल याची त्यांना कल्पना नाहीं. या कंगाल मेक्सिकनांना ' खरेखुरे अमेरिकन्स ' बनवावयचे तर लष्करापेक्षां तें आम्ही धर्मप्रसारकच लौकर साधूं शकूं. त्यांतच या लोकांचें कल्याणही आहे. त्यांची स्थिति सुधारण्याचा दुसरा मार्ग उपलब्ध नाहीं.

" पण बंधू, माझ्या इथल्या कार्याबद्दल आणि हेतूंबद्दल लिहिण्याची ही वेळ नव्हे. आज रात्रीं आम्ही आमच्या देशापासून एकटेच दूर येऊन पडलेलों आहों; परंतु दुःखी नाहीं. रोमांचित होऊन घरच्या आठवणी करतों आहों. आमच्याकडे काम करणाऱ्या मेक्सिकन बाईला फादर जोसेफनें आज रजा दिली आहे आणि तो स्वतः क्रिसमसचा स्वयंपाक करतो आहे. वास्तविक त्याला या दोन तीन दिवसांत क्रिसमस आल्यामुळें चर्चचें फार काम पडलें आहे; पण विश्रांति घ्यायला तो तयार नाहीं. त्याचें ब्रीद तुला आहेच माहीत : 'कामांत विश्रांति'. ड्युरँगोहून येतांना त्याच्याकरता ऑलिव्ह तेलाची एक बाटली मी आणली होती ( ऑलिव्ह-तेल म्हणतों कारण नुसतें ' तेल ' म्हणजे इथें केवळ गाड्यांच्या चाकांना वंगण एवढेंच मानतात. ) आणि सध्यां तो कसलें तरी ' सॅलड ' शिजवतो आहे. हिंवाळ्यांत आमच्या इथें भाजीपाला नसतो. ' लेट्युस 'चें तर नांवही कोणी ऐकलेलें नाही. सॅलडच्या खास तेलाविना सॅलड बनवणें जोसेफला जड जातं आहे. कारण ओहिओंत हें तेल महाग भावानें का होईना, पण उपलब्ध असे. अख्खी संध्याकाळ त्यानें स्वैपाकघरांत घालवली आहे. शेंगड्या, भांडी यांचेंही दुर्भिक्ष्यच आहे; पण जोसेफच्या 'सुगरण'-पणानें याही स्थितींत अद्याप कधीं दगा दिलेला नाहीं आणि तूं असें समजून चालायला हरकत नाहीं कीं, आज रात्रीं आम्ही दोघे फ्रेंचमन एकत्र बसून अत्यंत रुचकर भोजनाचा समाचार घेऊन तुझें शुभ इच्छित सुरापान करूं. "

फादर लतूरनें लेखणी खालीं ठेवली आणि शेकोटींतल्या एका काटकीनें खोलींतल्या दोन मेणबत्त्या पेटवल्या. मग हात झाडीत खिडकीशीं येऊन बाहेरच्या फिक्कट निळ्या अंधारल्या आकाशाकडे पहात उभा राहिला. वर सायंतारा त्या अवकाशांत आपल्याच चंदेरी तेजांत न्हाऊन उठून दिसत होता. त्याचा ' सेमिनरी 'तला मित्र अत्यंत गोड आवाजांत म्हणे तें ' आव्ह मारी

स्टेला ' हें भक्तिगीत त्याला आठवलें; तेंच गुणगुणत तो मेजाकडे परतला. दौतींत त्यानें पुन्हा लेखणी बुडवली आणि दार उघडलें. शब्द आले,

" जेवणाची सज्जता झाली आहे. चलावें, मॉसिनोर. "

फादरनें मेणबत्त्या उचलल्या, जेवणाच्या खोलीकडे तो गेला. तिथें जेवण सज्ज होतें आणि फादर व्हेलंट स्वयंपाक्याचा ' ॲप्रन ' बदलून आपला झगा चढवीत होता. धगीशीं बराच वेळ काढल्यानें त्याच्या मुद्रेवर तांबूसपणा चढला होता आणि त्यामुळें तो अधिकच भाबडा वाटत होता. परंतु नवख्यानें फादर व्हेलंटचा चेहरा प्रथमच पाहिला असता तर याहून कुरुपता विरळी, असेंच त्याचें मत बनलें असतें. फादर व्हेलंट बुटका होता, हाडकुळा होता. घोड्यावरच बरेंच आयुष्य गेल्यानें फेंगड्या पायांचा झाला होता आणि त्याच्या व्यक्तिमत्वांत दयार्दता आणि उल्हसित वृत्ति या दोनच वैशिष्ट्यांपलिकडे कुठलेंही सौंदर्य सांपडण्याजोगें नव्हतें. वय चाळिशीचेंच असलें तरी तो वृद्ध दिसे. त्याच्या कातडीला एक प्रकारचा दडसपणा आलेला होता आणि त्यांत उघड्या हवेंतल्या जीवनामुळें ती सुरकुतलेलीही दिसे. विशेषतः मानेवरच्या सुरकुत्यांमुळें फादर अधिकच वयावरचा वाटे. बसकट शेंड्याचें ठसठशीत नाक, रुंद भरीव जिवणी, मोठा जबडा, अति कामामुळें एकमेकांवर घट्ट दडपलेले जाड ओठ हें त्याच्या चेहऱ्याचें वर्णन. केसांना उन्हातान्हांत हिंडण्यामुळें वाळल्या गवताचा पिवळा रंग चढला होता. त्याचे डोळेही कोंजे होते. बाहुल्या इतक्या फिक्कट निळ्या होत्या कीं त्यांत कांहींहि ठसठशीत भाव प्रगटत नसे. बाह्यतः तरी त्याच्यांतली हिरीरी, जिद्द आणि ज्वलंत प्रज्ञा सूचित करण्याजोगें कांहीं त्याच्या कुडींत नव्हतें. तरीही अर्ध्या मेक्सिकन कुळीचीं माणसें त्यांच्यांतले हे गुण प्रथमदर्शनीं ताडत. फादर लतूर सँता फेला परतल्यावर त्याला आढळला तो स्नेहभाव व्हेलंटच्या कार्यापोटचा आणि त्याच्याविषयींच्या स्थानिक लोकांच्या मनांतल्या विश्वासापोटचा होता. आपल्या हाडकुळ्या कुडींत बारा दणकट माणसांचें मनोबल वागवणारा हा भाबडा, अस्सल, चिवट आणि आनंदी माणूस त्या लोकांना प्रिय झाला असला तर नवल नव्हतें.

जेवणघरांत येतांच फादर लतूरनें मेणबत्त्या शेकोटीच्या चौथऱ्यावर रोंवल्या; कारण टेबलावर आधींच सहा होत्या. भुरकट रंगाचें रश्श्याचें भांडें त्यांच्या प्रकाशांत उजळून निघालें होतें. मिनिटभर दोघांनीं स्तब्ध उभें राहून प्रार्थना केल्यावर फादर जोसेफनें झांकण दूर करून बश्यांमध्यें रस्सा वाढला. 'क्राउटन्स ' आणि कांदे घालून तो केला होता. फादर लतूरनें त्याची चिकित्सकपणें रुचि घेतली

आणि जोसेफकडे पाहून स्मित केलें. असा कांहीं वेळा रश्श्याचा चमचा त्याच्या तोंडापर्यंत जाऊन रिता होऊन परत आल्यावर मागें रेलून तो म्हणाला,

" खरेंच गड्या, मिसिसिपि आणि पॅसिफिक समुद्र यांच्या दरम्यान पसरलेल्या या साऱ्या अवाढव्य प्रदेशांत तुझ्यासारखा रस्सा बनवणारा कसबी माणूस दुसरा नसेल ही कल्पना मोठी रोचक आहे. "

जोसेफ म्हणाला, " असलाच तर तोही कोणीं फ्रेंचमन असेल. " झग्याच्या पुढल्या भागाला त्यानें नॅपकिन अडकवला होता. आणि विचारांत, कल्पनेंत वेळ न घालवता तो सरळ खात सुटला होता.

फादर लतूर म्हणाला, " तुझें कसब कमी लेखण्याचा माझा मानस नाहीं, जोसेफ, पण यावर विचार करतां असेंच म्हणावें लागतें कीं असा रस्सा हें केवळ एका माणसाचें काम नव्हे. एका सतत विकसित अशा परंपरेचा हा वारसा म्हणावा लागतो. या एका रश्श्याला जवळ जवळ हजार वर्षांची परंपरा आहे. "

मधोमधच्या रश्श्याच्या भांड्याकडे जरा तावूनच पाहून मग अवकाशांत कुठें तरी नजर लावीत--निदान अशीं त्याची नजर वाटे--जोसेफ म्हणाला, " तें खोटें नाहीं. पण--" लतूरला अधिक रस्सा वाढीत त्यानें पुढें म्हटलें, " 'लीक्स'शिवाय उत्तम रस्सा करावा तरी कसा आणि किती दिवस माणसानें ? नुसतेच कांदे खात किती दिवस रहायचें ? "

रश्श्याचें भांडें मग आंत नेऊन ठेवून त्यानें 'रोस्ट चिकन' आणि आणखी एका पदार्थाचें भांडें बाहेर आणून टेबलावर ठेवलें. फोडी करीत करीत त्यानें पुढें विचारलें, " कडदणें आणि कंदमुळें या सॅलडमधून किती दिवस ओरपायचीं ? तें कांहीं नाहीं, आपण इथें थोडीं बागाइत केलीच पाहिजे. माझी 'सांदस्की'ची बाग ! मला तिच्यापासून तोडून आणायचा गुन्हा केलास तूं ! सांग, माझ्या बागेंतल्यापेक्षां उजवा 'लेट्युस' अख्ख्या फ्रान्समध्यें कधीं तूं खाल्ला होतास ? आणि माझा द्राक्षांचा मळा. द्राक्षें खावींत तर तिथलीं ! काय जमीन तिथली ! तुला सांगून ठेवतों, एक दिवशीं द्राक्ष्यांच्या वेलीं साऱ्या 'लेक एरी'ला झांकून टाकतील ! माझ्या द्राक्ष्यांपासून बनवलेली दारू जो कोणी पीत असेल त्याचा हेवा वाटतो मला. पण जाऊं दे...हेंच धर्मोपदेशकाचें आयुष्य ! त्यानें फक्त पेरायचें. उगवेल तें खायचें दुसऱ्यांनीं. "

आज क्रिसमसचा दिवस. त्यामुळें हे दोघे मित्र त्यांच्या मायबोलींतूनच या गप्पा करीत होते. आपापसांतही इंग्रजींत बोलायची संवय त्यांनीं वर्षानुवर्षाच्या

सरावानें लावून घेतली होती, पण विशेष प्रसंगीं भाषा फ्रेंचच. अलिअलिकडे स्पॅनिश भाषेची संवय लावून घेण्याकरतां त्याही भाषेंत ते गोष्टी करीत.

जोसेफच्या उद्गारांवर फादर लतूर म्हणाला, " केव्हां केव्हां सँडस्कींतल्या तुझ्या जीवनाबद्दलही तूं थोडा फार नाखूष असायचास. म्हणायचास, अखेर आपण घरकोंबडे पॅरिश-प्रीस्ट म्हणूनच मरणार. "

"तें तर आहेच. ओहिओंत म्हणतात त्याप्रमाणें, केक खायलाही हवा आणि पुन्हा तोच जवळ ठेवायलाही हवा, तसें आहे हें. बस्स ! पुरें झालें हें. जीं, आलों एवढें लांब आलों. आतां मला याहून अधिक पुढें ओढूं नकोस." लाल मद्याच्या एका बाटलीचें बूच तो आता बोटांनी उचकटून काढूं पहात होता. " 'सेंट थॉमस डे'ला एके ठिकाणीं पोर बॅप्टाइज करायला गेलों होतों, तिथून तुझ्या करतां ही याचना करून आणली. जवळची फ्रेंच दारू एकाद्या सधन मेक्सिकन माणसाला दान करायला लावणें सोपें कर्म नव्हे. या लोकांना या दारूची किंमत कळते. " कांहीं थेंब ओतून घेऊन त्यानें त्या मद्याची रुचि चाखली. "बुचाची रुचि किंचितशी दारूंत उतरली आहे. या लोकांना ही नीट राखावी कशी तें कळत नाही. पण चालेल. धर्मप्रसारकांना हीहि वाईट नाहीं."

" हां, जोसेफ, तुला याहून पुढें ओढूं नये म्हणून तूं मला चापलें आहेस; " हनुवटीखालीं पंजांत पंजा गुंतवून धरून, मागे रेलल्या स्थितींत फादर लतूर म्हणाला, " पण आपला हा भाग पुढें आणखी पसरला आहे तरी कोठवर तें मला जाणून घ्यायला हवें. किल्ल्याचा प्रमुख या बाबतींत माझ्याइतकाच अज्ञानांत आहे. तो म्हणतो, ताओसला रहाणाऱ्या स्काउट किट कार्सनकडून मला कांहीं पत्ता लागूं शकेल. "

"इतक्यांत तुझ्या एकूण अखत्याराच्या गोष्टी नकोत, जीं, सध्या सँता फे हाच आपला कामाचा टापू. इथं प्रथम व्यवस्था लावूं. उद्यां इथल्या चर्च-वॉर्डन्सशीं मी बोलणार आहे. झिंगलेल्या गुराखी पोराना त्यांनीं मध्यरात्रीच्या 'मास'च्या वेळीं आंत घेतलें आणि प्रार्थनेंत सारा व्यत्यय आला. तीर्थपात्राची खराबी झाली. मी म्हणतों, करण्याजोगें अद्याप इथेंच कितीतरी आहे. मी तर ठरवलेंय कीं वर्षभरांत तीन दिवसांहून अधिक दिवस इथून कुठें जायचें नाहीं."

फादर लतूर स्मित करता झाला. मान हलवीत म्हणाला, " सेमिनरींत असतांना तूं असेंहि ठरवलें होतेंस कीं आत्मचिंतनांत आयुष्य व्यतीत करायचें."

फादर जोसेफची नजर उजळून उठली, मुद्रा उजळून उठली. तो म्हणाला, "अद्याप ती आशा मी सोडली आहे असें समजूं नकोस. कधींतरी तूं मला

रजा देशील आणि मग मी फ्रान्समधल्या एकाद्या आश्रमांत राहून आयुष्याची अखेर मनाजोगती साधीन. आज तरी माझ्या दैवांत हें वणवणीचेंच आयुष्य आहे. मात्र याहून जास्त वणवण मला यानंतर नाहीं चालणार हं, जीं. ''

लतूरनें मान हलवली तो पुटपुटला, '' तें कोण सांगू शकणार ? ''

डोंगराच्या हारी, वैराण माळ, खोल खोल दऱ्या, पुरानें रोंरावणाऱ्या नद्या, हेंच ज्याचें जीवन झालें होतें, अज्ञात प्रदेशांत येशूचा क्रूस वाहून नेण्याची कामगिरी जो कित्येक वर्षें पार पाडीत आला होता आणि या कामांत कित्येक खेंचरें, घोडे, स्काउट्स आणि गाडीवान यांना पुरून उरला होता तो हाडकुळा जोसेफ जींला आतां अगदीं काकुळतीनें म्हणाला, '' नाहीं नाहीं, जीं फार लांब आलों. याहून अधिक नको. '' मग विषयांतराची घाई करून त्यानें वेगळीच गोष्ट काढली.

'' कडधान्याचें हें सॅलडच काय तें मी तुझ्याकरतां आज त्यांतल्यात्यांत चांगला पदार्थ म्हणून बनवूं शकत होतों. पण मला वाटतें, कांदे घालून आणि डुकराच्या खाऱ्या मांसांचे नांवापुरते तुकडे टाकूनही तें तेवढें वाईट झालेलें नाहीं. ''

मनुका घालून शिजवलेल्या 'कॉम्पोट'चा समाचार घेत घेत ते त्यांच्या जुन्या बागेंत लागत त्या पिवळ्या जर्द, मोठाल्या 'कॉम्पोट्स'च्या गोष्टी करूं लागले. दोघेही आठवणींत रंगले. टेकडीवरून वळसे घेत, एकीकडे बागेच्या ओबडधोबड भिंती आणि एकीकडे उंच 'हॉर्स-चेस्टनट'चीं झाडें यांच्यामधून, रात्रीच्या निवांततेत, रस्त्याकडेच्या मिणमिणत्या दिव्यांचे ठिपके मोजीत, खालीं जाणाऱ्या वाटेनें खालीं उतरले. टोकाशीं समोर चर्च होतें. फादर लतूरनें जिथें पहिलें ' कम्युनिअन ' दिलें तें चर्च. त्याला सामोरी एकासारख्या एक झाडांची एक हार. या झाडांखालीं मंगळवारीं आणि शुक्रवारी बाजार भरे.

या आठवणींत ते रंगले असतां--सहसा या मोहांत ते पडत नसत--बंदुकीच्या बारांनीं, रक्त गोठविणाऱ्या किंकाळ्यांनीं आणि घोडदौडीच्या आवाजांनीं त्यांना खडबडवून जाग आणली. फादर लतूर तर जागचा उठलाच; परंतु फादर जोसेफनें त्याला थोपवलें. तो म्हणाला,

''स्वस्थ रहा. गेल्या 'ऑल सोल्स डे'च्या रात्रीं असाच प्रकार झाला होता. काल रात्रीं चर्चमध्यें घुसले तसल्या झिंगलेल्या गुराख्याच्या पोरांनीं त्या रात्रीं जवळच्या वस्तींतल्या इंडियन पोरांना पण दारू पाजून तर्र केलें आणि सगळे मिळून अशाच पद्धतीनें किल्ल्यावरच्या सैनिकांना पुकारीत दौडत गेले होते.''

.४.

नव्या निवासस्थानांतल्या पहिल्या रात्रीनंतर सकाळीं फादर लतूरला जाग आली ती एका सुखद मनस्थितींत प्रवासांत मध्यंतरी घोडा बदलून, जवळ जवळ साठ मैलाची अखंड मजल मारून रात्रीं तो घरीं पोंचला होता. यामुळेंच, सकाळीं उशीरसरच तो झोंपला होता. सहा वाजतां 'अँगेलस' चे टोले ऐकून त्याला पहिली जाग आली. हळू हळू झोप आणि गुंगी उडून तो संपूर्ण जागा झाला या भासांत की तो रोममध्यें होता. ' आव्ह मारिया ' चे टोल पडत होते. आणि किती अचूक ! ( एकूण नऊ टोले एकापाठोपाठ; त्यांत दर तीनांनंतर किंचित् अतर. ) हे टोले पाडणारी घंटा तरी किती मधुर वाजत होती. चंदेरी फुग्यासारखा एकेक टोला हवेंत अचळ उठत होता, तरंगत येत होता. पुरे नऊ टोले पडण्याआतच फादरच्या जाणिवेतलें रोम पुसलें गेलें. आणि त्या टोल्यांमागें कांहींतरी पौर्वात्य त्याला जाणवूं लागलें. 'पाम'चीं झाडें त्याच्या नजरेपुढें तरळलीं. त्यानें कधीं न पाहिलेलें जेरुसलेम त्याला आठवलें. क्षणभर डोळे तसेच मिटलेले ठेवून, तो या नव्या भासांत उत्कटतेनें रमला. मागें एकदां असाच तो कुडीचें बधन टाकून लांब जाऊन पोंचला होता. न्यू आर्लिन्सच्या एका सडकेवर हें घडलें होतें एका वळणावर वळून तो पिवळ्या सुगंधी फुलांची परडी घेतलेल्या एका म्हाताऱ्या स्त्रीला सामोरा आला होता. त्याला निमिषार्धांत नांव स्मरलें 'मिमोसा'- —परंतु त्याआधींच तो फ्रान्सच्या दक्षिण भागांत एका बागेंत पोंचला होता. लहान असतांना, एका हिंवाळ्यांत, आजारांतून बरें होण्याकरता त्याला तिथें ठेवण्यांत आलेलें होतें. आणि आतां, घंटेच्या या मधुर मुलायम टोल्यानीं त्याला असेंच कुठल्या कुठें नेऊन सोडलें होतें.

कॉफी पिण्याकरता तो फादर व्हेलंटसमोर येऊन बसला तेव्हां, कोठलेंही गुपित राखूं न शकणाऱ्या त्या भाबड्या माणसानें उत्सुकतेनें त्याला, त्यानें कांहीं ऐकलें का म्हणून विचारलें.

फादर लतूर म्हणाला, " अँगेलस वाजतांना ऐकल्यासारखें मला वाटलें, फादर जोसेफ. पण मन सांगतें कीं तें तर अशक्य आहे. ती घंटा ऐकायची तर प्रदीर्घ सागरी प्रवास मला प्रथम केला पाहिजे. "

" छे छे. " व्हेलंट म्हणाला, " इथेंच, जुन्या सान मिगुएलच्या तळघरांत मला ती घंटा आढळली. इथें ती निदान शंभर वर्षें पडून असल्याचें मला सांगण्यांत आलें. ती पेलणारा चर्च टॉवर इथें नाहीं—कारण तिचें वजन निदान आठशें पौंडाचें तरी आहे. परंतु आपल्या चर्चमागल्या जागेंतच मीं एक कमान बांधून घेतली आणि मदतीला बैल लावून आम्ही ती एकदांची त्या कमानीवर टांगली. तुम्ही आल्यावर ती वाजवण्याकरतां एका मेक्सिकन मुलाला मी ती वाजवायची कशी तें शिकवून ठेवलें. "

" पण ती इथें आली तरी कशी ? मला वाटतें, ती स्पेनमधली असली पाहिजे. "

" हो. तिच्यावर कोरलेला मजकूर स्पॅनिश भाषेंत आहे. सन १३५६ आहे. बैलगाडींतून ती मेक्सिको शहरांतून इथें आणण्यांत आली असावी. काम मोठें कठीण होतें, यांत शंका नाहीं. ती तयार कुठें करण्यांत आली तें मात्र कोणालाच सांगतां येत नाहीं. परंतु त्यासंबंधांत एक हकिकत सांगतात : मूर लोकांबरोबर झालेल्या लढायांत सेंट जोसेफला अशी एक घंटा वहाण्याचा नवस बोलण्यांत आला होता. त्याप्रमाणें नवस बोलणाऱ्या, वेढ्यांत सांपडलेल्या त्या अज्ञात नगरांतल्या लोकांनीं जवळचें सोनें नाणें आणून, तें एकत्र करून इतर धातूंत वितळवलें आणि त्याची ही घंटा ओतली. या घंटेंत चांदी बरीच आहे. एरवीं टोल्यांच्या आवाजांत एकढी माधुरी आलीच नसती. "

फादर लतूर विचारमग्न झाला. म्हणाला, "स्पॅनिश लोकांनीं एकत्र केलेली चांदी होती खरी म्हणजे मूरिश. होय ना ? असें धरून चालूं की ती अस्सल मूरिश नसेल; पण तिचे दागदागिने आणि वस्तू बनवल्या होत्या मूरिश वळणाच्या. कारण चांदी ओतण्याबाबत स्पॅनिअर्डसना तर तेव्हां कांहीं माहिती नव्हती. ते ती कला मूर लोकांकडून शिकले हा इतिहास आहे. "

" तुझें म्हणणें काय आहे, जी ? " फादर जोसेफनें उताविळीनें विचारलें. " ही माझी घंटा तूं कमअस्सल ठरवणार आहेस ? "

लतूरनें स्मित केलें. " तसें कांहीं माझ्या मनांतही नाहीं. " तो म्हणाला. " सकाळीं मीं ती ऐकली आणि कांहींतरी पौर्वात्य वातावरणाचा अनुभव मला आला. तो कां त्याचा माग मी घेतों आहे. मॉण्ट्रिअलमधल्या एका विद्वान स्कॉट जेसुइटानें मला एकदां असें सांगितलें होतें कीं, आपल्या पहिल्या घंटा आणि युरोपभर धार्मिक कारणांकरतां घंटेचा उपयोग करण्याची कल्पना, ही प्रथम पूर्वेकडून आली. तो म्हणाला होता, ' टेम्प्लर्स 'नीं अँगेलस धर्मयुद्धाहून परततांना

बरोबर आणली आणि तिची परंपरा मुळांत खरें तर मुस्लिम धर्मातली आहे. ”

फादर व्हेलंटनें तक्रार केली, “ हे विद्वान लोक सगळ्यांत कांहींतरी खुसपट काढतात. त्यांना मुळीं उदात्त कांहीं पहावतच नाहीं. ”

“ तें कसें काय? मला तर या तुमच्या घंटेंत मूरिश चांदी आहे असें वाटल्यानें आनंदच झाला. आपण प्रथम इथें आलों तेव्हां साऱ्या सांता फेमध्यें उत्तम कारागीर आपल्याला मिळाला तो चांदीचें काम करणारा. स्पॅनियर्डस्नीं या बाबतींतलें आपलें कसब मेक्सिकनांना शिकवलें आणि मेक्सिकनांनीं तें ‘ नाव्हाजो ’ना दिलें आहे. पण मुळांत हें मूर लोकांचें. ”

फादर व्हेलंट म्हणाला, “ मी कांहीं कोणी विद्वान नव्हेच. आणि त्यांत आज सकाळीं आतां आपल्यापुढें अनेक व्यावहारिक प्रश्न आहेत. मेक्सिकोहून परत चाललेल्या सांता क्लाराच्या इंडियन मिशनच्या एका म्हाताऱ्या धर्मगुरूशीं मी तुझी भेट आगाऊच ठरवून ठेवली आहे. नुकताच तो अवर लेडी ऑफ ग्वाडालूपच्या यात्रेलाही जाऊन आला आहे आणि त्याच्या अनुभवांची कहाणी त्याला तुझ्यापुढें निवेदन करायची आहे. दीक्षा घेतल्यापासून त्याच्या मनांत या यात्रेला एकदां जायची इच्छा होती. तुझ्या अपरोक्ष मी त्याच्याशीं बोललों त्यांत एवढें कळून आलें कीं न्यु मेक्सिकोमधल्या सर्व कॅथॉलिकांच्या दृष्टीनें हें यात्रास्थान फार मोलाचें मानलें जातें. या नवीन जगांतली ‘ ब्लेसेड व्हर्जिन ’च्या अस्तित्वाची आणि तिच्या कृपेची ही एकुलती एक अस्सल खूण मानण्यांत येते. ”

फादर लतूर आपल्या खोलीकडे गेला आणि फादर व्हेलंटनें सुमारें सत्तरीच्या पॅड्रे एस्कोलास्तिको हेरेराला तिथें आणलें. चर्चच्या सेवेंत त्यानें चाळीस वर्षें घालवली होतीं आणि नुकतीच मनची एक जुनी पवित्र इच्छा पूर्ण करून घेतली होती, त्या अवीट अनुभवाची गोडी अद्याप त्याच्या मनांत घोळत होती. तो स्वतःच्याच तंद्रींत होता. इतका कीं इतर कशांतही त्याचें लक्ष नव्हतें. त्या दिवशीं पुन्हा केव्हां अधिक मोकळेपणानें त्याचें सारें ऐकून घ्यायला बिशप साहेबांना सवड होईल का म्हणून त्यानें प्रथम विचारलें आणि लतूरनें त्याच्याकरतां एक आसन आणून ठेवलें आणि त्याला त्याची हकिकत सांगायला सुचवलें.

आसनाच्या कृपेबद्दल म्हाताऱ्यानें आभार मानले. गुडघ्यांत हात गुंफून, पुढें वांकून त्यानें सारी हकिकत अथपासून इतिपर्यंत सांगितली. त्या यात्रा स्थानाच्या आरंभाचा चमत्कार त्यानें निवेदन केला. हा रोमला कळवण्यांत आला होता आणि बदल्यांत दोघां पोपनीं यात्रास्थानाकरतां कांहीं भेटीही

पाठवल्या होत्या. परंतु हा या ‘ अमेरिकनां ’ ना माहीत असण्याची शक्यता त्याच्या मतें नव्हती.

१५३१ डिसेंबरच्या नऊ तारखेला शनिवारीं, सेंट जेम्सच्या चर्चचा एक दरिद्री नवखा भिक्षू तापेयाक टेकडीवरून, मेक्सिको शहरांतल्या ‘ मास ’ला उपस्थित रहाण्याकरतां घाईघाईनें चालला होता. त्याचें नांव वान दिएगो. त्याचें वय होतें पंचावन्न वर्षांचें. तो निम्मी टेकडी उतरला आणि त्याच्या मार्गांत त्याला प्रकाश उजळलेला दिसला. एक लावण्यवति त्याच्यापुढें प्रकट झाली. हीच प्रभूची माउली. निळा सोनेरी वेष तिनें परिधान केला होता. त्याला नांवानें हांकारून ती म्हणाली, “वान, तुझ्या बिशपला शोध आणि मी आतां उभी आहे इथेंच माझ्या नांवें एक चर्च बांधायला त्याला सांग. जा आतां--तूं परत येईतोंवर मी इथेंच खोळंबेन.”

वान धांवतच शहरांत गेला. बिशपकडे गेला. तिथें त्यानें घडली हकिकत सांगितली. बिशपचें नांव होतें झुमराग. तो स्पॅनियर्ड होता. त्यानें भिक्षुकाला उलट सुलट प्रश्नांनीं खूप छेडलें आणि बजावलें कीं त्याला भेटलेली स्त्री ही कोणी पिशाच्च नसून प्रत्यक्ष प्रभूची माउली आहे हें सिद्ध करण्याकरतां कांहीं खूणगांठ त्यानें प्रथम आणून हजर करणें अवश्य होतें. भिक्षुकाला त्यानें निर्दयपणें वाटेला लावलें आणि त्याच्यावर नजर ठेवण्याकरतां वर एकाला त्याच्यामागें पिटाळलें.

वान तिथून बाहेर पडला तो विषण्ण मनानें. त्याच्या वृद्ध काकाच्या, बर्नाडिनोच्या घरीं त्यानें आश्रय घेतला. काका तापानें फणफणला होता. पडून होता. मृत्यूपंथाला लागल्यासारखा होता. पुढले दोन दिवस त्याच्या सुश्रुषेंत वाननें घालवले. बिशपनें तंबी दिल्यानें घडल्या प्रकाराबाबतचा त्याचा विश्वासही ढांसळला होता आणि साहजिकच आपण खोळंबून राहूं म्हणून ‘प्रभूच्या माय’नें सांगून ठेवलें होतें त्या जागीं दोन दिवस फिरकलाही नाहीं. मंगळवारीं त्यानें काकासाठीं औषध आणण्याकरतां शहराचा निरोप घेतला आणि तो आपल्या चर्चकडे निघाला. परंतु त्याला साक्षात्कार झाला ती जागा मात्र त्यानें टाळली आणि दुसरीकडूनच तो पुढें गेला.

पुन्हा त्याच्या वाटेंत त्याला प्रकाश उजळलेला दिसला. पूर्वींसारखी ‘माय’ त्याच्यापुढें पुन्हा अवतरली. म्हणाली, “वान, या मार्गानेंसा जातोस ?”

स्फुंदतच वाननें तिला सर्व सांगितलें. बिशपचा त्याच्यावर विश्वास बसला

नव्हता तें सांगितलें. रुग्ण काकाच्या सुश्रुषेंत वेळ गेला हेंही कबूल केलें. 'माय' त्याच्याशीं अगदीं कनवाळू सुरांत बोलली. म्हणाली, "तुझा काका घटकेच्या आंत चांगला बरा होईल. बिशप झुमरागकडे परत जा आणि त्याला मी तुला प्रथम दिसलें त्याच जागीं चर्च बांधायला पुन्हा सांग. त्याचें नांव ' अवर लेडी ऑफ ग्वाडालूप'चें चर्च असेंच असलें पाहिजे. स्पेनमध्यें याच नांवाचें माझें प्रिय स्थान आहे." यावर वान म्हणाला, " तें खरें, पण बिशपला तुझ्या अस्सलपणाची कांहीं खूणगांठ हवी." तेव्हां 'माय' म्हणाली, "डोंगरावर जा आणि गुलाब गोळा करून घेऊन ये."

तो खरा तर होता डिसेंबर. गुलाबांचे ते दिवस नव्हते. तरीहि वान डोंगरावर पळाला आणि त्याला तिथें पूर्वी कधीं पाहिला नव्हता असा गुलाबांचा बहर आढळला. त्यानें त्याचा जाडाभरडा 'तिल्मा' भरेस्तोंवर फुलें गोळा केलीं. तो मूळ जागीं परत आला तेव्हां 'माय'नें मोठ्या परिश्रमपूर्वक त्या फुलांची एक रचना केली आणि 'तिल्मा'चे शेव एकत्र बांधून ती म्हणाली :

" जा आतां. बिशप पुढें जाईतोंवर हे शेव सोडूं नकोस. "

वान पुन्हा शहरांत गेला. वास्तविक बिशप ' व्हिकार ' बरोबर कांहीं वाटाघाटी करीत असतां बिशपची भेट त्यानें मिळवली.

तो म्हणाला, "युअर ग्रेस, 'माय'नें तुमच्याकरतां खूणगांठ पाठवली आहे."

असें म्हणून त्यानें 'तिल्मा' चा एक शेव सोडला आणि फुलें भुईवर ओघळूं दिलीं. नवल म्हणजे, त्यासरशीं बिशप झुमराग आणि व्हिकार खालीं वांकले, विखुरलेल्या फुलांत लीन झाले. त्या भिक्षुकाच्या त्या जाड्याभरड्या झग्याच्या एका बाजूवर 'ब्लेसेड व्हर्जिन' चें चित्र होतें. तिचीं वस्त्रें निळीं, सोनेरी, गुलाबी होतीं––भिक्षुकानें तिला प्रथम पाहिली त्या वेळसारखींच.

हें चमत्कृतिपूर्ण चित्र जतन करून त्याची पूजाअर्चा करण्याकरतां नवें यात्रास्थान उभारण्यांत आलें तेव्हांपासून तिथें कैक चमत्कार झाले होते. मोठमोठ्या संख्येनें यात्रेकरू दर्शनार्थ कोठून कोठून येऊं लागले होते.

या चित्राबद्दल पॅड्रे एस्कोलास्तिकोला खूप कांहीं म्हणायचें होतें; त्या चित्राच्या मनोहारी रंगयोजनेची आणि रंगसंगतीची त्यानें ग्वाही दिली. असल्या हडसभडस, दरिद्री वस्त्रावर मुळांत रंग बसले कसे याचेंच त्या स्थानाला भेट दिलेल्या अनेक चित्रकारांना आश्चर्य वाटलेलें होतें. शिवाय तसें म्हटलें तर एरवीं तें

विरविरीत वस्त्र इतके दिवस टिकलें हेंही आश्चर्यच होतें; वास्तविक यापूर्वीच तें कुजून, विरून नष्ट व्हायचें. यात्रास्थानाहून आणलेलीं छोटीं पदकें पॅड्रेनें फादर लतूर आणि फादर जोफेसला विनयपूर्वक नजर केलीं. या पदकाच्या एका बाजूला मूळ चित्राची प्रतिकृति होती आणि दुसऱ्या बाजूवर लेख होता: Non fecit taliter omni nationi ( कोणत्याहि देशावर तिनें अशी कृपा केलेली नाहीं. )

पॅड्रेच्या निवेदनाचा परिणाम फादर जोसेफ व्हेलंटच्या मनावर बराच झाला. पॅड्रेनें निरोप घेतांच व्हेलंटनें फादर लतूरकडे ही यात्रा शक्य तितक्या लौकर करून येण्याचा आपला मनोदय बोलून टाकला.

" या मागासलेल्या भागाच्या दरिद्री रहिवाशांचें केवढें भाग्य ! " चष्म्याचीं दमट भिंगें स्वच्छ करीत तो भावनेनें जडावल्या स्वरांत उद्गारला. " मार्ग-दर्शनाविना जगणाऱ्या या गरीब कॅथॉलिकांच्या श्रद्धेला निदान एवढा तरी आधार झाला म्हणायचा. त्यांच्या दृष्टीनें ' माय ' नें खुद्द त्यांच्या देशांत एका गरीब कॅथॉलिकाला असें दर्शन देणें या गोष्टीला केवढें महत्त्व असलें पाहिजे ! विद्वानांकरतां तत्त्वज्ञान उत्तम आहे, जीं; परंतु आम्हां सामान्यांना चमत्कार हीच ईश्वरी कृपेची जतन करण्यायोग्य खूण. "

अस्वस्थपणें फादर व्हेलंट फेऱ्या घालूं लागला आणि चिंतनशील होऊन फादर लतूर त्याला न्याहाळत राहिला. त्याच्या या जोडीदाराचा हाच गुण त्याला फार प्रिय वाटत आला होता. अखेर तो एवढेंच म्हणाला " परम श्रद्धा असेल तिथें चमत्कार घडतातच. साक्षात्कार म्हणजे तरी काय ? श्रद्धेनें पार्थिव नजरेला घडविलेलें सत्यदर्शन. बरें का जोसेफ, मला तूं आहेस तसा दिसत नाहींस, तर माझ्या तुझ्याविषयींच्या जिव्हाळ्यांतून तूं मला प्रतीत होतोस. साक्षात्कार, चमत्कार म्हणजे फार लांब, आपल्या कक्षेपलिकडे अस-लेलें कांहीं जादूनें आपल्यासमोर प्रकट होतें असें मी तरी मानीत नाहीं. होतें इतकेंच की श्रद्धेच्या बळानें आपली नजर अधिक तरल होते आणि आपल्या सभोंवतीच नित्य वावरणारें असें एक तेजस्वी अस्तित्व आपल्या दृष्टीला, श्रुतीला एकाद्या निमिषाला प्रतीत होतें. "

# द्वितीय खंड

.........................................................

## १.

मार्चच्या मध्याला फादर व्हेलंट अल्बुकर्कची यात्रा आटोपून परत निघाला होता. वाटेंत मानुएल लुजॉन नांवाच्या सधन मेक्सिकनाकडे त्याला थांबायचें होतें. तिथें त्या माणसाच्या लग्नबाह्य संबंधांत जमणाऱ्या नोकरनोकराणींचीं लग्नें लावून देऊन शिवाय मुलांचे 'बॅप्टिजम्स' उरकायचे होते. रात्र तिथेंच घालवावी लागणार होती. उद्यां किंवा फार तर परवां त्याला सँता फेकडे निघतां आलें असतें. मग मध्यें एकच कार्यक्रम : सांतो डॉमिनिगोला थांबून प्रवचन आणि प्रार्थना करणें. या गांवीं एक जुनें सुरेख चर्च होतें; परंतु इथले रहिवासी इंडियन्स जात्या वृत्तीनें भडक आणि संशयी होते. अल्बुकर्कला जाते वेळीं त्यानें इथें घरोघर फिरून प्रार्थनेच्या कार्यक्रमाला पुरेशीं माणसें जमविलीं होतीं. गांव तसें मोठें आणि सधन होतें, सुपीक होतें. प्रार्थनेला जमलेले श्रोते शांत, प्रतिष्ठित सावधचित्त वाटले होते. साध्या जमिनीवर ते ताठ बसले होते, ठेवणींतल्या शाली त्यांनीं लपेटून घेतल्या होत्या. जमलें तसें स्पॅनिश भाषेत त्यानें त्यांना कांहीं सुनावलें आणि त्यांनींहि आदरपूर्वक ऐकून घेतलें. परंतु पोरांना 'बॅप्टाइज' करायला आणायला ते कांहीं तयार होईनात. फार पूर्वीं स्पॅनिअर्ड लोकांनीं त्यांना फार अन्यायानें वागवलें होतें आणि हा सल अनेक पिढ्यांनंतरहि त्यांच्या मनांत कायम होता. फादर व्हेलंटला तेव्हां 'बॅप्टाइज' करण्याकरतां एकही मूल मिळूं शकलें नव्हतें; परंतु उद्यां पुन्हा एकवार एक प्रयत्न करून पहाण्याची त्याची इच्छा होती. तिथून घोड्यावरून ला बजादा टेकडी पार करून बिशप लतूरकडे.

एका 'अमेरिकन' किंवा 'यांकी' व्यापाऱ्याकडून त्यानें त्याचा घोडा खरेदी केला होता आणि या व्यवहारांत तो फार फसला होता. दिवशीं वीस तेतीस मैल वेगाच्या मजला आठवडाभर मारूनच तें जनावर मरायला टेकल्यागत दिसूं

लागलें होतें आणि ला बजादा टेकडी तें कसें चढून जातें ही काळजीच होती. मॅनुएल लुजॉनच्या घराशीं तो पोंचला तेव्हां अशा अनेक भौतिक चिंतांनीं त्याचें मन ग्रस्त होतें. लुजॉनच्या मालकीचें तें स्थळ तसें मोठें होतें आणि अनेक पागांमुळें एकाद्या गांवासारखेंच भासत होतें. प्रत्यक्ष घर लांबलचक आणि बुटकें होतें. त्याला कांचेच्या तावदानांच्या खिडक्या आणि झगझगीत निळ्या रंगाचीं दारें होतीं. भिंतींना रिकिबी, जिनें, उंच बूट, लगाम, बंदुका आणि जंगली जनावरांचीं कातडीं लटकवलेलीं होतीं.

फादर व्हेलंट फाटकावाटें आंत शिरतांच चहूंबाजूंनीं मुलांचा घोळका त्याच्याकडे धांवत आला. यांतल्या कुणाकुणाच्या अंगावर आंखूड खमीसापलिकडे दुसरें वस्त्र नव्हतें. त्यांच्या पाठोपाठ शालीविना मस्तकाच्या कांहीं बाया धांवत आल्या. परंतु हातीं टोपी काढून घेतलेला हंसतमुख लुजॉन जातीनें बाहेर आणि सामोरा येतांच हीं सर्वजणें कुठें ना कुठें दिसेनाशीं झालीं. लुजॉनचें वय सुमारें पस्तिशीचें होतें; कुडीनें तो भरीव होता आणि हनुवटीखालीं स्थूलपणाच्या खुणाही कांहींशा दिसत होत्या. प्रभूच्या वतीनें त्यानें फादर जोसेफचें आगतस्वागत केलें आणि त्याला घोड्यावरून उतरण्याकरतां आधार म्हणून हात पुढें केला. परंतु फादर जोसेफ आपला आपणच चपळपणें घोड्यावरून उतरून उभा राहिला.

“ प्रभू तुमच्यावर आणि तुमच्या या घरावर सदैव कृपाछत्र धरो, मानुएल, परंतु लग्नं लावायचीं तीं माणसें कुठें आहेत ? ”

मानुएल म्हणाला, “ पुरुष शेतावर आहेत, पॅड्रे. तशी कसली घाई नाहींच. आधीं आमचा थोडा पाहुणचार स्वीकारा, विश्रांति घ्या, मग लग्नविधि. ”

“ पाहुणचाराचा अव्हेर शक्य नाहीं; परंतु तो नंतर. खरें तर जेवणाचा वेळ साधून मला तुम्हां सर्वांना एकत्र गांठायचें होतें, पण घोड्यापायीं वेळ मोडला. माझ्या थैल्या कोणाला तरी घेऊन यायला सांगा म्हणजे त्यांतलीं माझीं पेशाचीं वस्त्रें मी परिधान करतों. तोंवर तुमच्या माणसांना शेतावर बोलावणीं पाठवा. लग्नाकरतां पुरुषानें काम थांबवायला हरकत नाहीं. ”

या जबाबानें यजमान दिपून गेला. म्हणाला, “ विश्रांतीचा अधिक आग्रह मी धरण्याचा उपयोग नसेल, तर पॅड्रे, प्रथम इथल्या मुलांचा बॅप्टिजम उरका. मुलें सगळीं हजर आहेत. तोंवर पुरुषमाणसें येतील. ”

“ मला जरा हातपाय धुवून कपडे बदलण्याकरतां घेऊन चला. तुमचीं पुरुष माणसें येईतोंवर मी एवढें उरकून येतो. कांहीं झालें तरी प्रथम लग्नविधि; नंतर बॅप्टिजम्स. क्रिश्चन धर्माची तशी पद्धत आहे. उद्यां सकाळीं

मुलांचे बॅप्टिजम्स मी उरकीन तोंवर त्यांच्या आईबापांचें लग्न होऊन निदान एक रात्रभर तरी उलटलेली असावी. ''

फादर जोसेफला त्याच्या खोलीकडे नेण्यांत आलें आणि लग्नाच्या पुरुषांना आणण्याकरतां पोरें शेताडीपार पिटाळण्यांत आलीं.लुजॉन आणि त्याच्या दोघां मुलींनीं मिळून एकीकडे क्रूस उभारण्याला सुरवात केली. दोन म्हाताऱ्या येऊन जमीन साफ करूं लागल्या आणि पाठोपाठ एकीनें खुर्चा, स्टुलें आणून ठेवलीं.

एकजण दुसरीच्या कानांत म्हणाली, " इश्श्य ! पॅड्रे तर अगदींच कुरूप आहे ! पण तो मोठा पुण्यशीलही असला पाहिजे. आणि त्याच्या हनुवटीवरची ती मोठी चामखीळ पाहिलीस का ? माझी आजी हयात असती तर तिनें ती काढून टाकली असती. चिमायोच्या ' पवित्र चिखला ' बद्दल कोणी तरी या पॅड्रेला सांगायला हवें. त्या चिखलानें ही चामखीळ कदाचित् वाळून तुटेल. पण चामखिळी काढणारें माणूस मात्र आतां कोणी जगून राहिलें नाहीं. ''

दुसरी म्हणाली, " खरें ग खरें. काळ वाईट आला. आतां हीं लग्नें लावलीं म्हणून इथलीं माणसें का सुधारणार आहेत ? लग्नाशिवायच एकत्र राहिलीं, मुलें देखील झालीं; आतां लग्नविधीचा काय फायदा ? आणि पुरुष त्या पाब्लोसारखे आणखी कोणा बाईचा विचारही मनांत वागवत असतील. रविवार रात्रींचीच गोष्ट. त्या त्रिनिदादच्या थोरल्या मुलीबरोबर झाडीमागून बाहेर येतांना मी या डोळ्यांनीं त्या पाब्लोला पाहिलें ! ''

फादर जोसेफ पुन्हा त्या जागीं आला आणि त्या सांगोवांगीच्या गोष्टी थांबल्या. फादरनें तात्पुरत्या क्रूसापुढें गुडघे टेकून आपल्या वैयक्तिक प्रार्थनेला आरंभ केला. कामाच्या बाया आवाज न करतां तिथून निघून गेल्या. लग्नविधीकरतां नोकरांना घाई करावी म्हणून सीनोर लुजॉनही नोकरांच्या रहात्या जागांकडे निघून गेले. तिथल्या बायका खिदळत होत्या, एकमेकींचीं ठेवणींतलीं वस्त्रप्रावरणें हिसकत होत्या.कोणी पुरुषांनीं तर हातही धुवून ठेवले होते.सगळे तात्पुरत्या चर्चमध्यें जमले आणि अत्यंत उत्साहानें फादर जोसेफनें एकेका जोडप्यांचें लग्न लावून दिलें.

फादरनें मग जाहीर केलें, " उद्यां सकाळीं मुलांचे बॅप्टिजम्स. आयांनीं इकडे येतांना मुलें जरा स्वच्छ स्थितींत आणावींत. ''

प्रवासाचे कपडे पुन्हां चढवल्यावर फादर जोसेफनें यजमानांना त्यांची भोजनाची वेळ विचारली. भल्या सकाळीं केलेल्या न्याहारीनंतर आपल्या पोटांत कांहीं गेलेलें नाहीं हें त्यानें त्यांच्या नजरेस आणलें.

यजमान लुजॉन म्हणाला, " तसे काय, स्वैपाक झाला कीं आम्ही जेवायला

बसतों. सहसा सूर्यास्तानंतर हें शक्य होतें. महाराजांच्या भोजनाकरता एक कोंवळें कोंकरूं मारण्यांत आलें आहे."

फादर जोसेफचें मन या वार्तेनें उजळलें. त्यानें विचारलें, "तें शिजवणार कसें बरें ?"

सीनोर लुजॉननें खांदे उडवले. "शिजवायचें काय त्यांत ? एका भांड्यांत मिरची घालून तें चुलीवर ठेवायचें. कांहीं कांदेही त्यांत चिरून घालतों आम्ही."

"अच्छा. म्हणूनच म्हणतों मी. मला हें असलें मटन फार झालें आहे. माझ्या पद्धतीनें मी स्वैपाकघरांत जाऊन थोडें शिजवूं का ?"

लुजॉननें हात फलकवला. तो म्हणाला, "हें माझें घर तुमचेंच समजा, पॅड्रे ! स्वैपाकघरांत मी तरी कधीं जात नाहीं कारण तिथें बायांचा सुळसुळाट असतो. पण स्वैपाकघर तें तिकडे आहे आणि त्याची प्रमुख म्हणून काम पहाते रोजा."

फादर स्वैपाकघरांत शिरला तेव्हां तिथें बायकांचा एक घोळका लग्नविधी-प्रकरणींच चर्चा करीत असलेला त्याला दिसला. लगबगीनें त्या पांगल्या आणि चुलाण्याशीं म्हातारी रोजा तेवढी उरली. फादर जोसेफला शिजल्या मटनाचा परिचित गंध जाणवला. दाराबाहेर, कापलेली अर्धी बकरी रक्तानें रंगलेल्या गोणपाटाच्या आवरणाखालीं लटकत होती. फादरनें रोजाला चुलाणा पेटवायला सांगितलें आणि मटनापैकीं मागल्या पायाचा फरा आपल्याला त्यावर शिजवून घ्यायचा असल्याचा मनोदयही व्यक्त केला.

"पण पॅड्रे, लग्न लागण्याआधींच माझें काम आवरलें. आतां चुलाणा जवळजवळ थंड झाला आहे. पुन्हां पेटवायचा तर निदान तासभर तरी लागेल. आणि जेवणाला उरले आहेत दोनच तास."

"हरकत नाहीं. तासाभरांत माझें मटन मी शिजवून घेऊं शकेन."

"तासाभरांत !" ती म्हातारी उद्गारली "पॅड्रे, हें कसें शक्य आहे ! त्यांतलें रक्तही तेवढ्या वेळांत आटणार नाहीं."

फादर जोसेफ जरा तापूनच म्हणाला, "केलें तर सारें शक्य आहे, आजी-बाई. आणि मला रक्त आटायला नकोच आहे. लौकर चुलाण्यांत विस्तव करा."

जेवणाच्या टेबलावर फादरचें विशेष मटन आलें. तेव्हां तें कापतांना गुलाबी द्रव सुरीमागून उमटत होता तो पहातांना वाढप्या मुलींच्या अंगावर कांटाच आला. मॅनुएल लुजॉननें एक तुकडा आग्रहाखातर पानांत घेतला पण तो खाल्ला मात्र नाहीं. फादरनें तें सारें मटन स्वतःच संपवलें.

प्रथम साऱ्या पुरुषमाणसांची आणि मुलांची पंगत बसली. बायकामुली नंतर

बसणार होत्या. फादर जोसेफ आणि लुजॉननें ‘ बोर्ड्युक्स ’ मद्याची एक बाटली आपापसांत संपवली. लुजॉन म्हणाला कीं ती मेक्सिको नगराहून आणविलेली होती. सँता फेच्या परतीच्या मार्गाबाबत त्यांची चर्चा चालू असतां आणि फादर जोसेफ आपण सान्तो डोमिनिगोला मुक्काम करणार असल्याचें म्हणाला असता लुजॉननें त्याला विचारलें, “तुम्ही तिथें एकादा घोडा कां मिळवूं नये ? तसेंच तुम्ही सांता फेला पोंचणें मला तर जवळ जवळ अशक्य वाटतें. सान्तो डोमिनिगोला घोड्याची निपज उत्तम आहे. तुम्ही एकाद्या घोड्याचा सौदा कराच. ”

“ छे. ” फादर जोसेफनें नकार दिला. “ नकोच. इथले इंडियन्स मोठे संशयी आणि आंतल्या गांठीचे. मी त्यांच्याशीं सौदा बोलूं लागलों तर माझ्या हेतूविषयीं ते संशय घेतील. त्यांची आत्मिक उन्नति आपल्याला करायची असेल तर आपल्याला त्यांच्याकडून कांहीं लभ्यांश हवा आहे असें त्यांना वाटूं देतां कामा नये. अल्बुकर्कच्या फादर गॅलेगोसला मीं हेंच सांगितलें. ”

मॅनुएल लुजॉन हंसला. त्यानें आसपासच्या इतरांकडे पाहिलें आणि त्यांनींही आपले शुभ्र दांत दाखवले. “ अल्बुकर्कच्या पॅड्रेला तुम्ही असें सांगितलें ? तुमचें धाडस मोठेंच म्हणायचें. तो तर मोठा गबर माणूस आहे. मला अर्थात् त्याच्याविषयीं आदरच आहे. त्याच्याबरोबर मी पोकर खेळलों आहे. मोठा अव्वल जुगाऱ्या आहे तो आणि वेळप्रसंगीं खिशाला नाट लागला तरी कुरकुरत नाहीं. एकदां डाव टाकल्यावर अध्येंमध्यें थांबणें त्याला माहीत नाहीं. एखाद्या अमेरिकनासारखा खेळतो तो. ”

यावर फादर जोसेफ तात्काळ उद्गारला, “ अशा धर्मगुरूविषयीं मला काडीचाही आदर नाहीं. ”

“ म्हणजे तुम्ही नाहीं वाटतें खेळत ? ” लुजॉननें किंचित् आश्चर्यपूर्वक विचारलें. “ माझी निराशाच झाली म्हणायची. जेवण झाल्यावर दोन डाव टाकूं या अपेक्षेंत मी होतों. इकडे जेवणानंतर कांहीं दुसरी करमणूक नाहीं. तुम्ही ‘ डोमिनोज ’ देखील खेळत नाहीं, म्हणतां ? ”

“ ती गोष्ट वेगळी. ” फादर जोसेफ म्हणाला. “ गंमत म्हणून शेकोटीशीं बसून कॉफीचे घुटके घेत किंवा आतां तुमच्या कृपेनें आस्वाद घेता आला तसल्या द्राक्षांच्या मद्याची चव चाखत डोमिनोजचा एखादा डाव टाकणें वेगळें. त्यानें मन तेवढेंच उल्हसित होतें. मला सांगा, मॅनुएलितो, हें मद्य तुम्ही कुठून मिळवितां ? फ्रेंच मद्यासारखें आहे हें. ”

“ सांठवणीचें आहे तें. माझ्या आजोबांच्या काळांत बर्नालिल्लोला गाळण्यांत

आलेंय तें. अद्यापही तिथें मद्य गाळतात, परंतु त्याला जुनी सर नाहीं."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कॉफी झाल्यावर, घरांतलीं मुलें 'बॅप्टिजम'साठीं तयार होत असतां यजमान लुजॉननें फादर जोसेफ व्हेलंटला आपल्या पागा दाखवायला नेलें. शेजारीं शेजारीं बांधलेलीं दोन पांढरीं शुभ्र घोडीं कांहींशा अभिमानानें त्यानें फादरला दाखवलीं. स्वतःच्या हातानें त्यानें त्यांना पागे-बाहेर काढलें. या जनावरांचीं अंगें पांढऱ्या घोड्यांचीं असतात त्याप्रमाणें निळ-सर पांढरीं नव्हतीं, अगदीं स्फटिकासारखीं पांढरीं फटक होतीं. सावलींत तीं आणखीच उठावदार आणि आकर्षक दिसत. त्यांच्या शेपट्या टोकाशीं कापून त्यांना घंटांचा आकार दिला होता.

लुजॉन म्हणाला, "कशीं आहेत जनावरें, पॅड्रे ? याचें नांव कॉंटेण्टो आणि याचें एंजेलिका. ईश्वरानें यांना केवळ मगज दिला नाहीं, पॅड्रे, त्यांत समजही दिली आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांच्याशीं बोलूं लागलों कीं जातीच्या क्रिश्चनासारखे ते माझ्याकडे लक्ष देऊन ऐकत रहातात. माणसांचा लोभही त्यांना फार आहे. त्यांना बाहेर काढायचें तर नेहमीं बरोबरीनें काढलें जातें आणि त्यांची दोस्ती अगदीं जिगरजान आहे."

फादर जोसेफनें एकाला काढणीला धरून किंचित फिरवलें. तो म्हणाला, 'जनावरें नेहमींच्यांतलीं नव्हेत. पांढरीं घोडीं मीं पाहिलीं आहेत, पण असला पांढरा रंग प्रथमच पहातों आहे." आणि यजमानाला आश्चर्यांत टाकून तो हाडकुळा धर्मगुरू चपळपणें एका उडींत कॉंटेण्टोवर आरूढ झाला. लुजॉनला तर राहोच, पण कॉंटेण्टोलाही याचें नवल वाटलेलें दिसलें. स्वतःला त्यानें गदगदा हलवलें. उसळून धांव मारली. फाटकाशीं तो थांबला. एवढें करून पाठीवरचा स्वार जागचा ढळला नव्हता त्या अर्थीं त्याच्या अश्वारोहणचातुर्या-बद्दल खात्री बाळगणें भाग होतें, असेंच जणूं मानून तें जनावर निमूट वळलें, मूळ जागीं आलें आणि एंजेलिकाशेजारीं तटस्थ उभें राहिलें.

"कमाल आहे तुमची, पॅड्रे!" लुजॉन उद्गारला. "आत्तां फादर गॅलेगॉस कांहीं घोड्यावर कायम राहिला नसता. तसा तो सराईत शिकारी असूनही बहुधा जमिनीवर आदळला असता."

"त्याचें असें आहे लुजॉन," फादर जोसेफ म्हणाला, "या तुमच्या देशांत रिकिब हेंच माझें घर होऊं बघतेंय. शिवाय या जनावराची धांव मोठी सफाई-दार आहे. आणि पाठही निरुंद आहे. माझ्या हें वैशिष्ट्यानें ध्यानीं आलें आहे, कारण माझ्यासारख्या आंखूड पायांच्या माणसाला रुंद आंसाच्या घोड्यावर

आठ आठ तास स्वारी करायची म्हणजे शिक्षा वाटते. आणि ती मला दिवसचे दिवस भोगावी लागते. इथून आतां मी सांता फेला जाणार. पुन्हा बिशपशीं बोलणें झालें कीं निघालों तिथून ' मोरा'कडे. "

"मोराकडे !" लुजॉन चित्कारला. "फारच मोठी मजल आहे ती. शिवाय सडका खराब.तुमच्या घोडीवरून तुम्हांला तें अशक्य होईल. ती मरूनच जाईल." हें तो म्हणत असतांना फादर त्या जनावरावरच बसून त्याला थोपटीत होता.

"त्याला इलाज नाहीं." तो म्हणाला. "माझ्याकडे दुसरें जनावर नाहीं. प्रभूनें एवढीच कृपा करावी कीं अन्नपाणी मिळणें अशक्य अशा जागीं तरी तसला प्रसंग आणूं नये. कारण तसें फार सामान मला बरोबर नेतां येणार नाहीं. नेतां येतील माझीं धर्मगुरूचीं वस्त्रें. आणि कांहीं तसलेंच अत्यावश्यक साहित्य. "

लुजॉन विचारांत अधिकाधिक व्यग्र झाल्यासारखा दिसला. कांहीं तरी फार महत्त्वाचा निर्णय तो घेत असावा आणि हा निर्णय मोठासा उत्साहजनक नसावा असा त्याचा चेहरा दिसत होता. एकाएकीं त्याचा चेहरा बदलला. तो फादर जोसेफकडे सस्मित वळला. त्या स्मितांत एक प्रकारचा पोरगेला उल्हास होता. किंचित् नाटकी सुरांत तो फादरला म्हणाला, "फादर व्हेलंट, माझ्या घराचा तुम्ही स्वर्गाशीं संबंध जोडून दिला आहांत. आणि त्याबद्दल माझ्याकडून तुम्ही फारसा मोबदलाही घेत नाहीं. तर मग तुमच्याकरतां मला कांहींतरी फार चांगलें केलेंच पाहिजे. मी माझा काँटेण्टो तुम्हांला नजर करतों. प्रार्थना कराल तेव्हां माझ्या वतीनेंही स्मरणपूर्वक प्रभूला कांहीं सांगा एवढीच अपेक्षा. "

जमिनीवर उडी मारून फादर व्हेलंटनें यजमानाला कवेंत कवटाळलें. तो म्हणाला, "मनुएलितो ! या तुमच्या बक्षिसाबद्दल मी तुमच्या वतीनें प्रार्थना करून तुम्हांला स्वर्गप्राप्ति देखील घडवूं शकेन, इतका उत्कट आनंद मला झाला आहे ! इतकी मोठी कृतज्ञता मला वाटते आहे ! "

लुजॉन हंसला. फादरला त्यानें थोपटलें. हातांत हात घालून दोघे ' बॅप्टिजम्स ' करण्याच्या जागेकडे गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं; लुजॉन फादरला न्यहारीकरतां पाचारण करण्यासाठीं शोधूं लागला तेव्हां फादर त्याला परसांत आढळला. त्या दोन शुभ्र जनावरांना तो इतस्ततः फिरवीत होता, त्यांची उजळ पांढरी काया कुरवाळीत होता. मात्र त्याच्या मुद्रेवर कालचा उल्हास नव्हता.

तो लुजॉनला बघतांच तात्काळ म्हणाला, "मनुएल; तुमचें बक्षिस मला घेतां येत नाहीं. रात्रभर मी त्यावर विचार केला. आणि मला कळून आलें आहे कीं

या तुमच्या सुंदर जनावराचा स्वीकार मी करतां कामा नये. सांता फेचे बिशपही माझ्याप्रमाणेंच हालअपेष्टा काढतात, कष्ट सोंसतात, फिरतात. त्यांचें जनावर माझ्या घोडीहून कांहीं फारसें उजवें नाहीं. या भागांत येतांना गॅल्व्हेस्टनला जहाज बुडून त्यांना त्यांची सारी चीजवस्त गमवावी लागली; त्यांत या भागांतल्या प्रवासाकरतां त्यांनीं मुद्दाम बनवून घेतलेली गाडीहि गेली. माझे बिशप जोंवर एका सामान्य घोड्यावरून प्रवास करतात, तोंवर मला या असल्या अव्वल जातीच्या जनावराचा स्वीकार करणें अशक्य आहे. यावर बसण्याची मला लाज वाटेल. माझ्या आहे त्याच घोडीवरून मला माझे प्रवास करायला हवेत."

लुजॉन अस्वस्थ झाला, कांहींसा दुःखीही झाला. जड सुरांत तो म्हणाला, "असें म्हणतां पॅड्रे ?" त्याला वाटलें, कालच्या साऱ्या आनंदीआनंदानंतर हें असें कांहीं तरी बोलण्याची, करण्याची या फादरना काय जरूर होती ? काल आपल्याला कसें एकाद्या उदारधी सम्राटागत वाटत होतें. आणि आज हा पॅड्रे आपलें औदार्य अव्हेरतो ! तो पुढें म्हणाला, तुमची घोडी मात्र ला बजादा टेकडी पार करूं शकेल असें मला वाटत नाहीं. असें करा, माझे सारे घोडे एकदां नीट पहा आणि त्यांतला तुम्हांला हवा असलेला कोणताही घ्या. ते सगळेच तुमच्या घोडीपेक्षां ताकदीनें उजवे आहेत."

फादर व्हेलंटनें निश्चयानें नकार भरला. तो म्हणाला, "मनुएलितो, हीं तुमचीं दोन जनावरें पाहिल्यानंतर मला दुसरें कांहीं स्वीकारण्याची इच्छा होणें अशक्य. लग्नविधीची माझी दक्षणा मी वाढवीन आणि पैसे जमवून तुमचें हें एक जनावर मी विकत घेईन ! आम्हां धर्मप्रसारकांना या भागांत घोडें हीच संगतसोबत. मला माणसाच्या मगजाचें तुमचें हें समजदार, देखणें जनावरच हवें."

सिनोर लुजाननें सुस्कारा टाकला. या विचित्र प्रसंगांतून सुटका शोधण्यासाठींच जणूं, तो इतस्ततः पाहूं लागला.

फादर जोसेफ उत्स्फूर्तपणें त्याच्याकडे वळला आणि म्हणाला, "मनुएल, मी तुमच्यासारखा सधन 'रँचरो' असतो तर या वेळीं काय केलें असतें तें सांगतों. मीं हीं दोन्ही जनावरें मागासल्या भागांतल्या धर्मप्रसाराकरतां, प्रभूच्या सेवेंत देऊन टाकलीं असतीं आणि सार्थक मानलें असतें."

"तसें होऊं दे, पॅड्रे." लुजॉन मंद सुरांत लागलींच म्हणाला, "मात्र बदल्यांत माझ्याकरतां ईश्वराकडे तुम्ही वारंवार शब्द टाकला पाहिजे. कारण या माझ्या साऱ्या मिळकतींत या दोन जनावरांच्या तोडीचें दुसरें कांहीं नाहीं. दीर्घ काळ त्यांची ताटातूट होती तर एक दुसऱ्याकरतां झुरलें असतें हेंही खरेंच.

त्यांची कधींच ताटातूट झालेली नाहीं. आणि परस्परांवरची माया दाट आणि दृढ आहे. घोड्यांत हा मायेचा भाग नेहमींचा मोठा असतो. हीं देणें मला कठीण वाटतें आहे."

फादर जोसेफ अंतःकरणपूर्वक उद्गारला, "या दानाचें पुण्य तुम्हांला लाभल्यावांचून राहाणार नाहीं, सिनोर. जेव्हां जेव्हां या जनावरांचें स्मरण तुम्हांला होईल तेव्हा तेव्हां तुमच्या मनांत कृतकृत्यताच वाटेल.

न्याहारी आटोपली आणि लागलीच फादर जोसेफ व्हेलंट पुढल्या मार्गाला लागला. त्यानें 'कॉंटेण्टो' वर स्वारी केली होती आणि मागून 'एंजेलिका' निमूटपणें येत होती. घराच्या फाटकाशीं या जनावराकडे भरल्या डोळ्यांनीं पहात लुजॉन तीं दिसेनाशीं होईपर्यंत उभा होता. त्याचीं हीं जनावरें त्याच्या कडून उगींच नेण्यांत आलीं, असें त्याला वाटत होतें आणि तरीही कोणताही आकस त्याच्या मनांत नव्हता. फादर जोसेफच्या आत्मार्पण बुद्धीविषयीं त्याला संशय नव्हता. त्याच्या हेतूच्या पावित्र्याविषयीं त्याची खात्री होती. कांहीं झालें तरी अखेर बिशप तो बिशप होता आणि व्हिकर तो व्हिकर. एकाच्या विचारावांचून दुसरा वागणे शक्यही नव्हतें. 'कॉंटेण्टो' आणि 'एंजेलिका' वरून ते दोघे आपापल्या कार्यार्थ फिरतील तेव्हा आपल्याला बिलकूल खंत वाटणार नाहीं असा दिलासा त्याला वाटूं लागला. झालें तें आतां त्याला चांगलेंच वाटत होतें.

## .२.

बिशप आणि व्हिकर हे दोघे 'ट्रुकास' डोंगरांतून भर पावसांत वाट काढीत होते. वरच्या अंगानें मारणाऱ्या वाऱ्यानें पावसाचे जाडे, काळसर थेंब तिरके अंगावर येत होते. नाकातोंडावर सपासप बसत होते. पोकळ असल्यासारखे फुटत होते. डोंगराच्या त्या उंचवट्यावर झाडीच झाडी पसरलेली होती आणि कांहीं दिवसांत पाणी खाऊन ती चांगली हिरवी जर्द आणि टवटवीत होणार होती. आतां मात्र तिचा रंग भुरकट काळा वाटत होता. दुतर्फा दऱ्या कपारी पसरल्या होत्या. निळसर हिरव्या फर झाडांचीं आच्छादनें त्यांना लाभलीं होतीं. त्यांच्या पाठीशीं डोंगरांचे उंच उंच सुळके. आभाळ ठेंगणें वाटत होतें. काळपट

ढगांनीं साऱ्या आसमंतावर धुक्यासारखें तलम, दाट पांघरून धरलें होतें. वरच्या काळवंडल्या, निथळत्या अवकाशांत उजळ प्रकाशाचा एकही पुंजका कुठें पायरवत नव्हता. तीं दोन शुभ्र पांढरीं जनावरेंदेखील ओलींचिंब भिजून काळसर भासत होतीं.

फादर ल्तूर पुढें चालला होता. त्याच्या जनावरावर तो ताठ बसला होता. आणि पावसाची झड थेट डोळ्यांत मारूं नये इतपतच त्यानें हनुवटी खालीं घेतली होती. मागून फादर व्हेलंट येत होता. त्याला फारसें कांहींच दिसूं शकत नव्हतें. कारण या हवेंत त्याचा चष्मा निरुपयोगी होई म्हणून त्यानें तो काढून ठेवला होता. घोडयाला चिकटून, अंगाची मुरगुशी करून तो बसला होता. त्याचे बाहू ' कॉण्टेन्टो 'च्या मानेभोंवती जवळ जवळ लपेटले होते. फादर जोसेफची बहीण फिलोमेन पुइ–ड–डोम भागांत तिच्या गांवीं एका कॉन्व्हेण्टची ' मदर सुपीरिअर ' होती. फादरच्या पत्रांच्या अनुरोधानें ती त्या दोघांचे घोडयावरचे प्रवास कल्पनेनें दृष्टीसमोर रेखाटण्याचे प्रयत्न करी. तिच्या परिचयाच्या सेंट फ्रान्सिस झेवियरच्या चित्रासारखे हे दोघे तिला दिसूं लागत. या वेळीं प्रत्यक्षांत हे दोघे फारसे चित्रयोग्य दिसत नव्हते––परंतु एक तरीहि खरें कीं कोणी पहातें तर त्यांना व्यापारी किंवा पारधी नक्कीच समजलें नसतें. ' नेकचीफ्स ' ऐवजी त्यांनीं गळ्याला ' क्लेरिकल कॉलर्स ' लावल्या होत्या आणि बिशपच्या ' बक्स्किन 'च्या कोटाच्या छातीवर चांदीच्या छडयाला चांदीचाच क्रूस लटकतांना दिसत होता.

ते मोराच्या मार्गावर वाटचाल करीत होते. प्रवासाचा हा तिसरा दिवस. अजून किती मार्ग काढायचा होता याचा अंदाज लागलेला नव्हता. सकाळपासून कोणी प्रवासी त्यांना भेटला नव्हता कीं कुठें वस्ती पायवरली नव्हती. आपण मार्ग चुकलेलों नाहीं हा भरंवसा त्यांना वाटत होता, कारण दुसरा मार्ग त्यांना वाटेंत दिसला नव्हता. पहिली रात्र त्यांनीं ' रिओ ग्रॅण्ड 'च्या उबदार खोऱ्यांत सांताक्रुझला घालवली होती. इथल्या शेतांतून आणि रायांतून वसंताची चाहूल जागोजाग जाणवत होती. परंतु एस्पनोलाचा टापू त्यांनीं मागें टाकला आणि त्याना प्रथम वाऱ्या वादळांना आणि मग थंडीला तोंड द्यावें लागलें. बिशप मोराला चालला होता तो तिथल्या स्थानिक धर्मगुरूच्या घरीं बरेच आश्रयार्थी तळ ठोकून होते, त्यांच्या पुढल्या व्यवस्थेचा उद्देश मनांत ठेवून. कॉनेजोस खोऱ्यांतील एक अलिकडली वसाहत इंडियन लोकांनीं हल्ले करून उध्वस्त केली होती. या हल्लयांत वसाहतींतले बरेच रहिवासी जीवें मारले गेले होते,

आणि उरले होते ते मूळ मोराचेच असल्यानें कसेबसे, कंगाल स्थितींत, मोराला पोंचले होते. ते हे आश्रयार्थी.

डोंगर निम्माअधिक पार करतात तों त्या दोघां धर्मगुरूंवर पावसाबरोबर हिमही पडूं लागलें आणि त्यांचे ओले कपडे गोठून गेले. बर्फाच्या मऊ गुठळ्या त्यांच्या अंगावर पडून पुढें घसरत जाऊं लागल्या. या स्थितींत रात्र उघड्यावर काढण्याची कल्पना सहन होत नव्हती. शेकोटी पेटली नसती, पांघरुणांत ऊब टिकली नसती. मोराच्या बाजूला डोंगर उतरत असतांच दिवस भराभर मावळूं लागला. तसें म्हटलें तर तेव्हां फक्त चारच वाजले होते. फादर लतूर वळून म्हणाला,

" जोसेफ, घोडीं थकलीं आहेत. त्यांना घांस घातला पाहिजे. "

फादर जोसेफ व्हेलंट म्हणाला, " जाववेल तेवढें सध्यां पुढें सरकूं या. रात्र पडण्याआंत कांहीं निवारा गवसेलसें वाटतें." जोसेफ सारखा मनाशीं प्रभूची करुणा भाकत होता आणि तो अंतर देणार नाहीं याविषयीं त्याची खात्री होती. आणि खरोखर, तासाभरांत ते एका पडीक घरापाशीं आले. घर इतकें पडीक आणि दरिद्री होते कीं वाटेनजीक ठळक जागीं तें नसतें तर त्यांच्या नजरेंतही आलें नसतें. घरानजीकची जागाच घराहून त्यांना वसतीकरतां उजवी वाटली आणि रात्र तिथेंच काढण्याचें त्यांनीं ठरवलें.

दाराशीं ते पोंचले आणि एकजण बाहेर आला. तो बोडका होता. आणि आश्चर्य असें कीं तो मेक्सिकन नसून अमेरिकन होता. त्यांना जवळ जवळ अगम्य अशा बोली भाषेंत तो बोलला. रात्रीं मुक्काम करण्याची त्यांची इच्छा आहे काय, असें त्यानें विचारलें. त्यानंतरच्या थोड्याशाच संभाषणांत फादर लतूरला वाटलें कीं या सीध्या न वाटणाऱ्या संशयास्पद माणसाबरोबर नाइलाजानें देखील या घरांत रहाणें योग्य नव्हे. इथून जावेंच. तो माणूस अंगाबांध्यानें उंच, धिप्पाड आणि बेढब होता. त्याची मान सर्पासारखी होती. मस्तक छोटें आणि भरीव होतें. आंखूड केसांखालीं जाड जाड वळ्या दिसत होत्या. त्याच्या छोट्या, सुपासारख्या कानांमुळें त्याच्या चेहऱ्याला आणि मस्तकाला अधिकच कुरूप कळा आली होती. त्याच्या त्या अवतारामुळें तिथें रहावें असें तर वाटत नव्हतें आणि त्याचें तें तेवढेंच घर मोराच्या त्या निर्जन रस्त्यावर उपलब्ध होतें.

दोघे धर्मगुरू घोड्यांवरून खालीं उतरले. जनावरांना बांधण्याची आणि दाणापाणी करण्याची सोय त्यांनीं त्याला विचारली.

तो म्हणाला, "माझा कोट चढवून येऊन मीच तें करतों. सध्यां चला आंत."

त्याच्या मागोमाग ते एका खोलींत गेले. कोपऱ्यांत शेकोटीची भट्टी धगधगत होती. तिथें जाऊन ते हातांना ऊब आणूं लागले. आडोशाच्या दिशेनें त्यांच्या यजमानानें एक रागीट, गुरगुरता सूर टाकला आणि लगतच्या दालनांतून एक स्त्री आंत आली. ती मेक्सिकन होती.

दोघां धर्मगुरूंनीं तिला अदबपूर्वक स्पॅनिश बोलींत अभिवादन केलें. तिनें तोंड उघडलें नाहीं. फक्त क्षणभर त्यांच्याकडे शून्य नजरेनें पाहिलें. मग ती अधोमुख झाली. भयभीत झाल्याप्रमाणें अंग चोरून उभी राहिली. दोघां धर्म-गुरूंनीं याचा अर्थ न कळून प्रश्नार्थक मुद्रांनीं एकमेकांकडे पाहिलें. हा माणूस या ना त्या तऱ्हेनें तिला छळत असावा हें त्यांच्या लक्षांत आलेलें होतें. एका-एकी तो माणूस तिच्याकडे वळून म्हणाला,

" पाहुण्यांची व्यवस्था कर. त्या खुर्च्या रिकाम्या कर. धर्मगुरू असले तरी खाणार नाहींत ते तुला. "

भराभर ती स्त्री खुर्च्यांवरचे ओले नाहीतर मळके कपडे गोळा करूं लागली. हातांना कंप होता आणि मधूनच एकादा कपडा तिच्या हातून पडत होता. तशी ती वयस्क नव्हती, बरीच तरुणही असूं शकत होती. परंतु डोक्यानें ती अर्धवट असावी. तिच्या चेहऱ्यावर भयाव्यतिरिक्त कसलाच भाव नव्हता.

तिच्या नवऱ्यानें कोट चढवला. बूट घातले. तो दाराकडे गेला. कडीवर हात ठेवून तो वळला. गोंधळलेल्या तिच्याकडे त्यानें तिरस्काराचा एक कडवट कटाक्ष टाकला.

" चल, माझ्याबरोबर ये. तुझी जरूर लागेल ! "

खुंटीवरची काळी घोंगडी घेऊन ती मागून गेली. दाराशीं ती वळली. पाहुण्यांशीं तिची नजरानजर झाली. ते तिच्याकडे मूढ होऊन परंतु कणवेनें पहात होते. पहातां पहातांच तो अर्धवट वाटणारा चेहरा आशयानें भरला. बोटानें तिनें त्यांना लांब, लांब जायला सुचवलें आणि शब्दांना अशक्य असें भय मुद्रेनें व्यक्त करीत मस्तक मागें झुकवून आपला पंजा तिनें आपल्या कंठावरून आडवा फिरवला. आणि ती निघून गेली. दार ओकें ओकें झालें. तिकडे पहात ते दोघे धर्मगुरू निःशब्द राहिले. घडलें, उमगलें तें इतकें निश्चित आणि भयंकर होतें कीं त्यांची वाचाच बसल्यासारखी झाली होती.

प्रथम फादर जोसेफला शब्द फुटला. " पिस्तुल भरलेलें आहे ना तुझें, जीं ? "

" हूं. परंतु तें गारठलें आहे. तरी पण हरकत नाहीं. "

ते घाईनें घराबाहेर पडले. काळवंडल्या प्रकाशांत, पावसाच्या धारेंतुन पागा दिसूं शकत होती. दोघे तिकडेच गेले.

बिशपनें हांक मारली, " सिनोर अमेरिकन, कृपा करून आमचीं जनावरें सोडून बाहेर आणतां का ? "

तो माणूस बाहेर आला. म्हणाला, " काय हवें तुम्हांला ? "

" आमचीं घोडीं. बेत बदलला आहे आमचा. तडक मोरा गांठायचें ठरवलें आहे आम्हीं. तुम्हांला तसदी पडली त्याबद्दल हा डॉलर. "

त्या माणसानें धमकीवजा पवित्रा घेतला. त्या दोघांकडे तो पाहूं लागला तशी त्याचें मस्तक सापाच्या फणेसारखें झुललें. " काय प्रकार आहे ? घर पसंत नाहीं माझें तुम्हांला ? "

"खुलाशांची गरज नाहीं. फादर जोसेफ,पागेंत जाऊन घोडीं बाहेर आणा–"

" हां, जाऊन तर पहा माझ्या पागेंत––"

बिशपनें पिस्तुल सरसावलें. "याद राखा, सिनोर, तुमच्या उद्दाम जिभेपासून दूर जाण्यापलिकडे आम्हांला दुसरें कांहींएक नको. आहांत तिथेंच उभे रहा–"

तो माणूस निःशस्त्र होता. जनावरें घेऊन फादर जोसेफ पागेंतून बाहेर आला. त्यांच्यावरचीं जिनें अद्याप उतरवलेलीं नव्हतीं. हें बरें होतें. दोन्ही जनावरांच्या तोंडीं चाऱ्याचा घांस होता. त्यांनाही हें स्थान मानवलें नसावें. कारण पाठीवर धन्यांचें वजन जाणवतांच तीं सडकेकडे धांवलीं. उतरत्या सडकेनें पुढें निघालीं. फादर जोसेफ म्हणाला, " त्यांच्या घरांत खात्रीनें बंदूक असेल. पाठींत गोळी खाऊन मरण्याची आपली तरी इच्छा नाहीं. "

" माझी तरी कुठें आहे ? परंतु तशी भीतीही नाहीं. काळोख बराच पडला आहे. आतां घोड्यावरून त्यानें पाठलाग आरंभला तर गोष्ट निराळी. पागेंत आणखी घोडीं होतीं ? "

" होतें एक. " फादर जोसेफची मदार मुख्यतः सेंट जोसेफवर होती. अडीअडचणीला तो त्याच्यावरच भार टाकीत आला होता. त्या अनोळखी स्त्रीनें आकस्मिकपणें त्यांना दिलेला इषाराही तो सेंट जोसेफचीच कृपा मानत होता.

डोंगराचा मुख्य भाग उतरून होईतों चांगलीच रात्र पडली होती आणि पावसाची धारही वाढली होती.

बिशप म्हणाला, " या अंधारांत मार्गाची खात्री नाहीं. परंतु आपल्या पाठीवर तरी कोणी नाहीं असा विश्वास वाटतो. आतां या हुषार जनावरांवरच विसंबावें हें उत्तम. त्या बिचाऱ्या गरीब बाईचा मात्र तो अधम संशय घेऊन

तिचा छळ करील अशी मला भीति वाटते. " वाटेवरल्या काळोखांत त्याला सारखी तीच दिसत होती--कंठावरून पंजा फिरवतांना !

मध्यरात्रीनंतर थोड्या अवकाशांत ते मोराला पोंचले. स्थानिक धर्मगुरूचें घर आश्रयार्थींना भरून गेलें होतें. या दोघांना बिछाना मिळावा म्हणून दोघां आश्रयार्थींना त्या बिछान्यांतून बाहेर घालवावें लागलें.

सकाळीं पार्गेतून एक पोरगा आला आणि त्यानें बातमी दिली कीं तिथल्या चाऱ्यात एक वेडी स्त्री पहुडलेली दिसली होती. दोघां धर्मगुरूंची भेट ती परोपरीनें मागत होती. ' पार्गेतल्या शुभ्र घोड्यांचे धनि ' म्हणून ती त्यांचें वर्णन करीत होती.

तिला त्यांच्यासमोर आणण्यांत आलें. तिच्या अंगावरच्या वस्त्राच्या चिंध्या झाल्या होत्या आणि अंगभर चिखलाचे डाग दिसत होते. आदल्या रात्रीची, आपले प्राण वांचविणारी स्त्री ती हीच, हें ओळखणें त्या धर्मगुरूंना जड गेलें, इतकी तिची रया बदलली होती.

आपण पुन्हा घरांत गेलोंच नाही असें तिने सांगितलें. तिचे नांव होतें मॅग्डालेना. हे दोघे धर्मगुरू घोड्यांवरून निघून गेले तशी बंदूक आणण्याकरतां तिचा नवरा घरांत धांवला होता, आणि संधि साधून पार्गेपल्याडल्या कपारी-वरून तिनें खालीं उडी झोकली होती. तशीच रात्रभर वाटचाल करून ती मोराला पोंचली होती. नवरा आपल्याला गांठून ठार करील हे भय तिला सर्व वाटभर अर्धमेलें करीत होतें; परंतु तसें मात्र घडलें नव्हते. फटफटत्या पहांटे ती त्या गांवी पोंचली होती. पार्गेत उबेकरता आणि निवाऱ्याकरतां जावून, घर जागे होण्याची वाट पहात पडली होती. बिशपपुढे वांकून ती इतक्या एकाहून एक भयंकर गोष्टी सांगूं लागली कीं त्याने तिला मध्येंच थांबवलें आणि स्थानिक धर्मगुरूकडे तो वळला. म्हणाला, " स्थानिक अधि-काऱ्यांकडे हे प्रकरण सुपूर्द करण्यांत आलें पाहिजे. इथें मॅजिस्ट्रेट आहे का ? "

मॅजिस्ट्रेट तर नव्हता. परंतु गांवांत एक म्हातारा पारधी होता. तो पंच म्हणून काम पहात असे. जाबजबाबाकरितां साक्षीदार म्हणून त्याचा उपयोग होत असे. त्याला बोलावणें धाडण्यांत आलें आणि मध्यंतरी मग फादर लतूरनें या बापड्या स्त्रीची सर्व प्रकारें काळजी घेण्याला भोंवतालच्या आश्रयार्थी बायांना समजावलें.

घटकाभरांत मॅग्डालेना अन्नानें आणि दयेनें तृप्त होऊन आपली कर्मकथा सांगण्याकरतां तयार झाली. पंचानें त्याचा एक कॅनडियन स्नेही, स्पॅनिश

समजणारा सेंट रेन याला बरोबर आणलें होतें. तो त्या स्त्रीला ओळखत होता हें आणखी विशेष. त्यानें तिचें नांव मॅग्डालेना वाल्डेझ असल्याचें आणि ती चौवीस वर्षांची लॉस रॅन्कोस ड ताओसची असल्याचें हमीपूर्वक सांगितलें. त्याच्या म्हणण्याप्रमाणें तिचा नवरा मूळचा व्योमिंग भागांतला. पारध्यांच्या एका गटाबरोबर तो त्या भागांत प्रथम आला होता. तिथल्या गोऱ्या लोकांना त्याची उत्तम माहिती होती परंतु स्थानिक मेक्सिकन मुलीच्या दृष्टीनें मात्र अमेरिकनाशीं लग्न म्हणजे श्रीमंती असें समीकरणच होतें. सहा वर्षांमागें मॅग्डालेनाचें त्याच्याशीं लग्न झालें होतें. मोरा–मार्गावरच्या त्या भिकार घरांत तिनें त्याच्याबरोबर तब्बल सात वर्षें काढलीं होतीं, या काळांत वाटेंत त्याच्याइथें रात्रीकरता मुक्काम केलेल्या चार मुसाफिराना त्यानें लुबाडून ठार केलें होतें. त्या भागांत कोणाच्या ओळखीपाळखीचे ते नव्हते, लांबचे होते. मॅग्डालेनाही आता त्यांचीं नावें विसरली होती. तिला आठवत होतें एवढेंच कीं, त्यांतला एक जर्मन मुलगा होता. त्याला स्पॅनिश आणि इंग्लिश फार जुजबी येत होतें. त्याचे डोळे निळे होते. त्याच्या हत्येचें दुःख तिला विशेष झालें होतें. पागेमागच्या भुसभुशीत जमिनीत सर्वांना पुरण्यांत आलें होतें. त्यांचीं प्रेतें पावसात बाहेर येतील हें भय तिला नेहमीं व्यापून राही. त्या मुसाफराचे घोडे रात्रींच्या रात्रीं लांब उत्तरेकडे नेऊन इंडियनांना विकण्यांत आले होते. लग्नापासून मॅग्डालेनाला एकूण तीन मुलें झालीं होतीं. जन्मानंतर कांहीं दिवसांत यातलें प्रत्येक मूल तिच्या नवऱ्यानें ठार केलें होतें––अशा अघोरी पद्धतींनीं कीं तें सारें तिला सांगतां सागवत नव्हतें. पहिलें मूल त्यानें मारलें तेव्हां ती त्याच्याकडून पळून जाऊन रॅंकोसला रहाणाऱ्या तिच्या आईबापांकडे जाऊन राहिली होती. परंतु तो मागोमाग आला आणि म्हाताराम्हातारीला धमक्या देऊन त्यानें तिला बळजोरीनें, परत नेलें होतें. कुठें मदतीकरतां याचना करण्याला ती सतत घाबरली होती परंतु आश्रयार्थ आलेल्या मुसाफऱ्यांना असेंच दोनदां तिनें संधि साधून इषारे देऊन वेळींच घालवून लावलें होतें. या वेळीं ती या धर्मगुरूंमागें आली होती ती ते तिला नक्की निवारा आणि संरक्षण देतील या खात्रीनें. अधिक हत्त्या तिला आतां पहावणें शक्य नव्हतें. मरण येईल तर तिला हवें होतें. त्याआधीं शक्य तर या लोकांच्या आश्रयाला राहून पापपुण्याचा हिशेब जमेल तितका मनाजोगता करून घेण्याची तिची इच्छा होती.

ताबडतोब सेंट रेन आणि त्याच्या मित्रानें माणसें जमवलीं. स्केलच्या घराकडे ते गेले. पागेमागें चार माणसांचे सांगाडे त्यांना मिळाले. ताओसच्या रस्त्यावर

तिकडून बायकोचा शोध घेऊन परत येणाऱ्या स्केलला त्यांनीं कैद केलें. त्याला मोराला आणलें. सेंट रेन तसाच ताओसला मॅजिस्ट्रेटला आणण्याकरतां गेला.

गांवात तुरुंग नव्हता, म्हणून एका रिकाम्या पागेंत स्केलला पहाऱ्यांत डांबण्यांत आलें. बायकोला उद्देशून स्केल सारखा शिव्याशाप उच्चारत होता आणि हें पहायला मोठी गर्दी जमली होती. मॅग्डालेनाला स्थानिक धर्मगुरूच्या घरीं ठेवण्यांत आली होती. सँता फेला आपल्याला न्या म्हणून ती घाबरलेली स्त्री फादर ल्तूरची सारखी प्रार्थना करीत होती. स्केलला तसें बांधून टाकण्यांत आलें असलें तरी ही बाई फादरच्या मतेंही असावी तितकी सुरक्षित नव्हतीच. रात्रभर तो आणि गांवचा पंच असे दोघे पिस्तुलें घेऊन पहाऱ्याला बसून होते.

सकाळीं मॅजिस्ट्रेट त्याची माणसें घेऊन येऊन पोंचला. पंचामार्फत त्याला सर्व हकिकत सुनावण्यांत आली. ताओसमध्यें मॅग्डालेनाची कांहीं व्यवस्था होईल का, म्हणून बिशपनें जमलेल्या मंडळीला विचारलें. कारण या गांवीं तिला निश्चित वाटणें शक्य नव्हतें.

शिकारीच्या कातडी पोषाखांतला एक इसम गर्दीतून पुढें आला. मॅग्डालेनाच्या भेटीची इच्छा त्यानें प्रकट केली. फादर लतूरनें त्याला, मॅग्डालेना पडून होती त्या खोलीत नेलें. तो नवखा माणूस तिच्याजवळ गेला, जातांना त्यानें आपली टोपी हातांत काढून घेतली. तो खालीं वांकला आणि आपला हात त्यानें तिच्या खांद्यावर ठेवला. तो अमेरिकन होता हें स्पष्ट दिसत होतें, परंतु तो सफाईदार स्पॅनिशमध्यें बोलत होता.

"मॅग्डालेना, ओळखलेंस का मला?"

एकाद्या काळ्या भिंतीआडून डोकवावें तसें तिनें त्याच्याकडे पाहिलें. तिच्या बेचैन, व्यथित नजरेत कांहींतरी चाळवलें. त्याचे गुडघे तिनें दोन्ही हातांनीं घट्ट पकडले.

"क्रिस्टोबल!" ती कण्हली. "तुम्ही क्रिस्टोबल!"

"मॅग्डालेना, माझ्याबरोबर मी तुला घरीं नेतों. माझ्या बायकोबरोबर रहा. तिथें रहायला तुला भीति वाटेल का?"

"नाहीं नाहीं, क्रिस्टोबल, तुमच्याकडे मला भीति कसली? मी कांहीं पापिणी नव्हे कीं डाकिणी नव्हे. मी तसली कुणी नव्हे."

त्यानें तिचें मस्तक कुरवाळलें. "तूं फार चांगली आहेस, मॅग्डालेना, पूर्वींपासून तूं फार चांगली आहेस. आतां सारें ठीक होईल. माझ्यावर भरंवसा ठेव."

मग तो बिशपकडे वळला. म्हणाला, "सिनोर व्हिकारिओ, माझ्याबरोबर

येईल ही. ताओसनजीक रहातो मी. माझी बायको मूळ या भागांतलीच. तिचें आणि हिचें चांगलें जमेल. तो हरामखोर तुरुंगांतून सुटला किंवा पळाला तरी माझ्याकडे फिरकणें शक्य नाहीं. मला ओळखतो तो. माझें नांव कार्सन. ''

या माणसाला भेटण्याचें फादर लतूरच्या मनांत आधींपासूनच होतें. नांवावरून आणि 'स्काउट'च्या पेशावरून हा माणूस कोणी धिप्पाड आणि जरब वाटावी अशा समर्थ कुडीचा इसम असेल अशी त्याची कल्पना होती. परंतु हा कार्सन तर बिशपइतकाही उंच नव्हता, कुडीचा भारी सडपातळ होता, वृत्तीनें सौम्य, संथ होता आणि दक्षिणेकडल्या पद्धतीनें तो इंग्लिश बोलत होता. त्याची मुद्रा विचारी आणि सावध होती. निळ्या डोक्यांत कायमचें कुतूहल होतें. पिंगट मिशांखालच्या जिवणींत सुसंस्कृततेचें स्पष्ट वळण होतें. ओठ नाजुक वळणाचे आणि भरदार होते. जिवणीपासच्या रेषांत किंचित् औदासिन्य, चिंतनशीलता आणि या दोहोंपोटचा संभाव्य हळवेपणाहि प्रतीत होत होता. त्याच्याकडे पाहतांना बिशपच्या मनांत समाधान दरवळून आलें. त्याच्या साऱ्या व्यक्तिमत्वांत उच्च मूल्यें, निष्ठा इत्यादि वैशिष्ट्यांची ग्वाही त्याला जाणवली. शब्दांतून व्यक्त न होणारी, न पटणारी परंतु या प्रकारचीं दोन माणसें एकत्र येतांच निःशब्दपणें प्रकट होऊन क्षणार्धांत पटणारी ही ग्वाही. बिशपनें कार्सनचा हात हातीं घेतला. ''तुम्हांला भेटण्याची इच्छा मनांत केव्हांपासून होती. या भागांत येण्याआधींपासून ही इच्छा मी बाळगून होतों. सांता फेला आपली गांठ केव्हां ना केव्हां पडेल असे मी मानलें होतें. ''

कार्सननें स्मित केलें. तो म्हणाला, '' मी जरा संकोचीच आहे. आणि अपेक्षाभंगाच्या धास्तींत मी नेहमीं असतों. पण आतां प्रश्न नाहीं. इथून पुढें आपल्यात कसलाच अडथळा निर्माण होणार नाही. ''

एका प्रदीर्घ स्नेहाचा हा आरंभ होता.

कार्सनच्या 'रॅंच'कडे परततांना मॅग्डालेना फादर व्हेलंटच्या हवाली होती आणि बिशप आणि कार्सन असे दोघे घोड्यांवरून बरोबरीनें पुढें दौडत होते. केवळ पद्धत आणि उपचार म्हणूनच आपण कॅथॉलिक झालो असल्याचें कार्सननें संभाषणांत स्पष्ट केलें. मेक्सिकन मुलीशी लग्न लावण्यास हा पंथ स्वीकारण्याची अमेरिकनांची पद्धत होती.त्याची बायको वृत्तीनें खूप चांगली आणि सेवातत्पर,धार्मिक स्त्री होती. कॅलिफोर्नियाच्या गेल्या प्रवासापूर्वीं धर्म ही बायकांची बाब तो मानीत होता. कॅलिफोर्नियांत तो आजारी पडला. तिथल्या मिशन्सपैकीं एका मिशनच्या धर्मगुरूंनीं त्याची सेवासुश्रूषा केली, त्याला बरें केलें. '' मग मात्र मला वेगळें

वाटूं लागलें. माझें मत, माझे समज बदलले. आंतल्या स्फूर्तीनें आपण केव्हां तरी श्रद्धावंत कॅथॉलिक होऊं असें वाटूं लागलें. धर्मगुरु हलकट आणि जोगिणी नीच असतात असा आमचा लहानपणापासून समज करवून देण्यांत आलेला. मिसुरीत हें असेंच मानण्यांत येतें. इथल्या अनेक धर्मगुरूंकडे पाहिले तर तेंच खरेंही वाटतें. आमच्या ताओसचा पाद्री मार्टिनेझ हा अशांतला. इथल्या वस्ती-वस्तींत त्याचीं पोरें आणि नातवंडें पसरलीं आहेत. ॲरोयो हॉंडोचा पाद्री ल्युसेरो वृत्तीनें दमडीचोर. धार्मिक कारणांसाठीं दरिद्री जनतेला लुबाडीत असतो."

कार्सनबरोबर स्थानिक जनतेच्या गरजांबद्दल बिशपचें बरेंच बोलणें झालें. कार्सनच्या निष्कर्षांबद्दल त्याला मनस्वी विश्वास वाटूं लागला होता. ते दोघेही वयानें सारखेच--चाळिशी नुक्ती ओलांडलेले. दोघाचाही अनुभव व्यापक. त्यामुळें आलेली समज आणि धार मोठी. जगप्रसिद्ध संशोधन--योजनांत कार्सननें वाटाड्याचें काम केलेलें होतें, परंतु पूर्वीं पारध्याचा पेशा तो करी तेव्हां होता तसाच तो आतांही दरिद्री होता. छोट्याशा खोपटांत तो त्याच्या मेक्सिकन बायकोसमवेत राही. सांता फे आणि पॅसिफिकचा किनारा यांच्या दरम्यानचा प्रचंड टापू एखाद्या पद्धतशीर नकाशाच्या रूपानें अद्याप कोणी आंखून, रेखून नवख्यांकरतां उपलब्ध केलेला नव्हता. किट कार्सनच्या मेंदूंत मात्र त्याचा नकाशा सुसज्ज होता. एकादा प्रदेश वा चेहरा ताडण्यांत सीमेच्या वाकबगार असलेल्या या हुषार माणसाला अक्षरओळख मात्र बिल्कुल नव्हती. जेमतेम त्याला सही करतां येत असे. तो असा निरक्षर राहिला तो अपघातानें; या टापूंत येऊन पडल्यामुळेंच. चौदाव्या वर्षापासून या भागांतल्या प्रवाश्यांकडे तो भटारी किंवा खेंचर-हांक्या म्हणून काम करूं लागला होता. यांत कोणी क्रूर आणि माथेफिरू लोकही असत-यांच्याशीं वारंवार संबंध आल्यानें स्वाभिमान आणि दयार्द्रता त्याच्या हृदयांत पक्की मुरली होती. मॅग्डालेनाबद्दल बिशपकडे बोलतांना तो उदारपणें म्हणाला, " ताओसमध्यें मी तिला पहात असे तेव्हां ती केवढी देखणी होती म्हणून सांगूं ? आणि आतां काय ही तिची दशा !"

रीतसर खटला चालवण्यांत येऊन सराईत खुनी बक स्केल्सला फांशी देण्यांत आलें. एप्रिलच्या आरंभीं सांता फेहून बिशप सेंट लुईला निघाला. बाल्टि-मोअरच्या प्रादेशिक मंडळाच्या बैठकीकरतां तो जात होता. सेप्टेंबरमध्यें तो परतला तेव्हां आपल्यासमवेत त्यानें पांच जोगिणी आणल्या होत्या. या साऱ्याच

मोठ्या धीराच्या बाया होत्या. सांता फेमध्यें मुलींकरतां शाळा काढावी असा बिशपचा बेत होता आणि म्हणूनच त्यानें या पांचजणींना आणलें होतें. येऊन पोंचतांच त्यानें मॅग्डालेनाला बोलावणें पाठवलें आणि तिला या पांचजणींच्या सेवेकरतां नेमलें. त्या पांचजणींविषयी तिला नितांत आदर वाटला आणि त्यांच्या सेवेंत तिचा काल मनस्वी समाधानानें जाऊं लागला. इतका कीं शाळेला भेट देतांना बिशप स्वयंपाकघराच्या दारानें आंत शिरून मॅग्डालेनाच्या सोज्ज्वळ, सुंदर, समाधानी चेहऱ्याचें दर्शन एकदां घेतल्याविना रहात नसे. तिचें सौंदर्य आतां, कार्सननें म्हटलें होतें तसें पुन्हा एकवार विकसित झालें होतें. मध्यंतरीचा यमपुरीचा अनुभव तिच्या मनावरून ईश्वराच्या सेवेंत, आतां पुसून निघत होता.

# तृतीय खण्ड

.१.

सांता फेला आल्यापासून वर्षभरांत बिशप लतूरचा मुक्काम खुद्द त्याच्या नेमलेल्या टापूंत जेमतेम चार महिनेच होता. सहा महिने बाल्टिमोअरच्या मंडळाच्या बैठकींत खर्च झाले होते. तिकडलें बोलावणें आल्यानेंच तो तिकडे गेला होता. तो प्रवास थोडाथोडका नव्हता. सांता फे ट्रेलच्या मार्गानें सुमारें हजार मैलांची मजल मारून तो प्रथम सेंट लुईला गेला होता; तिथून वाफोरानें पिट्सबर्गला, तिथून डोंगर ओलांडून कम्बर्लेंडला आणि मग नव्या रेल्वे मार्गानें वॉशिंग्टनला. परतीचा प्रवास याहून लांबणीचा आणि मंद गतीचा झाला होता. कारण बरोबर त्या पांच जोगिणी होत्या. सप्टेंबरच्या अखेरीला बिशप त्यांच्यासमवेत सांता फेला पोंचला.

आतांपर्यंत, बिशप लतूरचें सारें कार्य दूरदूरच्या फिरतीच्या स्वरूपाचेंच झालें होतें. त्याचें नेमून दिलेलें विस्तीर्ण कार्यक्षेत्र अद्याप तसें त्याला अपरिचित, अगदीं गूढ होतें. त्याचा परिचय करून घेण्याला, तेथल्या माणसांशीं ऋणानुबंध जोडण्याला तो आतां उत्सुक होता. चर्चेसच्या उभारणी आणि प्रस्थापनेच्या जबाबदारीतून त्याला आतां तात्पुरती मुक्तता हवी होती आणि पश्चिमेकडल्या पुरातन, एकीकडल्या अशा सांतो डॉमिंगो, इस्लेता, लगुना, ॲकोमा इथल्या मिशन्सना त्याला भेटी द्यायच्या होत्या, तेथील परिस्थिति जाणून घ्यायची होती.

ऑक्टोबरच्या उत्तम हवेंत, अंथरुणें पांघरुणें आणि कॉफीचें भांडें घेऊन, बरोबर जाकिंतो या पेकॉस प्युएब्लोच्या तरण्याताठ्या इंडियनला वाटाड्या म्हणून घेऊन, बिशप लतूर पश्चिमेकडे निघाला. अल्बुकर्कला तेथल्या उमद्या वृत्तीच्या लोकप्रिय पॅड्रे गॅलेगॉसच्या सहवासांत त्यानें एक रात्र आणि एक दिवस काढला. सांता फे नंतर त्याच्या कार्यक्षेत्रांतलें अल्बुकर्क हें दुसरें महत्त्वाचें चर्च. तेथला धर्मगुरू वजनदार अशा मेक्सिकन कुळीचा होता. त्यानें आणि त्याच्या

भक्तमंडळींनीं त्यांच्या आवडीनुरूप चर्चचें स्वरूप घडवलेलें होतें. चर्च त्यांनीं खूप शृंगारलें सजवलें होतें. पॅड्रे गॅलेगॉस तसा बिशप लतूरहून दहा वर्षांनीं ज्येष्ठ असला तरी 'फॅडँगो'चें नृत्य लागोपाठ पांच रात्री कायम उत्साहानें नाचण्यांत मागें घेणारा नव्हता. अमेरिकन वसाहतींत त्याचे बरेच स्नेही होते; त्यांच्याबरोबर तो एरवीं 'पोकर' खेळत असे किंवा शिकारीला जात असे. वेगवेगळ्या बनावटीच्या उंची मेक्सिकन मद्यांचा अद्ययावत सांठा त्याच्याकडे होता. पाहुणचाराची त्याला आवड होती आणि नशीब उलटलेला जुव्वेबाज किंवा नशा उतरूं घातलेला सैनिक यांचें त्याच्याकडे उत्तम आदरातिथ्य होत असे. एका स्थानिक सधन मेक्सिकन विधवेचा या पॅड्रेवर मोठा लोभ होता आणि त्याच्याकडल्या मेजवान्यांतून ती नेहमीं यजमानिणीची जबाबदारी पार पाडीत असे. त्याचीं इतर कामेंही ती एरवीं मनापासून आणि दक्षतेनें करीत असे. रविवारीं प्रवचन आणि प्रार्थना संपल्यावर अल्बुकर्कमध्यें एकमेव अशी तिची बंद बग्गी चर्चपुढें बराच वेळ खोळंबून असे आणि मग पॅड्रे तिच्यासमवेत तिच्याकडे भोजनार्थ म्हणून जाई.

बिशप लतूर आणि फादर व्हेलंटनें पॅड्रेच्या या वर्तणुकीची व्यवस्थित चौकशी केली होती आणि क्रिसमसपूर्वी चर्चला लांच्छनपद अशा या प्रकरणाचा निर्णय लावून टाकण्याचें नक्की केलें होतें.

परंतु या खेपेला, प्रत्यक्ष तिथें मुक्काम ठेवल्यावर, लतूरनें तिथल्या परिस्थिती-बाबत नापसंति वा नवल यापैकी कांहींच दर्शवलें नाहीं. पॅड्रेही त्याच्याशीं आनंदी वृत्तीनें आणि सभासमारंभांतल्या अदबीनेंच वागला. बिशपनें, आपल्या मुक्कामांत 'कन्फर्मेशन'साठीं कोणी न आल्याबद्दल किंचित् नवल व्यक्त केलें तेव्हां पॅड्रेनें न कचरता, न अडखळता खुलासा केला की 'बॅप्टिजम'च्या वेळीच मुलांना 'कन्फर्म' करण्याची त्याची पद्धत होती.

तो म्हणाला "इथल्यासारख्या क्रिश्चन जमातींत हें चालतें. पुढें मुलें वाढतील तसतसें त्यांना धार्मिक शिक्षण मिळेलच हें आम्हांला माहीत असतें. म्हणून आरंभालाच आम्ही त्यांना कॅथॉलिक दीक्षा देऊन टाकतो. त्यांत गैर काय आहे?"

बिशप त्याच्या दौऱ्यावर कदाचित् सोबतीला आणि सहाय्याला आपल्याला बोलावील अशी भीति पॅड्रेच्या मनांत होती. मिळेल त्या अन्नावर आणि वाटेल त्या परिस्थितींत जगण्याची, दिवस काढण्याची त्याला संवय नव्हती; म्हणूनच, बिशप यायच्या आधीं अनेक रात्रीं तो उत्साहपूर्वक नाचत असला तरी बिशपचें

स्वागत करतांना त्यानें एका पायाला बँडेज बांधलें होतें आणि संधिवाताची तक्रार तो वारंवार करीत होता. ॲकोमाला शेवटचें ' मांस ' त्यानें केव्हां घेतलें या बिशपच्या प्रश्नावर त्यानें जवळ जवळ मुग्धता पाळली. तिथल्या मागासलेल्या लोकांचीच तशी इच्छा नव्हती, एरवीं तो ' पॅशन वुइक ' मध्ये तिकडे मागें त्याकरितां जात असे असें गुळमुळीत उत्तर त्यानें दिलें. तो म्हणाला, " मी अखेरचा तिकडे गेलो होतों तेव्हां तिथल्या चर्चमध्ये मला प्रवेशही मिळाला नाहीं. तिथल्या लोकांनीं त्याच्याकडे चर्चची चावी नसल्याची बतावणी केली; त्यांच्या मतें गव्हर्नरकडे ती होती पण तो कांही कामकाजाकरतां म्हणे सेबोलेटा डोंगराकडे गेला होता. "

बिशपला पॅड्रे गॅलेगॉसची संगत पुढल्या प्रवासांत नको होती. उघड नकार दर्शविण्याचा प्रसंग टळत असल्याबद्दल त्यालाही आनंद वाटला. आणि पॅड्रेचा औपचारिक निरोप घेऊन तो अल्बुकर्कहून निघाला. वाटेंत त्याचे मन या गॅलेगॉसच्या विचारांतच व्यग्र राहिलें. धर्मगुरू म्हणून तो टाकाऊ होता. त्याची आत्मसंतुष्टता आणि लोकप्रियतेची हौस एवढी मोठी होती की त्याचें मार्ग तो बदलणें कदापि शक्य नव्हतें. तसा सराईत जुव्वेबाज तो दिसत नसे, परंतु त्याच्या वागण्या-दिसण्यांतली एक चमक आणि कसब दुहेरी आणि गुप्ततेनें भरलेलें जीवन सुचवीत होती. एकच मार्ग मोकळा होता; धर्मगुरूंच्या पदावरून त्या माणसाला दूर करणें. अशा प्रकारें आसपासच्या टापूंतल्या छोट्या धर्मगुरूंना ताकीद मिळेल असें करणें.

फादर व्हेलंटनें बिशपला आगाऊच बजावून ठेवलें होतें की इस्लेताला एक रात्र त्यानें मुक्काम केलाच पाहिजे. तिथला म्हातारा, जवळ जवळ आंधळा धर्मगुरू पॅड्रे जीसस द बॅका बिशपला आवडेल अशी त्याला खात्री होती. इस्लेताच्या इंडियन जनतेनही तो कैक वर्षांच्या सेवेनें फार प्रिय झाला होता.

इस्लेतानजीक येताच बिशपला नवी उमेद वाटूं लागली. समोरचें दृश्य त्याला रमणीय वाटले. चर्चची ती, ठळक, शुभ्र आकृति, तिच्याभोंवती विखुरलेलें गांव. ॲकासियाची कांही झगझगीत निळी–हिरवीं झाडे. त्या झाडांच्या दर्शनानें नेहमींच बिशपच्या मनीं कांहीं मधुर स्मृतितरंग उठत. फ्रान्सच्या दक्षिणेकडलें एक उद्यान त्याच्या स्मृतींत तरळे. तिथें त्याच्या तरूण भाच्यांना तो भेटायला जात असे. चर्चच्या वाटेनें बिशप घोड्यावरून पुढें झाल्यावर, तो म्हातारा धर्मगुरू त्याचें स्वागत करण्याकरतां लगबगीनें बाहेर आला. पहिल्या

अभिवादनानंतर तो आपल्या अधू डोळ्यांवर आडव्या पंजाची सावली धरून बिशपला कष्टपूर्वक न्याहाळूं लागला.

उद्‌गारला, " आपण माझे बिशप ? इतके तरुण ? "

बागेच्या वाटेनें दोघे त्या धर्मगुरूच्या निवासस्थानी गेले. चर्चमागेच हें होतें. बागेंत वेगवेगळ्या पद्धतीची मोठमोठीं खूप झाडें होतीं. आणि त्यांतून लांकडी पिंजऱ्यांतून पोपट पाळले होते. एक पंख कापलेले कांहीं पोपट उघड्यावर देखील उड्या मारतांना दिसत होते. टेवणीतल्या कपड्यांकरतां शोभा म्हणून पोपटांच्या पिसांचा तेथल्या इंडियनांना फार शौक असल्याचें धर्मगुरूने बिशपला सांगितलें. त्या दृष्टीनें, तिथल्या लोकांत प्रिय होण्याकरता एक साधन म्हणून, त्यानें हे पोपट मोठ्या प्रमाणावर पाळण्याचें ठरवले होते आणि पाळले होतें असे तो म्हणाला.

त्या धर्मगुरूचें घर अंतर्बाह्य शुभ्र रंगाचें होते. इस्लेतामध्यें घरांचा हाच प्रकार सामान्यपणें प्रचलित होता. तेथल्या कोठल्याही घराप्रमाणें धर्मगुरूचें घरही ओकेंबोकें वाटत होतें. तो म्हातारा स्वतः निष्कांचन होता आणि आपल्या चैनीकरतां स्थानिक लोकांवर भार घालणें त्याला पसंत नव्हतें. एक स्थानिक मुलगी त्याचें स्वैपाकपाणी करी. त्याव्यतिरिक्त कसलीच मोठी गरज त्याला भासत नसे. मुलीला स्वयंपाकाचें मोठेंसें कसब अवगत होतें असें नव्हे, पण ती वागायला दिसायला स्वच्छ आणि नीटनेटकी होती असे तो म्हणाला, हें एकूण गांवच, अगदीं यांतल्या सडकादेखील आपल्याला स्वच्छ वाटल्या असें बिशप म्हणाला तेव्हां तो धर्मगुरू त्यावर म्हणाला कीं जवळच एक टेकडी होती, तिच्यावर एक शुभ्र खनिज द्रव्य उपलब्ध होतें. स्थानिक लोक ते खणून आणून पांढऱ्या रंगासारखें वापरीत—त्यामुळें स्वच्छता. ही युक्ति त्यांना फार पूर्वीपासून अवगत होती आणि सर्वभरच्या शुभ्र कळेबद्दल हें गाव पूर्वापार प्रसिद्ध होतें. धर्मगुरूशीं थोडी बातचीत केल्यावर बिशपच्या ध्यानीं त्याचा बालिश निरागसपणा, साधेपणा, आणि अतिश्रद्धाळूपणा आला. त्याचबरोबर मनाचा एक दुर्मिळ मोठेपणाही त्याच्याकडे त्याला आढळला. त्याच्या डाव्या डोळ्यांत फूल पडलेलें होतें त्यामुळें मस्तक सदा कलतें धरून तो त्या फुलाआडून पहाण्याचा प्रयत्न करीत असल्यासारखा पाही. त्याच्या साऱ्या हालचाली डावीकडे झुकलेल्या होत्या. वाटे कीं वाटेंतलें कांहीं अडथळे तो टाळण्याचा, ओलांडण्याचा सतत प्रयत्न करतो आहे.

पोपटांनीं फुललेल्या त्या बागेंतून धर्मगुरूच्या निवासस्थानीं आल्यावर बिशपच्या ध्यानीं आलें कीं याच्या दारिद्री घरांतली एकुलती एक शोभेची वस्तू म्हणजे एक लाकडी पोपटच आहे ! एका दांडीवर तो पक्का बसवून

आढ्याला लटकावला होता. फादर जीसस आंतमध्यें त्यांच्या स्वैपाकिणीला सूचना देत असतां उभ्या उभ्या बाहेर बिशपनें तो पोपट खालीं काढून न्यहाळला. अखंड लाकडांतून तो कापला होता. बरोबर जिवंत पोपटाच्या आकाराचाच तो होता. शरीर आणि शेपूट ताठरलेलें, टणक. मस्तक किंचित् वळलेलें. पंख, शेपूट आणि कंठापासची पिसें कोरीव कामाने आणि रंगांनीं ओरझर्तीच दर्शवलीं होतीं. आकृतीच्या मानानें तिचें हलकें वजन लक्षांत येऊन बिशपला नवल वाटलें. खूप जुन्या लाकडाची शुभ्र तुकतुकी, तलमपणा त्या पोपटाच्या पृष्ठभागावर जाणवत होता. कोरीव काम होतें तें जेमतेम, रंगही नांवापुरतेच शिडकवले होते, आकारही तसें म्हटले तर फार सफाईनें घडवला नव्हता, परंतु गंमत अशी कीं तरीही तो पोपट मोठा जिवंत आणि अस्सल भासत होता.

बिशपच्या हातीं तो पोपट पहाताच पॅड्रे हंसला.

"माझी इस्टेट तुमच्या हातीं लागली तर एकूण ! युअर ग्रेस, हा पोपट ही या वस्तींतली सर्वांत जुनी वस्तू--असेंच म्हणा की या वस्तीहूनही जुनी."

तो पुढें म्हणाला, "या भागांतल्या इंडियनांच्या दृष्टीनें पूर्वापार पोपट हा मोठा नवसाचा आणि जवळ बाळगावा असा आवडीचा पक्षी रहात आला आहे. पूर्वापार त्याच्या पिसांना इकडे फार किंमत देण्यांत येते. स्पॅनिअर्डस् या भागांत यायच्याही आधीं, उत्तरेकडल्या न्यु मेक्सिकोंतले लोक पोपटांच्या पिसांकरतां आपलीं माणसें मध्यंतरीचे धोक्याचे, प्राणघातक मार्ग पार करून ट्रॉपिकल मेक्सिकोमध्यें धाडीत. कोणी मोठ्या कौशल्याने जिवंत पोपटच आणल्यास त्या पक्ष्याचें उमाप कौतुक होई. तो मेला तर सारी वस्ती दुःखानें, विषण्णतेनें भारावत असे. पुढें त्याच्या अस्थि श्रद्धापूर्वक जतन केल्या जात. इथें अशी पोपटाची एक कवटी जतन केलेली उपलब्ध आहे. हा लाकडी पोपट मी माझें बरेंच ऋण मानणाऱ्या एका म्हाताऱ्याकडून घेतला. तेव्हां तो मृत्युपंथाला लागला होता आणि त्याला कोणी वारस नव्हता. त्याच्याकडे हा असल्याचें मला केव्हांपासून माहीत होते. असे म्हणत की माझ्या पूर्वजांनीं हा त्यांच्या मूळ वस्तींतून इकडे आणला. मी तरी याला, त्या काळचे धोके आणि प्राणघाताचें भय पत्करूनही जिवाचा दिवा करून कोणी तरी ट्रॉपिकल मेक्सिकोहून बरोबर आणलेल्या कोणा अस्सल पोपटाचीच प्रतिकृति मानतों."

लगुना आणि ॲकोमाच्या परिस्थितीचें उत्तम चित्र फादर जीससनें बिशपपुढें उभें केलें. तरुण होता तेव्हां तो त्या भागांत प्रवचनाकरतां जात असे. सारें त्याच्याशीं तेव्हां आदरानें, स्नेहानेंच वागत.

तो म्हणाला, " ॲकोमाला जाल तेव्हां एक पर्वणी सोडूं नका. सेंट जोसेफचें एक चित्र आहे तिथें. स्पेनच्या एका राजानें त्यांना तें फार मागें केव्हां तरी भेट म्हणून धाडलें होतें. जागृत स्थान मानतात त्याला. अवर्षण आलें कीं तें चित्र काढून लोक तें त्यांच्या शेतावर नेतात आणि हमखास पाऊस येतो. या साऱ्या टापूंत नसतो तेव्हां त्याच्याकडे मात्र पाऊस येतो. त्यामुळें दुष्काळांतही त्यांच्याकडे चांगलें पीक निघतें. "

## २.

भल्या सकाळीं इस्लेता आणि त्याच्या त्या वृद्ध धर्मगुरूचा निरोप घेऊन फादर लतूर आणि त्याचा वाटाड्या असे दोघे अल्बुकर्कच्या पश्चिमेकडल्या वैराण मैदानांतून दिवसभर जात राहिले; तो सारा भाग राखेनें जणूं भरलेला वाटत होता. मरगळलेलीं, सुकलेलीं रोपें. आणि जरा टवटवीत वाटणारीं जंगली ' पम्पकिन 'चीं दाट उंच झुडपें यांचाच पहावा तिकडे तुरळक शिडकावा भासत होता. या झुडपांचें वैशिष्ट्य हें कीं त्यांना पसारा नव्हता. त्यांचीं बाणाच्या आकाराचीं अणकुचीदार, लांबट पानें झुबक्याझुबक्यांनीं उंच वाढलेली असत. त्यामुळें दिसतांना ती अनेक भुरे हिरवे जिवाणू सरपटतांना अचानक दचकून ताठ व्हावेत तशीं वाटत.

दिवस चढूं लागला तशीं वायूच्या एका वावटळीनें त्या प्रवाशांना गांठलें आणि दिवसा मावळतीचा अंधःकार सर्वभर दाटला. तसा जाकिंतोला तो प्रदेश चांगला परिचयाचा होता. लगुनाच्या धार्मिक नृत्य-समारंभांना तो वारंवार गेला होता तो इथूनच. परंतु आता तो तोंडाला रुमाल बांधून, मुंडी खालीं घालून घोड्यावरून जात होता. मुबलक रान आणि पाणी असलेल्या वस्तींतला तो मूळचा असल्यानें या वैराण भागाबद्दल त्याला कोणतेंही प्रेम नव्हतें. दुपारीं त्यानें घोड्यावरून उतरून थोडासा लांकूडफांटा गोळा केला आणि विश्रपकरतां कॉफी बनवली. भाकरी चघळतांना कचकचत होती कारण भोंवतालची वाळू तिच्यावर बसली होती.

मावळतीला, वाळूनें मळलेल्या वातावरणांत त्यांनीं मुक्काम टाकला आणि ते पांघरुणांत शिरले. रात्रभर गार वारा त्यांच्या अंगावरून भणभणत होता.

दोघेही इतके गारठले कीं फादर लतूर तर दिवस फटफटण्याआंत किती तरा वेळ जागा झाला. अखेर एकदांची पहाट फुटली. आभाळ स्वच्छ उजळलें. लौकरच दोघे मुक्काम आवरून पुढें निघाले.

दुपारीं केव्हां तरी खूप दूरवरचें लगुना जाकिंतोनें बिशपला दाखवलें. झगझगीत पिवळया वाळूच्या मोठमोठ्या उंच टेकड्यांपलिकडे तें दिसत होतें. पुढें पुढें गेल्यावर या टेकड्यांच्या पायथ्याशीं पाण्याचें एक दगडी कुंड लागलें. या कुंडाच्या नांवावरूनच त्या वस्तीला ' लगुना ' हे नांव पडलें होतें.

इस्लेताच्या दयाळू पॅड्रेनें त्याच्या आचाऱ्याच्या भावाला, नव्या 'हाय-प्रीस्ट'च्या आगमनाची वर्दी लगुनाच्या रहिवाश्यांना देण्याकरितां, पायीं पुढें पाठवलेंच होतें. त्यानें हेंही कळवण्याची व्यवस्था केली होती कीं हा नवा ' हाय-प्रीस्ट ' सज्जन माणूस असून तो पैसे घेणार नाही. त्यानुसार तेथले रहिवासी बिशपच्या स्वागतार्थ तयारच होते. गांवचें छोटे शुभ्र चर्च स्वच्छ करण्यात आलें होतें. त्याचीं द्वारें खुलीं करण्यांत आलीं होतीं. तें चर्च आंतून पाहतांच, त्यांतलीं पंचमहाभूतांचीं चित्रें आणि नक्षीकाम पहातांच फादर लतूरला लिऑन्सला असतां तिथल्या एका प्रदर्शनांत पाहिलेल्या पर्शियन टोळीवाल्या म्होरक्याच्या तंबूचा अंतर्भाग आठवला. हें नक्षीकाम स्पॅनिश मिशनऱ्यांनीं केलें असेल कीं ख्रिस्ती इंडियनांनीं, तें त्याला ठरवतां आलें नाही. समजलेंही नाहीं.

त्याला सांगण्यांत आलें कीं ' मास 'साठीं गांवकरी सकाळीं जमणार आहेत. बरींच मुलेंहीं ' बॅप्टाइज ' करायचीं होतीं असें त्याला कळलें. चर्चनजीकच्या दालनांत त्याची झोपण्याची व्यवस्था केली होती, परंतु, एक तर तिथें कुबट वास मारत होता आणि फादर लतूरने बाहेर उघड्यावर झोंपण्याचा बेत आधींच मनाशीं योजूनहि ठेवलेला होता,

जाकिंतोनें जळण जमवलें. स्थानिक रहिवाशाकडून पाणी आणलें आणि गांवाच्या उत्तरेकडल्या एका निवांत ठिकाणीं त्यांनीं तळ ठोकला. मागल्याच बाजूला मोठमोठी टेकाडें होतीं. बिशपनें जाकिंतोला अगदी नजीकच्या टेकाडाचें नांव विचारलें.

" मला नाव माहीत नाहीं. " जाकिंतो अर्धवट स्वतःशीं म्हणाला. " पण इंडियन नांव माहीत आहे. "

" काय आहे तें ! "

" हिमपक्षी टेकडी म्हणतात त्याला. "

" वा ! छान नांव आहे. " बिशप उद्गारला. " फारच गोड. "

" इंडियनांकडे सुद्धां छान नांवें असतात ! " जाकिंतो तात्काळ म्हणाला. आणि मग हा टोमणा आपण या मोठ्या माणसाला उगींच मारला असें वाटून तो पुढें म्हणाला, " हायप्रीस्ट तुमच्यासारखा तरणा असावा याचें इथल्या लोकाना भारी आश्चर्य वाटतेंय. गव्हर्नर तर म्हणाला, हा तर माझ्या पोरांसारखा. याला मी ' पॅड्रे ' कसा म्हणूं ? "

जाकिंतोच्या सुरांत अभिमान होता. बिशपला तो सुखद वाटला. या इंडियनांच्या बोलीतले एक वैशिष्ट्य त्याला जाणवलें. साधी स्तुतीही उत्तम शिफारशीप्रमाणें वाटायला लावण्याचें सामर्थ्य तिच्यांत होतें.

" पण जाकिंतो, मनाने आतां मी तसा फारसा तरणा नाहीं. तुझें वय काय रे ? "

" सव्वीस. "

" मूलबाळ कांहीं ? "

" एक आहे. नुक्तेंच झाले आहे. "

मग दोघे बराच वेळ स्तब्ध होते. संभाषणाची ही पद्धत त्यांच्या चांगली परिचयाची झालेली होती. कथलाच्या भाड्यांतून कॉफीचे घोट घेत बिशप बसून होता. आता सूर्य बुडाला होता. उजळ खडक काळवंडले होते. स्वैपाकघरांतल्या शेगड्यांनी गावातल्या घरांच्या खिडक्या लाल ठिपक्यागत भासत होत्या. धूर वर तरळत होता. पश्चिमेकडलें सारें आभाळ सुवर्णानें माखलेल्या भुऱ्या मातीसारखे दिसत होतें. त्यात क्वचित लाल रंगाची छटा एखाद्या ढगाला धरून डोकावत होती. क्षितिजावर खूप उंच, नुक्त्या उजळलेल्या फुलवातीसारखा सायंतारा चमचमत होता. त्याजवळच स्थिर प्रकाश देत त्याहून खूप लहान असा दुसरा तारा उगवला होता.

जाकिंतोनें विडीचें थोटुक लाब फेंकलें आणि तोच बोलूं लागला.

प्रथम इंग्रजींत प्रत्येक अक्षरावर जोर देत तो म्हणाला, "दि इ–व्हि–निं–ग स्टार ". आणि स्पॅनिशमध्यें पुढें म्हणाला, " पॅड्रे, तो जवळचा छोटा तारा पाहिलात ? त्याला इंडियन्स मार्गदर्शक, वाटाड्या म्हणतात. "

भोंवतीं रात्र दाटत असतां दोघे बसून आपापल्या विचारांत गढले होते. आभाळ गडद निळें होतें. त्यावर चांदण्यांची शोभा रेखली होती. उंच टेकाडें यांत उंचवर घुसल्यासारखीं भासत होती. जाकिंतोचे विचार वा त्याचीं श्रद्धा-स्थानें जाणून घेण्याचा प्रयत्न बिशपनें फारसा केलेला नव्हता. एक तर त्याच्या दृष्टीनें तें रीतीला धरून नव्हतें आणि त्यात मतलबही नव्हता असे त्याला वाटत

होतें. कारण युरोपच्या संस्कृतींतले त्याच्या मनावरचे संस्कार जाकिंतोच्या इंडियन मनांत उतरवणें त्याला अशक्य होतें. आणि जाकिंतोमागेंही एक मोठी दीर्घ परंपरा होती हें त्याला दिसत होतें. कोणत्याही भाषेंत प्रयत्न केला तरी ही परंपरा त्याला पूर्णपणें उमगणें अशक्यच होतें. अंधाराबरोबर गारठा वाढला. फादर लतूरनें आपला जाडजूड कोट चढवला आणि जाकिंतोनें अंगभर लपेटलेलें आपलें वस्त्र ढिलें करून तें मस्तकापर्यंत ओढून घेतलें.

"कितीतरी चांदण्या. या चांदण्यांबद्दल तुम्हांला काय वाटतें, पॅड्रे ?" त्यानें विचारलें.

"जाणते लोक सांगतात जाकिंतो, कीं आपल्या या जगासारखींच त्या चांदण्या म्हणजेही जगें आहेत."

जाकिंतोच्या ओठांतल्या विडीचें जळतें टोक उजळलें आणि मंद झालें. मग तो म्हणाला, "छे बुवा. आपल्याला नाही पटत." एकादें विधान साकल्यानें विचारात घेऊन निकालांत काढणाऱ्या माणसाचा त्याचा सूर होता. "मला तर वाटतें, पॅड्रे, कीं ते महान् आत्मे आहेत."

उसासत बिशप उद्गारला, "असतीलही. कुणीही का असेनात, पण महान् मात्र आहेत. मति गुंग होते. जाकिंतो, आपण आपले आता ह्या जगन्नियंत्याची प्रार्थना करूं आणि झोपूं या."

एकदमच दोघांनी प्रार्थना केली आणि दोघे पांघरुणांत शिरले. झोपतांना बिशपच्या मनांत, या इंडियन मुलाशी आपले काही अनौपचारिक नातें जडतें आहे याविषयीं समाधान होतें. या तरुण इंडियनाना 'मुलगा' म्हणावेसें वाटे कारण त्याच्या अंगकाठींतच एक पोरगेला चळवळेपणा आणि उत्साह जाणवे. एरवीं त्यांच्या वागण्यांत अमेरिकन वा युरोपियन अर्थानेही पोरवयांतला नैसर्गिक उथळपणा बिलकूल नसे. जाकितो याला अपवाद नव्हता. तो कोणत्याही प्रसंगांत बिचकत नसे कीं गोंधळत नसे. खोल विचार करण्याचा प्रयत्न करी. या इंडियनांना मुळांत जें कांहीं वळण मिळत होतें तेंच कुटल्याही परिस्थितीला तोंड देण्याकरतां त्यांची तयारी करीत असलें पाहिजे. हा जाकिंतो त्याच्या घरीं निर्घोर असे तितकाच बिशपच्या रहात्या जागेतही असे. आणि केव्हां केव्हां तो तसा फार निर्घोर असत नसे. आपण आपल्या मार्गदर्शकाचा स्नेह जोडण्यात, कशी का होईना, पण बरीच प्रगति केली आहे हे फादर लतूरला जाणवत होतें.

याचें कारण असें होतें कीं जाकिंतोला फादरचीं माणसें जोडण्याची, त्यांच्याशीं वागण्याची पद्धत आवडत असे. पॅड्रे गॅलेगॉसशीं त्याचें वागणें अचूक असे

तसें पॅड्रे जीससशीही तितकेंच अचूक असे. आणि इंडियनांशींही तो अस्सल सौजन्यानें वागे. त्याचा आधींचा अनुभव असा कीं हे गोरे लोक इंडियनापुढें नेहमीं सौजन्याचा आणि कनवाळूपणाचा खोटा आव आणीत. याचें एक उदाहरण म्हणजे फादर व्हेलंट. याच्या मुद्रेवर अशा वेळीं सौजन्य असे पण त्याच वेळीं आग्रही वृत्तीही लपत नसे. बिशप लतूरचें तसें नव्हतें. तो नेहमीं सहज आणि मोकळा वागे. लगुनाच्या गव्हर्नरशीं बोलतांना त्याचा जो चेहरा तोच जाकिंताशीं बोलतांना आणि तोच एकाद्या पॅड्रेशीं बोलतांना. जाकिंतोच्या दृष्टीनें हें कांहींतरी विशेष होते, महत्त्वाचें होतें.

## ३.

दुसऱ्या दिवशी सकाळी जरा लौकरच 'मास' उरकून फादर लतूर आणि त्याचा वाटाड्या, असे दोघे लगुना आणि ॲकोमा या दरम्यानच्या सखल वाटेला लागले. साऱ्या फिरतींत बिशपनें असा प्रदेश पाहिला नव्हता. लाल मातीच्या मैदानांत मधून मधून प्रचंड दगडी स्तंभ उभे होते. यांचा आकार 'गॉथिक' पद्धतीचा होता. मोठमोठ्या चर्चेसचे ते असावेत असा भास होत होता. त्याची रचना अस्ताव्यस्त नव्हती. मध्यें चांगलें अंतर टाकून ते व्यवस्थित उभे केलेले होते. हे मैदान ही एके काळी कदाचित् एकादी विस्तीर्ण नगरी असेल. त्यातल्या छोट्या इमारती आता काळाच्या घणांनीं मातीला मिळून सार्वजनिक इमारती तेवढ्या या स्वरूपांत कशाबशा शिल्लक असाव्यात. दगडी बांधकामाचे हे डोंगराएवढे उंच वाटणारे अवशेष. कुठे कुठे थोडी फार वनस्पति आढळली होती. कुठे 'ज्युनिपर्स' तर कुठे 'रॅबिट ब्रश.'

या साऱ्या भागाला एका अपुरेपणाची हुरहूर चिकटून राहिली होती. जणूं जग घडवण्याचें सारें सामान जमवून परमेश्वर कचरला. तिथून गेला आणि मागें सारें तसेंच पडून राहिलेलें होते. त्यानें कदाचित् इथे एकादा डोंगर बांधला असता, किंवा सपाट मैदान बनवलें असतें किंवा पठार घडवलें असतें. पण त्यानें काय केलें असतें त्याचा निर्णय घेतां न यावा अशा स्थितींत सारें होतें.

अशा या चमत्कारिक भागाची आठवण बिशपला पुढें दीर्घ कालपर्यंत राहिली. त्याला विशेष नवल वाटलें होतें तें या गोष्टीचें कीं या दगडी स्तंभाआड त्यांच्याच

आकाराचे मेघांचे स्तंभ त्याला प्रतिबिंबासारखे उभे दिसले होते. हे त्या त्या स्तंभामागें निश्चल उभे तरी होते किंवा सावकाश मागून मागून सरकत होते. परंतु असे हे मेघ-स्तंभ सतत दिसत; मग आभाळ कितीही तप्त आणि निळें गडद असेना का. या मेघांचे आकार आतां एक तर मग दुसराच असे बदलत. आणि असें वाटे कीं या उंच खडकांमागें खरोखरीचें एकादें पौर्वात्य नगरच वसलें आहे. या मेघडंबरीविना हें मैदान आणि यांतले हे खडक खोटेच वाटावेत इतकी ती या प्रदेशाचा एक अविभाज्य भाग झालेली होती.

सांता फेच्या वाटेनें कन्सासच्या मोठ्या थोरल्या सपाटीवर उतरतांच फादर लतूरला जमिनीपेक्षां आकाश रखरखीत भासूं लागलें होतें. पहावा तिकडे त्याला एकच एक गडद निळा रंग. फ्रेंच नजरेला तर हा रंग जास्तच कंटाळवाणा वाटावा परंतु एकदां पेकॉसच्या पश्चिमेला येतांच हें सारें बदललें. आतां आभाळांत सतत बदल. ढग जमायचे आणि सरकत रहायचे. कधीं ते काळसर, भरीव असत तर केव्हां कापसासारखे हलके आणि शुभ्र. कसेही असले तरी त्यामुळें खालचा प्रदेश मनस्वी बदलून जायचा. खालचा वैराण टापू, डोंगर, आणि खडक या साऱ्यांना पहाता पहाता वेगवेगळे रंग चढायचे. या सततच्या पालटांमुळें नजरेसमोरचें सारें दृश्य दिवसभर ताजें आणि टवटवीत वाटायचें.

जाकिंतोनें फादरच्या विचारलहरींत व्यत्यय आणला.

खेंचर रोखून तो उद्गारला, " ॲकोमा ! "

फादरनें त्याच्या बोटाच्या रोखानें नजर वळवली. खूप दूर त्याला दोन उंच खडक दिसले. आकारानें ते जवळ जवळ चौकोनी होते आणि या अंतरावरून परस्परांच्या फार जवळ वाटत होते. प्रत्यक्षांत मात्र त्यांत कांहीं मैलांचें अंतर असावें हें समजत होतें.

जाकिंतो अजूनही दाखवीत होता, " तें तें–तिकडे लांब. "

बिशपची नजर त्याच्या या तरण्या वाटाड्याइतकी चांगली नव्हती, परंतु आतां ते उभे होते. त्या उंचवट्यावरून लांबवरच्या खडकांच्या दिशेनें पहातांना खडकाच्या विस्तीर्ण काळसर पृष्ठभागावर एक पांढरा चौकोनी आकार त्याला दिसला. अनेक चौकोनांचा मिळून हा चौकोन बनल्यासारखा वाटत होता. जाकिंतोनें म्हटलें, " हं. तीच ॲकोमाची वस्ती. "

पुढें जाऊन, पहिल्या खडकाशीं त्यांनीं चाल किंचित् थांबवली आणि जाकिंतोनें सांगितलें कीं याही खडकावर ॲकोमासारखीच एक वस्ती फार पूर्वी

होती; परंतु वर जाण्याचा मार्ग एका वादळांत उध्वस्त होऊन वरचे लोक वरच भुकेनें तडफडून मेले होते.

परंतु बिशपला नवल वाटलें तें असल्या खडकाच्या टोंकावर, शेंकडों फूट उंचावर, ना पाणी कीं ना कांहीं उगवेल अशी जमीन, अशा जागीं रहाण्याची कल्पना काढणाऱ्या माणसांचें. हें नवल त्यानें जार्किंतोकडे बोलूनही दाखवलें.

जार्किंतोनें खांदे उडवले. म्हणाला, " जिवावर बेतलें म्हणजे माणूस काय वाटेल तें करील. वाटेल तिथें जाऊन राहील. या भागांत उत्तरेला नॅव्हॅजो इंडियन्स, दक्षिणेला ॲपेक इंडियन्स. म्हणून ॲकोमाच्या रहिवाशांनीं सुरक्षिततेकरतां खडकाचा शेंडा पत्करला. "

बिशपला जार्किंतोकडून शेवटीं मिळाली ती माहिती अशी कीं एके काळीं हा सारा भाग लढायांनीं आणि अत्याचारांनीं बजबजलेला होता. म्हणून आजन्म भयानें भारलेल्या आणि अत्याचारांना पिढ्यान् पिढ्या बळी पडून मूठभर उरलेल्या या इंडियनांनीं खडकावर रहाणें पसंत केलेलें होतें. तसे ते शेती कसविण्याकरतां किंवा शिकारीकरतां खालीं उतरत; परंतु वेळ पडली तर आतां त्यांना उंचवर एक सुरक्षित निवारा होता. नॅव्हॅजो इंडियनांची एकादी टोळी आसपासच्या टापूंत असेल तर आतां तसें भय नव्हतें. खडकावरचे मूठभर लोक खालून वर येऊं पहाणाऱ्या टोळीवाल्यांचा यशस्वी रित्या प्रतिकार करूं शकत होते. या खडकावर एकच वेळ सोडली तर केव्हांही कोणी कबजा करूं शकले नव्हते-- आणि ती एक वेळही चिलखतवाले स्पॅनिअर्ड्स चालून आले होते तेव्हांची. डोंगरापेक्षां या खडकाचें स्वरूप बरेंच भिन्न होतें. हा एक तर अगदीं एकाकी होता; दिसायला उघडा नागडा आणि भयावह वाटणारा होता. कल्पनेला अधिक आवडणारा होता. विचार करूं लागलें म्हणजे वाटे कीं हा खडक मानवी गरजेच्या सामर्थ्याचें प्रतीक आहे. प्रेम आणि स्नेहांतल्या निष्ठेशीं याची उत्तम तुलना होण्याजोगी आहे. स्वतः ख्रिस्तानें, त्याच्या चर्चेच्या चाव्या ज्याच्याकडे सुपूर्द केल्या त्या त्याच्या शिष्याच्या बाबतींत ही तुलना वापरलेली होती. आणि नित्य परकी प्रदेशांत बंदी म्हणून नेले जाणारे 'ओल्ड टेस्टॅमेंट'चे हिब्रू खडकांतच ख्रिस्त पहात, ईश्वरी अस्तित्व पहात. त्यांच्या जेत्यांना एवढें एकच समाधान त्यांच्याकडून हिरावता येत नसे.

इंडियन लोकांच्या जीवनांत बिशप लतूरला याआधींपासूनच एक एकसारखा, रुक्ष व्यवहारीपणा, रोखठोकपणा जाणवत आला होता. त्याला तो खटके. ॲकोमाच्या रहिवाशांनाही साऱ्या मानवजातीप्रमाणेंच स्थैर्याचा, सातत्याचा ध्यास

राहिला असावा आणि त्यांना या गुणांची मूर्तीच असा हा खडक मिळाला. या त्यांच्या खडकावर ते मग राहिले होते. तिथेंच ते जन्मत होते आणि मरतही होते.

अॅकोमाच्या खडकाशीं येतांच त्यामागें काळसर ढग सांचूं लागले स्वच्छ कागदावर शाईचा डाग पडून पसरावा तसे ते उजळ आभाळांत पसरूं लागले.

जार्किंतो म्हणाला, " पाऊस येतो आहे. फार छान. वरच्या लोकांना तेवढेंच बरें वाटेल. "

खडकाच्या पायथ्याच्या एका कपारींत खेंचरें बांधून, चिरगुटें बरोबर घेऊन घाईघाईनें जार्किंतोनें फादरला जिन्याकडे नेलें. खडकामधल्या एका भेगेंत चिरे पडून हा जिना निसर्गतःच तयार झाला होता. त्यांत जिथें जिथें चिऱ्यांना धोक्याचें स्वरूप आलें होतें तिथें तिथें हातानें धरण्याकरतां आधार बनवून ठेवले होते. खडकावर वनस्पतीचें नांव नव्हतें परंतु त्याच्या पायथ्याशीं मातींत एका प्रकारचीं झुडपें ठळकपणें डोकावत होतीं. ' ईस्टर लिलीज ' सारख्या फुलांचा शुभ्र बहर या झुडपांना आला होता. त्यांचीं पानें गडद निळीं हिरवीं, पसरट आणि राठ टोकें असलेलीं होतीं. चकाकत्या रेशमाच्या हातीं बनवलेल्या झाडांसारखीं हीं झाडें फादरला वाटलीं.

खडक चढत असतां माथ्यावर विजेचा केवढा तरी कडकडाट झाला आणि शतधारांनीं पाऊस धो धो ओतूं लागला. जिन्याच्याच एका वळचणीला राहून त्यांनीं पावसाचा जाड,दडस पडदा बनतांना पाहिला. ते उभे होते त्या कपारीला खळाळत्या झऱ्याच्या पात्राचें स्वरूप आलें. खडकांनीं विखुरलेला समोरचा भव्य प्रदेश पावसाच्या पडद्याआडून पहातांना लांबवरच्या डोंगरावर सूर्यप्रकाशाची उधळण बिशपनें पाहिली. पुन्हा एकवार त्याच्या मनांत आलें कीं जग निर्माण झालें ती प्रभात अशी असेल. अवकाशांतून प्रथम कोरडा भूप्रदेश तेवढा बाहेर आणला होता आणि बाकी कशाचा पत्ता नव्हता तेव्हांची प्रभात.

अर्ध्या तासाभरांत पाऊस थांबला. वादळ संपलें. जिन्याच्या वरच्या टोकाशीं बिशप आणि त्याचा वाटाड्या पोंचतात तो भर माध्यान्हीचा सूर्य अॅकोमाच्या माथ्यावर भर तेजानें तळपूं लागला होता गांवाची दगडी जमीन पावसानें धुपून आणि उन्हानें उजळून पांढरी स्वच्छ दिसत होती. खडकांतल्या सखल भागांतून अॅकोमानिवासी यांना 'कुडें' म्हणत--पावसाचें ताजें पाणी सांठलें होतें. बायका धुणीं घेऊन धुण्याकरतां बाहेर पडत होत्या. पिण्याचें पाणी खालच्या एका गुप्त झऱ्यांतून आणण्यांत येत असे; आणि बाकी गरजांकरतां अॅकोमाच्या रहिवाशांना पावसाच्याच सांठीव पाण्यावर अवलंबून रहावें लागे.

खडकाच्या शेंड्यावरची सपाटी एकूण सुमारें दहा एकरांची होती. या दहा एकरांत कुठें गवताचें पातें नव्हतें कीं झाडाचें पान नव्हतें. मातीही नव्हती-- होती ती चर्चनजीकच्या स्मशानभूमींत; खालून त्याकरतांच मुद्दाम आणण्यांत येणारी. घरें पांढरीं शुभ्र आणि दोन किंवा तीन मजली होतीं. तीं इतस्ततः विखुरलेलीं नसून पुंजक्यानें उभीं होतीं. त्यांच्या आगें मागें कडेकपारीचा कसला आधार नव्हता कीं निवारा नव्हता. सपाट दगडावर तीं उभीं होतीं. सूर्यप्रकाशाची दीप्ति त्याच्यावर परावर्तित होऊन नजर दिपवीत होती.

खडकाच्या अगदीं कडेला, खालच्या कड्याला लागून आपली दगडी भिंत वागवीत ॲकोमाचें जुनाट, गढीवजा दोन मनोऱ्यांचें चर्च उभें होतें. त्याचें छप्पर बरेंच विस्कटलेलें होतें आणि जुनाटपणाची कळा त्याच्या अंगाअंगांतून मारत होती. आंतला विस्तृत ओकाबोका भाग पाहून, कधींच नव्हे इतकें बिशपला विषण्ण वाटलें. दुपारींच त्यानें तिथें प्रार्थना घेतली, प्रवचन केलें परंतु त्याचें चित्त थाऱ्यावर नव्हतें. त्याच्यासमोर होते आंतल्या अर्धवट उजेडांत, भडक शालींत आणि पांघरुणांत गुरफटलेले पन्नास साठ मुग्ध चेहरे. त्यांच्या आगे मागें त्या धुरकट भिंती. एकाद्या समुद्राच्या तळाशीं, तेथल्याच अ-मानवी प्राण्याकरतां आपण प्रवचन करतों आहों असें त्याला वाटूं लागलें. हे प्राणी तरी कसे, जुनाट, निबर, एका भल्या जाड कवचांत स्वतःला बंद करून राहिलेले. त्यांच्यापर्यंत कॅलव्हरीचें दिव्य पोंचणेंहि अशक्य. धर्मविधींनीं त्यांना लहान अर्भकांप्रमाणें पावन करून घेणें शक्य परंतु त्यांच्या अनुभवांतून ते आपला उद्धार कदापि करून घेऊं शकतील हें असंभवनीय. त्यांना आशीर्वाद देऊन परत धाडतांना बिशपच्या मनांत पराभवाची, मर्यादेची एक तीव्र जाणीव डांचत होती.

आपलीं पवित्र वस्त्रें उतरून ठेवल्यावर जासिंतोबरोबर तो चर्चचें अधिक निरीक्षण करण्याकरतां फिरूं लागला. जसजसा तो फिरत होता तसतशी त्याच्या मनांत एक आश्चर्याची भावना वाढत होती. ॲकोमाला या एवढ्या भव्य चर्चची जरूर तरी कां भासावी ? सोळाव्या शतकांत फ्रे वॉन रमिरेझनें बांधलेलें हें चर्च. हा रमिरेझ वीस वर्षें या गांवांत राहिला, झिजला. मोठा थोर मिशनरी. खडकावर घोडी आणता यावींत म्हणून वेगळा मार्ग त्यानेंच तयार केला. या मार्गालाहि नांव होतें; एल् कामिनो डेल पॅड्रे.

चर्चचा अधिकाधिक अभ्यास करतांना फादरला एक पटलें कीं स्थानिक गरज लक्षांत न घेतां ही एवढी मोठी चर्चची इमारत बांधण्यामागें रमिरेझची किंवा

त्याच्यामागून इकडे येऊन राहिलेल्या मिशनऱ्यांची ऐहिक महत्त्वाकांक्षाच असली पाहिजे. त्याला त्याच्या वैयक्तिक समाधानाकरितां हें एवढें मोठें चर्च हवें होतें. चर्चची ही रमणीय जागा, इथल्या निसर्गाचें वैभव, यांनीं त्या भल्या माणसाचें माथें किंचित् चढलें असलें पाहिजे. या अनावश्यक कामाकरितां इथल्या इंडियन रहिवाशांचें नाहक श्रम कोणत्याहि लष्करी पाठबळाविना घेणारे ते स्पॅनिश मिशनरी मोठे जबरे असले पाहिजेत यांत शंका नव्हती. त्या साऱ्या बांधणीमागें कित्येक स्त्री-पुरुषांचे आणि मुलांचे अपार श्रम आणि धपाप स्पष्ट जाणवत होती. वरच्या नक्षीदार भल्या थोरल्या लांकडी बहालाकडे चकित नजरेनें फादरनें पाहिलें. आसपासच्या भागांत तर खुरटीं झुडपें सोडलीं तर एकहि मोठें झाड त्याला आढळलें नव्हतें. मग हीं बहाले आलीं कुठून? जार्कितोला त्यानें विचारलें. तेव्हां तो उत्तरला, "बहुतेक सान मतिओ डोंगरांतून."

"पण ते तर चाळीस पन्नास मैल दूर आहेत. तिथून एवढें अवजड लांकूड कुणी आणि कसें इथवर आणलें?"

जार्कितोनें संवयीनुसार खांदे उडवले. तो म्हणाला, "इथल्या लोकांचे खांदे होते ना." आणि खरेंच! याशिवाय कांहीं खुलासाहि मिळण्याजोगा नव्हता.

चर्चलगतच एक भक्कम वसतिगृह होतें. त्यालगत एक चांगली बाग केलेली होती. यासाठीं लागलेली विपुल माती अर्थातच खालून वर आणण्यांत आलेली होती. वसतिगृहाला खिडक्या नव्हत्या. बाहेर उकाडा असतांना इथें थंडगार वाटत होतें. एक दार होतें तें थेट बागेंत जाण्यासाठीं होतें. आणि बागेवरचा आकाशाचा एक तुकडा तेवढा बागेसमवेत आंतून नजरेंत येत होता. म्हणजे या अशा सुखद जागेंत राहून इथल्या मिशनऱ्यांना बाहेरच्या सामान्य भणंग माणसांचा, त्यांच्या हालकष्टांच्या जिण्याचा विसर पडला असेल यांत नवल नव्हतें. मनानें ते त्यांच्या पिरिनीजच्या पायथ्याच्या संपन्न मायदेशांतच वावरत असले पाहिजेत.

बागेंत पीचच्चीं दोन मरतुकडीं झाडें जीवन शोषणाऱ्या, अंगावरच्या बांडगुळांशीं झटापट करून थकल्यासारखीं उभीं होतीं. द्राक्षवेलींचे बुडखेहि फादर लतूरला आढळले.

या वसतिगृहाच्या वायव्य बाजूच्या एका छोट्या छपरींत रात्र काढण्याचें बिशपनें ठरवलें. इथून गांव चांगलें दिसूं शकत होतें. इथूनच त्यानें सूर्यास्त पाहिला; नंतरचा दाटता अंधार न्यहाळला. हा अंधार खालची सपाटी व्यापून एकाद्या धोकेबाज जिवाणूसारखा वर सरपटत येतांना पाहिला. सपाटीवरचे लांबलांबचे, सूर्यास्तानंतरच्या लालीनें उजळून निघालेले उंच उंच खडकांचे माथे

तेवत्या मेणबत्त्या कोणी पटापट विझवाव्यात तसे विझतांना पाहिले. तो स्वतः एका खडबडीत, रखरखीत खडकावर होता, जणूं अश्मयुगांत होता. मनांत घरचे, मायभूमीचे विचार गर्दी करूं लागले. फ्रान्स. युरोप. त्याची पिढी. त्याआधींचा काल. युरोपिअन माणसाचीं स्वप्नें आणि आकांक्षा यांचा एक वैभवशाली इतिहास. फटफटत्या पहांटेच्या पूर्व क्षितिजासारखें त्याचें सारें जग गेल्या अनेक शतकांत बदलत आलें होतें. आतांचा रंग मग नाहीं, मगचा नंतर नाहीं. परंतु लोक तेच—तसेच—एकाद्या उंच खडकावर कासवासारखे चढून बसलेले. त्यांची संख्या ती, आणि आकांक्षाहि त्याच. एका असमाधानानें बिशपचें मन भरून गेलें.

परततांना बिशपनें आणखी एक रात्र इस्लेताच्या फादर जीससच्या सहवासांत काढली. आणखी पश्चिमेकडल्या, मोकि टापूंतल्या अशाच खडकांवरच्या खेड्यांबाबत त्याचें बोलणें झालें. आणि हकिकतींतून हकिकत निघतांना ॲकोमाच्या, विस्मृतींत गडप झालेल्या 'फ्रायर' बद्दलचीहि एक हकिकत निघाली, ती खालीलप्रमाणें :

## .४.

सतराव्या शतकाच्या अगदीं आरंभाला केव्हां तरी, म्हणजे या भागांतल्या इंडियन लोकांच्या फार मोठ्या उठावांत न्यू मेक्सिकोच्या उत्तर कक्षेंतले सारे मिशनरी आणि स्पॅनिअर्डस् ठार वा हद्दपार केल्यानंतर सुमारें पन्नास वर्षांनंतर, म्हणजेच त्यानंतर पुन्हां तो भाग कबजांत आणण्यांत येऊन तिथें नवे मिशनरी येऊन रुजूं झाल्यावर, बाल्ताझार मोंतोया या नांवाचा एक 'फ्रायर' ॲकोमाच्या चर्चचा धर्मगुरु होता. वृत्तीनें तो छळवादी आणि एककल्ली होता. ॲकोमाच्या रहिवाशांचा त्यानें फार छळ केला. आज जवळपास नष्ट झालेलीं सारीं मिशन्स तेव्हां चालू होतीं आणि त्यांतल्या प्रत्येकाला त्याचा एक कायम धर्मगुरु होता. हा त्याच्या वृत्तीनुरूप स्थानिक लोकांकरतां खपे किंवा लोकांना खपवून घेई. फादर बाल्ताझार हा महत्त्वाकांक्षी होता. त्याची अशीच श्रद्धा होती कीं ॲकोमाची वस्ती ही तेथल्या सुंदर चर्चची निगा राखण्याकरतां आणि त्याला पोसण्याकरतांच अस्तित्वांत होती; आणि त्याच्या चर्चचा त्याला जेवढा अभिमान होता तेवढाच

या स्थानिक लोकांनाहि असणें जरूर होतें. गांवांतलें उत्तम पीक सारें तो घेई, फळांचे अति रुचकर रस त्याच्या संग्रहीं दाखल होत, मेंढी कापली जाई तेव्हां तिचे निवडक भाग प्रथम त्याच्याकडे रवाना होत. याशिवाय लोकांचे श्रम तो हक्कानें घेई ते वेगळे. चर्चची त्याच्या मनांतली सुधारणा कधीं पुरीच होत नव्हती. चर्चचें पटांगण त्यानें वाढवून घेतलें, वसतिगृहालगतची मातीच्या उत्तम थराची उत्तम बाग बनवून घेतली, तिला रोज पाणी घालण्याचें कामहि तो स्थानिक बायकांना करायला लावी. वास्तविक धर्मगुरूच्या वसतिस्थानांत स्त्रीनें प्रवेश करूं नये असा दंडक असूनहि तो हें करवून घेई. यांत या बायकांचे श्रम तर खर्चीं पडतच परंतु त्यांचे पाण्याचे सांठेहि तेवढे कमी होत.

बाल्ताझार तसा आयदी माणूस नव्हता. त्याच्या तेथल्या कारकीर्दीच्या पहिल्या काळांत, अंगानें जाडजूड होण्यापूर्वी. चर्चच्या आणि बागेच्या कामाकरतां तो लांबलांबचे प्रवास करी. केवळ पीचचें उत्तम बी मिळवण्याकरतां तो अनेक दिवसांची वाटचाल करून ओराईबीपर्यंत जाऊन येई. ( ओराईबीचीं पीचचीं झाडें फार जुनीं आणि मुळांत स्पेनहून आणण्यांत आलेल्या बींपासूनचीं होतीं. ) स्थानिक इंडियन आणि मेक्सिकन रहिवासी जेमतेम पोटापाण्याला मिळालें कीं समाधानानें रहात असतां हे चर्चचे धर्मगुरू मात्र त्या काळांत उत्तमोत्तम बींबियाण्याचा मोठा धंदा करीत.

फादर बाल्ताझार स्पेनमधल्या एका उच्च आणि सधन धार्मिक घराण्यांतला होता. तो स्वतः उत्तम सैंपाक करी आणि सुतारकामहि त्याला थोडेंबहुत येत असे. खडकाच्या टोंकाच्या त्या वसतिस्थानीं स्वतःला शक्य तेवढा आराम मिळावा म्हणून त्यानें बराच त्रास घेतला होता. दोन इंडियन मुलांना त्यानें आपल्या चाकरींत घेतलें. यांतल्या एकाकडे त्यानें त्याच्या गाढवाची आणि बागेची निगा राखण्याचें काम सोंपवून दिलें. आणि दुसऱ्याकडे सैंपाकाचें आणि वाढपाचें काम दिलें. पुढें तो जसजसा मुखावत, रुंदावत गेला तसा त्यानें आणखी एक तिसरा मुलगा नोकरीला ठेवला. लांबच्या कामांकरतां निरोप्या म्हणून तो त्याचा उपयोग करी. लाल कापड, फावडे किंवा नवा चाकू असल्या वस्तूंकरतां तो मुलगा पायीं लांबलांबच्या मजला मारी. व्हिलापर्यंत जाई. येतांना द्राक्षाचें मद्यहि घेऊन येई. कधीं मासे धरण्याकरतां त्याला सांदिआला जावें लागे तर ससांच्या जोडीकरतां झुनीकडे रवाना व्हावें लागे. सहसा त्याचीं कामें अशीं उपरींच असत. त्यांना धार्मिक स्वरूप वा हेतु फारसा नसे.

हें उघडच होतें कीं ॲकोमाचा हा फ्रायर लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीपेक्षां

स्वतःच्या ऐहिक सुखाकरतांच जगत होता. या ओसाड खडकावर सुग्रास अन्न अशक्य हें पटवून घेण्यापेक्षां तो युक्तीप्रयुक्तीनें, हर प्रयत्नांनीं तें उपलब्ध करून घेई. परंतु त्याच्या या वासनेची धांव चार रुचकर पदार्थ आणि फुलझाडें, फळझाडें यापलिकडे मात्र कधीं गेली नाही. तसें म्हटलें तर इंडियन बायांशीं अनैतिक व्यवहार त्याला फार सुलभ होता;आणि असल्या गोष्टींचा मोह व्हावा असें त्याचें वयहि होतें परंतु साऱ्याच मिशनऱ्यांना एक गोष्ट कळून चुकली होती कीं त्यांच्या असल्या नैतिक अधःपतनाच्या प्रमाणांत त्याचें स्थानिक जनतेवरचें वजन तितकें कमी होत असे. देवाला नवस म्हणून किंवा भुताखेतांवर रामबाण इलाज म्हणून स्थानिक रहिवासी अनेकदां आपआपसात असले व्यवहार करीत; आणि त्यांच्या पॅड्रेनेंही तो करावा अशी त्यांची इच्छा अर्थातच फार होती. परंतु स्पेनपेक्षां इथें असल्या वर्तणुकीचीं फळें कडू येण्याचा संभव जास्त होता आणि फ्रायर बाल्ताझारनें स्थानिक जनतेला आपलें उणेंदुणें काढण्याची संधीच दिली नाहीं.

सुबत्तेचीं पंधरा वर्षें त्यानें ॲकोमावर 'राज्य' केलें. या कालावधींत वारंवार त्यानें चर्चची आणि स्वतःच्या वसतिगृहाची सुधारणा करवून घेतली. बागेंत नवनवीन झाडें लावलीं. अंगानें स्थूल झाला तरी त्याचे हात बळकट होते आणि बोटांत कौशल्य शिल्लक होतें. स्वतःचें छोटें राज्य न्यहाळावें तसा हमेशा तो ही बाग न्यहाळी.स्थानिक स्त्रियांना पाणी घालण्याच्या कामी बिलकूल सूट मिळूं देत नसे. त्याच्या पहिल्या चाकरांचीं लग्नें ठरतांच त्यानें त्यांना सेवेंतून मुक्त केलें आणि नवीं मुलें घेतलीं. यांना अधिकच बारकाईनें वळण लावण्यांत आलें.

बाल्ताझारचा जुलूम दिवसानुदिवस थोडा थोडा वाढतच गेला आणि कांहीं वेळा ॲकोमाच्या रहिवाशांचीं मनें बंड करून उठण्याच्या अवस्थेप्रत येऊं लागलीं. परंतु पॅड्रेचें दैवी सामर्थ्य किती असेल त्याची कल्पना त्यांना येत नसल्यानें त्याची परीक्षा पहाण्याला ते कचरत होते. हें खरेंच होतें कीं स्पेनच्या राजाकडून सेंट जोसेफचें पवित्र चित्र आलें तें पॅड्रेच्या वशिल्यानेंच. आणि गांवच्या पाऊस पाडणाऱ्या मांत्रिकांना जमलें नव्हतें तें त्या चित्रानें जमून गेलें होतें. अवर्षण टळूं लागलें होतें. त्याची षोडषोपचारें उपासना केली कीं पाऊस पडूं लागला होता. तें चित्र आलें तेव्हांपासून गांवांत कधीं दुष्काळ नव्हता--लगुना आणि झुनी इथें मात्र तो अनेकदां पडून दुष्काळाकरतांच बाजूला काढलेल्या सांठ्याच्या धान्यावर तिथल्या रहिवाशांना आपला निर्वाह चालवण्याची पाळी आली होती.

तें पवित्र चित्र आपल्याला तात्पुरतें भाड्यानें मिळावें म्हणून लगुनाचे इंडियन्स वारंवार या गांववाल्यांकडे रदबदली करीत होते,परंतु फ्रायर बाल्ताझारनें ताकीद

देऊन ठेवली होती कीं चित्र गांवाबाहेर जातां कामा नये. त्या चित्राचें छत्र गांवावरून गेलें किंवा पॅड्रेची मंत्रशक्ति गांवाविरुद्ध फिरली तर अर्थातच त्या गांवाची धडगत नव्हती. त्यामुळें बाल्ताझारच्या कलानें सारें--न मानवूनही--केलें जात होतें, त्याचीं सारीं कौतुकें पुरवलीं जात होतीं. वर वर गांववाले आणि पॅड्रे यांचे संबंध स्नेहाचेच होते.

एका उन्हाळ्यांत--वाढत्या आकारामुळें पॅड्रेला आतां फिरतीवर जाणें फारसें शक्य होत नव्हतें--संगत सोबत आवश्यक वाटूं लागली, कोणी तरी आपल्या या इथल्या सोयींचें, सुखाचें कौतुक करावें असें वाटूं लागलें आणि म्हणून सेंट जॉन्स डे नंतरच्या सप्ताहांत त्यानें एक मेजवानी देण्याचा बेत योजला.

त्यानें आपला निरोप्या झुनि, लगुना, इस्लेता येथल्या पॅड्रेजकडे पाठवून त्यांना मेजवानीचें आमंत्रण दिलें. ते एकूण चौघेजण ठरल्या दिवशीं आले. ( झुनीच्या चर्चला दोन पॅड्रे होते. ) पाहुण्यांचीं घोडीं बांधून पाहुण्यांना वर आणण्याकरतां खडकाच्या तळाशीं एक मुलगा उभा करण्यांत आला होता. वर बाल्ताझारनें त्यांचें पुढें होऊन स्वागत केलें. सारें स्थान त्यांना फिरवून दाखवण्यांत आलें आणि बाहेर सारा खडक उन्हानें कडकडीत तापला असता पॅड्रेच्या निवासस्थानाच्या थंडगार निवाऱ्याला बसून सकाळभर गप्पागोष्टी केल्या. वाऱ्याच्या झुळुकांत द्राक्षवेली डुलत होत्या. बागेंतून एक सुवास दरवळत येत होता. पाहुण्यांचा ग्रह पॅड्रे बाल्ताझारच्या या जीवनाबद्दल फारच उत्तम झाला आणि त्याच्या या सुखासीन जीवनाची गुरुकिल्ली आपल्याला कळावी असें त्यांना वाटलें. पॅड्रेनें ज्या बढाईच्या भाषेंत आपल्या या निवासस्थानाबद्दल त्यांना ऐकवलें होतें त्याबद्दल कोणीं ठपका ठेवला नाहीं.

भोजनाच्या बाबतींत पॅड्रेनें विशेष कष्ट घेतले होते. स्वतः तो सेव्हिलच्या मार्गावरच्या एका धर्मपीठांत स्वयंपाकाची कला शिकलेला होता. स्पॅनिश सरदार आणि खुद्द राजाही इथें पाहुणचार घेण्याकरतां मुद्दाम मुक्काम करीत असा या धर्मपीठाचा लौकिक होता. तिथें शिकलेली कला इथल्या एकांतांत पॅड्रेनें जोपासली आणि वाढवली होती. साधनांची उणीव हें त्याला एक आव्हानच वाटलें होतें.

त्या थंडगार जागेंत, बाहेरच्या रखरखाटाचें पडद्यांतल्या फटींवाटें ओझरतेंच दर्शन घेत, त्या पॅड्रेजनीं मेजवानीचा समाचार घेतला. असें अन्न आणि वातावरण त्यांना बऱ्याच कालांत लाभलेलें नव्हतें. ‘ आपण पुन्हा याल तेव्हां बागेंत कारंजा पाहाल ’ म्हणून पॅड्रे बाल्ताझार त्यांना विश्वासानें सांगत होता. पुढल्या यायच्या अधिकाधिक उत्तम आणि रुचकर पदार्थांच्या हिशेबांत पुढयांतलें जपून

संपवण्याला सुचवीत होता. त्या दिवशीं आचाऱ्याला स्वयंपाक-घर सोडणें अशक्य असल्यानें आर्धी पाहुण्यांना वर आणून सोडणारा मुलगा वाढप करीत होता. त्याच्या कामांत चटपटीतपणा आणि कौशल्य होतें. बाल्ताझार त्याच्यावर खूष होता आणि त्याला त्याच्या या कर्तबगारीबद्दल ब्राँझचें पदक द्यायचें कीं चांदीचें याचाच विचार त्याच्या मनांत चालू असावा.

उकडलेला ससा त्याच्या रश्शासहित वाढला जात असता इस्लेताचा धर्मगुरू कसलीशी एक गंमतीशीर हकिकत सांगत होता. त्यावर बाकी सारे मोठमोठ्यांदा हंसत खिदळत होते. वाढप करणाऱ्या मुलाला किंचित् स्पॅनिश येत होतें आणि तो या हकिकतींतलें मर्म समजावून घेण्यासाठीं एकाग्र असता, झुनिच्या थोरल्या धर्मगुरूमागून जातांना, त्याच्या हातांतली थाळी उलटली आणि धर्मगुरूच्या डोक्यावर, बाहूंवर तपकिरी रंगाचा तो रसरशीत रस्सा सांडला. बाल्ताझार माथ्याचा तापट होता. त्यांत त्यानें मद्यहि बरेंच घेतलेलें होतें. त्यानें त्याच्या उजवीकडलें रिकामें पण जड भांडें उचललें आणि एक शिवी उच्चारून त्या गोंधळलेल्या मुलावर फेकलें. मस्तकाच्या बाजूला कानशिलाशीं त्या मुलाला तें लागलें. त्यानें थाळी खालीं टाकली, तो कांहीं पावलें धडपडत चालत गेला आणि खालीं कोसळला. तो वर उठला नाहीं. हललाहि नाहीं. तेव्हां वैद्यकशास्त्रांत गति असणाऱ्या झुनिच्या पॅड्रेनें, डोळ्या-वरचा रस्सा निपटून वांकून त्या मुलाची परीक्षा केली.

तो बरोबरीच्या धाकट्या पॅड्रेला कांहींतरी पुटपुटून म्हणाला. दोघे उठले आणि कांहींच न बोलतां घाईनें जिन्याकडे धांवले. पाठोपाठ क्षणभराच्या आंत लगुना आणि इस्लेताचे पॅड्रे तसेच निघून गेले. अत्यंत वेगानें ते चारहि पाहुणे खडकाखालीं उतरून घोडीं तयार करून आपापल्या मार्गानें नाहींसे झाले.

आपल्या उताविळीचे परिणाम सोसण्याला बाल्ताझार एकटा मागें उरला. शेवटचा पॅड्रे तिथून जाईपर्यंत, दुर्दैवानें, आचाऱ्यानें दीर्घ स्तब्धतेचें नवल वाटून तेवढ्यांतच आंत डोकावून पाहिलें. त्याचा मित्र जमिनीवर उताणा पडला होता. फक्त त्यालाच ठाऊक असलेल्या वाटेनें तो त्या जागेंतून तात्काळ नाहींसा झाला.

फादर बाल्ताझार स्वैंपाकघरांत गेला तेव्हां तें रितें होतें. मेजवानीचें कोंबडें शिजल्या स्थितींत पडून होतें. आतां फादरची भूक पळाली होती. त्याला वाढत्या प्रमाणांत बेचैन वाटत होतें. पळाल्या पाहुण्यांविषयीं मनांत संतापहि जळत होता. क्षणभर त्याला वाटलें कीं आपणहि त्यांचें अनुकरण करावें. परंतु अशा तऱ्हेनें

तात्पुरतें पळण्यानें त्याचें तिथलें स्थान डळमळणार होतें; आणि कायमचें पळणें तर शक्य नव्हतें. बाग आत्तां कुठें बहरत होती. पीचचीं फळें पिकत होतीं. द्राक्षवेली फळांनीं लहडल्या होत्या. त्यानें शिजणारें कोंबडें, करपेल म्हणूनच जणूं, उतरून ठेवलें. आपल्या खोलींत तो गेला. गेले अनेक दिवस वेळे-अभावीं वाचतां न आलेल्या ' ब्रेव्हिअरी 'चें पठन त्यानें सुरू केलें.

दुपारचा तो या खोलींत विश्रांति घेई. वाऱ्यावर लटकणाऱ्या पक्षांच्या पिंजऱ्यासारखी ही खोली होती. तिच्या कमानीवाटें त्यानें खालच्या गांवाकडे पाहिलें. त्यापलिकडे चहूंकडे पसरलेल्या सपाटीवर नजर फिरवली. हातच्या कामांत लक्ष टिकेना. समोरचें गांव भारी शांत होतें. वास्तविक या वेळेला पाणवठ्यावर बायका धुणीं भांडीं करीत असायच्या, पोरें खेळत बागडत आणि कोंबड्यांमागें धांवत असायचीं. पण आतां, रखरखीत उन्हांत सारा खडक चूपचाप होता. एकहि माणूस नजरेच्या टापूंत नव्हतें. पण नव्हतें कसें, होतें. क्षणाआधीं तें नव्हतें, आतां होतें. दगडी जिन्याच्या माथ्याशीं खडकांवर चकचकीत काळ्या रंगाचा एक डाग दिसत होता. कुणा इंडियनाचे केंस. जिन्याशीं पहारा बसवण्यांत आला होता.

पॅड्रेला आतां अधिकच बेचैन वाटूं लागलें. वेळ होती तोंवर इतरांबरोबर आपणहि खालीं पळायला हवें होतें असें त्याला वाटलें. या खडकावर आपण यावेळीं असायला नको होतें असं त्याच्या मनाने आतां घेतलें. तशी जुन्या फादर रामिरेझच्या जनावराकरतां केलेली वाट होती; पण इंडियनांनीं एक रस्ता अडवला तसे इतरहि अडवले असणार हें उघड होतें. काळ्या केसांचा तो ठिपका बिलकुल हलत नव्हता. वाटा एकूण दोन. त्या अडवलेल्या. बाकी कुठूनहि कड गांठावी तर खालीं पन्नास फूट खोल कडा. पडतांना झटायला ना एक झुडूप कीं ना झाड.

सूर्यास्त होऊं लागला तसा खालच्या गांवांतून पुरुषांच्या आवाजांचा मंद धुमारा येऊं लागला. ही प्रार्थना नक्कीच नव्हती. फार महत्त्वाच्या बाबतींत इंडियनांमध्यें वाटाघाटी चालत त्यांचा हा धुमारा होता. १८६० च्या बंडांतल्या धर्मगुरूंच्या कत्तलींतल्या एकाहून एक भयंकर हकिकती फादर बाल्ताझारच्या नजरेसमोर चमकूं लागल्या. कुणाचे डोळे बाहेर काढण्यांत आले, कुणाला जाळण्यांत आलें, जमेझच्या धर्मगुरूला नग्न करून रात्रभर चौफेर रांगायला लावण्यांत आलें होतें. झिंगलेले इंडियन्स त्याच्या पाठीवर फटके हाणीत होते, दणके मारीत होते. तो थकव्यानें गतप्राण होईतोंवर हें करण्यांत आलें होतें.

फादर बसून होता त्या खोलींतून चंद्रोदय मोठा रम्य दिसे. आज रात्रीं मात्र हा चंद्रोदय होऊं नये असेंच फादरला वाटलें. कारण चंद्रोदयानेंच खालच्या गांवांत दैनंदिन जीवन सुरू होई. भयभीत नजरेनें फादर, क्षितिजाची सपाटी सोडून चंद्र वर सरकतांना पहात होता.

चंद्र वर आला. निमूटपणें पण शिस्तीनें गांवकऱ्यांचा एक घोळका गांव सोडून चर्चकडे आला. शिडी चढून ते फादरच्या राखीव खोलींत आले. फादरनें गुरगुरून ' काय हवें ' म्हणून विचारलें. त्यांनीं उत्तर दिलें नाहीं. त्याच्याशीं वा एकमेकांशीं अवाक्षरहि न बोलतां त्यांनीं फादरचे हातपाय बांधून टाकले.

पुढें ॲकोमाचे गांवकरी सांगत त्याप्रमाणें, फादरनें कसलाहि प्रतिकार केला नाहीं. तो तसें कांहीं करता तर त्याला वेगळ्या क्रौर्याला तोंड द्यावें लागलें असतें. पण त्याच्या त्या इंडियन ' प्रजे 'ला तो चांगला जाणून होता, तिचा निश्चय एकदां ठरला कीं तो किती पक्का असतो हेंहि त्याला माहीत होतें. याशिवाय तो मानी स्पॅनिअर्ड होता. त्याच्या सुदृढ शरीरांत एक सामर्थ्य आणि जिगर वसत होती. अंमल गाजवण्याची संवय त्याला होती, विनवण्या करण्याची नव्हती. अखेरपर्यंत त्यानें आपला ताठा सोडला नाहीं, नमतें घेतलें नाहीं.

त्यांनीं त्याला सर्वांत उंच, तुटल्या कड्याकडे नेलें. या बाजूनें बायका फुटकीं भांडीं, वा कोंबड्या खात नसत अशी घाण टाकीत. तिथें सारे जमलेले होते. त्यांनीं फादरला मोकळें केलें. त्याचे हातपाय पकडून त्याला कांहीं वेळा पुढें मागें हेलकावलें. तो तसा वजनदार होता, त्याला तसें अधिक हेलकावणें त्या लोकांना धोक्याचें वाटलें असावें. ते हें करीत असता त्याच्या तोंडून जोराच्या श्वासोच्छ्वासाच्या आवाजापलिकडे कांहीं निघत नव्हतें. त्या लोकांनीं मग त्याला अखेरचा वर धरला आणि खालीं भिरकावून दिला.

अशा प्रकारें त्यांनीं त्यांच्यावर जुल्म गाजवणाऱ्या परंतु एकंदरीनें त्यांना आवडत आलेल्या फादर बाल्ताझारपासून त्यांचा खडक मुक्त केला. फादरला मारल्यावर चर्चची कोणतीहि नुकसानी कोणी केली नाहीं. फादरची मालमत्ता तेवढी सर्वांनीं वांटून घेतली. बाग सुकून जात असतां बायका ती पाहून आनंद मानीत. तिथें जाऊन गप्पागोष्टी करीत.

अनेक वर्षांनीं पुढचा धर्मगुरू आला तेव्हां गांवांत त्याला कोणतीहि कटु भावना आढळली नाहीं. तो त्या भागांतलाच मेक्सिकन होता. त्याच्या गरजा किमान होत्या. सुखाची व्याख्या मर्यादित होती. बाल्ताझारनें राखलेल्या बागेंत गांवच्या कोंबड्या तो सुखानें फिरूं देऊं लागला.

# चतुर्थ खंड

.१.

बिशप अल्बुकर्कला आणि ॲकोमाला जाऊन आल्यावर महिन्याभरानें सुखासीन वृत्तीच्या गॅलेगॉसला औपचारिक रित्या कामावरून तात्पुरतें दूर करण्यांत आलें आणि फादर व्हेलंटनें स्वत: त्या 'पॅरिश'चीं सूत्रें आपल्याकडे घेतलीं. आरंभा-आरंभाला यापोटीं थोडीं फार कटु भावना दिसून येत होती; स्थानिक सधन 'रँचेरोज' आणि अल्बुकर्कच्या कांहीं बायका या नवीन फ्रेंच धर्मगुरूबद्दल मनांत एक अढीच बाळगून होत्या.परंतू फादरनें आल्या आल्याच आपल्याला हव्या त्या सुधारणा प्रत्यक्षांत आणण्याला सुरुवात केली. सारें कांहीं बदललें. सणासुदीला फादर गॅलेगॉसच्या कारकीर्दींत थाटाचे मोठे उत्सव होत ते जाऊन धर्मविधींना प्राधान्य आलें. त्याआधीं चकाट्या पिटण्यांत आणि चैनमौज करण्यांत जितका उत्साह चंचल वृत्तीची स्थानिक मेक्सिकन जनता दाखवी तितकाच आतां धार्मिक सोपस्कारांबाबत दाखवूं लागली. आपल्या 'पॅरिश' मधलें वातावरण एकाद्या शाळेंतल्यासारखें असतें असें या संबंधांत फादर व्हेलंटनें फ्रान्समधल्या आपल्या बहिणीला, फिलोमेनला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें. त्यानें लिहिलें होतें, एका शिक्षकाच्या कारकीर्दींत खोड्यालबाड्या करण्यांत एकमेकाशीं स्पर्धा करणारीं मुलें दुसऱ्या शिक्षकाच्या कारकीर्दींत शिस्तपालनांत स्पर्धा करतात तसें येथें घडतें आहे. याआधीं ख्रिसमसआधींच्या दिवसांत येथें नाचगाणीं आणि थाटमाट होई; यंदा तितक्याच मन:पूर्वक धार्मिक विधी पाळून येथील रहिवाशांनीं हा सोहळा साजरा केला.

अल्बुकर्कचा धर्मगुरू म्हणून सर्व कामें पहात असतांच फादर व्हेलंट 'व्हिकर जनरल' होताच. फेब्रुआरींत बिशपनें त्याला एका फार महत्त्वाच्या कामाकरतां लास व्हेगासला पाठवलें. परत यायचा त्या दिवशीं तो परत येऊन पोंचला नाहीं आणि पुढेंही अनेक दिवस उलटले तरी त्याची कांहीं वार्ता लागेना

तेव्हां फादर लतूरला काळजी लागून राहिली.

एक दिवशीं भल्या पहांटे एक थकून गळून गेलेला आजारी इंडियन मुलगा फादर व्हेलंटच्या शुभ्र घोड्यावरून, कॉंडेटोवरून बिशपच्या अंगणांत येऊन पोंचला. त्यानें एक वाईट वार्ता आणली होती. त्यानें सांगितलें, पेकॉस डोंगरभागांतल्या त्याच्या गांवीं गोंवराची मोठी सांथ चालू होती आणि मृतांचे अखेरचे संस्कार करण्याकरतां पॅड्रे तिथें थांबले असता स्वतःच त्या आजारानें ग्रासले गेले होते. तो स्वतः देखील निघतांना नीट होता. परंतु मार्गांत त्यालाहि लागण झाली होती.

बिशप लतूरनें त्या मुलाची बागेच्या टोकाकडल्या एकाकी घरांत व्यवस्था केली. लॉरेटोच्या सिस्टर्सकडे त्याची सुश्रूषा सोंपावेली. ' मदर सुपीरिअर'ला त्यानें त्याला सोबत नेता येतील तितक्या औषधांची आणि रुग्णोपयोगी वस्तूंची एक थैली ताबडतोब बांधण्याला सांगितलें. आचारी फरुक्तोसाला, नेहमीं लांबच्या प्रवासांत तो घेई तेवढें अन्नधान्य सज्ज करण्याला आज्ञा सोडली. जनावरें तयार होतांच, प्रवासाचा पोषाख चढवलेला फादर लतूर त्याच्या ॲंगलिकावर स्वार होण्याला आला. परंतु त्या जनावराकडे एकच कटाक्ष टाकून त्यानें सांगितलें, "हिला कॉण्टेंटोंसोबत राहूं द्या. नवें घोडें जास्त तगडें आहे. या प्रवासांत तें चालेल."

मागून सामान लादलेलें दुसरें घोडें ओढीत बिशप सुमारें दोन तासांच्या अवधींत घोड्यावरून सांता फेच्या वेशीबाहेर पडला. इथून सरळ तो पेकॉस गांवाकडे जाणार होता तिथें जाकिंतोला बरोबर घेऊन तो पुढें होणार होता. त्या गांवीं तो पोंचला तेव्हां संध्याकाळ होऊं घातली होती. 'फर'नीं अर्धवट झांकलेल्या डोंगराच्या रांगांनीं गांव मागून निम्में वेढले गेलें होतें. समोर सेडर आणि ज्युनिपर वृक्षाचें रान पसरलें होतें. पेकॉसला पुढच्या डोंगरांतल्या मजलीच्या दृष्टीनें घोडीं बदलण्याचा बिषपचा मनोदय होता. तेवढें करून ताबड-तोब तो पुढें निघणार होता. परंतु जाकिंतो आणि भोंवतीं जमलेल्या इतर इंडियन रहिवाशांनीं त्याला परोपरीनें सांगितलें कीं रात्रीं इथेंच मुक्काम करून भल्या सकाळीं पुढें व्हा. आभाळांत सूर्य तळपत होता. परंतु पश्चिमेकडे, डोंगरांच्या रांकांमागें एक मोठा काळा ढग स्थिर राहिलेला होता. जमलेल्या वयस्क माणसांनीं त्याकडे पाहून माना हलवल्या.

"फार मोठें वादळ होणार." गांवचा प्रमुख व्यग्र मुद्रेनें उद्‌गारला.

कांहींसा इच्छेविरुद्धच बिशप घोड्यावरून उतरला. जाकिंतोकडे त्यानें

जनावरें सोंपविलीं. त्याच्या दृष्टीनें वेळ वायां जात होता. रात्र पडण्याला अद्याप तासभर होता. गांव आणि जुनें मिशन-चर्च या दरम्यानच्या ओसाड खडकाळीवर बेचैनपणें पुढें मागें फिरण्यांत त्यानें तो व्यतीत केला. सूर्य आतां बुडत होता. डोंगरमाथ्यांवर त्याची लाली सर्वभर पसरली होती. तो मोठा काळा ढग कडांनीं उजळून निघाला होता. पडक्या मिशनच्या मोठाल्या लाल मातीच्या भिंती समोर उघड्या वाघड्या उभ्या होत्या. छताचा कांहीं भाग पडला होता आणि उरलेलाहि फार काळ टिकण्याची शक्यता नव्हती.

त्या क्षणीं फादर जोसेफ तिकडे ऐन थंडींत कुडकुडणाऱ्या एका इंडियन गांवांतल्या घाणीत आजारानें फणफणत होता. बिशपला प्रश्न पडला होता, त्याला आपण या वनवासांत कां ओढलें ? फादर व्हेलंट तसा लहानपणापासून नाजुक प्रकृतीचा. त्याचा कांटकपणा दिसे तो मुख्यतः अदम्य उत्साहापोटचा. मॉंटफेरँडच्या ' बद्रर्स ' नीं हाताखालच्या मुलांना लाडावण्याची रीत नव्हती; परंतु या एका मुलाला मात्र ते उंच व्होल्व्हिक डोंगरांवर हवापालटासाठीं दरसाल पाठवीत; कारण कॉलेजजीवनाच्या शिस्तींत त्याच्या मनाची उमेद कोमेजून जात असे. तो आणि फादर लतूर असे दोघे ओहिओमध्यें मिशनरी असतांना दोन वेळां जोसेफ मरणाच्या दारीं जाऊन परत आलेला होता. एकदां तर तो कॉलऱ्यानें इतका आजारी झाला होता कीं वृत्तपत्रांनीं मृतांच्या यादींत त्याचें नांव सरळ छापून टाकलें होतें. त्या प्रसंगीं ओहिओच्या त्यांच्या वरिष्ठ धर्मगुरूनें--बिशपनें— फादर व्हेलंटला 'ट्रॉम्प-ल-पोर्त' असें नवें संबोधन बहाल केलें होतें. फादर लतूरला आतां वाटलें, हो. इतक्या वेळां जोसेफनें मृत्यूला परतवलें तसें याहि खेपेस परतल्याविना रहाणार नाहीं.

पडक्या मिशनच्या भिंतींभोंवतीं घिरट्या घालतांना बिशपच्या लक्षांत आलें कीं तेथली एक खोली सुकी आणि स्वच्छ होती. रात्र तिथेंच एका दगडी बांकावर पांघरुणांत गुरफटून व्यतीत करण्याचें त्यानें ठरवलें. या खोलीचें निरीक्षण करीत असतां, त्या जुनाट चर्चबाहेर वारा मोठ्यानें घोंघावूं लागला, झपाट्यानें अंधारून आलें. गांवच्या घरांच्या ठेंगण्या दारांआडून शेकोटीचा उजेड दिसूं लागला. डोळ्यांना तो सुखद वाटत होता. खडकांवर त्याची वाट पहात उभ्या असलेल्या जार्किंतोची सडसडीत आकृति त्यानें तात्काळ ओळखली. त्यानें त्याचें पांघरुण डोक्याभोंवतीं लपेटून घेतलें होतें आणि वाऱ्याचा सपाटा अंगावर घेत तो किंचित् वांकला होता.

जेवण तयार असल्याची वर्दी त्यानें दिली. बिशप त्याच्यामागून एकसारख्या

आकाराच्या त्या एकाच वेळीं बरोबरीनें बांधल्या गेलेल्या घरांपैकीं एका ठराविक घरांत गेला. जार्किंतोच्या या घराच्या दाराशीं शिडी होती, तीवरून माडीवर जाता येत असे; परंतु तिथें दुसरें कुटुंब रहात होतें. वरच्या कुटुंबाला जार्किंतोच्या जागेचा छताचा व्हरांड्यासारखा उपयोग करतां येत असावा. बुटक्या दाराशीं मस्तक वांकवून बिशप आंत शिरला. एक मोठी पायरी उतरून जमिनीवर आला. तो उतरून आला ती खोली लांबोडकी, चिंचोळी होती. तिला नितळ पांढरा रंग दिलेला होता. पहायला तरी तिच्या रितेपणामुळें, साधेपणामुळें स्वच्छ वाटत होती. भिंतींवर कांही मोजक्याच शोभेच्या वस्तू सोडल्या तर बाकी कांहीं नव्हतें. जार्किंतोला ज्यांचा नेहमीं अभिमान वाटे तीं रंगीबेरंगीं ब्लॅकेटें एका कोपऱ्यांत व्यवस्थित घड्या करून ठेवलेलीं होतीं. शेकोटीजवळच्या जागेवर जार्किंतो आणि त्याची बायको झोंपत असे. दिवसभराच्या उन्हानें ती जागा तापत असे आणि ही उष्णता ती रात्रभर मग पुरवत असे. रशियन शेतकऱ्याच्या, शेकोटीची व्यवस्था असलेल्या पलंगासारखीच ती होती. शेकोटीवर सुकें मांस आणि कांहीं धान्य शिजत लावलेलें होतें. जळत्या ' पिनॉन ' लांकडांमुळें घरभर एक गंधयुक्त धूर पसरलेला होता. बिशप आंत आला तशी जार्किंतोच्या बायकोनें--क्लारानें त्याचें स्मितपूर्वक स्वागत केलें. शेकोटीनजीक बिशप आणि जार्किंतो भोजनाला बसले आणि क्लारानें त्यांच्या भांड्यांत रस्सा वाढला. त्या दोघांच्या मधोमध एक भांड्यांत तिनें गरम गरम भाकऱ्या ठेवल्या होत्या. बिशपनें आरंभीं एक प्रार्थना म्हणून भाकरीचा तुकडा मोडला. ते दोघे पुरुष भोजन करीत असतां क्लारा त्यांना एकीकडे न्यहाळत होती आणि एकीकडे नजीकची पाळणेवजा झोळी हलवीत होती. सांबराच्या कातड्याची ही बनवलेली होती. छताच्या आढ्यांना ही बांधली होती. विचारणा करता जार्किंतो दुःखमय सुरांत म्हणाला कीं मूल आजारी होतें. फादरनें मूल पहायची इच्छा व्यक्त केली नाहीं, कारण एकावर एक चिरगुटांत तें आपादमस्तक गुंडाळलेलें असणार याची त्याला कल्पना होती. थंडीविरुद्ध ही काळजी घेण्यांत येई. थंडींत इंडियन मुलांना अंघोळ घडत नसे आणि यांतलें कोणी आजारी पडलें तरीहि उपाय सुचवणें निरुपयोगी असे. त्याबाबतींत इंडियन माणूस कुणाचें ऐकून ध्यायलाच तयार नसे.

जार्किंतोच्या मुलाचें आपल्याला कांहीं करता येऊं नये याचा बिशपला विषाद वाटला. गांवांत फार पाळणे उरलेले नव्हते. बालमृत्यूचें प्रमाण वाढतें होतें. आणि त्या मानानें एकूण मुलें फार जन्मत नव्हतीं. जमात रोडावत चालली होती. देवी आणि गोंवरांत वारंवार मोठ्या प्रमाणावर माणसें बळी पडत होतीं.

याला अर्थात् इतरहि कांहीं खुलासे सांता फेतलीं चांगली चांगली माणसें देत. पेकॉसबद्दल बऱ्याच बऱ्या वाईट कथा प्रचलित होत्या. गौरवर्णीय लोकांना पूर्वपार त्याचें एक आकर्षण वाटत आलें होतें आणि त्याचा असा कांहीं इतिहास घडला होता, म्हणूनहि या कथा असतील. असें सांगत कीं या लोकांनीं फार फार प्राचीन कालापासून डोंगरांतल्या कोठल्या तरी अज्ञात गुहेंत एक आगटी सतत पेटत ठेवलेली होती. ती विझूं देण्यांत आलेली नव्हती. आणि कधींहि एकाद्या गौरवर्णीयाच्या नजरेसहि पडूं दिलेली नव्हती. असें म्हणत कीं या आगटीच्या सेवेंत असणाऱ्या गावातल्या उजव्या उजव्या तरुणांची ताकद ती शोषून घेत असे. फादरचा यावर अर्थातच विश्वास बसला नाहीं. वृक्षांनीं फुललेल्या डोंगरावर, कोणाच्या नजरेला शतकानुशतकें न पडणारी ही लहानशी आगटी पेटती ठेवण्याकरता पडून पडून किती श्रम पडणार होते. आणि ताकद तरी किती खर्च होणार होती ?

सापाबद्दलची एक कथाहि प्रचलित होती. या भागांत आरंभीं आलेल्या स्पॅनिश तशा अमेरिकन प्रवाशांकडून ही पसरवण्यांत आली होती. आणि अद्याप तिच्यावर लोकांचा विश्वास होता. ही जमात तर वैशिष्ट्यानें सर्पपूजक होती. घरांत ते साप दडवून ठेवीत असत. त्याशिवाय डोंगरांत एक भला मोठा साप त्यांनीं राखला होता; विशिष्ट सणासुदींना त्याला गांवात आणण्यांत येई. अशी वदंता होती कीं या सापाच्या तोडी लहान अर्भकें बळी देण्यांत येत आणि त्यामुळें त्यांची संख्या घटत होती.

परंतु याहून मोठी शक्यता होती ती गोऱ्या लोकांनीं या भागांत येतांना कांहीं सासर्गिक रोग बरोबर आणले असण्याची. यामुळें ही जमात रोडावत चालली असावी हें जास्त पटण्याजोगें होतें. या लोकांत गोवर, डांग्या खोकला अशा रोगांना टायफस किंवा कॉलऱ्याइतकें प्राणघातक स्वरूप प्राप्त होई. दर साल जमातीची लोकसंख्या घटतच होती. जित्याजागत्या गांवाच्या एका टोकाला जाकिंतोचें घर होतें. पलिकडे मृत गांव——ओकीं, रितीं, पडकीं, उध्वस्त घरें. केवळ मातीच्या ढिगाऱ्यागत उरलेलीं. जित्या गांवांत एकूण प्रौढ माणसें फार तर शंभर असतील. एके काळीं संपन्न आणि लोकसंख्येनें भरभराटीत असलेल्या या कोरोनॅडोच्या संशोधनांत प्रकाशांत आलेल्या ‘ सिकुये ’ भागापैकीं हें एवढेंच काय तें आतां उरलें होतें. त्या काळीं, कोरोनॅडोनें नमूद केल्याप्रमाणें, या भागांत सहाशेंची वसती होती. पेकॉस नदीच्या पाण्यानें भिजून जमीन चांगली सुपीक झालेली होती. झऱ्यांतून मुबलक मासे मिळत. डोंगरांत शिकारी सांपडत. या

मोठमोठ्या डोंगरांच्या मांडीवरच जणूं हें गांव एकाद्या लाडक्या मुलासारखें बसलेलें त्या काळीं त्या संशोधकाला दिसलें होतें. खालच्या बाजूला, ज्युनिपर्सनीं विखुरलेल्या सपाटीवर स्पॅनिश लोकांचा तळ होता. असहाय्य इंडियन 'यजमानां' कडून मोठया प्रमाणावर जबरीनें धान्य, केंसाळ कातडीं, सुती कपडे मिळवून हे पाहुणे लोक सुखानें रहात होते. अशी कथा सांगण्यांत येई कीं येथूनच ते वसंत ऋतूंत क्विव्हेराच्या सात सुवर्णनगरांच्या शोधार्थ, सोबत पेकॉसमधून कांहीं गुलाम आणि बटकी सक्तीनें घेऊन कोणत्या तरी कुमुहूर्तावर निघून गेले होते.

शेकोटीशीं बसल्या बसल्या बिशप लतूरला बाहेरला डोंगरांवरून खालीं आणि पुढें सपाटीवर घोंघावणारा वारा ऐकूं येत होता. मनांत हे विचार चाळवले होते. मध्येंच त्याच्या मनांत आलें, शेजारच्या जार्किंतोच्याहि मनांत हेच विचार तर नसतील ? तोहि स्तब्ध बसून होता. सूर्यास्ताला डोंगरांमागें दिसला तो प्रचंड काळा ढग या सुसाट वाऱ्यामागें असावा हें समजत होतें. परंतु कदाचित् तितक्याच काळ्या भूतकाळांतूनहि तो वारा सोंसाटत येत असेल असें फादरला वाटलें. त्याविरुद्ध एकच एक मानवी आवाज उठत होता आणि तो होता पाळण्यांतल्या, जार्किंतोच्या आजारी, दुबळ्या, व्यथित पोराचा. कोपऱ्यांत बसून क्लारा मुकाट्यानें चार घांस पोटांत लोटींत होती. जार्किंतो शेकोटीवर टक लावून बसला होता.

तासभर बिशपनें शेकोटीच्या प्रकाशांत 'ब्रेव्हिअरी'चें वाचन केलें. नंतर, अंगांत पुरेशी ऊब आली आहे, अंथरुण पांघरुणें उबून निघालीं आहेत अशी खात्री करून घेऊन बिशप झोंपायला जाण्याकरतां उठला. बिशपमागून त्याचीं तीं अंथरूण पांघरुणें आणि स्वतःकडलें एक जाड चिरगूट घेऊन जार्किंतो मागून निघाला. ठेंगण्या ठेंगण्या दरवाजांच्या, आंतल्या शेकोटीच्या प्रकाशानें उजळलेल्या एका हारीपुढून ते पुढें गेले, खडकाची सपाटी मागें टाकून पडक्या मिशनपर्यंत पोंचले. जोराच्या वाऱ्याशीं अद्याप त्या ओक्याबोक्या भिंती धैर्यानें झगडत होत्या. चांदणें आंत डोकावत होतें.

## २.

लौकर जागें होणें बिशपला मुळींच जड गेलें नाहीं. मध्यरात्रीनंतर त्याचें शरीर अधिकाधिक गारठत गेलें, वळूं लागलें, आणि झोंपणें अशक्य झालें. पांघरुणांबाहेर

येण्याआधीं त्यानें आपली प्रार्थना करून घेतली. आधींच प्रार्थना आटपून घेतली कीं इतर मग कामांना भरपूर वेळ सांपडतो हें फादर व्हेलंटचें वचन त्याला स्मरलें.

गाढ झोपलेल्या निःस्तब्ध गांवांतून जार्कितोच्या घराकडे जाऊन बिशपनें त्याला जागें केलें आणि शेकोटी पेटविण्याला सांगितलें. जनावरें सज्ज करण्याकरतां तो निघून गेला असता फादरनें त्याचें कॉफी करण्याचें भांडें आणि कथलाचा पेला बांधलेल्या सामानांतून बाहेर काढला. मेक्सिकन पद्धतीच्या भाकरीचा एक तुकडाहि काढून घेतला. काळी कॉफी आणि भाकरी एवढ्यावर दिवसचे दिवस तो प्रवास करूं शकत असे. न्यहारी न घेतांच निघावें असा जार्कितोचा बेत दिसला परंतु फादरनें त्याला आपल्याबरोबर भाकरी खाण्याला लावलें. क्लारा अद्याप मुलाला घेऊन बिछान्यांत पडलेली होती.

चारच्या सुमाराला, फटफटतांना, दोघे सडकेला लागले. जार्कितो ओझ्याच्या घोड्यावर बसला होता. त्याच्या या भागांतल्या डोंगरप्रदेशांतून जाणाऱ्या वाटा त्याला चांगल्या परिचित होत्या; इतक्या की अंधारांतहि त्याला त्या समजत होत्या. दुपार झाली तशी जनावरांना जरा विश्रांति द्यावी असें बिशपनें सुचविलें. परंतु आकाशाचा वेध घेऊन जार्कितोनें नकार दर्शवला. सूर्य कुठेंच दिसत नव्हता; हवा कुंद होती. आसमंत काळवंडलें होतें. बर्फ पडण्याची चांगलीच शक्यता होती. थोडक्याच अवधींत तें पडूंहि लागलें—प्रथम झिरमिरतें, परंतु पुढें सारखें वाढत्या प्रमाणात. समोरच्या पाइन झाडांचे बुंधे बर्फाच्या थरांनीं भराभर बुजूं लागले. माध्यान्हीनंतर किंचित्कालांत वाऱ्याच्या एका वावटळीनें या दोघां प्रवाशांच्या भोंवतीं बर्फाचें एक आवर्तच सोडून दिलें. मग मोठें वादळ सुरूं झालें. समुद्रावर तुफान उठतें तसा वारा वहात होता. बर्फाच्या वर्षावानें पुढलें कांहीं दिसत नव्हतें. बिशपला त्याचा मार्गदर्शक जेमतेम पायरवत होता. क्वचित् त्याचें मस्तक तर क्वचित् खांदे, तर क्वचित् तो बसला होता त्या खेचराचा मागला भाग दृष्टीस अस्पष्ट पडे. बाजूचीं पाइनचीं झाडें क्षणमात्र दिसत तर पुढल्या क्षणी बर्फाच्या मोठ्या वर्षावांत अदृश्य होत. खुद्द सडक, वाटेंतल्या नैसर्गिक खुणा, डोंगर, सारे बर्फात भराभर बुजून चालले होतें.

जार्कितो घोड्यावरून तात्काळ खालींच उतरला आणि त्यानें पांघरुणें काढून घेतलीं. बिशपकडे इतर सामानाचीं बोचकीं फेकत तो म्हणाला, "पॅड्रे, त्वरा करा. मला एक निवारा माहीत आहे. चला."

जनावरांना तसें सोडण्याला बिशपनें विरोध दर्शविला. परंतु जार्कितो म्हणाला, "त्याला इलाज नाहीं. त्यांची काळजी त्यांना. तुम्ही मात्र चला लौकर—"

पुढला तासभराचा काळ फादरला मोठा कसोटीचा गेला, कष्टाचा गेला. सहनशीलतेची मर्यादा जाणवूं लागली. नजरेला काहीं दिसत नव्हतें, नाकानें श्वास घेणें महाकठीण होत होतें. उघड्या तोंडानें धांप चालू होती. अस्पष्टशा दिसणाऱ्या खडकावर तो कसाबसा चढत होता, आडव्या पडलेल्या झाडांना ठोकरत अडखळत होता, मोठमोठ्या खड्डयांत कोलमडत होता, पुन्हां कसाबसा जिवाच्या करारानें बाहेर येत होता पुढल्या जाकिंतोच्या खांद्यावरल्या रंगीत पांघुरणांमागून जायचें तेवढें त्याला समजत होतें. कारण बर्फाच्या भिंतीमागें जाकिंतो दिसनासा होई तेव्हां तीं पांघरुणें मात्र दिसत.

एकाएकीं हिमवर्षाव ओसरलासे वाटूं लागलें. जाकिंतो थबकला ते उभे राहिले. वर खडकाची एक कमान बिशपला, नीट पहाता, दिसली. बर्फापासून तिच्यामुळें चांगला आडोसा झाला होता. खांद्यावरचीं पांघरुणें जाकिंतोनें खालीं टाकलीं. ती कपार चढून जाण्याची तयारी तो करूं लागला. वर पहाता बिशपच्या नजरेला खडकांना त्या बाजूला एक विशिष्ट आकार आल्याचें दिसलें. दोन गोलाकृति कपारी एकमेकींवर तटलेल्या. मधोमध बिळासारखी पोकळी. माणसाच्या किंचित् विलगलेल्या आणि पुढें काढलेल्या ओठांसारखी ती जागा दिसत होती. या ओठांशी जाकिंतो भराभर चढून गेला. पाय कुठें रोवायचे तें त्याला चांगलें माहीत दिसलें. वर चढून खालच्या ओठावर तो आडवा झाला. आणि तिथून त्याने बिशपला वर ओढून घेतलें. खालीं राहिलेलें सामान आणेस्तोंवर इथेंच वाट पहाण्याला त्याने त्याला सुचविलें.

कांहीं क्षणांत सामान घेतलेल्या जाकिंतोबरोबर बिशप त्या गुहेंत शिरला. आंत एक लांकडी शिडी होती. ती सहजपणें उतरून दोघे खालीं जमिनीवर आले.

अस्पष्टपणें एकाद्या ‘ गॉथिक ’ पद्धतीच्या प्रशस्त चर्चसारख्या आकाराची ती जागा बिशपला वाटली. गुहेच्या तोंडाकडून आंत येत होता तेवढाच इथला प्रकाश. खालीं उतरतांना, इथें येतांनाच बिशपच्या मनांत या जागे-विषयीं एक नावड, नापसंती दाटावली होती. इथली हवा थंडगार होती. ती हाडी फुटत होती. शिवाय एक मंद कुबट दर्पहि नाकपुड्यात एकसारखा भरत होता. माथ्यावर वीस एक फूट उंचावर गुहेचें तोंड दिवसाच्या कुद प्रकाशांत विवरासारखें वाटत होतें.

हें सर्व नजरेनें टिपून घेत तो उभा, असता गुहेच्या आकाराचा अंदाज घेत असता, त्याचा वाटाड्या जाकिंतो तेथल्या जमिनीच्या, भिंतीच्या अभ्यासांत मग्न झालेला होता. शिडीच्या पायथ्याशीं अर्धवट जळलेलीं कांहीं लांकडें दिसत

होतीं. म्हणजे तिथें शेकोटी पेटवण्यांत आलेली होती. विझवतांना तिच्यावर ताजी माती टाकण्यांत आली होती. भिंतीशीं पिनॉनच्या काटक्या एका ढिगानें रचलेल्या होत्या. जमिनीचा व्यवस्थित अभ्यास केल्यावर, सावधपणें जाकिंतोनें हा भारा एक एक काटकी उचलून हलवण्याला सुरवात केली. तो दुसऱ्या जागीं रचला. बिशपला वाटलें, आतां हा तात्काळ शेकोटी पेटवेल. परंतु जाकिंतोचा तसा मनोदय दिसेना. काटक्यांचा भारा हलवतांच त्या जागीं आसन ठोकून जाकिंतो विचारांत मग्न झाला. जास्त उशीर न लावतां शेकोटी पेटवण्याचा आग्रह फादरनें त्याला केला.

तेव्हां तो इंडियन मुलगा म्हणाला, " पॅड्रे, तुम्हांला इथें आणलें हें योग्य केलें की अयोग्य तें मला समजत नाहीं. कांहीं समारंभांसाठी आमचे लोक ही जागा वापरतात आणि केवळ आमच्या लोकांनाच ही आतांपर्यंत माहीत होती. इथून बाहेर पडाल तेव्हां इथें आला होतात हें विसरा. "

" जरूर विसरेन. पण तूं इथें आतां शेकोटी पेटवणार नसशील तर आपण आपले बाहेर बर्फांतच जाऊन उभे राहूं. इतक्यांतच मला इथें कसेंसें वाटूं लागलें आहे. "

जाकिंतोनें चिरगुटें सोडलीं आणि त्यांतलें एक त्यांतल्या त्यात कोरडें पांघरूण कुडकुडणाऱ्या बिशपच्या अंगाभोंवतीं टाकलें. मग तो शेकोटीच्या राखेवर आणि जळक्या लांकडांवर वाकला, जाळ मर्यादित ठेवण्याकरतां वापरलेले बरेच छोटे दगड त्यानें वेंचून घेतले आणि तो गुहेच्या मागच्या भिंतीकडे गेला. तिथें, त्याच्या डोक्यापासून कांहीं अंतरावर एक विवर होतें. खूप मोठ्या कलिंगडाइतकें तें रुंद, लांबोडकें आणि अनियमित आकाराचें होतें.

' पाजारितो ' भागांतल्या ज्वालामुखीमुळें निर्माण झालेल्या कपारींतून अशा आकाराचीं विवरें खूप असत. इथें हें एकटेंच होतें. अंधारें वाटत होतें. दुसऱ्या एका गुहेंत तें पोंचत असावेंसें वाटत होतें. जाकिंतोच्या मस्तकाच्याहि वर तें होतें तरी त्याचा हात तिथवर पोंचूं शकत होता. तो हातांतले दगड त्या विवराशीं एकावर एक रचून बिलकुल आवाज न करतां तें बंद करूं लागला आणि त्यानें तें पूर्णपणें बंद केलें तेव्हां बिशप नवलानें थक्क झाला होता. मग जाकिंतोनें ' पिनॉन 'च्या काटक्या कापून त्या त्या दगडांच्या अध्येमध्ये फटींफटींतून बसवल्या. शेवटीं शेकोटींतली मूठभर माती उचलून त्यानें गुहेच्या तोंडाआंत वाहून आलेल्या थोड्याशा ओल्या बर्फांत कालवली. हा घट्ट चिखल त्यानें केलेल्या विवरावर सारवला आणि पंजानें थापून टाकला. हें सारें करण्याला त्याला पुरीं पंधरा मिनिटेंहि लागलीं नाहींत.

मग कांहीं न बोलतां, कसला खुलासा न करतां तो शेकोटी पेटवण्याच्या उद्योगाला लागला. बिशपला न मानवणारा कुबट दर्प पेटल्या शेकोटीमुळें हळू हळू नाहींसा झाला आणि ऊबहि आली. मात्र फादर लतूरच्या डोक्यांतला कोलाहल मात्र चालूच राहिला. प्रथम त्याला वाटलें अंगांतल्या थंडाव्यामुळें, रक्ताभिसरणांतल्या बदलामुळें कानात हा आवाज होतो आहे. परंतु जसजशी ऊब आली, जरा हलकें वाटूं लागलें तसा त्याला या गुहेचा एक कंप सातत्यानें जाणवूं लागला. मधाच्या मोहोळाभोंवतीं माशा घोंघावाव्यात किंवा लांबवर अनेक पडघम एकदम वाजूं लागावेत तसा एक आवाजहि होत होता. किंचित्कालानें जार्कितोला त्यानें त्याबद्दल विचारलें. गुहेत शिरल्यापासून प्रथमच तो तरुण इंडियन पोरगा हंसला. एक जळकें लाकूड हातीं बॅटरीमारखें घेऊन तो उठला, मागून त्यानें फादरला यायला खुणावलें. एका विवराशीं त्यानें नेलें. हें विवर पुढें ऐन डोंगरात कुठें तरी पोंचलेलें असावें. छत इतकें ठेंगणें होतें, कीं हात पोचावा. तिथें जार्कितो शाडूनें बुजवलेल्या भुईतल्या एका फटीशीं वांकला. जवळच्या चाकूनें थोडा शाडू उकरून त्यानें त्या फटीला कान लावला. कांही क्षण वेध घेतला. मग बिशपला त्यानें तेच करण्याला सुचवलें.

बराच वेळ फादर लतूर त्या फटीला कान लावून एकचित्त होता. फटीवाटें थंडी आत शिरूनहि त्यानें कान हालवला नाहीं. भूगर्भांतला सर्वांत जुना आवाज तो ऐकत होता हें त्याला उमगलें. एका मोठया भूमिगत नदीचा तो आवाज होता. वहाणारें काळें काळें पाणी फार फार खोल, अगदीं डोंगराच्या पायथ्याइतकें खोल होतें, खडकाच्या अनेक थरांखालून मिट्ट अंधारातून वहात होतें. तो पाण्याचा लोंढा नव्हता, संथ रुद्र गंभीरपणें वहाणारा तो सामर्थ्यवान् जल-प्रवाह होता—तसा त्याचा आवाज होता.

उठत तो म्हणाला, "भयंकर."

फटीवर थुंकी टाकून ती फट पुन्हा सारवून, थापून एकजीव करीत जार्कितोनें दुजोरा दिला.

दोघे शेकोटीकडे परतले तेव्हां गुहेच्या तोंडचा प्रकाश खूप फिक्कुटला होता. तो संपूर्ण नाहींसा होतांना बिशपनें विषादपूर्वक पाहिलें. सामानांतून त्यानें कॉफीपॉट भाकरतुकडा आणि थोडा खवा काढला. जार्कितोनें गुहेच्या तोंडाशीं चढून पाइनचें एक झाड हालवून ताजा बर्फ एका पांघरुणांत आणि कॉफी पॉटमध्यें गोळा करून आणला. या कामांत तो असतांना खिशांतली बाटली काढून बिशपनें ताओसच्या व्हिस्कीचा एक घुटका घेतला. जार्कितोच्या समोर मद्य घेणें त्याला बरें वाटत नसे.

या स्थितींत भाकरी, काळी कॉफी मिळते आहे हें आपण आपलें भाग्य मानतो असें जाकिंतो म्हणाला. कॉफी पिऊन कथलाचा पेला बिशपकडे परत देतांना सुखावून त्यानें ओंठावरून उपडा हात फिरवला, पांढरेशुभ्र दांत दिसेपर्यंत हास्य केलें.

“ इथें जवळपास आपण होतों म्हणून बरें झालें. ” तो उद्गारला. “ आपण जनावरें सोडलीं तेव्हां मला वाटलें होतें कीं इथें आपण पोचूं शकूं. पण खात्री वाटत नव्हती. मी फार वेळां इकडे आलेलो नाहीं. तुम्ही घाबरला होतात कीं काय, पॅड्रे ? ”

बिशप विचारपूर्वक म्हणाला, “ घाबरायला मला तूं सवड दिली नाहींस, बेट्या. तूं घाबरला होतास वाटतें.”

खांदे उडवून जाकिंतो म्हणाला, “ गांवाकडे मी आतां परत जात नाहीं एवढे मला जाणवलें होतें. ”

फादर लतूरनें शेकोटीच्या उजेडांत ‘ ब्रेव्हिअरी ’ चें पठण केलें. सकाळपासून अध्यात्म सोडून इतरच अनेक विषयांत त्याचे चित्त भ्रमलें होतें. आतां झोंप येईलसे वाटत होतें. रात्रीच्या मुक्कामांत नेहमीं करी तशी जाकिंतोला जोडीला घेऊन त्यानें प्रार्थना केली, मग पांघरुणांत गुरफटून शेकोटीकडे पाय करून तो आडवा झाला. मनांत एक विचार मात्र होता. रात्रींत केव्हां तरी उठून, जाकिंतोनें दाखवून दिलेली ती भुईतली फट आणि तिच्यावाटें येणारा आवाज अधिक अभ्यासावा. ती फट बुजवल्यानंतर त्या दिशेनें पुन्हां जाकिंतोनें चुकूनहि बघितलें नव्हतें आणि अव्वल इंडियन शिष्टाचार पाळण्यासाठीं, फादरनेंही तिकडे पुन्हा नजर टाकली नव्हती.

रात्रींत त्याला जागही आली. शेकोटी अद्याप सारी गुहा उजळीत धुमसत होती. परंतु नजीकच्या भिंतीशीं, एकाद्या अदृश्य उंचवट्यावर उभा असावा तसा, हात खडकावर पसरून खडकाला बिलगून, चिखलानें बुजवलेल्या विवराला कान लावून जाकिंतो एकचित्त होऊन उभा होता. जिवाचे कान करून तो कांहींतरी ऐकत होता. बिशपनें अंगाचें कांही चलनवलन न करतां डोळे मिटून घेतले आणि आपला हा वाटाड्या आपण रात्रीत उठूं तेव्हां झोंपलेला असेल असें आपल्याला वाटलें कसें याचें तो नवल करूं लागला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं गुहेबाहेर ते सरपटत आले आणि बाहेरच्या चकाकत्या शुभ्र जगांत उतरले. उगवत्या सूर्याच्या प्रकाशांत बर्फानें झांकलेले डोंगर लाल दिसत होते. भोंवतालचा रमणीय देखावा पहात बिशप उभा

राहिला. कोंवळ्या सूर्यप्रकाशांत फरचीं झाडांमागून झाडें गुलाबी हिमाचे गुच्छ मिरवीत हारीनें उभीं होतीं.

जनावरांचा शोध घेण्यांत आतां अर्थ नाहीं असें जाकिंतो म्हणाला. बर्फ वितळलें कीं तो त्यांच्या देहांवरचीं अवजारें आणि जिनें शोधून, सोडवून आणणार होता. आठ एक मैल चालून ते दोघे नजीकच्या पहिल्या पागेकडे गेले, दोन जनावरें त्यांनी भाड्यानें घेतलीं आणि रात्र पडेपर्यंत प्रवास संपवला. फादर व्हेलंटशीं ते पोचले तेव्हां तो म्हशीच्या कमावलेल्या कातड्याच्या एका बिछान्यांत उठून बसलेला होता. त्याचा ताप उतरला होता आणि त्याची तब्येत सुधारण्याच्या मार्गावर होती. बिशपच्याहि आधीं त्याचा दुसरा एक स्नेही त्याच्यापाशीं पोचला होता. किट कार्सन हा दोन इंडियन्स बरोबर येऊन त्या भागांत पारधीकरता फिरत असतां त्याला 'व्हिकर'च्या आजाराची वार्ता कळली आणि घाईनें तो वादळ सुरु होण्याआधीं त्याच्याकडे पोंचला. फादर व्हेलटला घोड्यावर बसतां येईल असें वाटतांच कार्सन आणि बिशप त्याला घेऊन सांता फेकडे निघाले. त्याच्या दुबळ्या तब्येतीमुळें हा प्रवास त्यांनीं चार दिवसांच्या अवकाशांत टप्पाटप्प्यांनीं केला.

बिशपनें आपला शब्द पाळला आणि जाकिंतोनें दाखविलेल्या त्या गुहेबद्दल तो कोणाकडेहि कांहीं बोलला नाहीं. परंतु त्याच्या मनांतलें नवल मावळलें नव्हतें. वारंवार त्या गोष्टीचें स्मरण त्याला होई आणि अंगावर अकारण कांटा उठे. वास्तविक त्याच्या विपत्तींत त्या जागेनें त्याला उत्तम निवारा दिला होता. प्रत्यक्ष वादळाची, त्यातल्या त्याच्या हालांची आठवण करतांना त्याला एक मौज वाटे. परंतु गुहेविषयीं त्याच्या मनांत वारंवार भयच निर्माण होई. यापुढें पुन्हा कोठल्याहि गुहेत जाणें नाहीं असें तो मनाशीं ठरवून टाकी.

घरीं परतल्यावरहि ती गुहा, त्यांतलें त्या रात्रींचें जाकिंतोचें तें गूढ वर्तन याचाच विचार तो करीत होता. पेकॉस धर्मपंथाविषयींच्या कट्ट अशा अनेक गोष्टी मग खऱ्या वाटूं लागत. इंडियनांच्या धार्मिक श्रद्धा, इंडियन मनाचे व्यापार याविषयीं सांता फेमधल्या गोऱ्या वा मेक्सिकन लोकांनाहि कांहीं माहिती नव्हती असें फादरचें पक्कें मत बनलें.

किट कार्सननें त्याला सांगितलें होतें, ग्लोरिएता पास आणि पेकॉस गांव यांच्या दरम्यानचा मक्तेदार व्यापारी या इंडियनांचा, वंशपरंपरागत व्यापारामुळें जवळ

जवळ शेजारीच बनला होता आणि त्याला त्यांची उत्तम माहिती होती. त्याची आई ही त्या भागांतली पहिली गौरकाय स्त्री. त्या व्यापाऱ्याचें नांव झेब ऑर्चार्ड. डोंगर भागांत तो एकटाच राही. इंडियन आणि गौरकाय लोकांना मीठ, साखर, व्हिस्की, तंबाकू पुरवी. कार्सच्या म्हणण्यानुसार हा माणूस फार सचोटीचा आणि नेकीचा होता. इंडियनांचा सन्मित्र होता. आणि एके काळीं त्याला स्थानिक इंडियन मुलीशीं लग्न करण्याची इच्छा होती परंतु स्वतःच्या गौरवर्णाचा अभिमान बाळगणाऱ्या त्याच्या आईच्या दडपणामुळें तों त्यापासून परावृत्त झाला होता, एकटाच एकांतवासांत जीवन कंठीत होता.

फादर लतूरनें एकाद्या प्रवासांत एक रात्र या व्यापाऱ्याकडे घालविण्याचे मनांत योजून ठेवलें. पेकॉसमधल्या इंडियनांच्या धार्मिक सोहळ्यांबद्दल, रीति-रिवाजांबद्दल तो त्याच्याकडून मिळेल तेवढी माहिती मिळवणार होता.

प्रत्यक्ष भेटींत ऑर्चार्ड म्हणाला कीं, न विझणाऱ्या शेकोटीबद्दलची कथा प्रचलित होती ती तंतोतंत खरी होती. मात्र ही शेकोटी डोंगरभागांत पेटत ठेवण्यांत आलेली नव्हती, तर खुद्द गांवांतच ती होती. शाडूच्या एका भट्टींत ती धुमसत असायची. अनेक शतकें, अगदीं गांवाच्या स्थापनेपासून ती एका ठिकाणीं पेटती ठेवण्यांत आलेली होती. सापाबद्दलच्या कथांविषयीं त्याला निश्चित कांहीं सांगतां आलें नाहीं. तो म्हणाला, गांवाच्या आसपासच्या टापूंत सर्प आपण पाहिले आहेत, पण ते या भागांत सर्वत्रच असतात. कांहीं वर्षांमागें पेकॉसमधल्या एका मुलाच्या घोट्याला सर्प डसला होता आणि हिस्कीकरता त्याला आपल्याकडे आणण्यांत आलें होतें. त्याच्या अंगाला सूज आलेली होती. तो खूपच आजारी होता.

वारंवार ऐकूं येई त्याप्रमाणें एकादा मोठा सर्प या इंडियनांनीं कुठें तरी लपवून ठेवला होता काय असें बिशपनें ऑर्चार्डला विचारतां तो म्हणाला. "या प्रकारचा एकादा जिवाणू लांब डोंगरांत ठेवून धार्मिक समारंभाने गांवात आणतात ही गोष्ट सत्य आहे. परंतु तो सर्पच कीं काय तें मला माहीत नाहीं. इंडियनांच्या धर्माबद्दल कोणाही गोऱ्या माणसाला कांहीं कळणें शक्य नाहीं, पॅड्रे."

त्यानंतर त्यांच्या गोष्टी चालल्या असतां, ऑर्चार्डनें कबूल केलें कीं, पोरवयांत असतां सर्पाविषयींच्या या प्रवादांचा पडताळा घेण्याला तोहि फार उत्सुक होता आणि एकदां, कोणत्या तरी इंडियन सणाला, पेकॉसच्या रहिवाश्यांवर गुप्त नजर ठेवून त्यानें हा पडताळा पहाण्याचा शर्थीचा आणि धोक्याचा प्रयत्न केला होता.

दोन रात्रीं तो डोंगरावर छपून बसलेला होता. पलित्यांच्या प्रकाशांत इंडियन्स एक पेटी आणत असल्याचें त्याला दिसलें होतें. पेटी मोठी होती. ज्या कळकांवर ती लटकावली होती ते भारानें चांगलेच वांकले होते. म्हणजे ती फार जडहि होती. अंधार पडल्यावर गौरवर्ण माणसें अशी पेटी अशा प्रकारें आणतीं तर आपण याचा अर्थ त्या पेटींत पैसे, दारू वा शस्त्रें असल्याचा केला असता असें ऑर्चोर्ड म्हणाला. परंतु, इंडियनांनीं ती तशी आणल्यानें आंत काय होतें तें सांगणें अवघड होतें. कदाचित् त्यांच्या पूर्वजांनीं पूजिलेले वेड्यावांकड्या आकारांचे दगडधोंडे त्यात असतील. तो म्हणाला, "त्यांना बहुमोल वाटतें तें आपण कवडी किंमतीचेंहि लेखीत नाही. त्या लोकांना त्यांच्या स्वतंत्र अंधश्रद्धा आहेत, आणि जगाच्या अंतापर्यंत त्याभोंवतीच ते जगणार, मरणार."

जुन्या गोष्टींविषयींचा इंडियनाचा आदर हा आपल्याला आवडणारा इंडियनाचा एक गुण असल्याचे आणि आपल्याही धर्मांत त्याला फार महत्त्व असल्याचे फादरने ऑर्चोर्डला सुनावलें.

तो व्यापारी यावर म्हणाला कीं, "कदाचित् या इंडियनांना तुम्ही उत्तम कॅथॉलिक बनवूं शकाल परंतु त्याच्या स्वतःच्या जुनाट श्रद्धा त्यांना टाकायला कधींहि लावूं शकणार नाहीं. त्याच्या धर्मगुरूंकडे स्वतंत्र प्रकारचीं गूढें आणि रहस्ये असतात. त्यातलीं खरीं किती, थोतांडें किती तें मला माहीत नाहीं. मी फार लहान असता घडलेली एक हकिकत मला स्मरते. एका रात्रीं पेकॉस गांवची एक मुलगी, हातात तिचें अर्भक घेऊन इथल्या स्वैंपाकघरांत घुसली आणि जवळ आलेला सण उलटेपर्यंत याला लपवा म्हणून माझ्या आईला विनवूं लागली. तिचें म्हणणें, तिच्या मुलाला सापाच्या तोंडीं देण्यात यायचें असल्याचें तिला समजलें होतें. तें खरे असो कीं खोटें असो, तिचा त्यावर विश्वास बसलेला दिसत होता आणि आईनें तिला आमच्याकडे राहूं दिलें होतें. त्या काळांत माझ्यावर या घटनेचा फार मोठा परिणाम झाला होता."

# पंचम खण्ड

.......................................................

.१.

ताओसला पहिली अधिकृत भेट देण्याकरता बिशप लतूर जार्कितोबरोबर घोड्या-वरून डोंगरभागांतून चालला होता. ताओसचें 'पॅरिश' हें त्याच्या अखत्यारांतलें अल्बुकर्कनंतरचें सर्वांत मोटें आणि संपन्न 'पॅरिश' तेथला धर्मगुरू आणि रहिवासी असे सर्व अमेरिकनाविरुद्ध होते आणि कोणत्याहि ढवळाढवळीची त्यांना नावड होती. स्पॅनिअर्ड सोडला तर दुसरा कोणताहि युरोपीय माणूस 'गिंग्रो' लेखला जाई. बिशपनें दीर्घकाल पॅरिशला भेट देणे टाळून स्वतः-विषयींची तेथली प्रारंभीची कटुता ओसरण्याला वाव दिला होता. कार्सनच्या सहाय्यानें तेथल्या परिस्थितीची आणि सामर्थ्यवान म्हातारा धर्मगुरू अंतोनिओ योज मार्तिनेझ याची अद्ययावत् माहिती मात्र तो सतत मिळवीत राहिला होता. धर्मगुरू मार्तिनेझ हा त्या भागांतला धार्मिक तसा ऐहिक बाबतींत मार्गदर्शक आणि सल्लागार होता. खरोखर, फादर लतूरचा प्रवेश त्या टापूंत होण्याआधीं मार्तिनेझ हाच न्यु मेक्सिकोच्या त्या उत्तरेकडल्या भागांत हुकूमशहा होता आणि सांता फेचे रहिवासी धर्मगुरू त्याच्या मुठींत होते.

ताओसच्या इंडियनांनीं पांच वर्षांमागें केलेल्या उठावामागें हा मार्तिनेझच होता हें त्या भागांत सर्वश्रुत होतें या भागांत अमेरिकन गव्हर्नर वेण्ट आणि आणखी डझनभर गौरकाय माणसांचें शिरकाण करण्यांत आलें होतें. ताओ-सच्या सात इंडियनांची लष्करी कोर्टापुढें याबाबत चौकशी होऊन त्यांना फांसावर देण्यांत आलें होतें. परंतु यामागला खरा सूत्रधार. मार्तिनेझ त्याला मात्र हात लावण्यांत आला नव्हता. या प्रकरणांत मार्तिनेझनें आपला खूप फायदा करून घेतला होता.

फांशीची शिक्षा झालेल्या सातजणांनीं त्यांच्या पॅड्रेला बोलावणें पाठवलें होतें आणि आपल्याला आपणच या प्रकरणांत पाडलेंत, आतां सोडवा म्हणून विनवणी

केली होती. त्या सात जणांनीं गांवानजीकच्या त्यांच्या जमिनीचें मालकीपत्र आपल्या नांवानें करून दिल्यास आपण याबाबत कांहीं करूं असा उलट निरोप फादरनें त्यांना पाठवला होता. हे त्या सातांनीं केलें आणि तो व्यवहार रीतसर पुरा झाल्यानंतर पुन्हां या प्रकरणाकडे फादरनें पाठ वळवली ती वळवलीच. आणि त्याच्या अबिक्विड या जन्मगावीं तो निघून गेला. त्याच्या अनुपस्थितींत ठरल्या दिवशीं त्या सात इंडियनाना फांसावर लटकावण्यांत आलें होतें. मार्तिनेझ आतां त्या सातांच्या जमिनी करून चांगला गबर झाला होता.

फादर लतूरनें मार्तिनेझशीं तसा थोडा फार मर्यादशील पत्रव्यवहार आधीं केलेला होता, एकदांच दोघाची भेटहि झाली होती. सांता फेच्या धर्मगुरूंनीं नव्या बिशपचें स्वामित्व मानूं नये म्हणून त्यांचे कान प्रत्यक्षच फुंकण्याकरतां मार्तिनेझ एकदा ताओसहून मुद्दाम सांता फेला आला होता तेव्हां ही भेट झाली होती तिला तसे बरेच दिवस उलटले असले तरी कालच पाहिल्यासारखा मार्तिनेझ बिशप लतूरला आठवत होता. कोणीं पाहून सहज विसरावें असें फादर मार्तिनेझचे व्यक्तिमत्व नव्हतें. रस्त्यांत भेटून पुढं होता तर त्याचें दांडगें शरीरबळ आणि अदम्य महत्त्वाकांक्षा विसरणें अशक्य झालें असतें. प्रत्यक्षांत बिशपहून तो फारसा उंच नव्हता परंतु भास मात्र असा करून देई कीं आपण भलेथिप्पाड आहों. त्याचें उंच रुंद खांदे पहाणाऱ्याला मस्त बैलाची आठवण करून देत रुंद मानगुटीवर त्याचें मोठें मस्तक, लालबुंद आणि गोबऱ्या गालांचा अंडाकृति स्पॅनिश चेहरा--तो चेहरा बिशपला किती स्पष्टपणें स्मरत होता! तो इतका वेगळा होता कीं तो पुन्हां पहाणें बिशपला आवडलें असतें. त्यावरचें ते उंच अरुंद कपाळ, कमानदार कृष्णमाळ भुंवयाखालचे चकाकते पीतवर्ण डोळे, गोबरे लाल लाल गाल–ते ॲंग्लोसॅक्सन वळणाचे म्हणजे केवळ मांसल नव्हेत तर हलत्या स्नायूंनीं विणलेले. मनातल्या भावागणिक मुद्रेवरचा अणु अणु बदलत राही. त्याची जिवणी भडक, स्वैर भावनावासनांची आणि जुलमी हट्टीपणाची निदर्शक होती. जाड ओठ बाहेर काढलेले, आणि कामेच्छेनें वा भयानें अंग ताठरवून घेतलेल्या प्राण्याच्या कातडीसारखे ताठरलेले दिसत. हें सारें फादर लतूरला स्मरत होतें.

फादर लतूरच्या दृष्टीनें एका व्यक्तीच्या स्वैर सामर्थ्याचे दिवस खुद्द सरहद्दीवरही जवळ जवळ संपुष्टांत आले होते आणि हा मार्तिनेझ म्हणजे या भूतकाळाचा वैचित्र्यपूर्ण, परिणामकारक आणि खरोखर षंढ नमुना मागें उरलेला होता.

बिशप आणि जाकिंतोनें डोंगर मागें टाकले, वाट संपून वाळल्या झुडपांनीं

व्यापलेला माळ सुरू झाला. मधून मधून माणसाच्या पायाएवढी जाड खोडें उभीं होतीं. त्याच्या दिशेनें सरकत येणाऱ्या एका धुळीच्या लोटाकडे तेवढ्यांत जाकिंतोनें फादरचें लक्ष वेधलें—शंभराहून अधिक इंडियनांची आणि मेक्सिकनांची एक पलटण आरडाओरडा करीत आणि शस्त्रें परजीत त्यांच्या नव्या बिशपच्या स्वागतार्थ धावून येत होती.

तो जमाव जवळ जवळ आला तशी बिशपनें त्यांतला मार्तिनेझ हेरला. तो 'बस्किन'च्या तुमानींत, उंच बुटांत आणि चंदेरी रिकीबींत होता. त्याच्या माथ्यावर रुंद मेक्सिकन हॅट होती आणि खांद्यांवर एक मोठें काळें वस्त्र एकाद्या धनगरासारखें बांधलेले होतें. थेट बिशपपर्यंत घोडा दौडवत येऊन त्यानें आपलें तें काळें जनावर रोखलें आणि मस्तक अनावृत्त करून बिशपला मोठा प्राणिपात केला. तोंवर त्याच्या बरोबरीच्यांनी या माणसाना घेरून हवेत आपल्या बंदुका झाडल्या होत्या.

दोन्ही धर्मगुरू मग जोडीनें लॉस रँकोस द ताओ या गांवांत शिरले. हिरवीं ऑर्चर्ड झाडें, वळणा वळणाच्या सडका आणि पिवळ्या भिंतींचें तें गांव होतें. चर्चपुढल्या चौकांत गांवकरी गोळा झाले होते. सारे गुडघ्यावर खालीं वांकले तरी दहा बारा वर्षांचा एक मुलगा उघड्या तोंडाने आणि डोक्यावर टोपी तशीच ठेवून उभाच राहिला. पॅद्रे मार्तिनेझनें अनेक वांकल्या बायकांच्या मस्तकांवरून हात लांबवून त्या मुलाची टोपी उडवली आणि कानसलांत फटाफट चारपांच सपाटे मारले. फादर ल्तूरनें पुटपुटून निषेध व्यक्त केला तेव्हां तो स्थानिक धर्मगुरू धैर्यानें म्हणाला, "माझाच मुलगा हा, बिशप. त्याला रीतभात आतां शिकायला नको का ?"

पुढें काय आणि कसें चालायचें होतें याची ही सूचना बिशपनें मानली. मुद्रेवर कोणताहि फरक न दाखवतां मनाशीं त्याने हें आव्हान स्वीकारलें आणि पॅद्रेच्या निवासस्थानांत त्यानें पाऊल ठेवलें. मार्तिनेझच्या वाचना-लेखनाच्या खोलीकडेच ते थेट गेले. तिथें एक भला दांडगा तरुण माणूस भुईवर आडवा पडून गाढ झोंपला होता. उशाला त्यानें एक जाडजूड ग्रंथ घेतला होता. श्वासोच्छवास घेतांना त्याचें अंग विलक्षण वरखालीं होतें. फ्रॅन्सिस्कनचा तपकिरी झगा त्याच्या अंगावर होता. केस आंखूड कापलेले होत. त्या झोंपलेल्या माणसाकडे लक्ष जातांच पॅद्रे मार्तिनेझ मोठ्यांदा हंसत सुटला आणि त्याच्या कुशींत त्यानें बरीच जोराची लाथ हाणली. तो तरुण माणूस दचकून जागा होऊन धडपडत उभा राहिला आणि एका दारावाटें बाहेर धांवत गेला.

पॅद्रे तो गेला. त्या दिशेनें ओरडला, "बरें का रे, रात्री फार कष्ट करणाऱ्या

तरुण माणसांनाच दिवसा झोंप येते ! रात्रीं कंदिलाशीं वाचत बसला असशील उशीरसर. धर्मशास्त्रामधली परीक्षा घेतों थांब तुझी मग !" कुठून तरी यावर क्षीण, मंद हास्याचा, खुदखुदीचा जबाब आला. त्याच बाजूला तो तरुण वाळत घातलेल्या कपड्यांमागें जाऊन दडला होता. आपला प्रचंड देह वांकवून तो दोन वाळत्या, ओल्या चादरींमागें धांवला.

मार्तिनेझ म्हणाला, " हा त्रिनिदाद माझा छात्र होता. आरोयो होण्डोचे फादर ल्युसेरो यांचा हा पुतण्या. फादर माझे फार जुने मित्र. तसा तो भिक्षु झाला आहे, पण अधिक कांहीं करूं शकला तर आम्ही पहातों आहों. ड्युरँगोच्या सेमिनरीमध्यें आम्ही याला पाठवला होता परंतु एक तर त्याला तिथें करमलें नाहीं आणि दुसरें म्हणजे तो कांहीं शिकायला ब्रथ्थडहि बराच होता. म्हणून इथेंच सध्यां मी त्याला शिकवतों आहे. कधीं ना कधीं आम्ही त्याला धर्मगुरू बनवणार. "

घर आपलेंच समजा म्हणून फादर लतूरला सांगण्यांत आलें होतें परंतु तशी इच्छा त्याला नव्हती. इथली अव्यवस्था त्याच्या सहनशीलतेच्या पलिकडली होती. खुद्द पॅड्रेच्या मेजावर तपकिरीचा शिडकावा झाला होता. आणि पुस्तकांच्या अस्ताव्यस्त ढिगांमागें भिंतीवरचा क्रूस लपून गेला होता. घरभर सर्वत्र खुर्च्या–मेजांवर पुस्तकें विखुरलीं होतीं. पुस्तकात, भुईवर सर्वभर वाळू आणि केर जाणवत होता. फादर मार्तिनेझचे बूट आणि टोप्या कोपऱ्यांत कशा तरी पडलेल्या होत्या. त्याचे कपडे खुंट्यांवर आणि सामानापैकीं कांहीं कांहीं वस्तूंवर लटकत होते. आणि इतकी सारी अव्यवस्था असूनहि घरभर तरुण आणि म्हाताऱ्या नोकराणींचा सुकाळ दिसत होता. विशेष निपजीचीं लठ्ठ पिवळीं मांजरें इतस्ततः भटकत होती, कोणी खिडक्याशीं झोंपलीं होतीं आणि दोघे फादर्स जेवायला बसले तेव्हां तिथें मग तीं धीटपणें झटूं लागलीं. मार्तिनेझहि त्यांच्याकडे बेफिकीरपणें मधून मधून स्वतःच्या जेवणांतले कांहीं तुकडे भिरकावीत होता.

जेवणाच्या वेळीं, भुईवर गाढ झोंपलेल्या आणि नंतर पळून गेलेल्या त्या भल्या धिप्पाड तरुणाची बिशप लतूरशीं फादरनें ओळख करून दिली. हा छात्र आपल्या मार्गदर्शनाखालीं अध्ययन करीत असून आपला हा चिटणीस होणार असल्याचें फादरनें पुन्हा एकवार बिशपाला ऐकवलें. त्याचबरोबर, तो तरुण, त्रिनिदाद ल्युसेरो, त्याचा बहुतेक वेळ स्वयंपाकघरांत घोटाळण्यांत आणि तेथल्या नोकराणींच्या खोड्या काढण्यांत घालवतो हेंहि तो कौतुकानें म्हणाला.

त्या तरुणाच्या पुढ्यांतच हें सारें तो बोलला. परंतु त्या तरुणाला याचा

बिलकुल संकोच वाटलेला दिसला नाहीं. त्याचें सारें लक्ष जेवणांत रंगलें होतें. पुढ्यांत ताट येतांच विलक्षण घाईघाईनें तो अन्नाचे गोळे तोंडांत टाकून ते गिळत सुटला. एकाद्या दरिद्री नातेवाइकाप्रमाणें किंवा नोकरासारखें या त्रिनिदादला त्या घरांत वागवण्यांत येई हें नंतर बिशप लतूरला कळून आलें. त्याला निरोप पोंचवण्यासाठीं धाडण्यांत येई, फादरचे बूट आणायला न संकोचतां सांगितलें जाई, जळणाला लाकूडफाटा आणण्याकरतां पिटाळलें जाई, घोड्याला खरारा करण्याचें कामदेखील तो करी. फादर लतूरला त्याचें वागणें वावरणें इतकें अप्रिय झालें कीं त्याच्याकडे पहाणेंहि तो शक्य तितकें टाळूं लागला. त्या तरुणाचा जाडा चेहरा विलक्षण बुद्दू वाटत होता, शिवाय तेलकट तुपट असा कांहींसा होता. जिवणीच्या टोकांना लहान पोरांच्या बाळशाला असतात तशा सुरकुत्या लहपणापार्यी पडल्या होत्या. नाकावर चष्मा जिथें टेकला होता तिथें मऊ मऊ मांस सांचलें होतें. सबंध जेवणांत तो एकहि शब्द बोलला नाहीं. पुन्हा अन्न दिसणार नाहीं अशा भयानें ग्रस्त असल्यासारखा तो केवळ भराभरा खात सुटला. क्षणभरच त्याचें हावरट लक्ष पुढ्यांतल्या अन्नावरून दूर होई तें अन्न वाढणाऱ्या मुलीवर खिळण्याकरतां. या मुली त्याची फारशी कदर दाखवीत नव्हत्या. एक ना एक वासनेनें तो सतत मूढ झालेलाच असे असा बिशपचा ग्रह झाला.

गळ्याला नॅपकिन बांधलेला मार्तिनेझ मोठ्या प्रमाणावर खात पीत होता. स्वयंपाकिणींची सुबत्ता असूनहि बिशपला तें अन्न रुचलें नाहीं. एल पॅसो डेल नॉर्तहून आणविलेलें मद्य मात्र बरेंच चांगलें होतें.

जेवतांना मार्तिनेझनें बिशपला सरळ सरळ विचारलें कीं " धर्मगुरूंच्या पेशाला ब्रह्मचर्य आवश्यकच आहे काय ? "

फादर लतूरनें उत्तर दिलें, " हा प्रश्न अनेक शतकांमागेंच सोडविण्यांत आला असून त्याचा कायमचा निर्णय लागलेला आहे."

मार्तिनेझ आवेशपूर्वक म्हणाला, " कायमचा निर्णय कशाचाहि लागलेला नाहीं आणि कधीं लागत नाही. फ्रेंच धर्मगुरूंच्या दृष्टीनें ब्रह्मचर्य उत्तम असेल परंतु आमच्या दृष्टीनें नाहीं. सेंट ऑगस्टाइननेंच म्हटलें आहे कीं निसर्गाविरुद्ध न जाणें बरें. त्याच्या वृद्ध वयांत त्याला त्याच्या ब्रह्मचर्यपालनाचा पश्चात्ताप होत असे असा किती तरी पुरावा मला उपलब्ध होतो आहे."

तो पुरावा जाणून घेण्याची इच्छा बिशपनें व्यक्त केली. आपल्याला सेंट ऑगस्टाइनच्या साहित्याचा परिचय तसा बऱ्यापैकीं आहेच, असेंहि तो म्हणाला.

मार्तिनेझ म्हणाला, " कुठें तरी मी माझ्या म्हणण्याला दुजोरा देणारे सारे उतारे उतरवून ठेवले आहेत. तुम्ही आहांत तोंवरच ते काढेन मी हुडकून. बहुधा सीलबंद मनानेंच तुम्ही ते वाचलेले असणार. ब्रह्मचारी धर्मगुरूंच्या बुद्धीला एक मांद्यच येतें. स्वतः थोडें तरी अधःपतित झाल्याविना कोणाहि धर्मगुरूला अधःपाताची, त्यांविषयींच्या उपरतीची, आणि क्षमेची खरी कल्पना येणें अशक्य. त्यांतल्या त्यांत लैंगिक वासना हा सर्वांत मोठा आणि एक सर्वसामान्य मोह असल्याने धर्मगुरूचा परिचय त्याच्याशीं असलाच पाहिजे. केवळ उपवास आणि प्रार्थनेनें आत्मा लीन होणें अशक्य. पाप करून त्याला मऊ आणलें पाहिजे. उपरतीचा, क्षमेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला पाहिजे. एरवीं धर्म म्हणजे एक कुचकामाचे तर्कशास्त्र होऊन बसेल.

बिशप शांतपणें म्हणाला, " हा विषय असा आहे कीं यावर आपण नंतर आणि विस्तारानें बोलावे हे बरे. माझ्या अखत्यारांतल्या टापूंत तरी मी असल्या संवयी लौकरांत लौकर बंद करणार आहे. धर्माच्या नावानें धर्मगुरू बनलेल्या प्रत्येक माणसानें, घेतलेली प्रतिज्ञा सक्तपणें पाळलीच पाहिजे. थोड्याच काळात हें शक्य होईलसें वाटतें. "

पॅड्रे मार्तिनेझ मोठ्यादा हंसला खाद्यावर चढलेलें शुभ्र मांजर त्यानें लांब भिरकावून दिले. तो म्हणाला, " तुम्हांला हें काम पुष्कळ पुरेल, बिशप. इथें निसर्गापुढे कुणाचे लाड चालत नाहींत. आणि कांहीं असलें तरी आमचे स्थानिक धर्मगुरू तुमच्या फ्रेंच जेसुइटांहून कितीतरी अधिक धर्मनिष्ठ असतात. इथें आमच्याकडे युरोपीय धर्मपंथाचे केवळ एक वाढलेलें बांडगूळ अस्तित्वांत नसून रसरशीत धर्मनिष्ठा पसरली आहे. या मातींतून आमचा धर्म वाढला असून त्याला येथेंच स्वतंत्र पक्कीं पाळेंमुळें आहेत येणाऱ्या परकी धर्मगुरूंचें आम्ही हार्दिक स्वागतच करतो; परंतु रोमचा अधिकार इथें काडीचाहि नाहीं. आम्हांला कोणाची प्रचारकी मदत नको आहे. बाहेरच्या ढवळाढवळीची आम्हाला चाड आहे. फ्रान्सिस्कन फादर्सनीं इथे रुजवलेली धार्मिकता केव्हांच खुरटून मरून गेली. ही त्यानंतरची सुगी आहे आणि ही इथली अस्सल आहे. जगांत आमचेच लोक सर्वांत श्रद्धाळू आहेत युरोपीय फॅडें इथें आणून त्यांच्या श्रद्धेला सुरुंग मात्र लावाल; सारे पाखंडी आणि केवळ पापाचरणी होऊन बसतील. "

या वक्तव्यावर बिशपनें मृदुपणें उलट सांगितलें कीं, कुणापासून त्याचा धर्म हिरावण्याकरता तो या भागांत आलेला नव्हता. परंतु आपली जीवनपद्धति न

सुधारणाऱ्या कांहीं धर्मगुरूंकडून त्यांचीं धर्मपीठें काढून घेणें मात्र त्याला भाग पडलें असतें.

मार्तिनेझनें मद्याचा चषक भरून घेतला. हंसतच तो उद्गारला, "माझें धर्मपीठ तरी तुम्ही माझ्याकडून हिरावून घेऊं शकत नाहीं, बिशप. पहा हवा तर प्रयत्न करून! मी माझें वेगळें धर्मपीठ तयार करीन. तुम्ही ताओसला फ्रेंच धर्मगुरू ठेवाल, लोक माझ्यामागें येतील!"

इतकें म्हणून मेजापासून उठून पॅड्रे शेकोटीशीं जाऊन पाठ शेकीत उभा राहिला.. झगा त्यानें छातीपर्यंत वर ओढून घेतला होता. तो वर छपराकडे पहात पुढें म्हणाला, "तुम्ही तरुण आहांत बिशप. इंडियन्स किंवा मेक्सिकन्स-बद्दल तुम्हांला कांहीं कल्पना नाहीं. इथें तुमची युरोपीय संस्कृति रुजवूं पहाल, इथलें मूळचें सारें बदलूं पहाल, इंडियनांचे गुप्त नाच बंद कराल, पेनिटेंटेमचे रक्तलांछित विधि थांबवाल तर तुमचें मरण फार लांब नाहीं हे भविष्य मी आतांच वर्तवून ठेवतों. तुमच्या सुधारणा हातीं घेण्याआधीं जरा तुम्ही इथल्या स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करावा अशी माझी तुम्हांला सूचना आहे. फ्रेंच गृहस्था, तूं दोन रानवट जमातींत रहातो आहेस, एवढेंच मी म्हणेन. तुमच्या धर्मानें निषिद्ध मानलेल्या अनेक भयंकर गोष्टी इंडियन धर्माचा एक महत्त्वाचा भाग आहेत. फ्रेंच फॅशन्स इथें कामाच्या नाहींत."

या क्षणीं त्रिनिदाद न बोलतां उठला आणि बिशपला एकदां वांकून प्रणाम करून धांवत्या चोरपावलांनीं स्वैपाकघराकडे निघून गेला. दारावाटे त्याचा करडा झगा दिसेनासा झाला तसा फादर लतूर तडफेनें त्याच्या यजमानाकडे वळला.

म्हणाला, "मार्तिनेझ, एका तरुण माणसापुढें, विशेषतः धर्माध्ययन करणाऱ्या तरुणापुढें ही तुमची भाषा साजली नाहीं. शिवाय, त्याच्या वकूबाच्या माणसाला तुम्ही धर्मगुरू करण्याचा का अट्टाहास करतां तेंही मला समजूं शकत नाहीं.. माझ्या अखत्यारांत तरी मी त्याला प्रवचनाला उभा राहूं देणार नाहीं."

मार्तिनेझ हंसला. हंसतांना त्याचे लांब, मोठे, पिवळे दांत बाहेर दिसले. हंसणें त्याला बरें दिसलें नाहीं. तो म्हणाला, "त्रिनिदाद ना, त्याच्या म्हाताऱ्या काकाच्या जागीं पुढें आरोयो होंडोला 'क्युरेट' म्हणून जाणार. त्याचा काका आतां फारच वयस्क झाला आहे. हा त्रिनिदाद तसा फार धर्मनिष्ठ आहे. त्याला तुम्ही 'पॅशन वुईक' मध्यें पहायला हवा. अबिक्युयुला गेला कीं पार बदलतो तो. उंचांत उंच डोंगरावर सर्वांत जड क्रूस वाहून नेतो. कुणाहिपेक्षां अधिक छळ सहन करतो. परत येतो तो 'कॅक्टस' चे इतके कांटे पाठींत रुतवून घेऊन कीं

इथल्या पोरींना कोंबडीचें पोर कसें सोलावें तसा त्याला सोलून काढावा लागतो."

फादर लतूर थकला होता. जेवण होतांच लौकरच तो आपल्यां खोलींत दाखल झाला. पलंग त्याला स्वच्छ आणि मोठा आरामशीर वाटला परंतु भोंवतालच्या वातावरणाबद्दल तो साशंक झाला. या घरातलेंच एकंदर वातावरण त्याला आवडलें नव्हतें. बिछान्यावर पडल्यावर बराच काळ त्याला कांहीं अंतरावरून येणाऱ्या भांडीं धुण्याच्या आवाजांनीं आणि खिदळत्या मुलींच्या आवाजांनीं जाग होती. तें थाबलें तेव्हां नजीकच्या कोणत्या तरी खोलींतून मार्तिनेझचें घोरणें ऐकूं येऊं लागलें. बहुधा त्याच्या खोलीचा दरवाजा त्यानें उघडा ठेवलेला असावा, एरवीं त्याचें घोरणें एवढें स्वच्छ ऐकूं आलें नसतें. एखाद्या संतप्त पोळासारखा पॅड्रे घोरत होता. अखेर बिशपनेंच स्वतः उठून त्याच्या त्या खोलीचा दरवाजा शोधून बंद करून घेण्याचें ठरविलें. त्यानें उठून कंदिल पेटवला, स्वतःच्या खोलीचा दरवाजा अर्धवट निश्चयानेंच उघडला. खोलींत वाऱ्याचा झोत शिरला. भिंतीकडून जमिनीवरून एक छोटी, दाट छाया झपाट्यानें सरकून गेली. कदाचित उंदीर-बिंदीर असेल. पण छे. स्त्रीच्या केसाची ती गुंतवळ होती. कोपऱ्यांत पडलेली होती. या खोलींत कोणी सौंदर्यप्रसाधन केलें असावें असें बिशपच्या मनीं आलें. या शोधानें तो मनस्वी बेचैन होऊन गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अकरा वाजता 'हाय मास' होती. स्थानिक धर्मगुरु ती चालविणार होता आणि 'एपिस्कोपल' आसन बिशप शोभविणार होता. ताओसच्या चर्चच्या दर्शनानें त्याला फार समाधान झालें होतें. इमारत अत्यंत नीटनेटकी, स्वच्छ आणि उत्तम निगेंत ठेवलेली होती. माणसें बरींच जमलीं होतीं आणि सारीं भक्तिपूर्वक बसलीं होतीं. पूजास्थानाच्या सेवेंतलीं मुलें उत्तम पोषाकांत होतीं. फादर मार्तिनेझनें प्रार्थना म्हटली ती फारच परिणामकारकपणें. त्याचा आवाज चागला रुंद आणि सुरेख होता. आणि कोणत्या तरी उचंबळत्या आवेगानें जणूं तो उमटत होता. साऱ्या 'मास' मध्यें कोणत्याहि तपशिलाला फाटा देण्यांत आला नव्हता आणि त्याची उपेक्षाहि झालेली नव्हती. प्रत्येक गोष्ट एका हिशेबानें, मनःपूर्वकतेनें केली जात होती. 'एलेव्हेशन' च्या वेळीं मार्तिनेझ जणूं आपलें वजनदार सर्वस्व एकवटून त्या पातळीप्रत पोंचला होता. योग्य मार्गदर्शन होत रहातें तर हा मेक्सिकन धर्मगुरु फार मोठें महत्त्व पावला असता असें बिशप लतूरच्या मनांत येऊन गेलें. या माणसाकडे अत्यंत आबदार व्यक्तिमत्व, एक बेचैन करणारी, रहस्यमय आकर्षण-शक्ति होती. असा बिशपचा एकुण ग्रह झाला.

'कन्फर्मेशन'च्या विधीनंतर फादर मार्तिनेझनें घोडे आणवून बिशपला आपला जमीनजुमला आणि पाळीव जनावरें पहायला नेलें. फिरवीत फिरवीत त्यानें ताओस आणि इंडियन वसती, या दरम्यानच्या, फांशी दिलेल्या सात इंडियनांच्या मालकीच्या जमिनींपावेतों आणलें. पुढें वाटचाल करतां करतां बेफिकीरपणेंच मार्तिनेझनें बेण्ट–कत्तलीचा उल्लेख केला. ताओसहून ज्याचा आरंभ नाहीं अशी एकहि दंगल कधीं या न्यु मेक्सिकोंत झालेली नाहीं अशी बढाई त्यानें बिशपकडे मारली.

इंडियन वसतीच्या जरा पश्चिमेस ते दोघे सूर्यास्ताच्या वेळीं थांबले. बिशपनें पाहिलेल्या अनेक इंडियन वसत्यापेक्षां ही वसती वेगळी होती. पिरॅमिडच्या आकाराच्या दोन मोठ्या सार्वजनिक इमारती मावळत्या सोनेरी सूर्यप्रकाशांत चमचमत होत्या. मागें नजीकच तपकिरी डोंगर खडा होता. या घरांच्या पायऱ्यावजा उंचवटयांवर छतांवर पांढऱ्या पोशाखांतली सोनेरी माणसे पुतळ्यांसारखी उभी होती. डोंगर-भागांतली मावळतीची शोभा तीं पहात होती. सर्वभर एक धार्मिक निःस्तब्धता पसरली होती. आवाज होता तो केवळ सोनेरी धुरळ्यांतून कानी येणारा बकऱ्यांच्या बेंबटण्याचा.

या दोन इमारती, पॅड्रेच्या सांगीनुसार, गेल्या सुमारें हजार तरी वर्षांपासून या लोकांनीं गजबजलेल्या होत्या. कोरॅनडोच्या लोकांना हे लोक इथें प्रथम आढळले होते आणि त्यांचें वर्णन त्यांनीं देखणे, वजनदार, हरणाच्या कातड्याचे कोट आणि युरोपियनासारख्या तुमानी पेहेनलेले उजळ्या कुळीचे इंडियन्स असें करून ठेवलेले होतें.

डोंगरावर झाडेंझुडपें असूनही, त्याच्या रेषा इतक्या ठसठशीत होत्या कीं त्याला उघड्यावाघड्या डोंगराचा नितळपणा आला होता. त्याच्या कुशींना मुबलक हिरवळ होती परंतु इतर भागांत 'ॲस्पेन' चीं झाडें होतीं. त्यामुळें प्रत्येक उताराला फिका हिरवा रंग चढला होता. पुरातन धर्मविधींचें हा डोंगर म्हणजे पीठच ठरला होता. फारच गडबड गोंधळ नसलेलें इंडियन जीवन त्यावर वाढत होतें. अनेक इंडियन रहस्यें त्यानें शतकानुशतकें पोटीं वागविलीं होतीं. पॅड्रे मार्तिनेझनें हें बिशपला सांगितलें.

"आणि तिथें कुठें तरी ते लोक पोपचा 'एस्तुफा' ठेवतात. परंतु कोणाही गौरवर्णी माणसाला तो दिसणें शक्य नाहीं. १६८० च्या उठावाची आंखणी करीत असतां पोपनें चार वर्षें स्वतःला कोंडून घेऊन सूर्यप्रकाशाचेंहि दर्शन घेतलें नव्हतें तिथला तो 'एस्तुफा'. मला वाटतें, बिशप लतूर, आपल्याला या उठावाची माहिती असेलच ?"

"तशी थोडीशी 'मार्टिरॉलॉजी' वरून झालेली आहे. परंतु हा उठाव ताओसपासून उत्स्फूर्त झाला हें मला माहीत नव्हतें."

"आत्तांच म्हटलें ना मी तुम्हांला कीं या न्यु मेक्सिको भागांतल्या साऱ्या चळवळी मुळांत ताओसपासून सुरू झाल्या?" पॅड्रे प्रौढीच्या सुरांत म्हणाला. "पोप सान वान इंडियन म्हणून जन्माला आला परंतु नेपोलियन कॉर्सिकन होता. पोपचें सारें कार्य चाले तें ताओसमधून."

पॅड्रे मार्तिनेझला अलिखित इतिहास असलेल्या त्याच्या प्रदेशाची चांगली माहिती दिसत होती. १६८० च्या मोठ्या इंडियन बंडाळीचा त्यानें ऐकलेला वृत्तांत त्यानें बिशपला ऐकवला. 'नव्या जगात' ल्या मार्टिरॉलॉजी'मध्यें या बंडाळीनें एका मोठ्या प्रकरणाची भर टाकली होती. या बंडाळींत साऱ्या स्पॅनिअर्डस्‌चें शिरकाण उडून एल पासो डेल नॉर्तच्या उत्तरेकडे एक युरोपीय माणूस जिवंत उरला नव्हता.

त्या रात्रीं, भोजनानंतर, यजमान तपकिरीच्या चिमट्या नाकांत भरीत बसला असता फादर लतूरनें त्याला त्याच्याच आयुष्यविषयीं अनेक प्रश्न विचारून बरीच माहिती जाणून घेतली.

ताओसच्या पश्चिमेकडल्या, शेंडा छाटलेल्या पिरॅमिडच्या आकाराच्या एकुलत्या एका निळसर डोंगराच्या छायेखालीं अबिक्युमध्यें मार्तिनेस जन्मला होता. या भागातली ती सर्वांत जुनी मेक्सिकन वसाहत. तिच्याभोंवतीं डोंगरदऱ्यांचें असे कडे पडलें होतें कीं इतर जगापासून दीर्घ कालपर्यंत ती अलगत पडलेली होती. या एकाकीपणामुळें, तिथले रहिवासी माथ्याचें गरम, धार्मिक बाबतींत कर्मठ आणि एकांतिक झालेले होते. ते 'पॅशन वुईक' साजरा करीत ते क्रूस वाहून नेण्याचा आणि रक्त फुटेपर्यंत फटके खाण्याच्या विधींनीं.

आंतोनिया योज मार्तिनेझ तिथें लहानाचा मोठा झाला होता. लिहिण्या-वाचण्याला त्याला कोणी शिकवलें नव्हते, विसाव्या वर्षी त्याचें लग्न करून देण्यांत आलें होतें. तेविसाव्या वर्षी मूल आणि पत्नी अशा दोहोंचा वियोग त्याला झाला होता. लग्नानंतर तो स्थानिक चर्चच्या धर्मगुरूकडून वाचायला शिकला होता. आणि विधुरावस्था आल्यावर त्यानें धर्माध्ययन करण्याचें ठरवलें. आपले कपडे आणि जवळची चीजवस्त विकून आलेले थोडेसे पैसे घेऊन तो घोड्यावरून जुन्या मेक्सिकोतल्या ड्युरँगो गांवीं निघाला. तेथल्या 'सेमिनरी' मध्यें दाखल होऊन परिश्रमपूर्वक त्यानें अध्ययनाला सुरवात केली.

तारुण्य प्राप्त होईपर्यंत निरक्षर राहिलेल्या त्या माणसाला अत्यंत अवघड विद्याध्ययन करण्याला किती सायास पडले असतील याची कल्पना बिशपला येत

होती. मार्तिनेझ त्याला केवळ ' चर्च फादर्स ' मध्येंच नव्हे तर जुन्या लॅटिन आणि स्पॅनिश वाङ्मयांतहि व्यासंगी वाटला. सेमिनरीमध्यें सहा वर्षें काढून मार्तिनेझ त्याच्या जन्मग्रामीं, अबिक्युयुमध्ये तेथल्या चर्चचा धर्मगुरू म्हणून परत आला होता त्या पुरातन गांवावर त्याचें भारी प्रेम होतें. ताओसमध्यें असल्यापासून--म्हणजे जवळ जवळ निम्म्या हयातींत--मधून मधून तो न चुकतां त्याच्या जन्मग्रामीं जाऊन येई तिथल्या पिवळ्या मातींत जणूं त्याला नवजीवन प्राप्त होई. निसर्गतःच त्याच्यांत अमेरिकनाविषयीं एक द्वेष वसत होता. अमेरिकेचा अखत्यार म्हणजे आपल्यासारख्या माणसांच्या सद्दीचा अंत असें त्याला वाटत होतें जुन्या पठडींतला तो माणूस होता, अबिक्युयुचा पुत्र होता आणि त्याची सद्दी संपलेली होती.

ताओसमधून निघाल्यावर, मार्ग तात्पुरता सोडून बिशप किट कार्सनच्या भेटीला गेला. कार्सन स्वतः मेंढ्यांच्या खरेदीकरतां कुठें गेलेला होता हें त्याला माहीत होतें. परंतु फादरला त्याच्या पत्नीची गांठ घेण्याची इच्छा होती. गरीब बिचाऱ्या मॅग्डलेनाला दाखविलेल्या दयेबद्दल सिनोरा कार्सनकडे त्याला कृतज्ञता व्यक्त करायची होती; मॅग्डलेनाचें आयुष्य साता फेच्या सिस्टर्सबरोबर आतां सुखाचें चाललें होतें हेहि सिनोराच्या कानीं त्याला घालायचें होतें

सिनोरानें त्याचें स्वागत कोणत्याहि मेक्सिकन कुटुंबांतल्या मुग्ध परंतु अस्सल आगतस्वागताच्या पद्धतीनें केले ती उंच कुडांची आणि सडसडीत बांध्याची होती. तिचे खांदे पडलेले असत. डोळे आणि केस तुकतुकीत श्यामवर्ण होते. तिला वाचतां येत नव्हतें तरी तिची मुद्रा आणि संभाषण यांत चतुराई दिसे. बिशपला ती देखणी वाटली. शिस्तशीर जीवन जगलेल्या माणसाचें तेज तिच्या व्यक्तिमत्त्वांत बिशपला जाणवलें. तिची वृत्ति उमदी आणि विनोदप्रिय होती. तिच्याशीं विश्वासानें कांहीं खाजगी बोलणें कठीण गेलें नसतें. पॅड्रे मार्तिनेझच्या निवासस्थानीं बिशपचा मुक्काम मोठा सुखाचा झाला असेल असें ती म्हणाली तेव्हां तो सुखाचा झाला नसेल हेंच तिला सुचवायचें होतें. आणि बिशपनें त्रिनिदाद ल्युसेरोच्या तेथल्या उपस्थितीनें अस्वस्थ होतों हें कबूल करतांच सिनोरा किंचित् हंसली.

खांदे किंचित उडवून ती म्हणाली " कुणी म्हणतात, तो फादर ल्युसेरोचा मुलगा आहे म्हणून. पण मला तसे वाटत नाही. मला तर वाटतें फादर मार्तिनेझचाच तो अनेकांपैकीं एक मुलगा असावा. गतवर्षीच्या ' पॅशन वुइक ' मध्यें

अबिक्युयुमध्यें त्याच्या बाबतींत घडलें होतें तें तुम्ही ऐकलें आहे की नाहीं? 'सॅव्हिअर' सारखें बनण्याचा प्रयत्न त्यानें केला आणि स्वतःला क्रूसावर चढवून घेतलें. नव्हे नव्हे, खिळ्यांनीं नव्हे, दोऱ्या बांधून लटकवून घेतलें होतें त्यानें स्वतःला तिथें! रात्रभर तो तसा रहाणार होता. अबिक्युयुमध्यें कोणी कोणी असें करतात. तें गांवच अगदीं जुन्या पद्धतीचें आणि अडाणी आहे. पण हा त्रिनिदाद अंगानें एवढा जाड कीं कांहीं तास तसें लटकल्यावर त्याच्यासकट क्रूस उखडून पडला आणि त्याचें मोठेंच हंसें झाले. मग त्यानें स्वतःला एका खांबाला बांधून घेतलें. आणि म्हणाला, 'सॅव्हिअर' नें झेलले तितके म्हणजे असूडाचे सहा हजार फटके मी झेलीन. परंतु शंभर पुरे होतात तों तो मूर्च्छित पडला. कॅक्टसच्या आसूडानें त्यांनीं त्याला झोडपलें होतें आणि त्याच्या पाठींत कांट्यांचें इतकें विष गेलें होतें कीं पुढें कित्येक दिवस तो बिछान्यांत होता. यंदा त्यांनीं त्याला आधींच कळवलें होतें कीं यंदाच्या 'होली वुईक' मध्यें त्यानें अबिक्युयुमध्यें येण्याची जरूर नाहीं आणि म्हणून तो इकडे आला होता. इथें त्याचें भारीच हंसें झालें."

हा सारा खुळेपणा आपण थांबवूं शकूं काय, याबाबत बिशपनें सिनोराचें स्पष्ट मत विचारलें त्यावर ती स्मितपूर्वक म्हणाली, "माझ्या यजमानांना मी नेहमीं म्हणतें कीं बिशपनीं असलें काहीं करूं नये. त्यानें इथले लोक तुमच्याविरुद्ध फिरतील. जुनाट माणसांना त्यांच्या जुनाट रूढींचीहि जरूर असते. तरुण पिढी कालमानानें बदलेल."

बिशप निरोप घेत असतां सिनोरानें त्याच्या पिशवींत मॅग्डलेनाकरतां केलेला भरतकामाचा एक सुंदर नमुना भरला. म्हणाली स्वतःकरतां ती याचा उपयोग करायची नाहीं हें मला माहीत आहे. पण निदान इतर कुणा सिस्टरला तरी हा आनंदानें देईल. त्या नीच माणसानें तिला कांहींहि ठेवलेलें नाहीं. तो फांसावर गेला तेव्हां एक खेचर आणि बंदूक यापलिकडे मागें कांहीं उरलें नव्हतें. तेवढ्याकरतांच तर तो दोन घोड्यांच्या अमीषानें दोन धर्मगुरूंना ठार करण्याला तयार झाला होता. अर्थात् यांत धर्मविषयक द्वेषाचा भागहि असेल, कोण जाणें. मॅग्डालेना म्हणे, मोराच्या धर्मगुरूला अनेकवार त्यानें ठार मारण्याची धमकी दिलेली होती."

सँता फेला फादर व्हेलंट आपली वाटच पहात असल्याचें बिशपला आढळलें. ईस्टरपासून दोघांची भेट नव्हती आणि बऱ्याच गोष्टींवर विचारविनीमय होणें

आवश्यक होतें. बिशपच्या कारकीर्दीतला जोम आणि जिद्द रोमपर्यंत पोंचली होती आणि नुक्ताच रोमचे प्रचारप्रमुख कार्डिनल फ्रान्सोनि यांचा एक खलिता बिशपला आला होता. त्यांत ' सांता फे 'च्या ' व्हिकरेट 'ला औपचारिकपणें ' डायकोज 'चा दर्जा देण्यांत आला असल्याचें त्यांनीं कळवलें होतें. त्याच टपालानें कार्डिनलकडून एक निमंत्रणही आलें होतें. पुढल्या वर्षी ' व्हॅटिकन 'मध्ये कांहीं महत्त्वाचीं बोलणीं व्हावयाचीं होती. त्यासाठीं हें आवर्जून निमंत्रण होतें. याबाबतींत बिशप आणि त्याच्या व्हिकर-जनरलच्या दरम्यान चर्चा होणार होतीच, परंतु फादर जोसेफ मुद्दाम यावेळीं अल्बुकर्कहून आला होता तो ताओसमध्यें बिशपचें स्वागत कसें काय झालें तें जाणून घेण्याकरतां.

दोन मेणबत्त्यांच्या प्रकाशांत त्याच्या अभ्यासिकेंत आरामांत विराजमान झाल्यावर त्यांनीं खूप गोष्टी केल्या

फादर ल्तूर म्हणाला, " सध्या तरी ताओसमधल्या विचित्र परिस्थिती-बाबत कांही हालचाल न करण्याचा निर्णय मी घेतला आहे. आणखी कांहीं ढवळाढवळ करणें सूज्ञपणाचें ठरणार नाहीं. तिथलें चर्च समर्थ आहे. माणसें धर्मनिष्ठ आहेत. धर्मगुरूचें वर्तन कसेंहि असो, त्यानें तेथली संघटना मोठी बळकट बांधलीं असून लोकाना त्याच्याबद्दल फार मोठी निष्ठा आहे. "

" पण तो शिस्तपालन करूं शकेल असे तुम्हांला वाटतें काय ? "

" शिस्तपालनाचा सवालच येत नाहीं ! आज तरी कांहीं प्रश्न निर्माण झाल्यास फ्रेंच बिशपविरुद्ध लोक त्यालाच पाठिंबा देतील. सध्यां म्हणूनच मी त्या बाबतींत डोळ्यावर झांपडें चढवून रहाणार आहे. "

परंतु फादर जोसेफ कळवळून म्हणाला, "परंतु जीं, त्या माणसाची वर्तणूक उघड उघड चर्चेचा विषय झालेली आहे. जावें तिथें त्याबाबत ऐकावें लागतें. कांहीं दिवसामागेंच एका गरीब मेक्सिकन मुलीची हकिकत मला सांगण्यांत आली. कॉस्टेला खोऱ्यांतल्या इंडियनांच्या हल्ल्यांत या मुलीला पळवून नेण्यांत आली. तेव्हां ती जेमतेम आठ वर्षांची होती ती सापडली आणि कांहीं मोबदला देऊन परत मिळवण्यात आली तेव्हा तिला पधरावें वर्ष लागलेलें होतें. या साऱ्या काळांत अनेक चमत्कारांच्या आधारें या धर्मनिष्ठ मुलीनें आपलें कौमार्य संरक्षिलें होतें. ' अवर लेडी ऑफ ग्वाडाल्युप 'ची मुद्रा तिनें गळ्यांत बांधलेली होती आणि तिला शिकवण्यांत आलेल्या प्रार्थना ती म्हणे. अनेकदां तिच्यावर बलात्काराचे प्रयत्न झाले, परंतु दर वेळीं कांहीं अनपेक्षित घडून तो प्रसंग टळे. पुढें ती सांपडली आणि आरोयो होंडोच्या तिच्या नातलगांकडे तिला

पाठवण्यांत आलें तेव्हां तिनें आपल्याला चर्चच्या सेवेंतच रहायचें असल्याची इच्छा व्यक्त केली. या मार्तिनेझनें तिला नासवली आणि त्याच्या पदरच्या एका नोकराशीं त्यानें तिचें लग्न लावून दिलें. त्याच्या एका शेतावर ती हल्लीं असते."

बिशप खादे उडवून म्हणाला, "हो, क्रिस्तोबलनें मला ही हकिकत सांगितली होती. परंतु यानंतर फार काळ डॉन वॉनची भूमिका वठवणें मार्तिनेझला शक्य नाहीं. कारण तो आतां म्हातारा झाला आहे. या धर्मगुरूला शासन करण्याच्या इरेला पडून ताओसचें चर्च गमवण्याची माझी इच्छा नाहीं, मित्रा. मार्तिनेझच्या जागीं नेमावा असा समर्थ धर्मगुरू माझ्यापाशीं आज नाहीं. तूं होतास परतु तूं आहेस अल्बुकर्कला. आजपासून वर्षभरानें मी रोममध्यें असेन आणि तिथे मला वाटतें, ताओसला मार्तिनेझच्या जागीं काम करूं शकेल असा एकादा स्पॅनिश धर्मगुरू मला उपलब्ध होऊं शकेल. तिथले लोक खपवून घेतील तर एकादा स्पॅनिअर्डच."

फादर जोसेफ विचारांतीं म्हणाला, "तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. मी बरेचदां निर्णय घेण्यात घाई करतो. तुम्ही युरापमध्यें असाल तेव्हां तुमची परंपरा इथें मी कशी चालवणार कोण जाणे. कारण मला वाटतें तुम्ही इथून जाल तेव्हा अल्बुकर्क सोडून मला इथे येऊन काम पहावें लागेल?"

"अर्थात्. अल्बुकर्क कांहीं दिवस सोडण्यानेंच तिथल्या लोकांना तूं अधिक आवडूं लागशील. परत येताना माझ्याबरोबर आपल्या 'सेमिनरीं' पैकीं कांहीं खंदा माणसे आणण्याचा माझा विचार आहे. तसे झालें तर अल्बुकर्कला त्यांतला एक मी ठेवीन. फार दिवस तूं तिथें काढलेस. आवश्यक तें सारें केलेंस. आतां मला तुझी इथें जरूर लागेल. आतांच्या स्थितींत, चर्चेचा मुद्दा उपस्थित झाला कीं कोणा तरी एकाला सत्तर मैल तुडवून जावें लागतें."

फादर व्हेलंट उसासला. म्हणाला, "मला वाटलेंच होतें असें होणार तें. सँडस्कीहून तुम्ही मला ओढून घेतलेंत तसें आतां अल्बुकर्कहून घेणार. तिथें प्रथम गेलों तेव्हा एकजात सारे माझे शत्रु होते. आतां प्रत्येकजण माझा मित्र बनला आहे. म्हणजे झालीच माझी तें चर्च सोडून येण्याची वेळ!" त्यानें चष्मा काढून मिटला, त्याच्या थैलींत ठेवला. हें त्यानें केलें कीं बोलणें त्याच्या दृष्टीनें संपल्याचा त्याचा निर्धार व्यक्त होई. "हूं, तर वर्षभरानें तुम्ही रोमला जाणार. खरें सांगायचें तर मी अल्बुकर्कमध्यें रहातो तर बरें झालें असते. परंतु क्लेरमॉंट...मला यावेळीं तुझा हेवा वाटतो, जीं, मला माझ्या जन्मभूमीचा तो भाग पुन्हां पहाणें आवडलें असतें. निदान, जाशील तेव्हां माझ्या सर्व कुटुंबियांना

भेट आणि त्यांचे निरोप माझ्याकरतां घेऊन ये. आणि गेलीं तीन वर्षें माझी ताई फिलोमेन आणि तिच्या जोगिणी माझ्याकरतां तयार करताहेत तीं माझीं धर्मगुरूचीं महावस्त्रेंही येतांना घेऊन ये. मी त्यांची वाट पाहीन." फादर जोसेफ उठला. एक मेणबत्ती घेऊन निघाला. "आणि क्लेरमाँटहून निघशील तेव्हां जीं, माझ्याकरतां खिशातून थोडीं चेस्टनट्स् घेऊन ये!"

.२.

फेब्रुआरीमध्यें बिशप लतूर पुन्हा एकवार सांता फेहून प्रवासाला निघाला. या खेपेस त्याचें उद्दिष्ट होतें रोम. जवळ जवळ वर्षभर तो त्याच्या अखत्यारातल्या टापूंत या निमित्तानें अनुपस्थित राहिला आणि परत आला तेव्हां त्यानें बरोबर चार जवान धर्मगुरू आणले होते. हे होते माँटफेरँडच्या त्याच्या स्वतःच्या 'सेमिनरी'तले. त्याशिवाय फादर तालाद्रिद नावाचा स्पॅनिश धर्मगुरूही त्याच्या-समवेत आला होता. बिशपला हा रोममध्ये भेटला. त्याला तात्काळ ताओसकडे धाडण्यांत आलें, बिशपच्या सूचनेवरून पेड्रे मार्तिनेझनें औपचारिकपणें आपल्या पदाचा राजीनामा दिला—एका अटीवर, कीं महत्त्वाच्या प्रसंगीं प्रार्थना त्यानेंच चालवावी. इतकेंच नव्हे तर लग्नें लावणें, दफनविधी उरकणें, 'पॅरिश'मधल्या माणसांच्या वागण्यावर देखरेख ठेवणें हीं कामें तोच करीत राहिला. लौकरच फादर तालाद्रिद आणि तो यांच्यात मोठा संघर्ष पेटला.

हा संघर्ष सहन करणें वा मिटवणें अशक्य आहे असें दिसतांच बिशपनें नव्या धर्मगुरूला पाठिंबा देणें चालू केलें आणि फादर मार्तिनेझ आणि त्याचा मित्र आरोयो होंडोचा धर्मगुरु फादर ल्युसेरो यांनीं उघड बंड पुकारलें. त्यांनीं आपलें स्वतंत्र चर्च उभारलें. आणि असें जाहीर केलें कीं हेंच मेक्सिकोचे जुनें पवित्र कॅथॉलिक चर्च असून बिशपचें चर्च ही अमेरिकन संस्था आहे. दोन्ही गांवीं बहुसंख्य जनता नव्या चर्चकडे वळली आणि त्यांतल्या त्यांत कोणी भाविक होते ते मेक्सिकन्स मात्र एका मानसिक गोंधळांत दोन्ही चर्चेसमधल्या धर्मविधींना उपस्थित रहात राहिले. फादर मार्तिनेझनें एक लांबलचक, आवेशपूर्ण जाहीरनामा छापला आणि (फार थोड्यांना तो वाचतां येणार होता हें उमजूनही) त्याच्या कृत्याचें मण्डन त्यानें त्यांत केलें होतें. धर्मगुरुला ब्रह्मचर्य आवश्यक असतें

या गोष्टीचें त्याच्या पद्धतीनें त्यानें खण्डन केलें होतें. तसें म्हटलें तर मार्तिनेझ स्वतः आणि फादर ल्युसेरो हे दोघेही वयस्क झाले असल्यानें या युक्तिवादानें फायदा होणार होता तो फक्त तरुण त्रिनिदादचा. नवें चर्च स्थापिल्यावर प्रथम दोघां म्हाताऱ्यांनीं कांहीं केलें असेल तर तें हें कीं, फादर ल्युसेरोला धर्मगुरु-पदापर्यंत बढती दिली. त्या दोघांचा 'क्युरेट' म्हणून तो काम पाहूं लागला, ताओस आणि आरोयो हॉंडो यांच्या दरम्यान हेलपाटे घालूं लागला.

या नव्या उपक्रमानें एक साधलें. त्याच्या सूत्रचालकपदावरच्या दोघां म्हाताऱ्यांत एक नवचैतन्य संचारलें आणि लोकांनाही त्यांच्या रूपानें चर्चेला नवा विषय सांपडला. परंतु तसें म्हटलें तर नेहमींच ते लोकांना चर्चेला एकेक विषय पुरवीत आलेले होते. जवळजवळच्या 'पॅरिशेस' मध्यें काम करीत असतांना ऐन तारुण्यात प्रसंगानुसार ते एकमेकांचे मित्र, सोंगडी प्रतिस्पर्धि आणि क्वचित हाडवैरी बनले होते. परंतु भांडूनहि ते फार काळ एकमेका-पासून अलग रहात नसत.

तसें म्हटलें तर म्हाताऱ्या फादर मारिनो ल्युसेरोमध्यें मार्तिनेझशीं जुळणारें अधिकारलालसेपलीकडे दुसरें एकही स्वभाववैशिष्ट्य नव्हतें. तरुण वयापासून तो पैशानें गबर मानला जात असूनही वृत्तीनें कद्रू होता. आत्यंतिक दारिद्र्यांत तो आरोयो हॉंडोंत जगला. आपलें घर खेंचराच्या पागेहून वाईट आहे याची तो प्रौढी मिरवी. त्याचें खाटलें, क्रूस, आणि एक भांडें हें त्याचें सामान. एक दीनवाणें खेंचर तेवढें त्यानें पाळलें होतें.ताओसला मार्तिनेझशीं भांडण्यातंडण्याला वा पोटाला तडस येईपर्यंत अन्नावर ताव मारायला तो या खेंचरावर बसून जाई. त्याच्या स्वैपाकघरांत प्रत्येक दिवस शुक्रवार असे. शेजारपाजारच्या कोणा बाईनें एकादें कोंबडीचें पिलूं उकडून दयार्द्र बुद्धीनें त्याच्याकडे आणलें तर तेवढाच काय तो मांसाहार. त्याच्या टापूंत तसा तो लोकप्रिय होता. तो बुभुक्षित होता परंतु जुलमी नव्हता. आरोयो सेको आणि क्वेस्टा या नजीकच्या भागांतून तो पैसे उकळी त्या मानानें त्याच्या चर्चच्या गांवीं कमी उपद्रव देई. शिवाय कंजूषपणा मेक्सिकनांमध्यें विरळा, त्यामुळें त्याच्या या गुणाचें कौतुकच होत असे. तो कधींहि कांहीं विकत कसा घेत नसे, गृहिणींनीं फेकून दिलेल्या झडल्या झिजक्या केरसुण्या उचलून नेऊन त्या तो कसा उपयोगांत आणी. मार्तिनेझचे जुने, निरुपयोगी, आडमाप कपडेच तो कसा वापरी, याच्या गोष्टी त्याच्या टापूंत घोळघोळून सांगितल्या जात. एकदां मार्तिनेझनें आपले जुने कपडे घरीं अध्ययनार्थ राहिलेल्या मेक्सिकोच्या कोणा भिक्षूला हिंवाळ्याकरतां देऊन

टाकले म्हणून ल्युसेरो आणि मार्तिनेझमध्यें झालें होतें तें भांडण त्यांच्यांतलें सर्वांत मोठें होतें.

एकमेकांविषयीं हे दोघे धर्मगुरू नेहमींच भीडभाड न बाळगतां बोलत. मार्तिनेझच्या साऱ्या चुरचुरीत गोष्टी ल्युसेरोविषयींच्या असत आणि ल्युसेरोच्या बाजारगप्पा मार्तिनेझविषयींच्या असत.

एखाद्या लग्नाच्या मेजवानीच्या प्रसंगीं पॅड्रे ल्युसेरो तरुण पोरांना म्हणे, "म्हाताऱ्या योज मार्तिनेझहून माझाच मार्ग बरा. त्याचें नाक आणि हनुवटी फार निकटचे शेजारी बनू पहात असून पेटिकोट अंगाला निरूपयोगी ठरूं लागला आहे. मी पहा, डॉलरच्या नुसत्या दर्शनानें केव्हांही ताड्दिशीं ताठ उभा होईन. हातांत पैसा खेळत असला कीं माझ्यासारखा सुखी मीच. आणि सुंदर पोरगी हातीं लागली तर उपरतीशिवाय दुसरें काय करतां येणार आहे त्याला?"

तो सर्वांना बजावी, "म्हातारवयांत भूक वाढते मार्तिनेझला बाया तसे मला पैसे. आपापल्या सुखाच्या शोधांत आणि उपभोगांत एकमेकांशीं आमचें चुकूनही वितुष्ट आलेलें नाहीं." त्रिनिदाद धर्मगुरूपदाची प्राप्ति करून घेऊन काकाकडे रहायला गेला तेव्हां फादर ल्युसेरोनें तक्रार चालवली कीं मार्तिनेझ-बरोबर राहून त्याला कांहीं वाईट खोडी लागल्या होत्या आणि तो त्याचा जीव खात होता. फादर मार्तिनेझही या स्वरूपाचें कांहीं आपल्या परीनें बोले.

अखेर बिशपला ताओस आणि आरोयो होंडोच्या बंडाळीकडे डोळेझांक करणेंच अशक्य झालें आणि फादर व्हेलंटला त्यानें ताओसला बंडखोर धर्म-गुरूंना तीन आठवड्यांची सूट देऊन अखेरची तंबी देवविण्याची आणि त्यांच्या शरणगतीच्या मागणीची व्यवस्था केली. तीन आठवड्यांनीं फादर जोसेफनें शांतपणें बिशपचा· फादर मार्तिनेझचीं धर्मपदाचीं वस्त्रें काढून घेण्यांत येत असल्याचा हुकूम ताओसमध्यें वाचला. त्याच दिवशीं दुपारीं, तो अठरा मैलांवरच्या आरोयो होंडोला गेला आणि फादर ल्युसेरोला धर्मगुरूच्या पदावरून बडतर्फ करण्यांत आल्याचा बिशपचा दुसरा हुकूम त्यानें तिथं घोषित केला.

फादर मार्तिनेझ मात्र त्याच्या सवत्या चर्चचा कारभार चालवीत राहिला आणि थोडक्याच कालांत, थोड्याशा आजारानंतर मरण पावला. फादर ल्युसेरोनें त्याचा दफनविधी स्वतंत्रपणें उरकला. यानंतर लौकरच फादर ल्युसेरोचा पडता काळ सुरू झाला. आजारीपणांतही त्यानें मध्यरात्रीं एका दरोडे-खोराशीं दोन हात करून झटापटींत त्याला ठार केलें आणि त्याला भोंवताल्च्या टापूंत खूप प्रसिद्धि मिळाली.

हा दरोडेखोर म्हणजे चोरीच्या आरोपावरून एका 'वॅगन ट्रेन' वरून बडतर्फ केलेला संशयास्पद वर्तणुकीचा माणूस. ताओसमध्यें तो उपजीविकेकरतां कांहीं कामाला राहिला होता आणि तिथें त्याने फादर ल्युसेरोच्या संपत्तीच्या कथा ऐकल्या. त्या म्हाताऱ्याला लुटण्याकरिता तो आरोयो होंडोला येऊन दाखल झाला. फादर ल्युसेरो तसा सावध झोंपेचा होता. रात्रींत केव्हां तरी चोरटी चाहूल ऐकतांच त्यानें उशाखालचा तो नेहमीं बाळगी तो चाकू हातीं घेतला आणि उसळून दरोडेखोरावर हल्ला चढवला. काळोखांत त्यांची झटापट सुरू झाली आणि चोर तसा तरणा आणि सशस्त्र असूनही म्हाताऱ्या ल्युसेरोनें त्याला भोसकून ठार केलें आणि रक्तानें माखल्या स्थितींत तो गांव जागें करण्याकरतां बाहेर धांवला—पहिल्या घराच्या झोंपण्याच्या दालनाला कत्तलखान्याची कळा आलेली जमलेल्या गांवकऱ्यांना दिसली. खणलेल्या खड्डयानजीक चोराचा मुडदा रक्तात न्हाऊन लोळला होता. म्हाताऱ्याला हें साधलें कसें याचें आश्चर्य जो तो करीत होता.

परतु त्या रात्रींच्या त्या धक्क्यातून फादर पुन्हा केव्हांच बाहेर निघाला नाहीं. इतक्या वेगानें तो झिजत गेला कीं त्याच्या चहात्यांनीं ताओसहून जनावराच्या डॉक्टरला त्याची तब्येत पहाण्याकरता आणवलें. हा जनावरांचा डॉक्टर अमेरिकन होता, 'याकी' होता, आणि जनावरांप्रमाणें माणसांवरही औषधोपचार करण्यांत त्यानें चागलेंच नांव मिळविलें होतें. परंतु फादरची तब्येत पाहून त्या डॉक्टरनें आपला नाइलाज बोलून दाखवला. आणि फादरला पोटांत 'ट्युमर' वा कॅन्सर झाला असल्याचें आपलें निदान व्यक्त केलें.

उपरतीच्या अवस्थेंत फादर ल्युसेरो मरण पावला. त्याची बडतर्फी जाहीर करणाऱ्या फादर व्हेलंटनेंच त्याच्या मरणवेळीं चर्चच्या सेवेंत त्याला रीतसर रुजू करून घेतलें. त्यावेळीं तो बिशपच्या कांहीं कामानिमित्त किट कार्सनकडे उतरलेला होता. मोठ्या पावसाळी वादळाच्या वेळीं एका संध्याकाळीं सारीं भोजनाला बसलीं असतां एक घोडेस्वार दौडत येऊन पोंचला. कार्सन त्याच्या आतिथ्याकरता बाहेर गेला. त्यानें सोबत आंत आणला तो स्वार दुसरा तिसरा कोणी नसून त्रिनिदाद ल्युसेरो होता. अंगावरचा रबरी कोट काढतांच आपल्या मोठ्या घेरामुळें भारदस्त दिसत, गळ्यांत क्रूस चिन्ह आणि अंगावर आरोयो होंडोच्या बनावटीचा धर्मगुरूचा झगा या वेषांत तो सर्वांपुढें उभा राहिला. सिनोराला डौलानें प्रणिपात केल्यावर फादर व्हेलंटला त्यानें आपल्या जाड्या आवाजांत, आपल्या मतें 'उत्तम' इंग्रजींत आपला आगमनाचा हेतु स्पष्ट करून सांगितला.

तो म्हणाला, " पॅड्रे ल्युसेरोचा मी एकुलता पुतण्या. माझे काका फार आजारी आहेत. लौकरच ते मरणार. ते रक्त ओकले आहेत." त्याची नजर जमीन धुंडाळीत होती.

फादर जोसेफ ओरडला, " अरे बाबा, तुझ्याच भाषेंत काय सांगायचें तें सांग ! तुला इंग्रजी येतें त्याहून मला स्पॅनिश नक्कीच जास्त समजतें. बोल आता. काय झालें आहे तुझ्या काकाना ? "

त्रिनिदादनें मग सर्व हकिकत 'ते रक्त ओकले' हें वारंवार सांगत कथन केली. त्याच्या सांगण्याप्रमाणें त्या स्थितींत त्याच्या काकाला फादर व्हेलंटच्या भेटीची फार इच्छा झालेली होती आणि तो विनवून म्हणाला, " कसेंही करा आणि त्यांच्या मनासारखे एकदांचें होऊं द्या. "

कार्सननें फादर व्हेलंटला सकाळपावेतों थांबण्याचा आग्रह केला,कारण पावसानें सडक वाहून गेली असण्याचा आणि काळोखांत त्यामुळें अपघात घडण्याचा चांगलाच संभव, त्याच्या मतें, होता. परंतु फादर व्हेलंट म्हणाला, सडक बऱ्या अवस्थेंत नसेल तर मी पायीं निघतों. तो आपल्या खोलीकडे गेला, आपले प्रवासाचे कपडे त्यानें चढवले. त्रिनिदादला बरोबर घेऊन तो तिथून अखेर बाहेर पडला.

म्हणजे वाट दाखवण्याकरतां बरोबर कोणी असण्याची जरूर त्याला वाटली असें नव्हे. आरोयो होंडो हें त्याचें आवडतें आणि चांगलें परिचयाचें गाव होतें. अनेक खेपांना तो तिथें जाऊन आलेला होता.

जातांना प्रथम लांबच्या डोंगरांच्या पायथ्यापर्यंत सलग पसरलेली सपाटी लागे. मग अचानकच सुमारें दोनशें फूट खोल अशा दरीशीं यायला होई. बाजूला कपारी—पण दगडाच्या नव्हेत, मातीच्या. तिथें थबकून खालीं पहावें तों हिरवीं गार शेतें आणि बागा; आणि त्यांत गुलाबी रगाच्या घरांचें गाव दिसे. तिथें माणसें, खेंचरें फिरतांना किंवा शेतें नांगरतांना दिसत. मध्यभागांतून पाण्याचा प्रवाह उंचावरून येऊन वहात गेलेला दिसे. त्याचें मुख कुठें तरी खूप उंचवर असलें पाहिजे, कारण त्याला जरा कुठें अडथळा केला कीं मिळेल त्या बाजूला तो वेगानें वाहूं लागे. पाण्याचा तो सापासारखा उसळता, वळवळता प्रवाह आणि दुतर्फांची हिरवी शोभा पहाण्याकरतां अनेकदां फादर व्हेलंट इथें किंचित्काल थांबला थबकला होता.

परंतु ही वेळ काळोखाची होती. कड्याशीं पोंचतांच त्यानें घोड्याची परीक्षा न पहातां पायीं पुढला पल्ला मारण्याचें ठरवलें आणि घोडें सोडून दिलें. तो स्वतः त्या खोल उतारावरून चालत निघाला.

मध्यरात्रींआधीं ते फादर ल्युसेरोच्या निवासस्थानीं पोंचले. जवळ जवळ निम्में गांव तिथें गोळा झालेलें होतें. कसला समारंभ सोहळा असावा तसें स्वरूप त्या जागेला आलें होतें. रुग्णाच्या खोलींत जमिनीवर पुष्यांत बऱ्याच मेणबत्त्या ठेवून काळ्या शाली लपेटलेल्या मेक्सिकन बायका गर्दीगर्दीनें बसून प्रार्थना पुटपुटत होत्या. त्या मेणबत्त्यांमुळें पाऊल ठेवण्यासाठीं जागा उरली नव्हती.

आपल्या चांगल्या माहितीच्या एका बाईला फादर व्हेलंटनें खूण केली. कॉन्सेप्शन गॉन्झेल्स तिचें नांव. या प्रकाराचा अर्थ त्यानें तिला विचारला. तिनें हळूंच सांगितलें कीं ही मरत्या पॅड्रेची इच्छा होती. त्याची नजर जात होती आणि अधिक प्रकाश हवा म्हणून तो सारखा ध्यास घेऊन होता. कॉन्सेप्शन उसासून म्हणाली, "हयातभर बिचाऱ्यानें मेणबत्त्या वांचवण्याकरतां पाइनच्या जळक्या लांकडावर भागवलें होतें."

कोपऱ्यात, खाटल्यावर, फादर ल्युसेरो पोरवत, कण्हत आणि सारखी कूस बदलीत पडला होता. एकजण त्याचे पाय चोळत होता; दुसरा गरम पाण्यांत फडकीं बुडवून तीं त्याच्या पोटावर, कळा मराव्यात म्हणून, ठेवीत होता. सिनोरा गॉन्झेल्स हळूच म्हणाली कीं म्हातारा यातना असह्य होऊन चादर चावीत आणि ओरबाडीत होता. तिनें आपल्याकडच्या ठेवणींतल्या आणलेल्या या चादरी. त्याच्या अशा चिंध्या उडत होत्या.

फादर व्हेलंट खाटल्याशीं गेला. बसलेल्या बायांना म्हणाला, "इथून जरा लांब व्हा, बायांनो. भिंतीशीं व्हा. तुमच्या या मेणबत्त्यांनीं डोळे दिपतात माझे."

परंतु त्या मेणबत्त्या उचलून उठूं लागताच आजारी पॅड्रे कण्हला, "नको, नको, बत्त्या लांब नेऊ नका! चोर येईल आणि मला नागवील हो नागवील!"

बायकांनीं खांदे उडवले आणि फादर व्हेलंटकडे 'पाहिलेंत ना?' याअर्थीं पाहून त्या पुन्हा मूळ जागीं बैठक मारून बसल्या.

फादर ल्युसेरोचा सांपळाच उरलेला होता. गालफडें आंत गेलीं होतीं, बांकदार नाक मेणासारखें झालें होतें, डोळ्यांत तापाची तार होती. फादर जोसेफकडे पहात ते जळत होते—बटबटीत, काळे, चमकते, अविश्वासानें पहाणारे ते डोळे! या मरणसमयीं फादर मेक्सिकनऐवजीं अधिकतर स्पॅनिअर्डच दिसत होता. अनपेक्षित भक्कमपणें त्यानें फादर व्हेलंटचें मनगट पकडलें आणि पाय चोळणाऱ्या माणसाला छातींत एक जबरदस्त लाथ हाणली.

"पुरे पाय चोळणें. आणि हीं फडकींही काढून न्या. 'व्हिकर' आला आहे, मला जरा बोलायचें आहे. तुम्ही सर्वांनीं तें ऐका." फादर ल्युसेरोचा आवाज

पूर्वीपासून उंच, किरटा 'घोडा बोलावा तसा' असें त्याचें वर्णन कोणी करत असत. फादर पुढें म्हणाला, "सिनोर व्हिकारिओ, पॅड्रे मार्तिनेझ तुम्हाला आठवतात ना ? आठवत असावेत. कारण माझ्याप्रमाणें तुम्ही त्यांचेंहि वाईट केलें होतेंत. तर मग आतां ऐका :"

फादर ल्युसेरोनें सांगितलें कीं, मार्तिनेझनें मरणाआधीं, त्याच्या आत्म्याच्या उद्धारार्थ प्रार्थना व्हाव्यात म्हणून एक रक्कम फादरकडे सुपूर्द करून ठेवलेली होती. ही अबिक्युयुच्या त्याच्या मूळ चर्चकडे व्यतीत व्हायची होती. दिल्या वचनाप्रमाणें ल्युसेरो वागला नव्हता. आणि आतां तो हाता त्या जागेंत भुईखालीं क्रूस-चिन्हाखालींच त्यानें ती पुरून ठेवली होती.

इथें पुन्हां एकवार फादर व्हेलंटनें त्या बसलेल्या बायांना मागें होण्याला सुचवलें. परंतु पुन्हा त्यांनीं मेणबत्त्या उचलतांच फादर ल्युसेरो बिछान्यांत ताड्दिशीं उठून बसत ओरडला, "आहां तिथेंच रहा ! तुम्ही पळ काढून मला एका परक्याबरोबर सोडूं बघतां काय ? तुमच्यावर माझा विश्वास नाहीं तसा त्याच्यावरही नाहीं ! माणसाला त्याचें सर्वस्व मृत्यूनंतरही स्वतः राखतां यावें अशी काहीं व्यवस्था त्या देवानें कां केली नाहीं ? जिवांत जीव आहे तोंवर चाकूच्या मदतीनें मी ते करीन. पण मी मेल्यावर --?"

सिनोरा गॉन्झेल्सनें फादर ल्युसेरोचें सांत्वन केलें. त्याला पुन्हां निजतें केलें. आणि त्यांनीं काय केलें असतां त्याला बरें वाटेल ते आर्जवून विचारलें. त्यानें इच्छा व्यक्त केली कीं मार्तिनेझकडून त्यानें त्याच्या मृत्यूसमयीं स्वीकारलेले पैसे मार्तिनेझच्या अखेरच्या इच्छेनुसार अबिक्युयुच्या चर्चकडे पाठवण्यांत येऊन मार्तिनेझच्या इच्छेप्रमाणेंच खर्च व्हावेत. क्रूस-चिन्हाखालीं आणि अंथरुणाखालीं त्याची स्वतःची सांठवलेली रक्कम होती. त्यांतली एक तृतियांश त्रिनिदादला देण्यांत यावी, उरलेली आपल्या आत्म्याला सद्गति मिळावी म्हणून धार्मिक विधींकरितां वापरण्यांत यावी असे त्यानें सांगितलें. हे धर्मविधि सांता फेच्या सान मिगुएलच्या जुन्या चर्चमध्यें करण्यांत यावेत अशीही इच्छा त्यानें व्यक्त केली.

फादर व्हेलंटनें, त्याच्या साऱ्या इच्छा व्यवस्थित पुऱ्या करण्यांत येतील असें आश्वासन त्याला दिलें. आणि साऱ्या ऐहिक चिंता सोडून ईश्वरचरणीं मन गुंतवण्याची, बायबल श्रवण करण्याची सूचना केली.

"सारें टीक झालें. पण माणसाला या जगाचा मोह काय सहजासहजॉ सोडवतो ? कॉन्सेप्शन गॉन्झेल्स कुठें गेली ? मुली, ये, इकडे ये. मी या खोलींत असेतोंवरच, आणि माझ्या जिवांत जीव असेतोंवर जमिनीखालचा पैसा खणून

ताब्यांत घेण्याची व्यवस्था कर. या साऱ्या बायांसमोर तो मोजण्यांत येऊन किती ती रक्कम लिहून ठेवण्यांत येईल एवढें पहा." या ठिकाणीं, तो म्हातारा जणूं कसल्या तरी नव्या आशेने उत्तेजित होऊन बोलूं लागला. "आणि क्रिस्तोबल तोच या कामाला योग्य आहे! क्रिस्तोबल कार्सनला या कामाकरतां बोलावून घ्या. त्रिनिदाद. मूर्खा, क्रिस्तोबलला कां बोलावून आणलें नाहींस ?"

फादर व्हेलंट फार अस्वस्थ होता. तो म्हणाला, "हें पहा फादर ल्युसेरो, आतां मनाची तयारी कराल आणि पारलौकिक गोष्टींवर एकाग्र न व्हाल तर मी बायबलचें पठन करणार नाहीं. तुमच्या ह्या मन:स्थितीत त्याला अर्थ नाहीं."

म्हाताऱ्याने हात बांधले आणि डोळे मिटून घेऊन आपली संमति व्यक्त केली. फादर व्हेलंट पलिकडल्या दालनात तयारीसाठीं गेला. त्याच्या अनुपस्थितींत कॉन्झेप्शन गॉन्झेल्सनें बिछान्यानजीकच्या एका छोटया मेजावर आपला मोठा रुमाल पसरून त्यावर दोन मेणबत्त्या ठेवल्या. पेलाभर पाणीहि आणून ठेवलें. फादर व्हेलट आपल्या धर्मगुरूच्या कपड्यात तिथें परत आला. बरोबर त्यानें त्याचें 'पिक्स' आणि पवित्र जलाचें तस्तही आणलें होतें. बिछान्यावर सभों-वतालच्या माणसांवर त्याने ते मन्त्रोच्चार करीत शिंपडलें. खोलींतल्या बाया हळूच बाहेर सटकल्या. तेवत्या मेणबत्त्या त्यांनीं मागेच ठेवल्या. फादर ल्युसेरोनें 'कन्फेक्शन' दिली, आपल्या ऐहिक मिळकतीवरचा हक्क सोडला, ईश्वरी कृपेची इच्छा व्यक्त केली आणि मग फादर व्हेलंटनें बायबलचें पठन केलें.

या सोहळ्यानें त्या व्यथित जीवाला बरीच शातता लाभली आणि छातीवर हात जोडून तो स्वस्थ पडून राहिला. बाहेर गेलेल्या बाया पुन्हा आत येऊन पूर्ववत् प्रार्थना पुटपुटत राहिल्या. बाहेर पाऊस खिडक्यांचीं तावदानें झोडपून काढीत होता. वारा सोसाटय़ा होता. पहाणारीं कांहीं माणसें थकव्यानें वांकलीं होतीं, परंतु घरीं जाण्याची गोष्ट कोणी काढीत नव्हते. मृत्युशय्येवरच्या माणसा-जवळ रहाण्याचें त्याना बिलकुल कष्ट नव्हते, उलट त्याना त्यात ऋणच वाटत होतें. मृत्युशय्येवरच्या धर्मगुरुनजीक रहाणे हे तर त्यांना भूषणच होतें.

त्या दिवसात युरोपीय देशातून देखील मृत्यूला एक उदात्त सामाजिक महत्त्व दिलें जाई. देहयंत्राचे कांहीं विशिष्ट भाग बंद पडण्याचा एक क्षण एवढेंच महत्त्व त्याला त्या काळीं नसे, तर तो एक नाट्यमय उत्कर्षबिंदु, जीवात्मा परलोकात प्रवेशण्याचा क्षण, टेंगण्या दारावाटे तो बाहेर पडून एका अनोळखी सृष्टींत प्रवेशण्याचा क्षण मानला जाई. पहाणारांना नित्य आशा असे कीं मृत्यु-शय्येवरचा जाता माणूस केवळ त्यालाच दिसणाऱ्या अपरिचिताबद्दल कांहीं

बोलेल, वर्णन करील. त्याचे ओठ नाहींत तरी निदान त्याचे हावभाव काहीं बोलतील. कुठल्या तरी दिव्य प्रकाशानें तो उजळेल वा अभद्र छायेनें काळवंडेल, नेपोलियन, लॉर्ड बायरन यांचे 'अखेरचे शब्द' अद्याप पुस्तकरूपानें छापण्यांत येत, प्रत्येक सामान्य मरणोन्मुख माणसाची अखेरची पुटपुट कान लावून, चित्त एकवटून ऐकली जाई. पुढें ती स्मृतींत दीर्घ कालपर्यंत जतन केली जाई. हे अखेरचे शब्द किती का बिनमहत्वाचे असेनात, त्यांना विशेष महत्व दिलें जाऊन त्यावर प्रत्येकजण गाढ विचार करीत राही. कारण प्रत्येकाला गेला त्याच्या वाटेनें एकदां जायचेंच असे.

मरणाच्या छायेखालीं दबून गेलेल्या त्या खोलींतली शांतता एकदम भंग पावली. क्रूसचिन्हापुढें त्रिनिदाद ल्युसेरो प्रार्थनेकरतां वांकला. त्याचा काका ( तो झोंपला आहे असें सारे समजत होते परंतु ) एकाएकीं तडफडूं तगमगूं लागला, किंचाळूं लागला. "चोर ! धांवा ! धांवा !" त्रिनिदाद मुकाट्यानें उठून गेला परंतु त्यानंतर म्हातारा पडून राहिला तो एक डोळा उघडा ठेवून. आणि क्रूसचिन्हाजवळ जाण्याची मग कोणाचीही छाती होईना.

पहांटेपूर्वीं सुमारें तासभर पॅड्रेला श्वासोच्छ्वास करण्याला इतका मनस्वी त्रास होऊं लागला कीं दोघाजणांनीं त्याच्या उशाशीं जाऊन त्याचें उसे उंच केलें. बायका आपापसांत कुजबुजूं लागल्या कीं त्याची मुद्रा बदलते आहे. त्यांच्या मेणबत्त्या घेऊन त्या जरा जवळ सरकल्या. त्याच्या बिछान्याशीं वाकून पहात राहिल्या. त्याची नजर अद्याप जिवंतपणाचीं लक्षणें स्पष्टपणें वागवीत होती. तिच्यांत मनस्वी अविश्वास, संशय आणि यातना होत्या. त्यानें मस्तक एकीकडे कलतें केलें आणि मेणबत्तीच्या एका तेवत्या ज्योतींत तो एकटक, पापणी न लववता पहात राहिला. चेहऱ्यावरचे अवयव ताठरले. अनेकवार दांत दिसतील एवढे त्यानें ओठ विचकले. पहाणारांनीं श्वास रोधले. मरण्यापूर्वी तो बोलणार अशी खात्री त्यांना वाटत होती--आणि तो बोलला.चमत्कारिक हास्य करावें तशी त्यानें मुद्रा वेडीविद्री केली आणि तोंडावाटे श्वासाची तार काढीत त्याचा पॅड्रे घोड्यासारखा--शेवटचाच--बोलला :

"आपलें पुच्छ खा, मार्तिनेझ, आपलें पुच्छ खा !" आणि तात्काळ त्याच्या देहाला मोठा पीळ भरून त्याचा प्राण सुटला.

उजाडलें तेव्हां त्रिनिदाद सांगूं लागला ( उपस्थित बायकांनीं त्याला दुजोरा दिला ) कीं मरतेसमयीं फादर ल्युसेरोनें परलोकांत पाहून नरकयातना भोगणाऱ्या मार्तिनेझला ओळखलें. पुढें त्या प्रसंगीं उपस्थित असलेलीं तीं

खिश्चन माणसें, ह्यातीच्या अखेरपर्यंत, ही हकिकत आरोयो हॉडॉत एक-मेकांना सांगत असत.

फादरच्या घराची जमीन त्याच्या अंतिम इच्छेनुसार उकरली तेव्हां तिच्या खालच्या सोन्याचांदीच्या नाण्यांच्या थैल्या पहाण्याकरतां ताओस, सांताक्रुझ आणि मोरापासून लोक लोटले होते. स्पॅनिश, फ्रेंच, अमेरिकन, इंग्लिश, आणि कांहीं फार पुरातन अशीं सर्व प्रकारचीं नाणीं त्या भूमिगत दौलतींत होतीं. सरकारी टांकसाळीकडे हें कळवण्यांत येऊन त्या साऱ्या नाण्यांची किंमत ठरविण्यांत आली ती अमेरिकन चलनांत वीस सहस्र डॉलर्स इतकी भरली. एका म्हाताऱ्या धर्मगुरूनें एका खेडवळ चर्चमध्यें आयुष्यभर पदरमोड करून जमवलेली आणि एका खड्ड्यांत गाडून जमलेली ही इस्टेट.

# सहावा खण्ड

.१.

बिशप ल्तूरची एक अगदीं ऐहिक अशी आकांक्षा होती. सांता फेच्या रमणीय निसर्ग-सौंदर्याच्या ठिकाणीं तितकेंच साजेसें एक 'कॅथेड्रल' बांधावें. मनांत ही इच्छा, तळमळ वागवीत असतां आणि तिच्यावर चिंतन करीत असतां त्याला असेंही वाटूं लागलें होतें कीं अशा तऱ्हेची इमारत हें एक प्रकारें त्याचें आणि त्याच्या कार्याचें उत्कृष्ट स्मारकच होऊं शकेल. तो गेल्यावरही या 'कॅथेड्रल' च्या रूपानें त्याचें कार्य चालू राहील, कांहीं मागें ठेवून गेल्याचें समाधान मिळेल. त्याच्या कारकीर्दीच्या आरंभापासून त्यानें त्याच्या तुटपुंज्या मिळकतींतला कांहीं ना कांहीं भाग या कामासाठीं निधि म्हणून बाजूला काढायला सुरुवात केली होती. या बाबतींत त्याला धनसंपन्न अशा कांहीं मेक्सिकन जमीनदारांचें सहाय्यही लाभलें होतें. परंतु डॉन आंतोनियो ऑलिव्हेर्सइतकें मात्र कोणाचें नाहीं.

एका केवळ्या तरी मोठ्या कुटुंबांतला हा आंतोनियो ऑलिव्हेर्स एक घटक होता. खूप बुद्धिमान् होता. धनाढ्य होता. त्या काळाच्या आणि त्या स्थलाच्या मानानें त्याचा अनुभव व्यापक होता. त्याच्या आयुष्याचा मोठा काळ त्यानें न्यू आर्लिन्स आणि एल पासो डेल नॉर्तमध्यें घालवला होता आणि बिशप ल्तूरनें त्या भागांतलीं धर्मविषयक सूत्रें स्वतःकडे घेतल्यानंतर कांहीं वर्षांनीं तो सांता फेमध्यें पुन्हा रहायला आला होता. बरोबर त्यानें त्याच्या अमेरिकन पत्नीला आणलें होतें. त्याचें सामानसुमानही चिकार होतें. सारें घेऊन, आयुष्याचा शेवटचा कालखंड निश्चितपणें व्यतीत करण्याकरतां तो या भागांत येऊन गांवाच्या पूर्वेकडल्या जुन्या, मोठ्या घरांत राहिला होता. याच घरांत तो जन्मला, लहानाचा मोठा झाला होता. पुन्हां इकडे राहूं लागला तेव्हां तो साठीच्या घरांत आला होता. ऐन उमेदींत त्याची पहिली पत्नी निवर्तली. न्यु ऑर्लिन्सला गेल्यावर त्यानें दुसरा विवाह केला होता तो लुइजिआनांत वाढलेल्या केनटकीच्या

एका मुलीशीं. ती सुंदर होती. उच्च संस्कारांतली होती. एका फ्रेंच कॉन्व्हेण्टमध्यें तिचें शिक्षण झालें होतें आणि आपल्या परीनें तिनें तिच्या नवऱ्याला पाश्चिमात्य युरोपीय संस्कृतीचें बरेंच वळण लावलें होतें. त्याचा पोषाख, वागणें वावरणें, सुखवस्तु-जराशी चैनीच-रहाणी, यांनीं त्याच्या बाकी कुटुंबांत, इष्टमित्रांत त्याच्याविषयीं अर्धवट तुच्छतेच्या स्वरूपाचा एक मत्सर रुजला होता.

ऑलिव्हेर्सची पत्नी डोना इसबेला, निस्सीम कॅथॉलिक होती आणि त्यांच्या घरीं या फ्रेंच धर्मगुरूचें नेहमींच स्वागत आणि उत्तम आदरातिथ्य होई. मुळांतल्या त्या अस्ताव्यस्त आणि जुन्यापान्या अतिप्रशस्त घराला सिनोरा ऑलिव्हेर्सनें चांगल्या प्रकारें नटवलें सजवलें होतें. त्या घराला मोठें अंगण होतें, त्याहून मोठें घरसूं होतें, एक फाटक होतें, नक्षीदार खांब आणि बहालें होतीं, हेरिंगच्या हाडांचीं सुंदर छते आणि उबदार शेकोट्या होत्या. सिनोरा स्वतः आदरातिथ्यांत फार चांगली मुरलेली होती आणि आतां तशी ती तरुण नसली तरी दिसायला ती आकर्षक दिसे. बांध्यानें सडपातळ, वर्णानें उजळ गव्हाळी, चपल, उत्साही अशी ती होती. कोणत्याही हवामानांत आपला वर्ण तिनें शिकस्तीनें कायम राखला होता. तिला फ्रेंच उत्तम येत होतें. स्पॅनिश येई परंतु मोडकेंतोडकें. ती 'हार्प' चांगल्या प्रकारें वाजवी आणि गोड गाई.

हें कुटुंब म्हणजे बिशप लतूर आणि फादर व्हेलंटच्या सद्भाग्याचेंच एक प्रकारें फळ होतें. कारण नित्य इंडियन्स, मेक्सिकन्स आणि अशाच हडस भडस, असंस्कृत माणसांत वावरतांना अधून मधून त्याना आता त्या सुंदर घरीं, देखण्या आणि सुसंस्कृत सिनोराशीं मायबोलीत गप्पा करता येत. बाहेरच्या जगांत चाललेल्या घडामोडींत रस घेणाऱ्या त्या जोडप्याच्या सहवासात एकादी संध्याकाळ घालवली कीं कसें ताजेंतवानें व्हायला होई. शिवाय सुग्रास भोजन मिळे, उत्तम मद्य उपलब्ध असे. संगीताची मजा अनुभवता येई. विसंगतीनें युक्त अशा व्यक्तिमत्वाच्या फादर जोसेफचा आवाज तमा बऱ्यापैकीं होता. त्याच्याबरोबर फ्रेंच गीतांची उजळणी करायला सिनोराला आवडे. कधींही गायचें तर ती तीन भाषांत गाई. तिच्या नवऱ्याचीं प्रिय गीतें, 'ल पलोमा' 'ल गोलोंद्रिया' 'माय नेली वॉज अ लेडी' ती कधीं गायल्यावांचून रहात नसे. स्टीफन फॉस्टरचीं निग्रो गीतेंही तोंवर त्या सरहद्दीवरल्या भागांत पोंचलेलीं होतीं.- छापील स्वरूपांत नव्हेत, तोंडातोंडीं.

डॉन आंतोनियो कुडीनें जाड होता. मोठ्या पोटाचा होता. त्याला थोडेंसें टक्कलही पडलेलें होतें. परंतु त्याचे डोळे तरतरीत होते आणि तो स्वस्थ असला

तरी त्या डोळ्यांतली चमक समोरच्या नजरेशीं बोलत राही. विशेषतः भोजनोत्तर न्यु ऑर्लिन्सहून आणलेल्या मोठ्या खुर्चीत बसून, मोठाल्या बोटांत चिरूट धरून तो बायकोचें 'हार्प' वादन ऐके तेव्हां पहाण्याजोगा असे.

अर्थात् सिनोरानें आपलें सुंदर रूप आणि नवऱ्याचें आपल्यावरचें प्रेम याही वयांत कायम राखलें असल्यानें सांता फेमध्यें तिच्याविषयीं कुजबूज चाले. कानगोष्टी होत. स्थानिक अमेरिकन्स आणि ओलिव्हेर्सचे इतर भाऊ वगैरे म्हणत कीं वयाच्या मानानें बाई फार पोरकट पोषाक वापरते. (हें तसें फार खोटें नव्हतें.) शिवाय तिला न्यु ऑर्लिन्समध्यें आणि एल पासो डेल नॉर्तमध्यें 'यार' असल्याचीही अफवा सांगितली आहे. तिच्या नवऱ्याकडल्या एका नातेवाइकाचें तर असेंच म्हणणें होतें कीं ऑलिव्हेर्सनें सान आंतोनियोहून तिच्या साथीला 'बँजो' वाजवण्याकरतां एक मेक्सिकन तरुण पोरगा आणला होता त्याचे आणि तिचे कांहीं अनैतिक संबंध होते. हा तरुण मेक्सिकन पोरगा, 'पाब्लो,' बँजो फार सुरेख वाजवी. त्याच्या बोटांत जादू होती. डोना इसबेलाबद्दल आणखीही कित्येक गप्पा प्रचलित होत्या. त्यांतल्या बहुतेक सर्व तिच्याच स्वयंपाकघरांतून प्रसृत होत. डोना इसबेलाचे एक मोठी खोली भरून एकाहून एक उंची कपडे असल्याची गप्प अशांतली एक. नवऱ्याच्या खिशांतून सोनें चोरून ती तें जमिनींत पुरून ठेवी ही अशीच दुसरी. नवऱ्याचें पौरुष वाढण्याकरतां ती त्याला कसल्या तरी वनस्पति आणि गुप्त रसायनें चारते ही अशीच तिसरी. या गप्पा घरांतला नोकरवर्ग पसरवी परंतु याचा अर्थ तो या मंडळीशीं बेइमान होता असें नव्हे तर त्या बापड्यांना आपल्या मालकिणीचा अभिमान वाटे तो ते या प्रकारें व्यक्त करीत.

ऑलिव्हेर्स नियमितपणें वर्तमानपत्र वाची. हें खरें कीं वर्तमान त्याच्या हातीं येईतोंवर आठवड्याभराचें जने झालेलें असे; परंतु तरीही त्याचा क्रम चुकत नसे. ऑलिव्हेर्सला सिगरेटीपेक्षां चिरूट आणि व्हिस्कीपेक्षां फ्रेंच मद्य आवडे. त्याच्या इतर भावाशीं त्याचें कुठलेंच साम्य नव्हतें. त्याचा एक जुना मित्र मानुएल शावेझ सोडला तर हे दोन फ्रेंच धर्मगुरूच त्याला या गांवांत जवळचे होते, प्रिय होते. त्यांच्यावरचा आपला लोभ तो विमुक्तपणें व्यक्त करी. बिशपच्या निवासस्थानीं तो त्याच्या बागेतल्या कोंवळ्या ऑर्चर्डविषयीं सल्ला देण्याकरतां जाई. फादर जोसेफकरतां घरगुती ब्रँडीची बाटली पाठवी. मैत्रीचा तो भुकेला होता. आयुष्यभर फादर लतूरला सुखावणारा चांदीचा 'टॉयलेट सेट' ऑलिव्हेर्सनेंच दिलेला. सांता फेमधल्या मेक्सिकन सोनारांकडून त्यानें आपल्या

टॉयलेट-सेटबरहुकूम हा सेट मुद्दाम बनवून फादरला भेट दिला होता. डोना म्हणे, आपला नवरा नेहमीं फादर व्हेलंटला कांहींतरी रुचकर पाठवून देतो आणि फादर लनूरला दिसायला सुंदर असें कांहीं कांहीं भेट देतो.

या जोडप्याला एक मुलगी होती तिचें नांव सिनोरिता इनेझ. तिचें वय बरेंच होतें आणि तरीहि ती कुमारिकाच होती. ती कधीच लग्न करणार नाहीं असें समजण्यांत येई. दीक्षा न घेतांही ती जणूं जोगिणीचें आयुष्य जगत होती. दिसायला ती फार साधी बगडी होती आणि आईची चारचौघांसमोर वागण्याची चातुरी तिच्याकडे नव्हती. पण तिचा आवाज फार मधुर होता. न्यू ऑर्लिन्सच्या 'कॅथेड्रल'च्या गान-संचांत ती गात असे. तेथल्याच एका कॉन्व्हेंटमध्यें संगीताचे शिक्षण देत असे. आईवडील सांता फेमध्यें येऊन स्थायिक झाल्यापासून फक्त एकदांच ती त्यांना भेटण्याला आली होती. त्या कांहींशा परंपराप्रिय, चार-चौघांसारख्या कुटुंबांत, घरांत ती वेगळीच उठून दिसे. डोना इसबेलाचा तिच्यावर भारी जीव होता परंतु तिच्या मर्जीविरुद्ध आपलें वागणें होईल ही भीति तिला सतावीत असे. मुलगी घरीं असता आई त्यांतल्या त्यांत साधे पोषाक करी, उजव्या कानावर रुळणाऱ्या छोट्या बटा पिन लावून केंसांत बांधून ठेवी. आणि दोघी मिळूनच केव्हांही चर्चला जात.

अंतोनियो ऑलिव्हेर्सला कॅथेड्रल बांधण्याच्या बिशपच्या मनीषेविषयीं फार आत्मीयता होती. कारण एक तर बिशपची ही मनीषा किती तीव्र आहे याची कल्पना त्याला होती; आणि कोणाही जवळच्या स्नेह्याच्या एकाद्या तीव्र मनीषेच्या पूर्तीच्या कामीं शक्य तो हातभार लावण्यांत सार्थक मानणारा तो माणूस होता. त्याशिवाय, त्याच्या जन्मगांवाविषयीं त्याच्या मनांत एक ओढ होती. तो खूप गांवें फिरला होता, खूप सुंदर सुंदर चर्चेस त्यानें पाहिलीं होतीं आणि सांता फेमध्यें केव्हां ना केव्हां असें एक चर्च उभें राहिलेलें पाहूं हा त्याचाही एक ध्यास होताच. अनेकवार त्यानें आणि फादर लनूरनें शेकोटीशीं बसून तासन्तास या विषयावर विचारविनिमय केला होता. या नव्या 'कॅथेड्रल'चें स्थान कोणतें असावें, आकार कसा असावा, दगड कोणता वापरावा, खर्च किती येईल आणि त्याची रक्कम उभी करायची तर कष्ट किती पडतील तें सारें दोघांनीं एकमेकांशीं चर्चिलें होतें. बिशपची इच्छा होती कीं १८६० सालपावेतों इमारतीचें बांधकाम तरी सुरू व्हावें. कारण त्या सालीं त्याच्या या भागांतल्या कारकीर्दीला दहा वर्षें पुरीं होत होतीं. एका रात्रीं, घरच्या संस्मरणीय अशा नव-वर्षाच्या मेजवानीच्या वेळीं जमलेल्या पाहुण्यांसमोर ऑलिव्हेर्सनें जाहीर केलें कीं हें वर्ष संपण्याआंत

फादर ल्तूरच्या मनांतलें ‘कॅथेड्रल’ निदान बांधणें सुरू करतां येईल एवढा निधि फादरच्या स्वाधीन करता यावा अशी आपली इच्छा आहे.

ती मेजवानी संस्मरणीय ठरली ती ऑलिव्हेर्सच्या प्रतिज्ञेमुळें. तसेंच जुन्या मित्रांच्या वियोगाचाही तो प्रसंग होता. स्थानिक लष्करामधल्या बदली झालेल्या दोन अधिकाऱ्यांना या मेजवानीला मुद्दाम डोना इसबेलानें बोलावलें होतें. पैकीं लोकप्रिय अशा ‘कमांडंट’ची नेमणूक वॉशिंग्टनमध्येंच करण्यांत आली होती आणि दुसऱ्या आयरिश कॅथॉलिक, नुकत्याच लग्न केलेल्या आणि फादर ल्तूरच्या अत्यंत मर्जीतल्या घोडदलाच्या तरूण लेफ्टनंटची नेमणूक आणखी पश्चिमेकडे झाली होती (पुढला नव-वर्ष-दिन उगवण्याआंत तो आरिझोनाच्या सपाटीवर इंडियनांशीं युद्ध करतांना कामीं आला.)

त्या रात्रीं मात्र भविष्यकालाची फिकीर कोणालाही सतावीत नव्हती; घर प्रकाशानें आणि संगीतानें बहरलें होतें, साध्याच परंतु अस्सल पाहुणचारानें वातावरणांत एक ऊब आली होती. मादाम ऑलिव्हेर्सचा नित्य चहा करणारा किट कार्सन दोन दिवसांचा प्रवास करून ताओसहून मुद्दाम या मेजवानीला आला होता. सोबत त्यानें मिश्र रक्ताची त्याची सात्विक वृत्तीची कन्याही आणली होती. सेंट लुईतल्या एका कॉन्व्हेण्ट स्कूलमध्यें ती अध्ययन करीत होती. सुट्टींत बापाकडे आलेली होती. या प्रसगाकरितां कार्सननें चंदेरी भरतकामाचा सुंदर बाक्सिन कोट पेहेनला होता. लष्करी अधिकारी अर्थातच त्यांच्या गणवेशांत होते आणि खुद्द यजमानांनीं ब्रॉडक्लॉथ’चा ‘फ्रॉक कोट’ पेहेनला होता. सिनोरा ऑलिव्हेर्स--यजमानीणबाई--न्यु ऑर्लिन्सहून आणलेल्या फ्रेंच पद्धतीच्या ‘हूप-स्कर्ट’ मध्यें होत्या. त्या पोषाकावर सर्वभर साटिनचीं गुलाबी फुलें चिकटवलीं होतीं. लष्करांतल्या बाया आपलीं साटिनचीं पादत्राणें खराब होऊं नयेत म्हणून लष्करी गाडींतून मेजवानीला आल्या. बिशप ल्तूरनें त्याचा ठेवणींतला ‘व्हायोलो’ रंगाचा झगा पेहेनला होता आणि फादर व्हेलंट अगदीं नव्या बनावटीच्या ‘कॅसॉक’मध्यें होता--हा त्याच्या बहिणीनें, फिलोमेननें रिओममध्यें त्याच्याकरतां मुद्दाम बनविलेला.

आरंभीं आरंभीं हा फादर व्हेलंट त्याच्या बहिणीला आणि तिच्या बरोबरीच्या जोगिणींना आपल्याकरतां नवे पोषाक बनविण्याचा त्रास देतो हें बिशप ल्तूरला बरें वाटलें नव्हतें. परंतु गेल्या खेपेला तो फ्रान्सला गेला तेव्हा या गोष्टीची-एक अगदीं वेगळी बाजू त्याच्या दृष्टोत्पत्तीस आली. ‘मदर’ फिलोमेनच्या कॉन्व्हेण्टला त्यानें भेट दिली. आणि त्या प्रसंगीं जरा तरुण अशा एका ‘सिस्टर’नें त्याला या बाबतींत कांहीं सांगितलें. लांबलांबच्या मिशन्समधल्या माणसांकरता कांहीं करणें हें

या विजनवासांतलें त्यांचें सुखच होतें असें ती म्हणाली. फादर व्हेलंटचीं लांब लांब पत्रें त्यांना किती प्रिय होतीं (या पत्रांत तो त्याच्या भागांतल्या परिस्थितीबाबत, लोकांबाबत, त्याच्या चालीरीतींबाबत, परंपरेबाबत कांहीं कांहीं लिही.) तें तिनें बिशपला सांगितलें. हीं पत्रें ' मदर ' फिलोमेन सायंकाळचीं मोठ्यानें वाची आणि बाकी साऱ्या तीं ऐकत असें ती म्हणाली. तिनें बिशपला एका खिडकीपाशीं नेलें. इथून बाहेरच्या रस्त्याचा ओझरताच देखावा उंच भिंतीच्या कोनाआडून दृष्टीस पडे. पुढें भिंतीनें तो झांकून टाकला होता. ती म्हणाली, 'पहा, त्यांचें एकादें पत्र 'मदर'नें वाचलें कीं मी इथें येऊन अशी उभी रहातें, आणि दिसणाऱ्या त्या तेवढ्याच रस्त्याकडे, त्यावरच्या एकाच दिव्याकडे नजर लावतें. त्या तिथें वळण; आणि त्या वळणापलीकडे मला न्यु मेक्सिको भासूं लागतो. तिथलीं लाल वाळवंटें, निळे डोंगर, मोठीं पठारें, उंच उंच दऱ्या माझ्या नजरेपुढें तरळतात. वाटतें कीं मी तिथेंच आहे. छाती सारखी धडधडत रहाते. आणि झोंपण्याची घंटा होते–सारें तुटतें. पुन्हा भान येतें. स्वप्न संपतें. पण फार बरें वाटत असतें." तिथून बिशप बाहेर पडला तो त्या जोगिणींचें फादर व्हेलंटकरतां चालणारें काम चांगलें आणि आवश्यक असल्याचें ठरवूनच.

आज रात्रीं, मादाम ऑलिव्हर्स फादर व्हेलटच्या पोषाखाची प्रशंसा करीत असतां फादर लतूरला, कां कोण जाणे, तो प्रसंग स्मरला. त्या तरुण जोगिणीची पांढुरकी मुद्रा, जळजळीत नजर...उसासा.

भोजन आटोपल्यावर आणि 'टोस्ट'च्या स्वरूपाचें मद्यपान पार पडल्यावर सारे धूम्रपान करीत असतां तरुण पाब्लोला तिथें आणण्यात आलें आणि त्यानें 'बँजो'वर कांहीं गती वाजवून मंडळीचें रंजन केलें. फादर लतूरला तें वाद्य यापूर्वी कधींच मानवलें नव्हतें. त्याला तें जरा जास्तच जंगली वाटे परंतु या मुलानें तें वाजवतांच त्याच्या तारात एक मुलायमता शिरली, सूर लोण्यासारखे मऊ होऊन त्याच्या बोटांतून ठिबकूं लागले. परंतु तरीही वारंवार त्या वाजवण्यांत एक वेडसर लहर येऊन जाई. एक बेकदर, निधडी भावना व्यक्त होई, जंगली प्रदेशाची 'हांक' उमटे. या साऱ्या जमलेल्यांना ही 'हांक' नवी नव्हती हिच्यामागें तर ते केव्हां ना केव्हां धावले होते. चिरुटांच्या धुरांत जमलेलें ते स्काउट आणि सैनिक, मेक्सिकन जमीनदार आणि धर्मगुरू, सारे मूक बसून नतमस्तक 'पाब्लो'चें वादन एकाग्रतेनें ऐकत होतें. मधून मधून त्याचा आडवा हलणारा पीतवर्ण हात त्याच्या निश्चित रेखा टाकून निच्चळ गतिरूप होई, तरल भासे.

त्या साऱ्यांना तसें व्यग्र, अंतर्मुख पाहून फादर ल्तूरच्या मनीं विचार चालू होता, " यांतल्या प्रत्येकाची एक कहाणी असली पाहिजे इतकेंच केवळ नव्हे तर यावेळीं ते आपल्या कहाणीचा एक भाग झाले आहेत. कार्सनचे ते तीक्ष्ण, निळे डोळे--हे एखाद्या ' स्काउट ' शिवाय, ' ट्रेल-ब्रेकर ' शिवाय आणखी कोणाचे असूं शकत होते ? या मंडळींतला सर्वांत देखणा माणूस, डॉन मानुएल शावेझ त्याच्या व्हेल्वेट आणि ब्रॉड क्लॉथच्या पोषाकांत वर वर शांतपणें, मुग्धपणें बसलेला. परंतु त्याच्या या शांतपणामागची विजेची तळप समजायला त्याच्याकडे खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून असें लक्षपूर्वक पहाण्याची किंवा त्याच्या शेजारीं भोजनाला बसण्याची जरूर होती. त्याच्या वृत्तींतल्या बेगुमान-पणाच्या, धाडसाविषयींच्या आवडीच्या मुळाशीं एखाद्या कटुतम अनुभवाचें कारण तर नसेल ?

११६० मध्ये मूर लोकांपासून शावेझ नगराची मुक्तता करणाऱ्या कॅस्टिलियन सरदारांची कुळी शावेझ आपली म्हणून सांगे. पेकॉस आणि सान मतिओच्या डोंगरांत त्यांची बरीच मालमत्ता होती आणि त्याशिवाय सांता फेचें घर. एक शानदार बाग त्यानें घराभोंवतीं केली होती आणि तिच्यामागें तो नेहमीं दडलेला असे. या भागातल्या निसर्ग-सौंदर्याचें वेडच त्याच्या रक्तांत, वृत्तींत होतें. आणि हें सौंदर्य पाहूं न शकणाऱ्या अमेरिकनांविषयीं त्याच्या मनांत एक अढी होती. इंडियनांशीं उत्कृष्ट लढत देणारा ही किट कार्सनची ख्याति त्याला टोंचत असे. तो म्हणे, कार्सन आयुष्यभरांत पहाणार नाहीं एवढ्या इंडियनांच्या लढाया आपण वयाच्या विशीआधीं पाहिल्या आहेत. नेमबाजींत तर तो कार्सनशीं उघड उघड बरोबरी करूं शकत असे. तीरकामठ्याच्या लढतींत त्याला कोणीच प्रतिस्पर्धि नव्हता, कोणाकडून त्यानें हार म्हणून घेतली नव्हती. शावेझ-इतक्या पल्ल्यावर तीर मारणें कोणा इंडियनालाही जमल्याचें ऐकिवांत नव्हतें. केवळ चढाओढ म्हणून इंडियनांचे जथे दरसाल त्याच्या घरीं तीरकामठ्यांच्या नेमबाजीकरतां येत त्याच्या घरांत, पागांतून अनेकानेक विजयचिन्हांची नुसती दाटी दिसे. इंडियनांच्या हत्यारांच्या वापरांतल्या आपल्या सफाईचा त्याला अभिमान होता. कारण ही कला तो अत्यंत कष्टपूर्वक शिकलेला होता.

तो सोळा वर्षांचा असतांना ' नॅव्हॅजो ' इंडियनांच्या शिकारीकरीतां मेक्सि-कन तरुणांच्या एका जथ्याबरोबर गेला होता. अमेरिकन अंमलाआधींच्या त्या काळांत, ' इंडियनांची पारध ' करण्याला निमित्त, कारण लागत नसे, तो एक मर्दांचा खेळच मानला जाई. मेक्सिकनांची एक कंपनी पश्चिमेकडे

नॅव्हॅजो भागांत घोडदौड करीत जाई, मेक्स्यांच्या कांहीं छावण्यांवर हल्ले करण्यांत येत, आणि परत येतांना कांहीं मेक्स्या, घोडीं आणि कैद्यांचे जथे आणण्यांत येत. यांतल्या प्रत्येकाबाबत मेक्सिकन सरकारकडून या लोकांना कांहीं ना कांहीं मोठी बक्षिसी मिळे. अशा एका कंपनीबरोबर शावेझ 'शिकारी 'ला आणि लूट आणण्याकरतां गेला होता.

त्यांना इंडियन्स न मिळाल्यानें ते मेक्सिकन तरुण ठरवल्यापेक्षां पुढें पुढें सरकत गेले. या दिवसांत सारे भटकते नॅव्हॅजो टोळीवाले कॅन्यॉन ड शेलीला एका धार्मिक सोहळ्याकरतां एकत्र येतात हें त्याना ठाऊक नव्हतें आणि वाटलें म्हणून पुढें पुढें सरकत ते सारे त्या रहस्यमय आणि भयभीत करून सोडणाऱ्या 'कॅन्यॉन ' च्या कडेशींच येऊन पोंचले. सर्वभर इंडियन्स दिसत होते, एकत्र जमत होते. या तरुण मुलाच्या लक्षांत येण्याआत त्यांची कोंडी करण्यांत आली आणि परत फिरण्याचा मार्ग बंद झाला. समुद्रालगत उंच उभ्या असलेल्या खडबडीत खडकाळ भूमीवर ते लढले. या पथकाचा नेता मानुएलचा मोठा भाऊ डॉन थोज शावेझ हा होता. तो प्रथम जाया झाला. पाठोपाठ मोजून पन्नासजणांची कत्तल उडाली. मानुएल एकावन्नावा, तो वांचला. तीराच्या सात जखमानिशी आणि एक तीर अंगांत वागवल्या स्थितींत मुडद्यांच्या राशींत पडलेल्या त्यालाहि मृत समजून इंडियन्स निघून गेले.

त्या रात्रीं, ते नॅव्हॅजो इंडियन्स त्यांचा धार्मिक सोहळा साजरा करण्यांत गढले असता हा मुलगा खडकाखडकांतून सरपटत, फरफटत मोठमोठ्या कपारींच्या आडोशाला जाऊन थांबला. तिथून मग पायीं तो पूर्वेकडे निघाला. जखमा जळत होत्या. परंतु ऐन ज्वानींतली विलक्षण रग अंगात होती. दोन दिवस आणि दोन रात्री पायपीट करून, पाण्याच्या एका थेंबाशिवाय राहून, सुमारें साठ मैलांचें अंतर काटून, डोंगर, सपाटी पार करून तो दुसऱ्या बाजूच्या एका प्रसिद्ध झऱ्याशीं येऊन पोंचला. पुढें इथें 'फोर्ट डिफायन्स ' बांधण्यात आला. तिथें तो पाणी प्यायला, आपल्या जखमा त्यानें धुतल्या आणि तिथेंच तो झोंपला. चकमकीच्या आदल्या सकाळपासून त्याच्या पोटांत अन्नाचा कण नव्हता. झऱ्याजवळ त्याला 'कॅक्टस 'चीं काहीं मोठीं झाडें आढळलीं. जवळच्या शिकारी चाकूनें त्यांचे काटे काढून त्यानें त्यांच्या भक्षणानें पोटाची भकाटी भरून काढली.

इथून, कोणा माणसाचें दर्शन दुर्भिळ अशा स्थितींत धडपडत, खुरडत तो सान मतिओ डोंगरापर्यंत पोंचला. लगुनाच्या उत्तरेकडला हा डोंगर. डोंगराच्या

एका खोऱ्यांत मेस्किकन मेंढपाळांच्या छावणीशीं तो कसाबसा पोंचला आणि तिथें मूर्च्छित झाला. तेथल्या लोकांनीं आपल्या मेंढयाच्या कातड्याचा कोटांची आणि पाल्यापाचोळ्याची एक झोळी करून त्याला सेबोलता गांवांत नेलें. तिथें अनेक दिवस तो भ्रमिष्ट अवस्थेंत पडून होता. पुढें अनेक वर्षांनीं शावेझच्या हातीं इस्टेटीचीं सूत्रें आल्यावर दोन ओक झाडांच्या दरम्यान जिथें तो मूर्च्छित झाला तें सान मतिओ डोंगरांतले रमणीय खोरें त्यानें खरेदी केलें. त्या दोन ओक झाडांच्या दरम्यान एक घर बांधलें आणि बागबगीचाहि केला.

अमेरिकन अंमलाशीं पटवून घेण्याची तयारी नसल्यानें सांता फेंत असला कीं शावेझ एकीकडे राही. कधीं कुठें इंडियनांशीं चकमक उडाल्याची बातमी येतांच तो प्रथम तिथें धांवत जाऊन आपल्या जमेचे इंडियन बळी वाढवी. इंडियन्स आणि अमेरिकन्स यांच्याविषयीं आपुलकी ठेवतो म्हणून नव्या बिशपविषयीं त्याच्या मनांत अढी होती. शिवाय शावेझ हा मार्तिनेझचा माणूस होता. केवळ सिनोरा ऑलिव्हेर्सच्या आग्रहावरूनच तो आज या मेजवानीला आला होता. खरें म्हणजे अमेरिकन लष्करांतल्या त्या अधिकाऱ्यांच्या सहवासाची त्याला घृणाच असली पाहिजे.

'बँजो' वाजवणारा तो मुलगा थकला तेव्हां फादर जोसेफ म्हणाला कीं मादाम ऑलिव्हेर्सनीं यानंतर 'हार्प' वाजवावा आणि गावें तिचें गायन फारच रंगलें. हार्प वाजवीत असतांना ती बाई फारच डौलदार आणि सुंदर दिसत होती.

तिच्या कौतुकानें ऐकणाऱ्या नवऱ्याकरतां 'ल पलोमा' हें त्याच्या आवडीचें गीत म्हणतांना तिला बिशपनें हें अखेरचेंच ऐकलें. त्या स्थूल माणसांच्या रुंद मुद्रेवर ऐकतांना निर्विकार सुस्ती होती परंतु त्याची नजर जणूं तिला सतत उत्तेजन देत होती.

'सेप्टुआ-गेसिमा'च्या रविवारीं ऑलिव्हेर्सचें अवसान घडलें. रात्रीच्या जेवणानंतर दिवे लावीत असतां घरांतल्या शेकोटीशीं तो कोसळला आणि बिशपला बोलावण्याकरितां 'बँजो' वाजवणाऱ्या मुलाला पिटाळण्यांत आलें. मध्यरात्रींपूर्वीं ऑलिव्हेर्सचे दोघे भाऊ, ब्रँडीनें आणि मानसिक गोंधळानें तसे हर्षानें निम्मेअधिक झिंगून सांता फेतून घोड्यांवरून बाहेर पडून अल्बुकर्कच्या वाटेला दौडले--वकील गांठण्याकरतां.

.२.

अंतोनियो ऑलिव्हेर्सचा दफनविधी फार शांतपणें आणि थाटानें उरकण्यांत आला. सांता फेंत विरळा असा तो प्रसंग होता. परंतु फादर व्हेलंट मात्र त्यावेळीं तिथें उपस्थित नव्हता. दक्षिणेकडे आपल्या कांहीं धार्मिक कामाकरतां तो लांबच्या प्रवासाला गेला होता आणि ऑलिव्हेर्स जाऊन कांहीं आठवडे उलटेतोंवर तो परत सांता फेला येऊं शकला नाहीं. पायांतलें रायडिंग बूटस् तो काढूं म्हणत असताच मादाम ऑलिव्हेर्सच्या वकीलाची गांठ घेण्याकरतां फादर ल्ऐरचें बोलावणें त्याला आलें.

ऑलिव्हेर्सनें आपले सारे व्यवहार कायद्यापुरते बॉइड् ओ ' रेली या तरुण आयरिश कॅथॉलिक वकिलाकडे सोपवलेले होते. हा मूळ बोस्टनचा. नव्या जगां ' त वकिलीचा व्यवसाय चालविण्याकरतां तो या बाजूला येऊन स्थायिक झाला होता. त्या कालात साता फेमध्यें पोलादाच्या तिजोऱ्या नव्हत्या परंतु ओ ' रेलीनें ऑलिव्हेर्सचें मृत्युपत्र एका भक्कम पेटींत बंद करून ठेवलें होतें. मृत्युपत्र तसें छोटें आणि स्वच्छ होते. अंतोनियोची एकूण इस्टेट अमेरिकन चलनांत सुमारें दोन लाख डॉलर्स किंमतीची ठरत होती. ( त्या काळच्या मानानें ही चागलीच मोठी होती )या इस्टेटीवरच्या मिळकतीची विल्हेवाट होती:''माझी पत्नी इसबेला ऑलिव्हेर्स आणि तिची कन्या इनेझ ऑलिव्हेर्स यांना त्यांच्या हयातीच्या अखेरपर्यंत ती मिळत राहावी आणि तदनंतर ती चर्चच्या, ' सोसायटी फॉर द प्रॉपगेशन ऑफ द फेथ ' च्या कारणीं लागावी. बिशपच्या कॅथेड्रल निधीचा उल्लेख करणारें कलम, दुर्दैवानें, त्यांत दाखल करण्याचें राहून गेलें होतें.

त्या तरुण वकीलानें फादर व्हेलंटच्या कानीं घातलें कीं ऑलिव्हेर्स बंधूंनीं अल्बुकर्कच्या एका मोठ्या कायदेविषयक फर्मला आपल्यातर्फे नेमून मृत्युपत्राचा वाद कोर्टांत लढविण्याचें ठरविलें होतें. त्याच्या आक्षेपाचा मुद्दा होता तो हा कीं सिनोरा ऑलिव्हेर्सची कन्या असूं शकणें अशक्य इतके इनेझ ऑलिव्हेर्सचें वय होतें. डॉन अंतोनिया त्याच्या उमेदींत खूप रंगेल होता आणि त्याच्या भावांचें म्हणणें कीं इनेझ ही अशा एखाद्या लग्नबाह्य अनैतिक संबंधांत जन्म घेतलेली मुलगी होती. डोना इसबेलानें फक्त तिचें पालन पोषण तेवढेंच केलें होतें. ओ' रेलीनें ऑलिव्हेर्स जोडप्याच्या लग्नविषीसंबंधांतले कायदेशीर

कागदपत्र तसेंच इनेझची जन्म-नोंद आणविण्याकरतां न्यु ऑर्लिन्सला आपल्या माणसाला पाठविलें होतें. परंतु सिनोरा ऑलिव्हेर्स जन्मली त्या केनटकीमध्यें जन्म-नोंद ठेवण्याची पद्धत नव्हती आणि त्यामुळें सिनोरानें वय सिद्ध करण्याचा कोणताच भरीव पुरावा उपलब्ध नव्हता. आणि आपलें खरें वय कबूल करण्याला तिला भाग पाडणेंहि योग्य नव्हतें. सांता फेमध्ये सर्वसाधारणपणेंच असें मानण्यांत येत होतें कीं सिनोराचें वय फार तर चाळिशीचें असेल. प्रत्यक्षांत ती पन्नाशीपलिकडली बाई होती. परंतु हें कोर्टांत सांगा म्हणून ओ ' रेलीनें तिला आग्रह करण्याचा प्रयत्न केला तेव्हां तिनें मुळीं त्याचें म्हणणें मनावर घेण्याचेंच काय, पण नीट ऐकण्याचेंहि नाकारलें. या बाबतींत बिशपनें आणि फादर व्हेलंटनें आपलें वजन तिच्याकडे खर्च करावें असें त्याचें म्हणणें होतें.

एवढ्या नाजुक बाबतीत पडण्याला फादर लतूर कचरला. परंतु फादर व्हेलंटनें मात्र त्या दोन स्त्रियांचें रक्षण करणें आणि आपलें धार्मिक हक्क अबाधित राखणें हीं दोन्हीं आपलीं कर्तव्यें असल्याचें जाणून तात्काळ बाहेर पडण्याचा झगा चढवला आणि ते दोघे लाल चिखल तुडवीत गावाच्या पूर्वेकडल्या टेकड्यांतल्या ऑलिव्हेर्सच्या घराकडे निघाले.

नव–वर्षाची मेजवानी झाली त्यानंतर फादर जोसेफ तिकडे पुन्हा याआधीं गेलेला नव्हता. एवढ्यांतच अवकळा आलेलें तें घर नजीक येतांच त्यानें एक उसासा टाकला. लोखंडी हूक गायब झाल्यानें पुढलें मोठें फाटक एका गजाच्या अंतरानें उघडें पडलें होते. अंगणांत चिंध्या, कचरा आणि कुत्र्यांनीं आणून टाकलेलीं हाडकें विखुरलीं होतीं. अंगणाला, त्या साऱ्या जागेला व्यवस्थेचा, निगेचा स्पर्श कित्येक दिवसांत झालेला दिसत नव्हता. सदरेवरचा मोठा पिंजरा गलिच्छ झाला होता आणि आंतले पोपट कर्कश ओरडत सारखे फडफडत होते. बाहेरच्या फाटकापासची घंटी ओ ' रेलीनें वाजवली तेव्हा बँजो वाजवणाऱ्या ' पाब्लो ' नें विस्कटल्या केसांनीं, मळक्या सदऱ्यानें बाहेर धांवत येऊन पाहुण्यांना आंत घेतलें. मोठाल्या ' लिव्हिंग रूम ' मध्यें त्यानें त्याना नेलें. ही ओकी आणि थंड वाटत होती. शेकोटी विझलेली होती. तिच्या जवळपासची स्वच्छता देखील कोणी केलेली नव्हती. खुर्च्यांवर खिडक्यांच्या कडांवर लाल धूळ सांचली होती. कांचेचीं तावदाने मळलीं होतीं. कसले तरी शिंतोडे त्यांवर सांकळलेले दिसत होते लिहिण्याच्या मेजावर रिकाम्या बाटल्या, चिकट ग्लासें आणि चिरूटाचीं जळकीं थोटकें पडलीं होतीं. एका कोपऱ्यांत हिरव्या वस्त्रांत गुंडाळलेला ' हार्प ' टेकून ठेवलेला होता.

पाब्लोनें फादर्सना बसण्याची विनंति केली. त्याची मालकीण जरा आजारी असल्यानें बिछान्यांतच होती आणि स्वैपाकिणीनें तिचा हात भाजून घेतला असून इतर नोकराणी आळशी असल्याचें तो म्हणाला. त्यानें तेवढ्यांतल्या तेवढ्यांत थोडा लाकूडफाटा आणून शेकोटी तयार केली.

कांहीं वेळानें डोना इसबेला तिथें आली. सुतकाच्या पोषाखांत ती होती. पोषाखाच्या काळ्या रंगाच्या विरोधानें तिची पांढुरकी काया उठून दिसत होती. तिचे डोळे लाल होते. मानेजवळच्या, कानांजवळच्या बटा फिकुटल्या होत्या, जवळ जवळ राखी रंगाच्या झाल्या होत्या.

फादर व्हेलंटनें तिला अभिवादन करून सांत्वनाचे आणि समजुतीचे चार शब्द सांगितल्यावर बरोबरच्या तरुण वकिलानें पुन्हा एकवार फार सौम्य सुरांत तिला त्यांच्यापुढच्या अडचणींची आणि त्या परतवणें असेल तर काय करणें जरूर आहे त्याची कल्पना देण्याला सुरुवात केली. ती मुग्धपणें बसून ऐकत होती. मधून मधून हातच्या लेसच्या रुमालानें डोळे, नाक टिपीत होती. तो म्हणत होता त्याचा अर्थ समजावून घेण्याचा तिचा प्रयत्न मुळींच दिसत नव्हता.

लौकरच फादर जोसेफचा संयम सुटला आणि तो स्वतः तिच्यापाशीं गेला. त्यानें भराभर बोलण्याला सुरुवात केली, "माझ्या पोरी, तुझे दीर तुझ्या नवऱ्याच्या इच्छा फोल ठराव्या म्हणून, तुझें आणि तुझ्या मुलीचें नुकसान व्हावें म्हणून आणि परिणामीं चर्चलाहि घस यावी म्हणून किती खटपट करीत आहेत याची. ही वेळ बालिश कुलीनतेची नाहीं. तुझ्या पतीच्या स्मृतीच्या होऊं बघणाऱ्या या अवमानाला पायबंद बसावा अशी तुझी इच्छा असेल तर तूं मॅडमॉयसेल इनेझची आई असण्याइतकी वयस्क आहेस हें कोर्टांत शपथेवर सांगायला हवेंस. निश्चयानें तुझें खरें वय—त्रेपन्न वर्षें, खरें ना?—तूं तिथें जाहीर करायला हवेंस."

भीतीनें इसबेलची मुद्रा जास्तच उतरली. खोल सोफ्याच्या दुसऱ्या टोकाशीं ती गळून बसून राहिली. त्यांतहि मग तिच्या निळ्या नजरेंत पुन्हा एक चमक आली. ती तिच्या कांपऱ्यांतच प्रकर्षानें चुळबुळत राहिली. तिची पाठ भिंतीला टेकलेली होती.

भयग्रस्त नवलानें तिनें म्हटलें, "त्रेपन्न! हें मी याआधीं कुणाकडून ऐकलें नव्हतें. गेल्या वाढदिवसाला तर मी बेचाळीस वर्षांची झालें. चार डिसेंबरला तो येऊन गेला. अंतोनियो असता तर त्यानें सत्य सांगितलें असतें, तसेंच त्यानें

तुम्हांला मला दटावूंहि दिलें नसतें आणि कामाच्या गोष्टीहि आपल्यांत अशा त्यानें होऊं दिल्या नसत्या, फादर जोसेफ, माझ्याशीं कोणी व्यवहार बोललेलें त्याला आवडत नसे." आपल्या चिमुकल्या रुमालांत तोंड लपवून ती रडूं लागली.

फादर लतूरनें त्याच्या अति उत्साही 'व्हिकर' ला आवरलें आणि तो स्वतः मादाम ऑलिव्हेर्सच्या नजीक, सोफ्यावर बसला. तिच्या अवस्थेबद्दल त्याला फार वाईट वाटलें होतें आणि बोलतांना त्याचा स्वर फार मृदु होता. "हें पहा मादाम ऑलिव्हेर्स, तुमच्या स्नेह्यांच्या आणि जगाच्या दृष्टीनें तुम्ही बेचाळिशीच्या. तरी पण मनानें आणि कायेनें तुम्ही त्याहूनहि तरुण आहांत. परंतु कायदा आणि चर्च या दोहोंच्या दृष्टीनें हिशोब हवा तो व्यवहाराच्या रोखठोक पद्धतीचा. दृष्टीपेक्षां पुराव्यानें पटण्याजोगा. कोर्टांत तुम्ही एक वर वरच्यापुरता, तात्पुरता जबाब दिलात तरी तुमच्या स्नेह्यांच्या दृष्टीनें कांहीं तुम्ही वयस्क ठरणार नाहीं. तुमच्या चेहऱ्यावर कांहीं त्यानें एकदेखील सुरकती वाढणार नाहीं. स्त्रीचें वय तिच्या चेहऱ्यावर असतें तें, असें तर मानण्याची पद्धतच आहे."

जरा गहिंवरून, कंपयुक्त आवाजांत, ओल्या डोळ्यांनीं फादरकडे पहात मादाम ऑलिव्हेर्स उद्‌गारली, "तुम्ही असें म्हणतां हा तुमचा भलेपणा, बिशप लतूर. पण एकदां मी तुम्ही सांगतां असा जबाब दिला कीं पुन्हां तोंड वर काढण्याला या जगांत मला जागा रहाणार नाहीं त्यापेक्षां इस्टेटीचा सारा पैसा 'त्यां'च्या भावांना घेऊं द्या. मला नको तो."

यासरशीं फादर व्हेलंट जागचा ताड्‌दिशीं उठून तिच्याकडे डोळे वटारून पाहूं लागला. जणूं तशा डोळ्यांच्या क्षेपानें तो तिच्या अवनत मस्तकांत नवा प्रकाश पाडणार होता. तो चीत्कारला, "चार लाख पेसॉस, सिनोरा! उरलेलें आयुष्यभर तुम्हांला, तुमच्या कन्येला सुखाचे दिवस लाभतील याची एकमात्र हमी! तुमच्या कन्येला काय भिकारीण बनवण्याचा तुमचा विचार आहे? ते लोक सारें सारें घेउन बसतील."

ती बाई म्हणाली, "पण माझा इलाज नाहीं. नाहींतरी ती 'कॉन्व्हेण्ट' मध्यें जायचें असेंच म्हणते आहे. आणि मला स्वतःला त्या पैशाचें महत्त्व वाटत नाहीं. 'त्यां'च्याविना आतां कशाला अर्थ उरला आहे?"

फादर जोसेफनें तिचा थंडगार हात हातीं धरला. "परंतु तुमच्या विश्वासावर सोडण्यात आलेल्या त्या पैशांतल्या चर्चच्या वांट्याच्या भागाबद्दल तर तुम्हांला काळजी आहे? का तुमच्या वर्तनानें तुम्ही चर्चचा तो फायदाहि

गमावणार आहांत ! असें केलेंत तर परिणाम काय होतील यांचा विचार तुमचा तुम्हीं केला आहे ? ”

फादर ल्तूरनें कडक नजरेनें ‘ व्हिकर’ कडे रोखून पाहिलें. “ पुरे. ” तो संथपणें म्हणाला. व्हिकरनें सोडलेला सिनोराचा हात हातीं घेऊन, वांकून, त्यानें आदरपूर्वक त्याचें चुंबन घेतलें आणि तो म्हणाला, “ जास्त आग्रह आपण करता कामा नये. मादाम ऑलिव्हर्सना, त्याच्या अंतरात्म्यालाच काय तें ठरवूं द्या. माझ्या मुली, मला मात्र वाटतें कीं विचारातीं तुला कळेल कीं वृथा मानाच्या तुझ्या कल्पनेचा त्याग केल्यानेंच तुझ्या आत्म्याला शांति लाभेल. या बाबतींत केवळ ऐहिक बाजू पुरता विचार करायचा तर मुली, तुला दारिद्य जांचक होईल. त्या लोकांच्या भिकेवर तुला चरितार्थ चालवावा लागेल, होय ना ? मला तरी असें घडलेलें पहाण्याची इच्छा नाहीं. यांत माझाहि कांहीं स्वार्थ आहे; नाहीं असें नाहीं. तूं या घराची शान सांभाळून राहावेंस आणि आम्हांला आमच्या कष्टप्रद कामांत इथें केव्हां तरी घटकाभराचा विरंगुळा लाभावा हा माझा स्वार्थ. इथें ती गोष्ट आम्हांला दुर्लभ आहे. ”

मादाम ऑलिव्हेर्स रडण्याची थांबली. तिनें मस्तक वर उचललें आणि ती डोळे कोरडे करूं लागली. एकाएकीं तिनें बिशपच्या झग्याचें एक बटन पकडलें आणि ती तें बेचैनपणें उलटसुलट फिरवूं लागली.

बिचकतच ती म्हणाली, “ फादर, इनेझची आई शोभायला मला तरूणपण ठेवून किती वयाचें झालें पाहिजे ? ”

बिशपला निर्णय देतां येईना; तो कचरला, जरा शरमला, आणि हातानेंच त्यानें त्या प्रश्नाचें उत्तर ओ’ रेलीकडे सोंपवलें.

हा तरुण वकील आदराच्या सुरांत म्हणाला, “सिनोरा ऑलिव्हेर्स ते बावन्न असायला हवें. तेवढें तुमच्याकडून मी कोर्टांत कबूल करवून घेऊं शकलों आणि तुम्ही त्यालाच चिकटून राहिलांत तर ही केस मी जिंकून देतो.’

“ ठीक आहे मिस्टर ओ’ रेली. ” तिनें मस्तक वांकविलें. पाहुणे जागचे उठले आणि निघाले तेव्हां ती धूळभरल्या जाजमांकडे नजर लावून बसली होती. “ सर्वांसमक्ष !” ती, जणूं स्वतःशींच पुटपुटली.

घराकडे परतत असतां, फादर जोसेफ म्हणाला कीं, त्याच्यापुरतें बोलायचें तर एखाद्या सबंध इंडियन गांवच्या आंधळ्या श्रद्धांशीं झगडणें त्याला, एका गोऱ्या बाईच्या मानाच्या खोट्या कल्पनेशीं झगडण्यापेक्षां परवडलें असतें.

बिशप म्हणाला, “असला प्रसंग पुन्हां नको. यापेक्षां दुसरें कांहींही मला

परवडेल. इतक्या कठोर अशा एकाद्या कामांत मी कुणाला यापूर्वी सहाय्य केलें असेन असें मला तरी वाटत नाहीं."

बॉइड ओ' रेलीनें ऑलिव्हेर्स बंधूंना त्या केसमध्यें हरवलें. केस जिंकली. कोर्टातल्या सुनावणीला हजर रहाण्याला विशेष तयार झाला नाहीं परंतु फादर जोसेफ मात्र प्रेक्षकांच्या उभ्या गर्दीत उपस्थित होता. ओ रेलीनें मनांतल्या भयापोटच्या अनिश्चिततेनें त्याच्या अशीलाकडे बोट रोखून तो प्रश्न केला तेव्हां फादर जोसेफचे पाय क्षणभर लटपटले.

"सिनोरा ऑलिव्हेर्स, तुमचे वय बावन्न वर्षांचें आहे, होय किंवा नाहीं?"

मादाम ऑलिव्हेर्सच्या अंगावर सुतकाचाच गडद काळा पोषाख होता आणि त्यावर तिची पाढुरकी मुद्रा जास्तच फिक्कट दिसत होती.

"होय महाराज." जेमतेम ते शब्द कोर्टाला ऐकूं गेले.

निकाल जाहीर झाल्यानंतरच्या रात्रीं, मानुएल शावेझ आंतोनियोच्या अनेक जुन्या स्नेह्यासहित मादाम ऑलिव्हेर्सचें अभिनंदन करण्याकरता आला. तो येणार ही बातमी आधींच गावांत पसरली होती आणि इतरहि अनेक परिचित माणसें, बाहेरच्या मांणसांना वर्ज्य असलेल्या त्या घरीं जाऊन यायच्या तयारींतच होतीं. संध्याकाळीं घरांत बरीच गर्दी जमली. यांत लष्करी अधिकारीहि होते, ऑलिव्हेर्सच्या बंधूचे जुने, वंशपरंपरागत शत्रूहि यांत होते.

पुन्हा एकवार गजबजलेलें घर पाहून स्वैपाकिणीनें घाईघाईनें स्वैपाक केला. पाब्लोनें पांढरा सदरा आणि व्हेल्वेटचें जाकीट चढवलें धन्याच्या संग्रहींचें उत्कृष्ट मद्य तो पाहुण्यांकरता आणून पुरवूं लागला. यांत व्हिस्की होती, शेरी होती. ( मेक्सिकनांना फसफसत्या मद्याची चव विशेष याआधीं कांहीं वर्षें, सांता फेमधल्या मेक्सिकन लष्करी आधकाऱ्याशीं कांहीं विशेष राजकीय वितुष्ट आलेल्या एका अमेरिकन व्यापाऱ्यानें त्याची मर्जी पुन्हां संपादन करण्याकरतां त्यांना शांपेनचा मोठा सांठा नजर केला होता. नक्की सागायचें तर त्या तीन हजार तीनशें ब्याण्णव बाटल्या होत्या!)

पाहुणचाराचें वातावरण त्या घरांत अचानकच स्फुरलें, पूर्वतयारी बिलकूल नव्हती. मद्याच्या चषकांवर धूळ सांचलेली होती ती पाब्लोनें अंगांतून काढलेल्या सदऱ्यानेंच भराभरा पुसून काढली. आणि कोणी न सांगतां सुचवतांच तो मद्याचे भरलेले चषक पाहुण्यांपुढें वारंवार नेत सुटला. डोना इसबेलानें देखील थोडी

शांपेन घेतली; सैन्यांतल्या तरुण जॉर्जिअन कॅप्टनच्या आग्रहानें तिनें एक चषक रिता केल्यावर नजीकच्याच शेजारी फर्दिनद सांशेझच्या सांगीवरून आणखी एक घेणें प्राप्तच झालें. तिच्या नवऱ्याचा तो विश्वासू मित्र तर होता ! प्रत्येकजण उल्हासित होता., नोकर चाकर आणि पाहुणे सारख्याच उमेदींत वावरत होते. पावसाच्या पहिल्या सरीनंतरच्या बागेसारखें सारें वातावरण टवटवलें होतें.

इतकीं माणसें जमणार याची वार्ता फादर ल्तूर वा फादर जोसेफला नव्हती. ते सकाळीं आठ वाजतांच त्या विधवेच्या भेटीकरतां निवासस्थानाहून निघाले. अंगणांत शिरतात तों आतले संगीताचे सूर आणि सताड उघड्या खिडक्या पाहून त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं. दार वाजवण्याला न थांबतांच त्यांनीं आंत प्रवेश केला. बऱ्याच मेणबत्त्या तेवत होत्या. सर्व बटनें लावलेल्या पायघोळ कोटांत पाहुणे उभे होते. ओ रेलीनें आणि लष्करी अधिकाऱ्यांनीं मद्याच्या साठ्याशीं कोंडाळें केलें होतें. तिथें पाब्लो, मनगटाला पांढरा नॅपकिन बांधून रिकाम्या चषकात शांपेन ओतीत होता. खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून हार्पचे सुस्वर उठत होते आणि त्यांत मिसळून डोना इसबेलाचा आवाज :

"लिसन टु द मॉकिंग बर्ड...

लिसन टु द मॉकिंग बर्ड !"

तें गाणें संपेपर्यंत ते दोघे धर्मगुरू दाराशीं थांबले, नंतर यजमानिणीला अभिवादन करण्याकरितां पुढें झाले. मनाच्या व्यथित स्थितींतहि शक्य आणि योग्य तेवढे झगझगीत कपडे तिनें घातले होते आणि केसांच्या बटा पूर्वीसारख्या पुन्हां रुळत, झुलत होत्या. उजव्या कानामागें तीन, कपाळाच्या एकेका उंचवट्यावर एक आणि आगेमागें त्यांची एक छोटीशी रांगच. काळ्या पोषखांतल्या या दोन आकृति आपल्या दिशेनें येत असल्याचें ध्यानीं येतांच तिनें 'हार्प' वरचे हात खालीं केले, आणि दोघांपुढें दोन हात करीत ती जागची उठली. तिच्या नजरेंत चमक होती, आणि धर्मगुरूंविषयींच्या जिव्हाळ्यानें तिची मुद्रा उजळून निघाली होती. मात्र तिनें त्यांचें स्वागत केलें तें जरा दटावणीच्या आणि सर्वांना ऐकूं जावें अशा सुरात :

"फादर जोसेफ, तुम्हाला मी केव्हाहि क्षमा करणें शक्य नाहीं. आणि तुम्हांलाहि बिशप ल्तूर. माझ्या वयाबद्दल कोर्टांत तुम्ही चक्क मला खोटें बोलायला लावलेत !"

मोठ्या हंशांत आणि टाळ्यांच्या गजरांत त्या दोघां धर्मगुरूंनीं मस्तकें वांकविलीं.

# सातवा खण्ड

.१.

भोंवतालच्या आणि बाहेरच्याहि अनेक घटनांनीं बिशपचें त्या भागांतलें कार्य कांहीं वेळां जोम धरी तर कांहीं वेळा त्यांत अडथळेहि निर्माण होत.

फादर लतूर सांता फेला येण्याआधीं तीन वर्षें, 'गॅड्सडेन सौदा' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका सौद्यानें अमेरिकेनें मेक्सिकोकडून बराच प्रदेश खरेदी केला होता. (आज हा न्यु मेक्सिकोचा दक्षिण भाग आणि आरिझोना म्हणून ओळखला जातो.) या संदर्भांत रोमच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनीं फादर लतूरला कळवलें होतें कीं हा नवा टापू त्यानें त्याच्या अखत्यारांत रिचवावयाचा होता परंतु राष्ट्रीय सीमामुळें अनेकदां अखंड 'पॅरिशेस' खण्डित होत त्यामुळें 'चर्च'च्या या टापूबाबत चिहुआहुआ आणि सोनोराच्या मेक्सिकन बिशपांशीं वाटाघाटी होणें आवश्यक होतें. या वाटाघाटींसाठीं जायचें तर सुमारें चार सहस्र मैलांचा प्रवास करावा लागणार होता. फादर व्हेलंट म्हणाला त्याप्रमाणें घोड्यांवरच्या दोन मिशनऱ्यांना इतिहासाच्या धांवेशीं बरोबरी करणें शक्य नाहीं हें अद्याप रोममध्यें कुणाला कळलेलें नव्हतें.

कांहीं वर्षें हा प्रश्न तसाच भिजत पडला होता, त्यावर ढीगभर पत्रव्यवहार झाला होता. अखेर १८५८ मध्यें फादर व्हेलंटला संबंधित मेक्सिकन बिशपांशीं चर्चा करून सीमा-प्रश्न सोडविण्याकरतां बिशपनें धाडून दिलें. तो शरदांत निघाला आणि सबंध हिंवाळा त्याला वाटचालींत घालवावा लागला. एल पासो डेल नॉर्तेहून पश्चिमेकडे टुस्कॉनला, तिथून सांता मॅग्डालेना आणि ग्यामाजला. ग्यामाज हें कॅलिफोर्नियाच्या सामुद्रधुनींतलें सागरी बंदर. घराकडे परतण्याआधीं कांहीं जलप्रवासही त्यानें केला.

परतीच्या प्रवासांत पिण्याला गढूळ पाणी आणि उघड्यावर वावर यामुळें हिंवतापानें तो पछाडला गेला आणि आरिझोनाच्या वाळवंटांत तो कांहीं दिवस

रुग्णावस्थेंत बेहोष पडून होता. एका इंडियन निरोप्यानें त्याच्या आजाराची वर्दी सांता फेला आणली आणि फादर लतूर आणि जार्किंतो न्यु मेक्सिकोवाटें निम्मा आरिझोना पार करून त्याच्यापर्यंत पोंचले आणि टप्प्याटप्प्यानें त्यांनीं त्याला परत सांता फेला आणलें.

दोन महिने तो बिशपच्या घरीं आजारीच होता. सांता फेला आल्यावर त्यानें आणि बिशप लतूरनें लावलेल्या बागेची मजा लुटण्यांत दोघेही एकत्र असण्याची ही पहिलीच खेप.

तो मेरीचा महिना होता. मे महिना होता. फादर व्हेलंट एका लष्करी बाजे-वर, अंगावर पांघरूण घेऊन बागेत द्राक्षवेलींखालीं पहुडला होता. बिशप आणि माळी बागेतल्या भाजीच्या वाफ्यात काम करीत होते, त्यांना न्यहाळत होता. सफरचंदाचीं झाडें बहरलीं होतीं, चेरीचा बहर उलटून गेला होता. वसंत ऋतूंतल्या वाऱ्याच्या झुळकांनीं हवा आणि धूळ वारंवार एकमेकांत मिसळत होतीं. सर्वभर सूर्यप्रकाश पसरला होता आणि तो लाल धुळीनें भरला होता. जमिनीच्या अनेक गंधांनीं नाकपुड्या भरून जात होत्या, आणि पायाखालच्या हिरव्यागार गवतात निळ्या आभाळाचें प्रतिबिंब सांपडत होतें.

सहा वर्षांपूर्वीं योजिलेली, आखलेली ही बाग. सेंट लुईहून गाडीनें बिशपनें लॉरेटोच्या सिस्टर्सबरोबर फळझाडें आणवलीं होतीं. या सिस्टर्स 'अॅकेडेमी ऑफ अवर लेडी ऑफ लाइट'च्या स्थापना-कार्याकरतां आलेल्या होत्या. तें विद्यालय आतां चांगलें नावारूपाला आलें होतें, लोकांच्या उपयोगी येत होतें. झाडेंही मोठीं होऊन फळाफुलांनीं डंवरत होतीं. त्यांच्या कलमांनीं आसपासच्या अनेक मेक्सिकन बागा शोभत होत्या. बिशप बाल्टिमोरच्या प्रवासाला गेला असता, फादर जोसेफनें, अनेक अधिकृत कामाच्या जोडीला, त्यांच्या मेक्सिकन नोकराणीला, फ्रुक्तोसाला, सैंपाकाचे धडे दिले होते. पुढें बिशप लतूरनें फ्रुक्तो-साच्या नवऱ्याला, त्राक्विलिनोला, हातीं धरून त्याला बागकामांत तयार केलें. त्यांनीं मग बागेच्या विकासाच्या मोठ्या योजना आंखल्या होत्या. त्यानंतर बिशपनें त्या दिशेनें खूपच काम केलें होतें नाहीं तरी त्याला छंद हा एवढाच होता.

चर्चच्या अंगणांतून विद्यालयाकडे जाणाऱ्या वाटेवर दुतर्फा कोवळ्या पॉप्ल-र्सच्या हारी होत्या. दक्षिणेकडे, मातीच्या भिंतीलगत, ते तिथें आले तेव्हांपासून वाढत असलेलीं कांहीं वेड्यावांकड्या फांद्यांचीं 'टॅमारिस्क' झाडें हारीनें

उभी होतीं. त्यांच्याकडे कोणीच लक्ष दिलें नव्हतें आणि वाईट जागीं उगवून, जगण्याकरतां एकाकी धडपडतांना त्यांच्या फांद्यांना 'सायप्रस' चा निबरपणा आला होता. ते खूप पुरातन, गुळमळीत आणि अधून मधून नाजुक गुलाबी फुलांनीं बहरण्याचा वर असलेले खांबच वाटत होते.

इतर साऱ्या झाडापेक्षां फादर जोसेफला याच टॅमारिस्क झाडांबद्दल प्रेम वाटे. त्याच्या साऱ्या फिरतींत या झाडांची त्याला सोबत झाली होती. न्यु मेक्सिको आणि आरिझोनाच्या वैराण प्रदेशांतून फिरत असतां मेक्सिकन वस्तीशीं आले की न चुकतां हीं झाडें त्याचें स्वागत करीत. घरचें तट्टू त्याच्या बुंध्याला बांधलेलें असे, बाजूला कोंबडीं जमीन उकरीत असत, त्याच्या छायेंत कुत्रीं विसावलेलीं असत आणि त्याच्या फांद्यावर धुतलेले कपडे वाळत घातलेले असत. फादर लतूर नेहमीं म्हणे कीं या जमिनीला, इथल्या घरांना, माणसांना शोभावींत आणि त्यांच्या उपयोगी यावीत अशाच पद्धतीनें जणूं या झाडांचा आकार, रंग घडविण्यांत आला होता. त्यांचा बहरही बराचसा मातीच्या रंगाच्या वेगळ्या छटेचा असे. त्यांच्या बुंध्यावर लाल सोनेरी रंगाच्याच विविध छटा असत. बिशपच्या असल्या गोष्टींविषयींच्या व्यासंगाबद्दल फादर जोसेफला आदर होता, परतु त्याला स्वतःला हीं झाडे आवडत कारण तीं 'जनते'चीं झाडे होतीं, प्रत्येक मेक्सिकन कुटुंबांत माणसांइतकें अशा झाडाचें अस्तित्व अपरिहार्य असे.

हे दिवस फादर व्हेलंटला फार सुखाचे, समाधानाचे जात होते. त्याच्यापुरता वर्षांतला पवित्र महिना म्हणून हा महिना त्याच्या बालपणी त्यानें ठरवूनही, गेलीं कित्येक वर्षें तशा स्वस्थपणें आणि चिंतनांत गढून त्याला तो पाळता आलेला नव्हता. त्याच्या धर्मोपदेशकाच्या जुन्या जीवनांत, ग्रेट लेक्स भागांतल्या आयुष्यांत, या दिवसांत तो दैनंदिन व्यवहारांतून जवळ जवळ मुक्त होऊन धर्मकर्मांत हा काळ घालवी. इथें मात्र तशी उसंत नव्हती. गतवर्षीं, मेमध्यें, होपि इंडियन्सच्या भागाकडे तो निघालेला होता. दिवसाला तीस मैल कापीत होता. वाटेंत कोणाचीं लग्नें लावीत होता. कोणाचे 'बॅप्टिझम्स' करीत होता आणि कुणाच्या 'कन्फेशन्स' ऐकून घेत होता. रात्रीं वाळूच्या टेकडांत मुक्काम टाकायचा. पुन्हा भल्या सकाळीं पुढल्या वाटेला लागायचें. व्यवहारांतल्या अनेक विचारांनीं आणि दगदगींनीं धर्मकर्मांत सारखा व्यत्यय येई.

परंतु यंदा, या आजारामुळे, हा मेरीचा महिना मेरीसाठींच व्यतीत करण्याची संधि लाभली होती. जागृतींतले बहुतेक तास तो तिच्या चिंतनांत घालवीत होता. तिच्या कृपेच्या छायेंत रात्रीं निवान्त झोंपत होता. सकाळीं तो जागा होई

तेव्हां, डोळे उघडण्याआधीं, हवेंत एक विशेष मधुर गंध त्याला जाणवे—मे. मेरीचा महिना. Alma Mater redemptoris! पुन्हां एकवार एकाद्या तरुण धर्मनिष्ठाच्या उत्साहानें तो पूजा करूं शकत होता. कसली घाई नव्हती कीं मिशनऱ्यांच्या पाचवीला पुजलेली चिंता नव्हती. पुन्हा एकवार हा महिना त्याच्या हक्काचा उरला होता. देवदयेनें हें घडलें होतें. त्याच्या धार्मिक जीवनांत याचें महत्त्व फार होतें.

जुन्या काळच्या एका स्मृतीनें त्याच्या जिवणीवर स्मित पसरलें. तो काळ—पुय-ड-डोममध्यें सेंड्र गांवीं तो 'क्युरेट' असतांनाचा काळ—तारुण्याचा काळ. मे महिन्यांत व्हर्जिन मेरीच्या उपासनेचा नवाच विशेष बेत त्यानें मनांत योजला होता. आणि आयत्या वेळीं त्याच्या वरिष्ठ म्हणून काम करणाऱ्या म्हाताऱ्या धर्मगुरूनें त्याच्या या बेताला सुरूंग लावला होता. त्यानें निर्विकार नापसंती व्यक्त केली. म्हातारा जुन्या पठडींतला, कडक शिस्तीचा आणि कांहींसा 'जान्सेनिझम'च्या वळणावरचा होता. तरुण फादर जोसेफनें त्याचा नकार अत्यंत लीनतेनें स्वीकारला आणि विषादयुक्त मनानें तो आपल्या खोलीकडे निघून गेला. मग 'रोजरी' घेऊन तो दिवसभर प्रार्थनेंत गढला होता: "Not according to my desires, but if it is for thy glory, grant me this boon, O Mary, my hope." मेरी माते, माझ्या इच्छेखातर नव्हे, तुझ्या महिम्याखातर मला एवढा वर दे, माझी इच्छा पुरव...त्याच दिवशीं संध्याकाळीं म्हाताऱ्या 'पॅस्टर' नें त्याला बोलावून घेतलें आणि सकाळीं कठोरपणें नाकारलेली परवानगी त्याला आपखुषीनें दिली. किती आनंदानें सिस्टर फिलोमेनला त्यानें हें लिहून कळवलें होतें. त्या काळांत ती त्याच्या 'रिओम' गांवीं 'व्हिजिटेशन'च्या जोगिणींत राहून शिकत होती. आपल्या मे महिन्याच्या व्रताखातर कागदाचीं कांहीं सुंदर फुलें करून पाठवण्याला त्यानें तिला कळवलें होते. आणि तिनें तरी किती तत्परतेनें, किती प्रकारची फुलें करून धाडलीं होतीं. 'पॅरिश' मधल्या लोकांनीं—विशेषतः तरुणतरुणींनीं—मोठ्या प्रमाणावर वेळोवेळीं उपस्थिति ठेवून त्याचें व्रत यशस्वी केल्याचें कळल्यावर तिला त्याच्याइतकाच आनंद झाला होता. फादर व्हेलंटचें कुटुंब तसें फार आटोपशीर होतें, ऋणानुबंधाच्या चिवट धाग्यांनीं दृढपणें बांधले गेलेलें होतें. लहान असतांनाच त्या भावंडाची आई गेली होती त्यामुळें एकमेकांतले दुवे घट्ट बसलेले होते. या बहिणीशीं तर त्यानें आपलें सारें आध्यात्मिक जीवन, सुखें, दुःखें वाटून उपभोगलीं होतीं.

तेव्हांपासून नेहमीं, त्याच्या स्वतःच्या पूर्वायुष्यांतले बहुतेक महत्त्वाचे ठळक प्रसंग या पवित्र मे महिन्यांत घडत आले होते. जणूं 'ॲनन्सिएशन' साजरें करण्यांकरतां या महिन्यांत दर साल जग शुभ्र वस्त्रें परिधान करून किंचित्काल प्रत्यक्षांत 'काइस्टची वधू' ठरावें इतकें सुंदर होई. मेमध्येंच, आयुष्यांतला सर्वांत निर्घृण अनुभव घेण्याची संधि त्याला मिळाली होती. त्याला त्याचा देश सोडावा लागला होता, आवडत्या बहिणीचा आणि बापाचा वियोग घडला होता, (तो तरी किती दुःखद परिस्थितींत!) आणि मिशनऱ्याचे कष्ट उपसण्याकरतां त्याला 'नव्या-जगा' कडे यावें लागलें होतें. हा वियोग वियोग नव्हता—ही पळवाट होती—पळपुटेपणा होता—कोणत्या तरी उच्च गोष्टी-साठीं कौटुंबिक कर्तव्याशीं केलेला तो द्रोह होता. आतां तो त्या आठवणीवर हंसूं शकत होता, परंतु त्या वेळीं मात्र तो सारा मामला भयंकर वाटला होता. बिशपलाहि तो आठवत असावा. त्या विशिष्ट कालांत फादर लतूरविषयीं त्याच्या मनांत वसत होता तो आदर होता म्हणूनच आज तो सांता फेच्या या बागेंत असा विचार करीत पहुडला होता तसें म्हटलें तर फादर लतूरच्या विनंतीला मान देऊन त्यानें कदापि त्याचे आवडतें सँडस्की गांव सोडलें नसतें, या हालकष्टांत उडी घेतली नसती. परंतु त्या वेळीं फादरनें ती गोष्ट काढतांच त्याला वाटलें, "खरेंच; आता ते अडचणींत आहेत. मूढ आहेत. त्या दिवशीं रस्त्याकडेला आम्ही उभे होतों. पॅरिसच्या 'व्हिजिलन्सची प्रतीक्षा करीत होतों आणि माझा हेतूच फसला होता तेव्हां त्यानीं तर मला गोंधळांतून मुढा-वस्थेतून बाहेर ओढलें. वांचविलें. मला त्यांना सहाय्य केलेंच पाहिजे."

फादर व्हेलंटला तोहि काळ स्मरला, अगदीं नजीकचा वाटला आणि डोळ्यां कडेचें सांकळलें पाणी त्यानें निपटून काढले. (आजारपणांतल्या दुबळ्या अवस्थे-मुळें तो बराच हळवा झाला होता.) त्यानें चष्मा पुसला आणि म्हटलें,

"फादर लतूर जरा विश्रांति घ्या आतां. फार वेळ तसे अवघडून काम करताहां."

बिशप आला, आणि जवळच्या एका हातगाडीवर बसला.

"जोसेफ. मला वाटूं लागलें आहे कीं यापुढें आतां तूं लौकर बरा व्हावास म्हणून मी प्रार्थना करूं नये! माझा व्हिकर हाताशीं हजर ठेवण्याचा मार्ग एकच : त्याला आजारी पाडणें;"

फादर जोसेफ हंसला.

"बिशप, तुम्ही तरी सांता फेमध्यें असे फार कुठें असतां!"

"या उन्हाळ्यांत तरी रहाणार म्हणतों. आणि तुलाही ठेवतां यावें अशी इच्छा आहे. यंदा माझ्या बागेंतलीं कमळें तुला दाखवतो. त्रांक्विलिनो यंदा माझ्या तळ्यांत पाणी सोडील." हें तळें म्हणजे बागेच्या मध्यावरचें एक डबकें होतें. पाणी हेरून तें इष्ट जागीं वळवण्यात कोणीही मेक्सिकनाप्रमाणें तरबेज आणि कल्पक असणाऱ्या त्रांक्विलिनोनें सांता फेनजीकच्या कपारींतल्या एका झऱ्याचें पाणी इकडे वळवलें होतें. 'गेल्या उन्हाळ्यांत, तूं इथें नव्हतास तेव्हां," बिशप पुढें म्हणाला, "या डबक्यात निदान शंभर एक कमळें आम्हीं फुलवलीं होतीं. सारी रोममध्यें शोभेला मांडतों त्या जातीचीं."

"कधीं फुलतात तीं?"

"जूनमध्यें फुलायला सुरुवात होते, परंतु खरा बहार पहावा जुलैमध्यें."

"मग जरा घाई करायला हवी तुम्हांला त्याना. कारण माझ्या बिशपच्या परवानगीनें मी जुलैमध्यें इथून जाईन म्हणतों."

"इतक्या लौकर? तें कशाला?"

फादर व्हेलंट पांघरुणाखालीं जरा अस्वस्थपणें चाळवला. "जीं, उपेक्षित कॅथॉलिकाना शोधून मार्गावर आणण्यासाठीं हे उपेक्षित कॅथॉलिक्स तुमच्या नव्या प्रदेशांतले टुस्कॉननजीकचे. धर्मगुरू कसा असतो तेंहि यांतल्या अनेक कुटुंबांनीं कधीं पाहिलेले नाहीं. या खेपेला तिथल्या घराघरात जाऊन, प्रत्येक लहानसहान वसतींत शिरून हे लोक गाठायचे आहेत. त्यांच्यापाशीं अमाप श्रद्धा आहे, भक्ति आहे, आणि काहीं चुकींच्या अर्धसमजुतींव्यतिरिक्त तिला क्षेत्र नाहीं. त्याना प्रार्थना येते ती सारी चुकीची. त्यांना वाचतां येत नाहीं, आणि कोणी शिकवायला नसल्यानें त्याना मार्गावर तरी कोण आणून सोडणार? खूप सकस परंतु पाण्याविना मरणाऱ्या, निरुपयोगी होणाऱ्या बीजासारखी त्यांची अवस्था आहे. केवळ कोणी त्यांना गाठलें तर सारे चर्चच्या सेवेंत रुजू होतील. या मेक्सिकनात मीं जितका जास्त काम करतों तितकें जास्तच वाटूं लागलें आहे कीं यांच्याबद्दल प्रभू म्हणाला असला पाहिजे "Unless ye become as little children". जगाच्या व्यवहारात तरबेज नसलेले, स्वार्थावर आणि भौतिक विकासावर नजर नसलेले असे लोकच हे उद्गार काढते वेळीं त्याच्या मनांत असावेत. आमच्याकडच्या खेडवळांसारखे हे लोक कंजूष नाहींत. खाजगी मालमत्तेचें कौतुक त्यांना नाहीं. भौतिक मूल्यांची जाणच त्यांना नाहीं. एकाद्या गांवांत कांहीं तास मी मुक्काम टाकतो, मी धर्मविधी उरकतों, 'कन्फेशन्स' ऐकतों, प्रत्येक घराघरांतून 'रोजरी' म्हणा, एखादें धार्मिक चित्र म्हणा, अशी कांहीं माझी खूण

ठेवून निघतों, आणि निघतांना वाटतें तें फार कांहीं सुख त्यांना प्राप्त करून दिल्याचें समाधान. उपेक्षेनें ईश्वरापासून तुटल्या स्थितींत ठेवलेल्या निष्ठावान् जीवांना मुक्त केल्याचें सुख.

"टुस्कॉननजीक एका ठिकाणीं क्रिस्ती झालेल्या एका पिमा इंडियननें मला, त्याच्याबरोबर वाळवंटांत जाऊन तो दाखवील तें फार महत्त्वाचें काहीं पहाण्याला विनवलें होतें. त्यानें मला नेलें तें एका रानटी स्थळीं, हें स्थळ एवढें रानटी होतें कीं नवागताला त्याला तिथें आणणाऱ्या माणसाविषयीं अविश्वास आणि स्वतःच्या जीवाची काळजीच वाटावी. काळ्या खडकाच्या एका कपारींत आम्ही उतरलों. आणि तिथें, एका गुहेच्या खूप आंत त्यानें मला ' मास ' साजरा करण्याकरतां वापरण्याची सोन्याची 'चलिस', आणि धार्मिक वस्त्रें दाखवलीं. स्थानिक मिशनवर ' ॲपेक ' इंडियनानीं हल्ला केला, तें लुटलें तेव्हां त्याच्या पूर्वजांनीं हें साहित्य इथें आणून लपवून ठेवलें होतें. किती जुन्या काळीं, तें त्यालाहि माहीत नव्हतें. त्याच्या कुटुंबांत ही गुप्त गोष्ट पिढीकडून पिढीला मिळत त्याच्यापर्यंत पोचली होती. आणि ईश्वराला त्याच्या जागीं प्रस्थापित करण्याकरता त्या भागात त्यानतर गेलेला मी पहिला धर्मगुरू. त्या रानवट भागांत, श्रद्धा एकाद्या गुप्त खजिन्याच्या स्थितीत आहे. ते ती राखतात परंतु तिचें करावें काय, आणि ती आत्मोन्नतीकरतां कशी वापरावी हें त्यांनाहि कळत नाहीं. त्या आत्म्यांना त्यांच्या बंधनांतून मुक्त करण्याला एकादा शब्द, एकादी प्रार्थना, एकादें प्रवचन पुरतें. मला त्या मिशनविषयीं जरा जादा प्रेम आहे हें मी कबूल करतों. ईश्वराच्या त्या उपेक्षित लेकरांना पुन्हा प्रभूच्या पायाशीं नेणारा मी ठरावा ही माझी आस आहे माझ्या आयुष्यांतलें हें सर्वश्रेष्ठ सुख ठरेल."

या विनंतीला बिशपनें तात्काळ कांहींच उत्तर केलें नाहीं. अखेर तो बोलला तो अत्यंत गंभीरपणें : " फादर जोसेफ, हें समजून घे कीं मला तुझी इथें फार गरज आहे. एका माणसाला इथले काम अनावर आहे. "

पांघरूणें झुगारत, पाय भुईवर टेकत फादर म्हणाला, "परंतु त्यांना माझी आवश्यकता आहे तेवढी तुम्हाला नक्कीच नाहीं. मॉंटफेरँडचा आपला एकादा फ्रेंच धर्मगुरू माझें इथलें काम करूं शकेल. इथलें काम थोड्या फार अक्कलेनें करतां येणारें आहे. परंतु तिकडे काम आहे तें अंतःकरणाचें, एका विशेष सहानुभूतीचें, आणि आपल्या नव्या धर्मगुरूंना त्या लोकांशीं माझ्याइतकें समजून वागतां येणार नाहीं. मी तर जवळ जवळ मेक्सिकनच झालों आहे! मिरच्या आणि मटण-चरबीची आवड तर मी लावूनच घेतली आहे. त्यांच्या असमंजस

पद्धतींनीं आतां मला अवमानित वाटत नाहीं आणि त्याचे दोषच मला आवडूं लागले आहेत. मी त्यांचा माणूस आहे ! ''

" निःसंशय, निःसंशय ! तरीहि तात्पुरतें सध्यां तूं पडून रहावेंस असें मला बजावून सांगितलेंच पाहिजे. ''

फादर व्हेलंट, संकोचून, शरमून मागें उशावर पहुडला आणि बिशप बागेंत टमारिक्स झाडांच्या दिशेनें जरा फिरल्यासारखें करून परत आला त्याची चाल धीमी होती. पावलांत निश्चितता आणि बांध्यांत कठोरतेचा स्पर्श नसलेला ताठा होता. मस्तकाची ठेवण निर्दोष होती. यामुळें कोणत्याही परिस्थितींत सूत्रें त्याच्या हातीं असावींतसें वाटे. त्याच्या मनांत एक संघर्ष माजला आहे हें कोणालाही वरपांगी जाणतां आलें नसतें. फादर जोसेफच्या कळकळीच्या विनंतीमुळें त्याचा सारा बेत विस्कटून गेला होता आणि त्याची मोठी निराशा झाली होती. एकच गोष्ट करण्याकरतां उरली होती. आणि टमारिस्कच्या झाडांपाशीं पोचण्याआंतच त्यानें ती केली. त्याच्या मनांतले विचार थांबवण्याकरतां, गाडण्याकरतां त्यानें त्या झाडांच्या फुलांचा मोठा सडा भुईवर पाडला आणि मग पूर्वींच्याच सहज कृत्रिम चालीनें चालत येऊन तो फादर जोसेफच्या बाजेशीं सस्मित उभा राहिला.

तो म्हणाला, " या बाबतींत तुझी भावना तुला मार्गदर्शक व्हायला हवी, जोसेफ. तुझ्या मार्गांत मी तुला अडवणार नाहीं. सध्यां तुझ्या तब्येतीबाबत कांहीं काळजी घेण्याचा आग्रह मी तुला करीन परंतु बरा होशील तेव्हां मनाला अधिक ओढ वाटते त्या कामांत जाऊन उडी घे. ''

कांहीं क्षण दोघेहि स्तब्ध होते. सूर्यप्रकाशानें दिपून फादर जोसेफनें डोळे मिटून घेतले. फादर ल्तूर विचारांत गढून गेला. त्याच्या नाजुक, बेचैन बोटांत तो 'टमारिस्क'ची एक कळी चाळवत, हाताळत होता. त्याच्या हातांत अधिकाराची एक विलक्षण छटा होती आणि तरीहि सर्वसाधारणपणें धर्मगुरूच्या हातांत सांपडते ती स्वस्थता मात्र नव्हती. तीं बोटें सदा कसल्या तरी संशोधनांत वळवळत, कसले तरी पक्के निर्णय घेत.

पंखांच्या जोरजोराच्या उघडझापीनें दोघेहि एकदमच भानावर आले. कबूतरांचा एक झगझगीत थवा त्यांच्या माथ्यावरून बागेच्या दुसऱ्या टोकाला उडत गेला. विद्यालयाच्या मैदानाकडे जाणाऱ्या वाटेवरच्या तेथल्या फाटकावाटें त्याच वेळीं एक स्त्री प्रवेशत होती. कबुतरांना खाऊं घालण्याकरतां आणि फुलें खुडण्याकरतां ती आली होती. दर दिवशीं ती या कामाकरतां या वेळीं येई. या महिन्यांत विद्यालयाच्या ' चापेल ' मधल्या 'आल्टर'ची सजावट करण्याचें काम

सिस्टर्सनीं तिच्याकडे सोंपवलें होतें आणि बिशपच्या बागेंतल्या सफरचंदाच्या झाडाच्या फुलांकरतां आणि डॅफोडिल्सकरतां ती आली होती. चकाकत्या पंखांच्या झपाट्यांतच ती पुढें आली आणि त्रांक्विलिनो हातची कुदळ खालीं टाकून तिला पहात राहिला. एका क्षणीं कबूतरांचा तो सारा थवा उडतांना अशा जागीं आला कीं सूर्यप्रकाशाच्या दीप्तींत हरवला, पाण्यांत मीठ एकजीव होतें तसा प्रकाशांत एकरूप झाला. पुढल्या क्षणीं सूर्याच्या किरणांखालून काळ्या, चंदेरी आकृति धारण करून तो पुढें गेला. मॅग्डालेनाच्या अंगाखांद्यावर उतरून तो विसावला, तिच्या हातचे दाणे टिपून खाऊं लागला. तिच्या ओठांत तिनें पावाचे तुकडे धरतांच दोन कबूतरांनीं तिच्या चेहऱ्यापुढें हवेंत तरंगून पंख हलवीत त्याच्यावर चोंची मारल्या. आतां ती वाढली होती, सुरेख दिसत होती.

फादर व्हेलंट पुटपुटला, " आतां हिला पाहून कोण म्हणेल कीं क्रौर्य आणि वासनांच्या बजबजाटांतून आम्हीं हिला सोडवून आणली ? क्रिश्चॅनिटीच्या अगदीं आरंभापासून इथल्याइतकें कार्य कुठें घडलेलें नसेल. "

बिशप विचारमग्न राहूनच म्हणाला, " अद्याप सत्ताविशी अठ्ठाविशीचीच आहे ती. तिचें लग्न नव्यानें करून द्यावें कीं काय असें अलिकडे मला वाटतें. तशी ती वर वर समाधानी वाटली तरी तिच्या नजरेंत केव्हां केव्हां मला व्यथाहि जाणवली आहे. आपण तिला प्रथम पाहिलें तेव्हांचा तिच्या नजरेंतला भेसूर आशय आठवतो तुला ? "

"कसा विसरेन मी तो !" फादर व्हेलंट म्हणाला. "परंतु तिची उभी काया बदलली आहे. तेव्हां ती आकारहीन, हाडकुळी पोर होती मला तर ती अर्धवटहि वाटली. छे, छे, या जगांतलीं फार वादळें तिनें पार केलीं. इथें ती सुखांत आहे, सुरक्षित आहे." फादरनें मॅग्डालेनाला हांकरलें. " मॅग्डालेना, मॅग्डालेना, माझ्या मुली, इकडे ये. जरा आमच्याशीं गोष्टी कर. फार काळ एकमेकांनाच पाहून माणसें कंटाळतात. "

२.

उन्हाळ्याच्या मध्यापासून फादर व्हेलंट आरिझोनाबाहेर होता. आतां डिसेंबर उजाडला होता. बिशप लतूरच्या मनावर एक प्रकारची विरक्ती, एक प्रकारचा

संभ्रम दाटला होता. त्याच्या बालपणापासून कुठेंहि असला तरी केव्हां कव्हां अशी भावना त्याला होत आली होती आणि त्याला अगदी एकाकी वाटत आलें होतें. आतांहि तो त्याचा पत्रव्यवहार संभाळीत होता, आपल्या टापूंत पाहणी-करतां फिरतीवर जात होता आणि परत येत होता, 'पॅस्टर' विना मिशन्समध्यें प्रवचनें करीत होता, सिस्टर्सच्या विद्यालयाच्या नव्या जादा इमारतीच्या बांध-कामाकडे लक्ष पुरवीत होता; परंतु त्याचें मन, त्याचे अंतःकरण त्यांत नव्हतें.

क्रिसमसपूर्वी तीन आठवडे, एका रात्रीं, तो बिछान्यांत पहुडला होता. झोंप कशी ती येत नव्हती. अपयशाची भावना काळजाचे लचके तोडीत होती. प्रार्थना म्हणजे केवळ पोकळ शब्दाची मालिका झाली होती आणि मनाला शांतता कशी ती नव्हती. जीव सुकला होता. त्याच्या धर्मगुरूंना, या लोकांना द्यावें असें कांहीं त्याच्या स्वतःतच उरले नव्हतें, सांपडत नव्हतें. सारें कार्य वरवरचें, पोकळ, क्षणभंगुर वाटत होतें. सारा वाळूवरचा बंगला! त्याच्या अखत्यारांत अद्याप सारा मागासलेला आणि रानवट टापूच होता, इंडियन्स त्यांच्या भय आणि अज्ञानाच्या जुन्याच वाटा चोखाळत होते. मेक्सिकन्स धर्माचें खेळणें बनवून त्याच्याशीं लहान पोरासारखे खेळत होते.

रात्र चढूं लागली तसें, बिछायत बिछायत 'काट्याची शय्या' वाटूं लागली. त्याला ते काटे असह्य झाले. अंधारात तो उठून बसला. त्यानें खिडकीबाहेर पाहिलें. बाहेर बर्फ पडत असल्याचें पाहून त्याला नवल वाटलें. भुईवर त्याचा एक पातळ थर पसरलाही होता. ढगांनीं पूर्णचंद्र झांकला होता आणि वरून त्याचा केवळ उजळ प्रकाश तेवढा खालीं डोकावत होता. या चंदेरी तेजांत चर्चचे मनोरे काळेकुट्ट बनून ताठ उभे होते. फादर ल्तूरच्या मनांत या वेळींच चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करण्याची ऊर्मि उसळली. त्याऐवजीं बिछान्यांत पहुडून त्यानें पुन्हा एकदा पांघरूण अंगावर ओढलें. मग त्याला जाणवलें कीं चर्चमध्यें कुडकुडायला होईल म्हणून आपण माघार घेतली. तो पुन्हा उठला. भराभर त्यानें कपडे चढवले. तो बाहेर अंगणात आला. अंगावरील 'कॅसॉक' वर त्यानें एक शाल घेतली होती. ही फादर व्हेलंटबरोबरीनें शिवलेली.

पॅरिसमध्यें खूप दिवसामागें दोघांनीं तिचें कापड खरीदलें होतें. तेव्हां ते तरुण होते, रू द बॅकमधल्या परकी मिशन्सच्या सेमिनरीमध्यें राहून ते तेव्हां नव्या जगाकडे जाण्याची पूर्वतयारी करीत होते. ओहिओच्या एका जर्मन शिंप्यानें या कापडाच्या त्या दोन शाली शिवल्या. कोल्ह्याच्या केंसाळ कातड्याचें अस्तर त्यांना दिलें. पुढें अनेक वर्षांनंतर, आपल्या 'बिशोप्रिक' च्या शोधांत

दीर्घ प्रवासाकरतां फादर लतूर निघण्याच्या तयारींत असतां त्याच शिंप्यानें त्याची ती शाल उसवून पुन्हा शिवली होती आणि तिला खारीच्या कातड्याचें अस्तर मारलें होतें. सौम्य हवेच्या दृष्टीनें त्यानें हा बदल केला. या आणि इतर अनेक कृति बिशपच्या मनांतून, ती शाल अंगाभोंवतीं लपेटतांना सरकल्या. त्यानें अंगण ओलांडून 'सॅक्रिस्टी' मध्यें प्रवेश केला. त्याच्या हातीं चर्चची मोटी लोखंडी चावी होती

अंगण बर्फानें पांढरें शुभ्र माखलें होतं. भिंतीच्या, इमारतीच्या गडद सांवल्या धूसर चंद्रप्रकाशामध्ये रेखीवपणें उमटलेल्या होत्या. 'सॅक्रिस्टी'च्या पलिकडल्या दरवाजांत त्यानें एक मुडपलेली, अवघडलेली आकृति पाहिली. ती स्त्री होती हें त्यानें जाणलें. ती मुसमुसून रडत होती. त्यानें तिला वर उठवलें, तिला आंत नेलें. त्यानें मेणबत्ती शिलगावली आणि तात्काळ त्यानें तिला ओळखलें. तिचा हेतूहि त्याला कळून चुकला

ती होती एक वृद्ध मेक्सिकन स्त्री, साडा. एका अमेरिकन कुटुंबांत ती गुलाम म्हणून नांदत होती. तें कुटुंब प्रॉटेस्टंट होतें. रोमन चर्चशीं त्याचें जणूं वैरच होतें. ते लोक तिला 'मास'ला येऊं देत नसत, धर्मगुरूच्या गांठींहि घेऊं देत नसत. घरीं तिच्यावर सक्त नजर ठेवली जाई--परंतु हिंवाळ्यात, घराच्या उबदार खोल्याची गरज त्या कुटुंबाला भासे तेव्हां लाकडाच्या एका 'शेड' मध्यें तिला झोंपायला दिलें जाई. आजच्या रात्रीं, थंडीमुळें झोंपणें अशक्य झाल्यानें, हें धाडस करण्याला ती प्रवृत्त झाली होती, पागेच्या दारावाटें त्या घराबाहेर निसटून आडवाटांनीं धांवत पळत देवाच्या दाराशीं करुणा भाकण्याकरतां आली होती. चर्चचे दर्शनी दरवाजे बंद पाहून तिनें बिशपच्या बागेंत प्रवेश मिळवला होता आणि तिथून ती 'सॅक्रिस्टी'पर्यंत पोंचली होती. परंतु तिचेंहि दार तिला बंदच दिसले होतें.

ती तिला बोलायचे असलेले मोजकेंच शब्द बोलेतोंवर बिशप हातीं मेणबत्ती धरून तिची मुद्रा न्यहाळीत होता दाट गव्हाळी वर्ण, वयानें आणि हालकष्टांनीं आटलेला, सुरकतलेला, धार आलेला चेहरा. त्याला वाटलें कीं, या बाईच्या मुद्रेवर प्रतीत होतो आहे तेवढा विशुद्ध सोज्ज्वल भाव दुसऱ्या कोणाहि माणसाच्या मुद्रेवर आपण यापूर्वीं पाहिला नसेल. तिच्या बुटांच्या आत मोजे नव्हते; बूटहि तिच्या धन्याचे, टाकाऊ ठरलेले होते. आणि तिच्या अंगावरल्या ठिगळलेल्या, फाटलेल्या शालीच्या आंत एक पातळसा सुती पोषाख तेवढा दिसत होता. त्यालाहि ठिगळें होतीं. अंगाची हुडहुडी थांबवण्याकरतां, आवरण्याकरतां तिनें

दांतावर दांत दाबून धरले होते, आणि तिची दांतखीळ वाजत होती. मोकळ्या हाताच्या एका हालचालीनें बिशपनें आपल्या खांद्याभोंवतालची शाल काढून ती तिच्या अंगाभोंवतीं लपेटून टाकली. यानें ती भ्यायली. गयावया करीत म्हणाली. " नको, नको, फॅड्रे ! कशाला, फॅड्रे... "

" मुली, तुझ्या फॅड्रेची आज्ञा ही धर्माज्ञा. ती तुला पाळलीच पाहिजे. ती शाल चांगली लपेटून घे. आपण चर्चमध्यें प्रार्थनेकरतां जाऊं या. "

उंच 'आल्टर' पुढल्या एकुलत्या एका मंद लाल कंदिलाच्या प्रकाशापलिकडे चर्चमध्यें सारा अंधार होता. तिचा हात हातीं धरून आणि मेणबत्ती पुढें धरून त्यानें तिला ' लेडी चापेल ' पर्यंत नेलें तिथें ' व्हर्जिन 'पुढल्या समया तो उजळवूं लागला. म्हातारी गुडघ्यावर बसून जमीन चुंबूं लागली 'होली मदर'च्या पादकमलाचीं तिनें अनेकानेक चुंबनें घेतलीं. हें करतांना भावनावेग मोकळा सोडून ती स्फुंदत, रडत होती. परंतु हें रडणें दुःखाचें नव्हतें. तिच्या मुद्रेवरच्या सुंदर गहिंवरातून कळत होतें कीं हे हर्षातिशयांतून उमटलेलें रडूं आहे.

" फादर, एकोणीस वर्षें; एकोणीस वर्षें झालीं मी हें सारें अखेरचें पाहिल्याला ! "

" झालें तें झालें, साडा. अंतःकरणांत तूं कधीं ईश्वराला अंतर दिलें नाहींस. आपण मिळून त्याची प्रार्थना करूं या. "

तिच्या शेजारींच बिशप वांकला. दोघें प्रार्थना म्हणूं लागलीं, "O Holy Mary, Qeen of Virgins ..

या म्हाताऱ्या आणि गुलामगिरींत जगणाऱ्या बाईविषयीं कैकदां फादर व्हेलंट बिशपकडे बोलला होता. तिच्या दयनीय अवस्थेविषयीं 'पॅरिश' मधल्या धार्मिक वृत्तीच्या बायांत वारंवार कुजबुज चाले. ती ज्यांच्याकडे होती तें स्मिथ कुटुंब जॉर्जिआचें. कधीं तरी मागें तें एल पासो डेल नॉर्तेला रहात होतें. आणि परत जाते वेळीं या बाईला त्यानीं आपल्याबरोबर नेलें होतें. कांहीं काळामागें या कुटुंबावर जॉर्जियांत कांहीं अरिष्ट, बेअब्रूचा प्रसंग आला होता आणि त्याच्या-जवळचे नीग्रो गुलाम विकून टाकून जॉर्जिआमधून त्यांना पळ काढावा लागला होता. या मेक्सिकन बाईला ते लोक विकूं शकले नाहींत कारण तसा तिच्यावर त्यांचा कायदेशीर हक्क शाबीत होत नव्हता. आतां पुन्हां ते मेक्सिकन प्रदेशांत येऊन राहिल्यावर त्यांना अशी भीति वाटत होती कीं ही बाई पळून जाईल, सुटका साधील आणि तिच्या जमातीपैकीं कुणाकडे तरी जाऊन राहील. त्यामुळें तिच्यावर आतां सक्त नजर ठेवण्यांत येत होती. त्यांच्या घराच्या हद्दीबाहेर पड-

ण्याला तिला मनाई करण्यांत आली होती, मालकिणीबरोबर बाजारांतहि तिला जाऊं देण्यात येत नसे.

'आल्टर गाइल्ड' च्या दोघां बायांनीं जरा धीटपणा दाखवून थेट स्मिथ मंडळीच्या घरात शिरून धुणीं धूत असलेल्या साडाशीं बोलण्याचा प्रयत्न केला होता परंतु घरच्या मालकिणीनें त्यांना अत्यंत उर्मटपणें बाहेर घालवलें होतें. अर्धवट पोषाख केल्या स्थितींत बाहेर धांवत येऊन तिनें त्यांना सांगितलें होतें कीं तिच्या नोकराणीकडे त्यांचें कांहीं काम असेल तर त्यांनीं पागेवाटें चोरून येऊन त्या बिचाऱ्या वेडपट बाईला न घाबरवतां, राजरोस पुढल्या दरवाजानें यायला हवें होतें. आपण साडाला 'मास' ला बोलवायला आलों आहोत असें त्यांनीं सांगितलें तेव्हां मालकीण म्हणाली, एकदां आपण तिला धर्मगुरूच्या तावडींतून मागें कसेंबसें सोडविलें आणि पुन्हां त्यांत ती पडलेली आपल्याला चालली नसती.

हें सारें घडल्यावरहि शेजारच्या घरच्या एका अत्यंत भाविक स्त्रीनें लाकूड-फाटा खेचरावरून उचलून घरांत नेणाऱ्या साडाशीं कांहीं बोलण्याचा प्रयत्न केला होता परंतु म्हाताऱ्या साडानें ओठांवर बोट धरून तिला गप्प करून, जायला सांगितलें होतें. हें करतांना तिच्या मुद्रेवर एवढें भय, एवढा कावरे-बावरेपणा होता कीं बिचारी ती दुसरी बाई मुकाट्यानें चालती झाली. तिला वाटलें, कुणाशीं बोलतांना सांपडली तर साडाचे बरेच हाल करण्यांत येत असावेत. ही हकीकत तिनें तात्काळ जाऊन फादर व्हेलंटला कथन केली आणि फादर व्हेलंटनें बिशपच्या कानीं ही घालून या गुलामगिरींतल्या वृद्ध स्त्रीला कसेंहि करून धर्माचा आधार आपण मिळवून दिला पाहिजे असें म्हटलें होतें. परंतु बिशपनें अद्याप यासाठीं योग्य वेळ आली नसल्याचें त्याला सांगितलें होतें. इथल्या लोकांच्या मनांत कोणतीहि अढी निर्माण व्हावी असें कांहीं इतक्यांत आपण करतां नये असें तो म्हणाला. ही स्मिथ मंडळी कॅथालिकांशीं भांडणें करण्याला उत्सुक असलेल्या कांहीं नीचवर्गीय प्रॉटेस्टंटांच्या एका मोठ्या गटाच्या नेतेपदीं होती. सणावारीं चर्चच्या दारीं उभी राहून ती टिंगल टवाळी करीत, रस्त्यांत जोगिणींना कांहीं उलट उर्मट बोलत, 'कॉपर्स क्रिस्ती' रविवारला मिरवणूक जाई तेव्हां उभी राहून आरडा ओरडा करीत आणि वाईट साईट शब्द उच्चारीत. या स्मिथ कुटुंबांत मुलगे पांच. चालचलणुकीनें वाईट, तोंडाचे शिवराळ आणि असभ्य. पैकीं धाकटे दोन अद्याप पोरवयांत असूनहि या बाबतींत क़मी नव्हते. त्रांक्विलिनोनें, बिशपला शिवीगाळी वा झाडांची नासाडी करण्या-

करतां तीं बरोबर इतर मुलें घेऊन आलीं असतां बिशपच्या बागेंतून त्यांना अनेकवार बाहेर काढलें होतें.

प्रार्थना संपल्यावर दोघें उठलीं तेव्हां फादर लतूरनें, साडाला अद्याप प्रार्थना चांगली आठवत असल्याबद्दल संतोष प्रकट केला.

तेव्हा ती भावनावेगानें म्हणाली, "फादर कुठेंहि झोंपलें तरी रोज रात्रीं मी 'होली मदर' ची प्रार्थना न चुकतां करतें !" फादरच्या चेहऱ्याकडे तिची नजर होती आणि मुरकुतलेले हात तिनें छातीशीं घट्ट दाबून धरले होते.

तिची माळ तिच्याकडे आहे किंवा काय याची चौकशी फादरनें करतांच ती वृद्धा बावरून गेली. कारण तीची माळ ती कपड्याखालीं कमरेला, बांधून ठेवी. कारण तिथे असली म्हणजे ती कोणाच्या नजरेला येत नसे.

फादर लतूर तिच्याशीं मृदु सुरांत बोलत होता. तो म्हणाला, एक लक्षांत ठेव, साडा, येत्या वर्षांत आणि क्रिसमसच्या आधींच्या 'नोव्हेना'च्या दिवसांत 'मास' च्या वेळीं मी तुझ्याकरता विशेष प्रार्थना करण्याला विसरणार नाहीं. यानंतर मनांत समाधान असू दे. माझ्या व्यक्तिगत ईशचिंतनांतहि माझ्या आसनातलगाना मी आठवतों तशी तुझी आठवण ठेवीन."

डिसेंबरमधल्या त्या रात्रीं अनुभवला त्या प्रकारचा धार्मिक स्वरूपाच्या उच्च आनंदाचा अनुभव त्याला एरवीं कधींहि मिळाला नसता असें तो नंतर फादर व्हेलंटकडे म्हणाला. त्या रात्रीं, त्या वृद्धेशेजारीं नम्र होऊन परमेश्वराची करुणा भाकत असतां, जगांत हक्काचे कांहीं जवळ नसलेल्या त्या स्त्रीला 'आल्टर' पुढल्या एकेक गोष्टींचें वाटत असलेलें मोल त्याला उमगलें, जाणवलें. समया, व्हर्जिनची मूर्ति, सन्ताच्या आकृति, कंगालांकडून हलकेपणाची, नीचतेची भावना काढून घेऊन ख्रिस्ताशीं त्यांचें नातें यातना आणि दारिद्र्याद्वारें जोडणारा क्रूस—फार कांहीं सोसलेल्या त्या गुलाम स्त्रीशेजारीं तसें ईशचिंतन करतांना, ऐन उमेदींत मिळे तसा देवाघरच्या रहस्याचा एक विलक्षण प्रत्यय फादरला मिळाला. तिच्यासारखेंच त्याला वाटूं लागलें कीं या पृथ्वीवर खूप क्रूर माणसें असलीं तरी तिथें—देवाघरीं कोणालाहि भेदभाव न करतां पोटाशीं धरणारी एक प्रेममूर्ति, एक आई आहे. त्याला वाटलें कीं लहान मुलापेक्षां, जगाच्या व्यवहाराचे घांव खाऊन, अनेकानेक कटु अनुभव घेऊन थकलेल्या, भागलेल्या वृद्धांनाच स्त्रीच्या वात्सल्याची अधिक गरज असते. तें जाणायला स्त्रीच हवी. देवता हवी.

त्या रात्रीं जीं मारि लतूर जितका त्या दयेच्या देवतेच्या निकट पोंचला तितका कधींहि पोंचला नसेल. ही दया—आईच्या कुशींत वाढलेल्या कोणालाहि

मिळणारी; मरणोन्मुख सैनिकाला, एकाद्या हुतात्म्याला आणि फांसावरच्या खुनी माणसाला सारखीच लाभणारी. मेरीमातेच्या त्या अतिभव्य साक्षात्कारानें फादर ल्तूरचें काळीज दुभंगून गेलें.

" O Sacred Heart of Mary ! " त्याच्या शेजारीं ती वृद्धा पुटपुटत होती. ते शब्द तिला अन्नपाण्यासारखे, एकाद्या जिवलगासारखे, आईच्या मायेसारखे वाटत होते. फादरला हें जाणवत होतें. तिला होत असलेला साक्षात्कार त्यानें आपला मनांत परावर्तित केला होता, तिच्या नजरेनें तो पहात होता. आणि आपणहि तिच्याइतकेच कंगाल असल्याचें आतां त्याला प्रथमच चांगलें कळत होतें. क्रौर्य, जुलूम, गुलामगिरी यांनीं भरलेल्या या विश्वांत प्रथम ' स्वर्ग साम्राज्य ' अवतरलें तेव्हां तें प्रस्थापित करणारा प्रभू म्हणाला होता, ' And whosoever is least among you, the same shall be first in the Kingdom of Heaven. " ( तुमच्यांतील सर्वांत कनिष्ठ असेल तोच या राज्यांत मला जास्त प्रिय राहील. ) हें चर्च--हें वास्तविक साडाचें घर होतें आणि इथें बिशप ल्तूर एक सेवक होता.

त्या वृद्ध स्त्रीनें आपलें मन फादरकडे मोकळें केलें आणि फादरनें तें ऐकलें. त्यानें तिला आशीर्वाद दिला, तिच्या मस्तकावर दोन्ही हात ठेवले. चर्चबाहेरच्या वाटेनें तो तिला घेऊन निघाला तेव्हां साडानें आपल्या अंगाभोंवतालची त्याची शाल काढण्याला आरंभ केला. त्यानें तिला अडवलें. तिनें ती तिच्याकरतां ठेवावी म्हणून सुचवलें. रात्रीं तीच पांघरून तिनें झोंपावें असें सागितलें. परंतु घाईनेंच तिनें ती दूर केली. फादरनें म्हटलें त्याचा विचारहि तिला भेडसावून गेला. " नाहीं नाहीं फादर, " ती म्हणाली, " माझ्यापाशीं ही सांपडली तर माझी धडगत नाहीं. " मात्र तिनें तिच्या धन्यांबद्दल कोणताहि अनुदार उद्‌गार काढला नाहीं. तिनें ती शाल हातीं धरली, तिला निवारा, जिव्हाळा देणारी ती कोणी जिवंत व्यक्ति असल्यासारखें तिला कुरवाळलें, थोपटलें आणि ती फादरच्या हातीं दिली.

अचानक फादरला खिशांतल्या 'व्हर्जिन'चें चित्र असलेल्या एका छोट्याशा चांदीच्या पदकाची आठवण झाली. त्यानें तें तिला दिलें. खुद्द 'होली फादर'चें चिन्ह म्हणून हें ठेव असें तो म्हणाला. आतां तिच्यापाशीं जपण्यासारखें, लपविण्यासारखें, एकांतांत डोळे भरून पहात रहावें असें तिचें असें कांहीं होतें. त्याला वाटलें, खरोखर, ज्यांना लिहितां येत नाहीं, वाचतां येत नाहीं, त्यांच्या दृष्टीनें अशा प्रतिमा किती मोलाच्या असतात !

कुलूप लावलें. चर्च बंद झालें. मनांत भरून राहिलेल्या शांततेतलीच आणखी कांहीं भोंवतालच्या वातावरणांत भासत होती. बर्फ पडायचें थांबलें होतें. आकाशात विखुरलेले पारदर्शक ढगांचे पुंजके आतां सँग्र ड क्रिस्टोच्या डोंगरांच्या माथ्याशीं एकत्र येऊन धुकें पसरावें तसे ओठंगले होते. निळ्या, विस्तीर्ण, एकाकी आभाळांत पूर्णचंद्र विलसत होता. चर्चच्या दाराशीं तसा उभा राहून, विचारांत गढून, बिशप म्हाताऱ्या साडानें ओल्या बर्फात मागें ठेवून दिलेले पावलाचे ठसे पहात होता.

.२.

सबंध हिंवाळाभर फादर व्हेलंट आरिझोनामध्यें होता. हवेंत प्रथम वसंताची चाहूल उमटताच बिशप आणि जार्किंतो मिळून न्यु मेक्सिकोमधून मोठ्या प्रवासाला निघाले. या खेपेस त्यांचें उद्दिष्ट पेण्टेड डेझर्ट' आणि 'होपि' गांवें हें होतें. ओराइबी सोडल्यावर अनेक दिवसपर्यंत बिशप दक्षिणेकडे वाटचाल करीत राहिला. त्याच्या एका नॅव्हॅजो स्नेह्याच्या भेटीला तो चालला होता. अलिकडेच या स्नेह्याचा एकुलता एक मुलगा निधन पावला होता आणि मुद्दाम त्या स्नेह्यानें सांता फेला बिशपला हे कळावे म्हणून निरोप धाडला होता.

या नव्या प्रदेशांतल्या आरंभी आरंभीच्या काळांतच फादर लतूरचा 'युसाबिओ'शीं परिचय झाला होता, वाढला होता. त्या काळीं हा 'नॅव्हॅजो' जमातीपैकीं इसम सांता फेमध्येंच रहात हाता. त्याची जमात आणि 'होपि' इंडियन्स यांतलें जुनें आणि अखंड वैर शमविण्याच्या कामीं तो लष्करी अधिकाऱ्यांना मदत करीत होता. त्यानंतर युसोबिओ आणि बिशपचा एकमेकांविषयींचा जिव्हाळा वाढतच गेला होता. बिशपनें 'बॅप्टाइझ' करावा म्हणून मुलाला घेऊन तो मैलोगणती घोडदौड करून सांता फेला आला होता. आणि गेल्या हिंवाळ्यांत हाच त्याचा एकुलता एक लाडका मुलगा गेला होता.

तसा फादर लतूरहून युसाबिओ दहा वर्षांनीं लहान. परंतु नॅव्हॅजो जमातींत त्याचें वजन मोठें होतें. तसाच मेंढ्या आणि घोडे या बाबतींत तो संपन्न असामींतही गणला जात असे सांता फेमध्यें आणि अल्बुकर्कमध्यें त्याच्या हुषारीमुळें आणि अधिकारामुळें त्याला मान असे. तो खूप उंच होता, सर्वसाधारणपणें

नॅव्हॅजो असत त्याहूनहि उंच होता. रिपब्लिकन काळांतल्या एकाद्या रोमन सेनापतीसारखा त्याचा चेहरा होता. कपड्यांच्यापुरता तो छानछोकीनें राही. त्याच्या कपड्यांवर मण्याचें आणि इतर खूप नक्षीकाम केलेलें असे. अंगावर चांदीचे दागिने असत. कोलोरेडो चिकितो भागांत आप्तपरिवारासह हा राही. पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे त्याचे जनावरांचे कळप पसरलेले असत.

वाळूच्या एका मोठ्या वादळांत फादर लतूर आणि जाकिंतो त्याच्या वस्तीपाशीं पोंचले. घोंघावती वाळू त्यांच्या आणि त्याच्या घोड्यांच्या नाकातोंडांत शिरत होती. गुदमरायला होत होतें. तो नॅव्हॅजो घरांतून बाहेर आला आणि त्यानें एंजेलिकाचा लगाम हातीं पकडला. कांहीं न बोलतां, ओठ न उघडतां कांहीं वेळ तो नुसताच दर्दभऱ्या, व्यथित, विरक्त नजरेनें फादरचा गौरवर्ण हात आपल्या हातीं घेऊन तो मुग्ध उभा राहिला. मग त्याच्या कातीव, निबर मुद्रेवर भावनेचा एक मोठा आवेग उमटला. तो म्हणाला :

"माझा सखा आला !"

एवढेंच तो म्हणाला परंतु यांत सारें कांहीं आलें होतें. स्वागत; भरंवसा; कृतज्ञता.

वस्तीपासून जरा अलग असलेली एक जागा बिशपला रहाण्याकरतां देण्यांत आली. युसाबिओनें झटपट ती आपल्याकडच्या अनेक वस्तूंनीं शृंगारली आणि प्रवासाचा थकवा जाईपर्यंत आतां तुम्ही इथें राहिलें पाहिजे असें बिशपला बजावलें. परतीचा प्रवास पुन्हा फार लांबीचा होता. घोडीं आणि बिशप, जाकिंतोनें ताजेंतवानें होणें आवश्यक होतें.

बिशपनें याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करून तीन दिवस रहाण्याचा आपला बेत त्याला बोलून दाखविला. मानसिक स्वस्थतेची त्याला फार गरज होती. दैनंदिन व्यवहारांच्या रहाटगाडग्यांतच त्याचें आयुष्य चाललेलें होतें. आणि तो म्हणाला, हें स्थळ मनाच्या स्वस्थतेला, एकाग्रतेला, चिंतनाला फार चांगलें होतें. जोराचा वारा सतत वहात असे. धुळीचे लोट सतत त्यावर तरंगत इकडून तिकडे उडत. नदीलाहि या दिवसांत बरेंच पाणी असे. धूळ बिशपच्या रहात्या जागेंतहि चिखलाच्या भिंतींतल्या फटीवाटें सरके.

नदीलगत, उंच उघड्यावाघड्या 'कॉटनवुड्स्'चें बन होतें. हीं झाडें एवढ्या मोठ्या व्यापाचीं होतीं कीं प्राचीन वाटत. एकमेकांपासून लांब लांब तीं उगवत. त्यांचे वेडेवांकडे आकार सततच्या वाऱ्यानें दबून, धुळीचा मार खाऊन झालेले असावेत. शिवाय त्यांना पाणीहि जेमतेम मिळे. वर्षाचा बहुतेक काळ नदीला

पाणीच नसे. हीं झाडें जमिनींतून तिरकस उगवलीं होतीं. चाळीस पन्नास फूट तसेच उंच जाऊन पुन्हा बुंध्याशीं सरळ रेषेंत त्यांचे शेंडे राहिलेले होते. कांहींना मोठे फाटे फुटले आणि ते वांकून जवळ जवळ भुईपर्यंत पोंचले होते. कांहींना फांटे नव्हते परंतु मुख्य बुंधाच ताणलेल्या धनुष्यासारखा खालीं वांकलेला होता. हीं सारीं जिवंत झाडें, परंतु त्यांचें लाकूड मात्र जुनाट, वाळके मेलेले वाटे. पानें तर त्यांना फारशीं नसतच. फांटा फुटे तिथें किंवा वांकलेल्या फांदीच्या टोकाशीं हिरव्या नाजुक पानांचा एकादा तुरा दिसे तेवढाच. हा एकूण झाडाशीं मोटा विसंगत वाटे.

नॅव्हॅजोचें आदरातिथ्य आक्रमक वा लुडबुडीच्या स्वरूपाचें नसे. युसाबिओनें बिशपचा प्रारंभीचा पाहुणचार आणि आगतस्वागत केलें आणि त्याला एकटें सोडलें. जवळ जवळ अखंडपणें चाललेल्या वाळूच्या वादळांत फादर लतूरनें त्या ठिकाणीं तीन दिवस काढले. नजीकच्या वस्तीपासून तो बहुतेक काळ तोडला गेलेला, अलग पडलेला असे. घरांत बसून तो बाहेरचा वाऱ्याचा सुसाटा ऐकत राही किंवा इंडियन ब्लँकेट नाक तोंड झांकेपर्यंत पांघरून त्या जुनाट, वेड्यावांकड्या वृक्षाच्या निवाऱ्याला हिंडत राही. इथें आल्यापासून त्याच्या डोक्यांत एकच विचार होता : फादर व्हेलंटला टुस्कॉनहून बोलावून घेतलें तर ते योग्य होईल किंवा नाहीं ? प्रवाशाकरवीं व्हिकरच्या अधूनमधून येणाऱ्या पत्रांतून कळे तें असें कीं तो होता तिथेंच मजेंत होता, दोनशें वर्षे उपेक्षित राहिलेल्या सेंट झेविअर डेल बाक्च्या जुन्या चर्चला नवी कळा आणीत होता.

फादर व्हेलंट लांब गेला तेव्हांपासून बिशपच्या जबाबदाऱ्या सारख्या वाढत होत्या. आउव्हर्नेचे नवे धर्मगुरू तसे चांगले होते. निष्ठावान् आणि कष्टाळू होते, परंतु तरीहि या भागात ते नवखे होते, निर्णय घेतांना ते कचरत आणि दर वेळीं बिशपकडे धांव घेत. फादर लतूरला त्याच्या 'व्हिकर'ची अत्यंत गरज होती कारण स्थानिक रहिवाशांची नाडी, त्यांचें मन त्याला समजे. त्यांच्यांतल्या उणीवांविषयीं त्याला कळकळ वाटे. एकत्र असतां फादर व्हेलंटच्या आशावादी धसमुसळेपणाला त्याला वारंवार पायबंद घालावा लागे——परंतु एकटेपणीं या धसमुसळेपणाचीच फार उणीव त्याला वाटे. फादर व्हेलंटचा सहवासही त्याला प्रिय होता——हें उगाच नाकारण्यांत काय अर्थ होता ?

जीं मारि लतूर आणि जोसेफ व्हेलंट हे दोघे पय-ड-डोमच्या दोन शेजार-शेजारच्या भागांत जन्मले असले तरी बालपणीं एकमेकांच्या सहवासांत नव्हते. लतूर कुटुंब विद्वान आणि उच्च रहाणीचें होतें आणि व्हेलंट कुटुंबाचा दर्जा त्या

मानानें बराच सामान्य होता. शिवाय छोटा जोसेफ घरापासून लांबच फार काल असे, व्हॉलव्हिक डोंगरांतल्या शेतावर आजोबांबरोबर रहात असे. इथली हवा विशेष मोकळी आणि जोसेफसारख्या मुलाला हितकारक होती. क्लेरमाँटमध्यें, माँटफेरँडला सेमिनरिअन्स असतांना हे दोघे मुलगे प्रथम एकत्र आले.

सेमिनरीमध्यें जीं मारि दुसऱ्या वर्षाला असतांना आरंभींच्या एक दिवशीं खेळाच्या मैदानावर उभा राहून नव्या विद्यार्थ्यांना न्यहाळत असतां, त्यांच्या घोळक्यांत त्याला एक वैशिष्टयानें मंद मुलगा आढळला. हा सुमारें एकोणीस वर्षांचा आणि त्या मानानें खुरटा होता. वर्ण पांढुरका–चेहऱ्यामोहऱ्यानें साधा बगडा. हनुवटीवर चामखीळ. त्याचे केंस दोन छटांचे होते आणि त्यामुळें तो जर्मन वाटत होता. जीं मारीची नजर त्या मुलाला जाणवलीशीं वाटली. एकदम तो बोलावल्यासारखा त्याच्याकडे आला. आपल्या साधे बगडेपणाची जाणीव त्याला नमावी. तो बिलकूल संकोची व बुजरा नव्हता. किंबहुना या नव्या वातावरणांत फार रस घेत होता. जीं लतूरला त्यानें नांवगांव विचारलें. वडील काय करतात तेंहि विचारलें. आणि मग अगदीं साधेपणानें तो म्हणाला :

'माझे वडील भटारी–बेकर–आहेत. रिओममध्यें त्यांच्या तोडीचें कोणी नाहीं. आणि खरें म्हणायचें तर ते खरोखरच फार चांगले भटारी आहेत."

पोरगेल्या लतूरला मौज वाटली.परंतु तोंडीं त्यानें त्या मुलाच्या वडिलां-विषयींच्या प्रौढीबाबत सौम्य संमति प्रगट केली. मग तो चमत्कारिक मुलगा त्याच्या भावाबद्दल, आत्याबद्दल, फिलोमेन नांवाच्या छोटया, हुषार बहिणीबद्दल सांगत सुटला. सेमिनरीमध्यें लतूर किती दिवसांपासून होता तें त्यानें विचारलें.

"तूं धर्मगुरू होण्याचें पूर्वींपासून ठरविलें होतेंस का? मीहि ठरविलें होतें पण त्याऐवजीं लष्करांत जवळ जवळ भरती झालोंच होतों."

त्याआदल्या वर्षीं, अल्जिअर्सच्या शरणागतीनंतर क्लेरमाँटला एक लष्करी मेळावा झाला होता. लष्करी गणवेष, लष्करी बँडस्, फ्रेंच लष्कराबाबत आवेश-युक्त भाषणें असा खूप नेत्रदीपक आणि मन हुरळविणारा थाटमाट झाला होता. त्या गडबडींत पोरगेला जोसेफ व्हेलंट खरोखरच हुरळून गेला होता आणि घरीं न विचारतांच त्यानें स्वयंसेवक म्हणून नांव नोंदविलें होतें.आपल्या मनांत स्फुरलेल्या देशभक्तीच्या भावनेचें, वडिलांच्या रागाचें आणि त्यानंतरच्या आपल्या नाउमे-दीचें प्रत्ययकारी वर्णन त्यानें लतूरला ऐकवलें. त्याच्या आईची इच्छा, त्यानें धर्मगुरू व्हावें अशी होती. तो तेरा वर्षांचा असतां तिला मृत्यु आला आणि त्यानंतर नेहमींच तो तिच्या इच्छेबरहुकूम वागण्याचें आणि 'डिव्हाइन मदर'च्या

सेवेंत आयुष्य घालविण्याचें ठरवीत आला होता. परंतु त्या एका दिवशीं मात्र बॅंडस् आणि कवायतींच्या जल्लोषांत फ्रान्सच्या कारणीं आयुष्य लाविण्याचा एकच एक निर्धार सोडला तर त्याला बाकी साऱ्यांचा विसर पडला होता.

हें सांगतांना एकाएकीं पोरगेला व्हेलंट बोलायचा थांबला होता. आपल्याला तात्काळ एक पत्र लिहून टाकायला हवें असल्याचें म्हणाला. आणि झगा वर खोंचून वेगानें धांवत निघून गेला होता. ल्तूर त्याच्या पळत्या आकृतीकडे पहात राहिला होता. या नव्या मुलाला आपल्या पंखाखालीं घेण्याचा त्याचा निश्चय झाला होता. त्या भटाऱ्याच्या पोरांत असें कांहीं वैशिष्ट्य होतें कीं त्या त्यांच्या भेटीला एकाद्या साहस-कथेंतल्या प्रसंगांचा रंग चढला होता. आणि ल्तूरला वाटलें कीं असें पुनःपुन्हा घडावें. पहिल्या भेटींतच, त्यानें तो चटपटीत, कुरूप मुलगा आपला मित्र म्हणून ठरवला. अगदीं सहज स्फूर्तीनें हें घडलें ल्तूर वृत्तीनें थंड होता, चिकित्सक होता. त्याचें समाधान सहजीं होत नसे. आणि सर्वसाधारणतः वृत्तीनें तो उदास असे.

सेमिनरींतल्या काळांत, निव्वळ विद्याध्ययनाच्या क्षेत्रांत त्यानें सहजीं त्याच्या मित्राला मागें टाकलें होतें. परंतु श्रद्धेच्या सखोलतेंत आणि दृढतेंत हा मुलगा आपल्याला मागें टाकीत आहे याची जाणीव त्याला सतत होती. पुढें ते धर्मोपदेशक बनल्यावर जोसेफ इंग्रजी बोलायला शिकला होता; स्पॅनिश भाषाहि शिकला होता. आणि ल्तूरपेक्षा हौसेनें शिकला होता. प्रथम तो या दोन्ही भाषा बोलतांना चुका करी यांत शंका नव्हती, परंतु व्याकरण, शब्दांची सफाई या बाबत मोठीशी तमा वा वृथा अभिमान त्याला नव्हताहि. त्या त्या भाषा बोलणाऱ्या सामान्य जनाशीं त्याला संबंध जोडायचा होता आणि त्यासाठीं त्या सामान्य जनांसारखेंच बोलायचें होतें.

फादर जोसेफबरोबर काम करूं लागल्याला बिशपला आतां पंचवीस एक वर्षें झालीं होतीं. तरीहि त्याच्या स्वभावांतल्या परस्पर-विरुद्ध गुणधर्मांचा छडा मात्र त्याला नीटसा लागला नव्हता. त्यानें तें फादर जोसेफच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग म्हणून स्वीकारलें होतें आणि फादर जोसेफ फार काळ लांब असला म्हणजे त्याला कळून येई कीं या परस्परविरुद्ध गुणधर्मांबाबतहि आपल्याला एक जिव्हाळा वाटत आहे. ऐहिक म्हणाव्या अशा अनेक गोष्टींत त्याच्या या 'व्हिकर' चें मन अडकलेलें असलें तरी त्याच्या पहाण्यांतला तो एक अस्सल आध्यात्मिक वृत्तीचा फार मोठा धार्मिक माणूस होता. त्याला खाण्याची चव होती, पिण्याची आवड होती, तरीहि सारे धार्मिक उपवास तो एकाद्या कर्मठ माणसाच्या कडकपणें करी

किंबहुना धर्मप्रसाराच्या लांबच्या प्रयत्नांत खाण्यापिण्याचे कितीहि हाल झाले तरी कधीं चुकूनही तक्रारीचा शब्द उच्चारीत नसे. त्याला उत्तम मद्याची आवड होती. तशी ती असणें दुसऱ्या एकाद्या माणसांत दोषास्पद ठरलें असतें परंतु कुडीनें हाडकुळा आणि जरा दुबळाच असल्यानें पेशाला आवश्यक त्या शारीरिक सामर्थ्याकरतां, मानसिक चिकाटीकरतां आणि उमेदीकरतां मद्य त्याला स्फूर्तिप्रद आणि हिताचेंच ठरे. बिशपच्या नजरेसमक्ष अनेकदां सुग्रास अन्न आणि उंची मद्याच्या एकाद्या बाटलीचा फायदा फादर जोसेफनें आध्यात्मिक स्वरूपाचें कांहीं कर्तृत्व करण्याकरतां घेतलेला होता, इतर कोणाला सुस्ती आणील अशी मेजवानी झोडून फादर व्हेलंट नव्या जोमानें कामाला लागे, दहा बारा तास अंग मोडून कष्ट, वणवण करी, आणि सारें इतक्या एकचित्ततेनें कीं त्या साऱ्यालाच एक भरीव, टिकाऊ स्वरूप असे.

'पॅरिश' करतां, कॅथेड्रल-निधीकरतां, लांबलांबच्या 'मिशन्स' करतां याचना करण्याच्या त्याच्या 'व्हिकर' च्या उत्साहानें बिशपला अनेकदां संकोचण्याची पाळी आलेली होती. तरीसुद्धां उचिततेच्या मर्यादेपर्यंतहि फादर जोसेफनें आपल्या स्वार्थाचा, लाभाचा विचार कधींहि बाळगला नव्हता. एक 'कॉंटंटो' घोडें सोडलें तर जगांत त्याचें असें मालकीचें कांहीं नव्हतें. रिओममधल्या त्याच्या बहिणीकडून त्याला चांगले-चुंगले कपडे मिळत; तरी पण त्याचे दैनंदिन वापराचे कपडे राठ आणि मळकट असत. त्या मानानें बिशपचें मोठें, मौल्यवान् ग्रंथालय होतें. घरांत अनेक सुखसोयी होत्या. त्याच्याकडे सुंदर सुंदर कातडीं आणि ब्लॅंकेटें होतीं. हीं युसाबिओ आणि त्याच्या इतर इंडियन मित्रांनीं भेट दिलेलीं होतीं. शिवणकाम आणि भरतकामात तरबेज मेक्सिकन बायांनीं त्याला त्याच्या उपयोगाकरतां तलम कपडे, अंथरुणें पांघरुणें आणि मेजावर अंथरण्याचे रुमाल भेट दिले होते. ऑलिव्हेर्सनीं आणि 'पॅरिश'-पैकीं इतर संपन्न माणसांनीं दिलेलीं चांदीचीं कांहीं भांडींहि त्याच्या संग्रहीं होतीं. परंतु फादर व्हेलंट मात्र पुरातन सतासारखा होता. निःसंग.

आपल्या उमेदींत, जोसेफनें आपलें जीवन एकांतांत आणि एकाकी चिंतनांत व्यतीत करण्याचें ठरविलें होतें, परंतु खरी गोष्ट अशी होती कीं, माणसें पाहिल्याशिवाय, त्यांच्याशीं कोणत्या ना कोणत्या प्रकारें व्यवहार ठेवल्याशिवाय फार काळ चैन पडावी अशी त्याची वृत्ति नव्हती. आणि जवळ जवळ कोणीहि माणूस त्याला प्रिय होई. ओहिओमध्यें, बग्ग्यांतून लांबचा प्रवास करण्याच्या काळांत, फादर ल्तूरनें हें पाहून ठेवले होतें कीं, दर वेळीं नवा कोणी उतारू

आधींच दाटी झालेल्या त्या बग्गींत शिरला कीं जोसेफला नवा आनंद होई. तो त्या नवागतांत नवा रस घेई. जणूं तो आला हें फार चांगलेंच झालें! याउलट असा कोणी नवा माणूस बग्गींतल्या गर्दींत शिरला कीं बिशपला यातना होत, आणि तो त्या दाखवीत नसे, इतकेंच. ओहिओंतल्या गलिच्छपणाचें जोसेफला कधींच कांहीं वाटलें नव्हतें. भिकार घरें, चर्चेस, निगा नसलेलीं शेतें आणि बागा, सर्वभर दिसणारी अव्यवस्था, घाण, यांनीं फादर लतूर बावून जाई; याउलट फादर जोसेफला तें बहुधा जाणवतहि नसावेसें दिसे. कोणाला वाटलें असतें कीं, सौंदर्य, टापटीप याची दृष्टीच या माणसाला नसावी. तरीहि संगीताची रुचि त्याला फार होती. सँडस्कीमध्ये असतांना त्याच्या जर्मन संगीत-शिक्षकाबरोबर प्रत्येक संध्याकाळ लहान मुलांना संगीताचे धडे देत घालविण्यात त्याला एक विशेष आनंद वाटे.

फादर व्हेलंटबाबत म्हटलें जाई त्या कशामुळेंही त्याच्या व्यक्तिमत्वाचा खुलासा मिळण्याजोगा नव्हता. त्याच्याजवळच्या गोळाबेरीज गुणांपेक्षां त्याचें व्यक्तिमत्व मोठें होतें. कोणत्याहि समाजात त्याला सोडा; त्या जागीं एक नवा उल्हास, नवी उमेद खेळूं लागे. मग तो समाज नॅव्हॅजो इंडियनांचा असो, मेक्सिकनांचा असो कीं रोमच्या वरिष्ठ धर्माधिकाऱ्याचा असो.

गतखेपेला रोममध्यें असते वेळीं बिशपनें फादर व्हेलंट प्रथमच ओहिओहून रोमला गेला तेव्हाच १६ व्या ग्रेगरीचे चिटणीस असलेल्या मॉसिनोर माझुक्ची यांच्याकडून त्याची एक गंमतीशीर हकिकत ऐकली होती.

जोसेफ त्यावेळीं तीन महिने रोममध्यें राहिला होता. दिवशीं चाळीस सेंट हा त्याचा खर्च आणि मिळेल तें सारें तो पाहून घेत होता. अनेकवार त्यानें माझुक्चीकडे, पोपची आणि आपली व्यक्तिशः भेट व्हावी अशी विनंति केली. ओहिओचा हा धर्मोपदेशक माझुक्चीला आवडला होता; त्याच्यांत एक वेगळा चटपटीतपणा, चिवटपणा, आकस्मिकपणा, रोममध्यें येणाऱ्या धर्मगुरूंत त्याला सहसा न आढळलेली टवटवी त्याला आढळली होती. त्यानें पोपशीं त्याची भेट निश्चित केली. त्या भेटींत त्या दोघांव्यतिरिक्त माझुक्चीहि हजर रहाणार होता.

पोपच्या स्पर्शानें पवित्र व्हाव्यात त्या वस्तूंनीं भरलेल्या दोन थैल्या घेतलेल्या एका 'चेंबरलेन' समवेत फादर भेटीच्या दालनांत आला. आरंभींचें आगत-स्वागत संपतांच फादर जोसेफनें आपल्या आणि आपल्या धर्मप्रसारक मित्रांच्या अनुभवांचें असें बोलकें आणि परिणामकारक वर्णन पोपपुढें ऐकवण्याला सुरुवात केली कीं पोपला आणि त्याच्या चिटणिसाला काळवेळेचें भान न राहून

मुळात ठरल्याच्या तिप्पट काळ ही मुलाखत चालली. सोळावा ग्रेगरी सरंजामशाही वृत्तीचा, एकतंत्री वळणाचा होता, युरोपांतल्या राजकारणांत त्यानें चुकीची भूमिका पत्करून ती अखंडपणें चालू ठेवली होती. स्वतंत्र इटलीचा तो शत्रू होता. परंतु जगाच्या दूरदूरच्या कान्याकोपऱ्यांत धर्मप्रसार व्हावा म्हणून आधींच्या पोपपेक्षां त्यानें बरेंच अधिक कार्य केलें होतें. आपल्या मनांतलें बोलणारा, उमगणारा, हा धर्मोपदेशक पाहून त्याला संतोष वाटला. प्रथम फादर व्हेलंटनें स्वतःला, स्वतःच्या धर्मप्रसारक बांधवांना, त्यांच्या मिशन्सना, त्याच्या बिशपला पोपचा आशीर्वाद मिळावा अशी इच्छा प्रदर्शित केली. मग त्यानें एकाद्या फिरस्त्या व्यापाऱ्याप्रमाणें आपल्या मोठ्या थैल्या सोडून अनेक क्रूस, रोजरीज, प्रार्थना–पुस्तकें, पदकें, ब्रेव्हिअरीज यांनीं तट्ट भरल्या स्थितींत त्या पोपपुढें मांडल्या आणि यांनाहि पोपनें पुनीत करावें अशी आणखी इच्छा प्रकट केली. आश्चर्यानें थक्क झालेल्या 'चेंबरलेन'नें दरम्यान अनेकवार तिथें येरझारा केल्या होत्या आणि शेवटीं चिटणीस माझुक्चीनेंहि पोपला पुढल्या कार्यक्रमाची याद दिली. फादर व्हेलंटनें आतां स्वतःच त्या अवजड थैल्या उचलून घेतल्या कारण त्या आणणारा 'चेंबरलेन' आतां तिथें हजर नव्हता; आणि त्या पाठीवर लादून तो पोपपुढून नम्र होऊन निघून जाऊं लागला. तेव्हां पोपनें आसनांतून उठून आपला बाहू वर धरला. आशीर्वादासाठीं नव्हे, अभिवादनाकरतां. आणि बरोबरीच्या माणसाला म्हणावें तसें तो म्हणाला,

"Coraggio, Americano!"

जुन्या आठवणी करण्याकरतां, नवे बेत ठरविण्याकरतां बिशप लतूरला तें 'नॅव्हॅजो' ठिकाण फार पसंत पडलें. त्याच्या भावाला, फ्रान्समधल्या त्याच्या जुन्या मित्रांना तिथून त्यानें लांब लांब पत्रें लिहिलीं. समुद्रावर असतांना जहाजाची केबिन असते तितका हा भाग एकीकडे आणि जगापासून अलग वाटत होता. वाराही अष्टौप्रहर तसाच. एकुलतें एक आणि सदा उघडें दार एवढाच बाहेरच्या परिस्थितीशीं प्रत्यक्ष संबंध. वाऱ्याबरोबर वाळू सतत घरांत येऊन भुईवर विखरून राही. घराची बांधणी इतकी तकलाबी, कीं ऐन वाळवंटांतच जरासा आडोसा करून बसल्यासारखें वाटे.

.४.

युसाबियोकडे येऊन पोंचल्यापासून तीन दिवसांनीं 'व्हिकर'ला परत बोलावणारें बरेंचसें औपचारिक पत्र बिशपनें त्याला लिहिलें आणि मग तिथून तो रोजच्या सारखा बाहेर फिरतीला गेला. सूर्यास्तापावेतों तो बाहेरच राहिला. मग वारा पडला आणि वातावरण स्वच्छ झालें. परत येत असतां, नदीपासून जवळ जवळ मैलाच्या अंतरावर असतां त्यानें 'कॉटनवुड'चा पडघम मंदपणें वाजत असलेला ऐकला. त्याला वाटलें कीं हा युसाबिओच्या घरांतून वाजतो आहे आणि युसाबिओ घरीं आला असला पाहिजे.

परतल्यावर फादर लतूरला युसाबिओ त्याच्या घराच्या दाराशीं पुढ्यांतल्या लांबोडक्या पडघमवर हळूवारपणें नाद घुमवीत नॅव्हॅजो भाषेंतलें एक गाणें म्हणतांना आढळला. त्याच्यापुढें सुमारें चार पांच वर्षांचे दोन इंडियन मुलगे त्या गाण्याच्या तालावर नाचत होते. युसाबिओची पत्नी आणि बहीण या दोघी अंधाऱ्या घरांतून हें पहात होत्या.

या नवागताकडे प्रथम त्या नाचणाऱ्या मुलांचें लक्ष गेलें नाहीं. आपल्याच नादांत तीं होतीं. नाचत होतीं. मुद्रेवर गांभीर्य होतें. तपकिरी डोळे अर्धवट मिटलेले, धुंद होते. त्यांच्या हातांच्या, बाहूंच्या भरदार आणि लयबद्ध हालचाली पहाण्यांत बिशप रंगला. जेमतेम 'कॉटनवुड'च्या पानाइतक्या आकाराच्या त्यांच्या चिमुकल्या पावलाच्या नाजुक, तरबेज हालचाली पहाण्यांत गढला. आणि कोणाच्याहि सूचनेशिवाय, मार्गदर्शनाशिवाय तीं मुलें तें ठेक्यावरचें, अनियमित नृत्य नाचत राहिलीं. युसाबिओहि एकाग्र झाला होता. गुडघ्यांमध्यें पडघम घेऊन, रुंद खांदे वाकवून, डोक्याला एक किरमिजी फडकें बांधून तो बसला होता. थापेनें वा हातच्या काटकीनें तो पडघम वाजवीत असतां त्याच्या गडद गव्हाळी वर्णाच्या बाहूंतले चांदीचे अलंकार चकचकत होते. गात असलेलें गाणें संपल्यावर तो उठला आणि त्यानें बिशपशीं त्या छोट्या मुलांची--त्याच्या भाच्यांची--त्यांच्या इंडियन नांवांनीं ओळख करून दिली. एकाचें नांव होतें 'ईगल फेदर' आणि दुसऱ्याचें 'मेडिसिन मौंटन.' ओळख करून दिल्यावर मानेच्या एका हालचालीनें त्यानें त्यांना निरोप दिला, ते घरांत दिसेनासे झाले. युसाबिओनें पडघम बायकोहातीं दिला आणि पाहुण्याबरोबर तो चालूं लागला.

"युसाबिओ," बिशप म्हणाला, " टुस्कॉनला फादर व्हेलंटला मला एक पत्र धाडायचें आहे. जाकिंतोसोबत तें मी पाठवूं शकेन परंतु मग परतीच्या माझ्या प्रवासांत माझ्या सोबतीला तूं दुसऱ्या कुणाला तरी दिलें पाहिजेस."

युसाबिओ म्हणाला, " मी येतो तुमच्या सोबतीला व्हिलापर्यंत." नॅव्हॅजो लोक सांता फेला अद्याप याच जुन्या नांवानें संबोधीत.

त्याप्रमाणें, दुसऱ्या दिवशीं सकाळीं, जाकिंतोला दक्षिणेकडे पाठवून देण्यांत आलें आणि फादर लतूर आणि युसाबिओ आपलीं ओझ्याचीं जनावरें घेऊन पूर्वेकडे दौड मारत निघाले.

परतीचा प्रवास सुमारें चारशें मैलांचा होता—हवा दोन प्रकारची आलटून पालटून अनुभवाला येत होती. एक तर डोळे दिपविणारें उन्ह किंवा वाळूचें सोसाट्याचें वादळ. खालचें वाळवंट जेवढें एकसारखें, निःस्तब्ध तेवढें वरचें आभाळ बदलतें, हलतें वहातें. आणि वरचें आभाळ खूप विस्तीर्ण होतें—समुद्रावरही एवढें असत नसेल, जगांत दुसरीकडे कुठेंही नाहीं. वाळू पायतळीं होती इतकेंच. बाकी पहावें तिकडे हें आभाळ. त्याची निळाई. उन्ह त्याखाली डोंगरही वारूळांगत वाटत होते. इतरत्र आभाळ हें जगाचें छप्पर मानलें जातें; परंतु इथें भुई आभाळाची जमीन होती, लांबून दिसे तें जग आभाळाचें, भोंवतीं पहावें तिकडे आभाळ, ज्यांत आपलें अस्तित्व तें जग म्हणजेच सगळे आभाळ !

युसाबिओबरोबर प्रवास करणें म्हणजे मानवी स्वरूपांतल्या या प्रदेशाबरोबरच प्रवास करण्यासारखें होतें. लहरी हवा आणि दैवाधीनता या गोष्टी भारावल्या परंतु आनंदी मनानें त्यानें स्वीकारल्या होत्या. तो बोले थोडका, खाई थोडका, कुठेंही झोंपून जाई, सदा मनाची खुली वृत्ति आणि दिलदारपणा कायम असे. जाकिंतोप्रमाणें त्याचेंही वागणें वावरणें शिस्तीचें आणि शालीन होतें. फुलें गोळा करण्याकरतां वाटेंत तो इतक्या वेळा थांबतो याचें बिशपला आश्चर्य वाटे. एकदां सकाळचा, घोडीं घेऊन हातीं किरमिजी रंगाच्या थरथरत्या, लांबोडक्या फुलांचा एक गजरा घेऊनच तो परत आला.

"यांना इंडियन्स 'रेनबो फ्लॉवर' म्हणतात." तो तीं झुलवीत म्हणाला. " अजून तशीं फुललेलीं नाहींत हीं."

मुक्कामाची दरड किंवा झाड किंवा वाळूचें टेकाड सोडतांना प्रत्येक वेळीं युसाबिओ तिथल्या आपल्या वसतीच्या खुणा पुसून टाकण्याची खबरदारी घेई. शेकोटीची राख तो गाडून टाकी, उरलें सुरलें अन्न खड्डा खणून त्यांत पुरून टाकी. एकत्र केलेले दगड पुन्हां पुन्हां विखरून, पाडलेलीं विवरें बुजवून मगच

तो निघे. जार्कितोची पद्धत हीच, अशीच होती. यावरून फादर लतूरच्या मनांत आलें कीं कोणत्याही प्रदेशात आपली खूण मागें ठेवण्याला, आपलें अस्तित्व प्रस्थापित करण्याला, कांहीं नवीन, वेगळें, विधायक करण्याला गौरकाय माणूस उत्सुक असतो तसे हे इंडियन्स कोणत्याही प्रदेशांतून आपला वावर जाणवूं न देत। जाऊं इच्छितात. काही बदलूं देत नाहींत, वेगळें राहूं देत नाहीत. येण्यापूर्वी सारें होतें तसें जातांना सारें ठेवून जातात. पाण्यांतल्या मासोळीसारखे, हवेंतल्या पक्षासारखे.

कोणत्याही प्रदेशांत उठून दिसण्याऐवजीं मिसळून जाण्याची ही इंडियन पद्धति. ' होपि ' गांवच घ्या ना. ज्या खडकावर ते उभें होतें त्याचाच रंग-त्याचेंच रूप त्यानें धारण केले होते; लाबून त्याचें वेगळें अस्तित्व भासतही नसे. भोवतीं वाळू, वृक्ष. आाणि यांचीं घरेंही याच बनावटीचीं. घराला कांचेचीं तावदानें बसविण्याची त्या काळीं कोणा गावाची तयारी नव्हती. सूर्याचें कांचेंतलें परावर्तन, प्रतिबिंब त्यांना कुरूप वाटे, अनैसर्गिक वाटे—अगदीं धोक्याचें वाटे. त्यांना मुळीं मुळांत कसला बदल, कांहीं नवें मानवत नसे. त्यांच्या बापजाद्यांनीं या खडकाळ आाणि वालुकामय प्रदेशांत रुळविलेल्या ठराविक पायवाटेनें तेहीं येत होते, जात होते. उंच खडकांवरच्या त्यांच्या वसत्यांचे जुनेच नैसर्गिक दगडी जिने चढत होते आणि उतरत होते, जुन्याच झऱ्याच्या कावडी वहात होते—अगदीं गौरकाय लोकानीं नव्या विहिरी खोदल्यावरही.

चांदीचे अलंकार घडवितांना वा नीलमणि खोदतांना अपार चिकाटी त्यांच्या कडे असे; स्वतःच्या ब्लँकेटावर पट्टयावर, सणावारीं मिरवण्याच्या कपड्यांवर ते आपलें सारें कलाकसब एकवटींत. परंतु सजावटीची ही त्यांची कल्पना यापलिकडे, आसपासच्या प्रदेशापर्यंत पोंचत नव्हती. युरोपीय माणसांची निसर्गावर मात करण्याची, त्याला वांकविण्याची, नमविण्याची जिद्द त्यांच्यांत नव्हती. वेगळ्याच दिशेनें त्यांचें कसब, चातुरी कामीं येई. भोंवतालच्या प्रदेशांत स्वतःला ते बेमालूम मिसळून टाकीत. त्यासाठीं स्वतःत बदल घडवीत, जुळतें घेत. यांत बिशपच्या मतें आळस नव्हता, सुस्तपणा नव्हता तर बापजाद्यांपासून चालत आलेलें भय आणि आदर होता. जणूं तो सारा अवाढव्य भूखंड गाढ झोपलेला होता आणि त्याला जाग न आणतां त्यांना जगायचें होतें. वा पंचमहाभूतांना चाळवणें, डिवचणें त्यांना नको होतें. ते शिकारी करीत तेही याच सारासारबुद्धीनें. त्यांची शिकार म्हणजे कत्तल नसे. नद्या वा जंगले विस्कटणें वा विध्वंसिणें त्यांना बरें वाटत नसे; नदीचें पाणी पाट काढून ते बाजूला घेत तेंही

अगदीं गरजेपुरतेंच. जमीन आणि तिच्यावरच्या साऱ्याच गोष्टींविषयीं ते एक कदर बाळगून असत. यांतलें कांहीं ते सुधारूंही पहात नसत आणि बिघडवण्यालाही नाराज असत.

फादर लतूर आणि युसाबिओ अल्बुकर्केच्या नजीक आले तसे त्यांना येते जाते इंडियन्स भेटूं लागले. सोबत मिळूं लागली. सर्वांच्या वाटचालीची एकच मुग्ध तऱ्हा. मग गति जलद असो कीं मंद असो. तेंच निरुपद्रवी वागणें, वावरणें. प्रत्येकानें अंगावर झगझगीत ब्लँकेट लपेटलेलें, तो घोड्यावर बसलेला वा त्याचा लगाम हातीं धरून चालणारा. साऱ्या वाटा, वळणें एकाच अचळपणें पार करणारा. जणूं वसंताची नवी जागृति दाखविणाऱ्या या सृष्टींतून त्यांना न दिसतां, न जाणवतां निघून जायचें होतें.

लगुनाच्या उत्तरेकडे दोन 'झुन' निरोपे बाजूनें दौडत गेले. कांहीं इंडियन कामाकरतां ते पूर्वेकडे चालले होते. दौडतांनाच उघड्या पंजानें त्यांनीं युसाबिओला अभिवादन केलें परंतु ते थांबले नाहींत. उमद्या सांबराच्या चपळ अचळपणानें ते दूर निघून गेले. बाजूच्या टेकडावर त्यांच्या आकृत्या हिंदकळत, वर खालीं होत गेल्या—मंद परंतु समर्थ उड्डाण करणाऱ्या, झेंपावत्या घारींच्या सांवल्या भुईवरून सरकत जाव्यात, तशा.

# आठवा खण्ड

.१.

सांता फेला येऊन फादर व्हेलंटला तीन आठवडे झाले होते आणि तरीही दुस्कॉन-हून त्याला बोलावण्यात येण्यामागचा हेतु अद्याप बिशपनें त्याला शब्दानेंही कळवला नव्हता. एकदां सकाळीं फ्रुक्तोसानें बागेत येऊन त्याला वर्दी दिली कीं आज जेवण नेहमींपेक्षा लौकर व्हायचें आहे, कारण बिशप दोनप्रहरीं कुठेंसे जाणार आहेत. सुमारें अर्ध्या तासानंतर फादर व्हेलंट त्याच्या बिशपबरोबर भोजनाला बसला.

बिशप सहसा एकटा जेवत नसे. लांबच्या एखाद्या चर्चचा धर्मगुरु, वा कोणी लष्करी अधिकारी किंवा अमेरिकन व्यापारी आणि असें कोणी नसेल तर जुन्या मेक्सिकोंतून वा कॅलिफोर्नियांतून कोणी आला असतां त्याच्याशीं महत्त्वाच्या गोष्टी करण्याला याच वेळीं चांगली उसंत असे. जेवणाची खोली प्रशस्त होती, तिला थंडावाहि चांगला होता. पश्चिमेकडच्या टोंकालाच तिला खिडक्या होत्या; त्यांतून बाग दिसे. झाडांमुळे आंत प्रकाश येई तो मंद प्रमाणांत. उन्हाचे कवडसे आंत येऊन भिंतींवर काचावर खेळत. मादाम ऑलिव्हेर्सनें सांता फे सोडून न्यू ऑर्लिन्सला परत जाण्याच्या दृष्टीनें घरांतल्या एकेक वस्तू लिलावांत विकल्या तेव्हां फादर लतूरनें तिच्याकडले जेवणाचें मेज आणि मद्य ठेवण्याचा 'साइड बोर्ड' विकत घेतला होता. आपली आठवण म्हणून डोना इसबेलानें स्वतः त्याला कॉफीचा चांदीचा सेट आणि मेणबत्त्यांचें पात्र दिलें होतें. धूसर प्रकाशाच्या त्या सबंद खोलींत जरा भारी अशा एवढ्याच वस्तू दिसत.

फादर जोसेफ जेवणाकरतां खोलींत आला तेव्हां बिशप आपल्या आसनांत प्रविष्ट झालेला होता. "आपलें जेवण आज लौकर कां तें फ्रुक्तोसानें सांगितलें का तुला? दुपारीं जरा बाहेर जाऊं या. तुला कांहीं दाखवायचें आहे."

"बरें झालें. मी बेचैन आहे हें कदाचित् तुमच्या लक्षांत आलेंच असेल. सबंध दोन आठवडे मी असा मागें केव्हां धूळ खात पडलों असल्याचें मला

आठवत नाहीं. पागेंत जाऊन ‘ कॉंटेण्टो ’कडे पहातों तेव्हां नजरेनें तो जणूं मला हिणवतो. असाच राहिला तर तो देखील अंगानें सुटेल ! ”

बिशपनें स्मित केलें. त्या स्मितांत किंचित् मिस्कील भावहि होता. जोसेफला तो चांगला ओळखीत होता. जराशा बेफिकीरपणेंच तो म्हणाला, “ समजा. टुस्कॉनहून सहाशें मैल रखडपट्टी केल्यावर थोड्या विश्रांतीनें त्याचें कांहीं नुकसान होणार नाहीं. आज दुपारीं काढ त्याला बाहेर. मी ‘ अँगेलिका ’वर बसेन. ”

दोनप्रहरनंतर थोड्या अवधीनें ते दोघे धर्मगुरू घोड्यांवर बसून पश्चिमेकडे निघाले. आपलें उद्दिष्ट बिशपनें उघड केलें नव्हतें आणि व्हिकरनेंहि तें विचारलें नव्हतें. लौकरच सडक सोडून ते सीधे दक्षिणेकडे एका मळवाटेनें निघाले. निळ्या सांडिया डोंगराकडे जाणाऱ्या उताराला लागले.

चारच्या सुमारास रिओ ग्रँड व्हेलीच्या एका उंच टोकावर ते पोंचले. इथून वाट एकदम खालीं उतरून, सांडिआ डोंगराला पायथ्याशीं वळसा घालून सुमारें साठ मैल अंतरावरच्या अल्बुकर्कमध्यें पोंचली होती. ते उभे होते तो भाग त्रिकोणी, खडकाळ टेकड्यांचा होता. त्यावर तुरळक पर्णराजी दिसत होती. खडकाचा रंग हिरवा होता परंतु छटा समुद्राचा रंग आणि ऑलिव्हचा रंग या दरम्यानची आणि विरळा सांपडणारी होती. खालच्या, खडीनें भरलेल्या जमिनीला हीच हिरवी छटा होती. फादर लतूर, या उंचवट्याच्या पश्चिम टोकाला उताराशीं उभ्या असलेल्या, अलग पडलेल्या एका टेकडीकडे दौडत गेला. टेकडी बरीच उंच होती. निळ्या सांडिआ डोंगराच्या माळेला आणि मावळत्या सूर्याला सामोरी अशी ती दाटून उभी दिसत होती. ते तिच्यापाशीं पोंचले तेव्हां फादर व्हेलंटच्या नजरेत एक गोष्ट आली. पश्चिम बाजूला जमीन निचरून केवळ खडकांची एक भक्कम भिंत तेवढी उरली होती आणि ती इतर टेकड्यांप्रमाणें हिरवी नव्हती. सोनेरी पिवळी होती. सूर्यास्ताच्या आतांच्या प्रकाशासारखीच ती भासत होती. फावडीं, पहारी तिथें पडलेल्या होत्या आणि नुक्त्याच फोडलेल्या दगडाच्या ठिकऱ्याहि विखुरल्या होत्या.

बिशप असली एक ठिकरी उचलण्याकरतां वांकत म्हणाला, “ या साऱ्या हिरव्या टेकड्यांत एवढीच ही पिवळी सांपडावी हें नवल आहे, नाहीं ? या टेकड्यांतून मी सर्वत्र हिंडलों आहे. परंतु ही मात्र अशा प्रकारची एवढीच. ” हातीं घेतलेल्या पिवळ्या ठिकरीकडे तो पहात होता. पवित्र आणि धार्मिक वस्तु हाताळण्याची त्याची एक वेगळीच तऱ्हा होती; आणि तीच तो फार सुंदर वस्तूंबाबतहि अंमलांत आणी. क्षणभर मुग्ध राहून त्यानें त्या भरभक्कम

भिंतीकडे पाहिलें. ती सोन्यासारखी चकाकत होती. तो म्हणाला, "ही टेकडी हेंच माझें कॅथेड्रल."

फादर जोसेफनें बिशपकडे पाहिलें. मग किलकिल्या डोळ्यांनीं त्या टेकडीकडे पाहिलें. "एवढा कठीण दगड आहे इथला ? रंग खरेंच चांगला आहे. सेंट पीटर्सच्या स्तंभाची आठवण होते."

बिशपनें अंगठ्यानें हातांतली ठिकरी स्वच्छ केली. "घराजवळचें कांहींतरी वाटतें ही पाहून--क्लेरमाँटजवळचें. या ठिकरीकडे, या टेकडीकडे मी पहातों तेव्हां वाटतें कीं मागेंच ऱ्होन नदी वहाते आहे !"

"असें असें. म्हणजे तुम्ही ॲव्हिग्नॉनच्या पोप्सच्या राजवाड्याबद्दल म्हणतां ! खरें आहे. तसें वाटते खरें इथें. या दिवसांत अशा वेळीं तरी तिथें असेंच असतें."

एका दरडीवर बिशपनें बैठक मारली. अजूनहि तो त्या टेकडीकडेच पहात होता. "मला अगदीं हाच दगड हवा होता; आणि योगायोगानें हा इथें आढळला. इस्लेताहून मी परत येत होतों. अखेरच्या घटका मोजणाऱ्या पॅड्रे जीससच्या भेटीला मी गेलों होतों तिथून येत होतो. त्यापूर्वी कधीं या वाटेनें मी आलेलों नव्हतों परंतु सांतो डॉमिनिगोला पोचलों तेव्हां सडक मोठ्या पावसानें एवढी धुपून गेली होती कीं मी ती सोडून या मार्गानें आलों. उतरत्या दुपारीं इथे पोचलों. आतां आहे अशी ही टेकडी समोर गेली. आणि त्या क्षणीं मन म्हणालें कीं हेंच माझें कॅथेड्रल."

"हे अपघात नसतात, जीं. असल्या गोष्टी कांहीं पूर्वयोजनेनेंच घडत असतात. परंतु कॅथेड्रल बांधण्याचा बेत तुम्हांला इतक्यांत मनावर घेतां येणार नाही"

"परंतु तो फार लांबणीवरहि टाकावा लागूं नये असें वाटतें. माझ्या आयुष्यांत या डोळ्यांनीं हे काम पुरें झालेलें मला दिसावें--अर्थात् ईश्वरेच्छा तशी असेल तर. होईल, घडेल म्हणून मला कांहींहि कुणावर सोंपवायचें नाहीं, इमारती बांधणाऱ्या अमेरिकन्स माणसांच्या पंगतीलाहि मला जायचें नाहीं. त्या तिकडे ओहिओंत बांधताहेत तसली भयंकर इमारत बांधण्यापेक्षां आपलें आहे हें कच्च्या बांधणीचें जुनें चर्चच मला पत्करेल. मला हवें साधें चर्च, पण मला तें चांगलेंहि व्हायला हवें. इंग्लिश तबेल्यासारखी लाल विटांची क्लिष्ट इमारत चर्चच्या नांवानें उभी रहावी म्हणून मी यत्किंचितहि उत्साह दाखविणार नाहीं. या भागाला आपली 'Midi Romanesque' पद्धतच खुलेल."

फादर व्हेलंटनें चष्मा पुसला. "जीं, अशी इमारतीच्या बांधकामाची

अन्नडविचड करीत राहिलांत आणि ती बांधायला अमेरिकन माणसें नकोत म्हणालांत तर मग कुणाला सांगणार आहांत तें काम तें तरी सांगा!"

" आहे--माझा एक मित्र आहे. तुलूजमध्यें असतो तो. चांगला स्थापत्य-विशारद आहे. मागल्या खेपेला तिकडे गेलों असतां ह्या संबंधांत त्याच्याकडे बोललोंहि होतों मी. तो स्वतः कांहीं इथवर येऊं शकणार नाहीं; मोठ्या सागरी प्रवासाची त्याला भीति वाटते. आणि घोड्यावरच्या प्रवासाची त्याला संवय नाहीं. परंतु त्याचा एक तरुण मुलगा आहे. अद्याप शिकतो आहे तो. तो हें काम आनंदानें हातीं घेईल. या नव्या जगांत ' रोमनेस्क' पद्धतीचें पहिलें चर्च बांधणें हीं त्या मुलाची फार मोठी महत्त्वाकांक्षाच बनली असल्याचें त्याच्या बापाच्या पत्रांतून मला नेहमीं वाचायला मिळतें. त्या दृष्टीनें त्यानें कांहीं कल्पना केल्या असतील, नमुने अभ्यासले असतील. 'मिडि'चीं जुनी चर्चेस साऱ्या फ्रान्समधलीं सर्वांत सुंदर चर्चेस असल्याचें तो म्हणतो. आपली तयारी झाली कीं दोन तीन पाथरवट बरोबर घेऊन तो इथें येईल. सैंट लुईच्या मजुरांहून या लोकांची मजुरी नक्कीच जास्त नसेल. आतां मला हवा तसला दगडहि सांपडलाच आहे; माझ्या दृष्टीनें कॅथेड्रलच्या उभारणीला सुरुवात झालीच आहे. सांता फेपासून ही टेकडी फार तर पंधरा मैलांवर आहे. दरम्यान जरा चढ आहे, परंतु तो फार मोठा नाहीं. इथून दगड गांवांत नेणें मला वाटलें होतें त्याहून सोपेंच जाईल."

जरा नवलानेंच आपल्या मित्राकडे, बिशपकडे पहात फादर जोसेफ म्हणाला, " तुम्ही फार पुढचे बेत ठरवतां. अर्थात बिशपला हेंच जमलें पाहिजे हेंहि खरें. माझ्यापुरतें म्हणाल तर मी आपला नाकाखालचें पहाणारा माणूस आहे. भोंवतीं सारें दारिद्र्य असतां, आणि आपणहि दरिद्री असतां त्यांत इतकी चांगली इमारत बांधण्याचें तुमच्या मनांत असेल हें माझ्या स्वप्नांतहि नव्हतें."

" परंतु फादर जोसेफ, कॅथेड्रल होणार तें आपल्याकरतां नव्हे, भविष्यकाळा-साठीं आपण तें बांधणार आहों, तें आपण मागें ठेवणार आहों. फ्रान्समध्यें स्थापत्याबाबत भूषण समजल्या जाणाऱ्या सेमिनरींतले आहों आपण. आधींच वाटेल तेवढीं भिकार बांधणीचीं चर्चेस असलेल्या या भूमीवर आणखी एक बेरूप चर्च उभारलें तर लज्जास्पद गोष्ट ठरेल ती आपल्याला."

" तुमचेंच बराबर असेल. मी यावर कधीं विचारच केलेला नाहीं. ओहि-ओच्या पद्धतीव्यतिरिक्त वेगळें एखादें चर्च इथें आपण उपलब्ध करूं शकूं असेंच मला यामागें कधीं वाटलें नव्हतें. मला आठवतें त्याप्रमाणें तुमच्या

पूर्वजांनीं क्लेरमॉंटचें कॅथेड्रल बांधण्याला तेराव्या शतकांत हातभार लावला. काल घटना पुनरावृत्त करतो हेंच खरें. कॅथेड्रलची कल्पना तुम्ही एवढी जिवाला लावून घेतली असेलसें नव्हतें वाटलें मला."

फादर लतूर हंसला. "तर मग काय ती वर वर बोलायची गोष्ट असायला हवी होती?"

"नव्हे, तसें नव्हे!" फादर व्हेलंटनें अस्वस्थपणें खांदे चाळवले. यांत आपण एवढें मागें कां घेत आहोंत तें त्याचें त्यालाच समजत नव्हतें.

ते ज्या टेकडीसमोर उभे होते तिचा पायथा आतां काळवंडून पिवळ्या जर्द शाडूसारखा झाला होता. शेंडा मात्र अजूनहि वितळत्या सुवर्णाची शान दाखवीत होता. खूप तृप्तीचा एक उसासा टाकून अखेर बिशप वळला. "होय." तो पुटपुटला. "हा दगड फार उपयोगी येईल. चल. घरीं चलूं या. दर वेळीं इथें यावें तों हा दगड मला अधिकच आवडूं लागतो. या प्रकारें ईश्वर माझी आवड, वाटलें तर याला माझा पोकळ रुबाब म्हण, पुरवील असें वाटलें नव्हतें. तुला सांगतों, मला कोणी मोठी इस्टेट दानधर्माकरितां देऊं केली असती आणि बदल्यांत ही टेकडी हवी तर घे म्हटलें असतें तर मी हंसत ही टेकडी घेतली असती! अनेक कारणांस्तव, कॅथेड्रल ही माझी अत्यंत जिवलग गोष्ट झाली आहे, मला वाटतें, तूं मला याबद्दल फार ऐहिक वृत्तीचा म्हणणार नाहींस."

चंद्रप्रकाशानें न्हालेल्या त्या प्रदेशांतून परतीची वाट कापीत असतां, फादर व्हेलंटला एक दोन गोष्टींचें अद्याप गूढ वाटत होतें. आरिझोनांत धर्मकार्य करण्यापासून परावृत्त करून त्याला इकडे कां बोलावण्यांत आलें होतें हें एक गूढ. आणि एका इमारतीबाबत एका गरीब धर्मोपदेशक बिशपानें एवढें कां मानून घ्यावें, हें दुसरें गूढ. त्याला स्वतःला तें कॅथेड्रल व्हावें असें वाटत होतें; परंतु तें 'मिडी रोमनेस्क' पद्धतीचें असावें कीं 'ओहिओ जर्मन' पद्धतीचें, याला त्याच्या लेखीं काडीचेंहि महत्त्व नव्हतें.

.२.

हा प्रसंग घडला त्याच्या पुढल्या दिवशींच सांता फेमध्यें साप्ताहिक टपाल आलें. त्यांत बिशपकरतां बरींच पत्रें होतीं. त्याची सबंध सकाळ त्यांतच गेली. जेवणाच्या

वेळीं फादर व्हेलंटला त्यानें सांगितलें कीं लीव्हेनवर्थच्या बिशपकडून एक फार महत्त्वाचें पत्र आलें असून त्याच्या विचारार्थ संध्याकाळीं दोघांनीं एकत्र बसणें जरूर आहे.

या अनेक पानी पत्रांत कोलोरॅडोंत, रॉकी डोंगरांच्या जवळ जवळ अज्ञात भागांत घडणाऱ्या अनेक घटनांबाबत मजकूर होता. साता फेपासून हा प्रदेश उत्तरेकडे तसा केवळ कांहींशें मैलांवर. परंतु त्या भागाशीं दळणवळण इतकें अनियमितपणें चाले कीं युरोपची बातमी सांता फेंत पाइक्सपीकच्या त्या भागा-तल्या बातमीपेक्षां लौकर पोंचे. गतवर्षांत त्या भागांत सोन्याच्या मोठ्या खाणी सांपडल्या होत्या आणि फ्रान्सहून आलेल्या एका पत्रांतून फादर व्हेलंटला हें प्रथम समजलें होतें. चेरी क्रीक आणि सांता फे या दरम्यानच्या अज्ञात डोंगरदऱ्या पार करून पोंचावी त्याहून लौकर ही वर्दी अॅटलांटिक किनाऱ्यावरून युरोपला आणि तिथून परत याइथें पोंचली होती. फादर व्हेलंट टुस्कॉनला असतां त्याच्या भावाचें, मारिअसचें या बातमीचें पत्र औव्हर्नेहून आलें होतें आणि आपल्याला गंधवार्ताहि नसलेल्या या इथल्याच नजीकच्या गोष्टीबाबत यानें निम्में अधिक पत्र अनेक प्रश्न विचारून भरून टाकावें आणि आपल्याला हवा तो इटालीं-तल्या लढाईचा अधिक महत्त्वाचा, निकटचा तपशील मात्र त्यानें चटापुरता द्यावा, याचा तेव्हां फादर व्हेलंटला जरा रागहि आला होता.

पाइक्सपीकच्या आसमंतांतला रॉकी डोंगरांचा तो भाग त्या काळीं अगदीं अज्ञात होता. व्योमिंगहून ताओसला येणारे फांसेपारधीदेखील तेवढा ग्रॅनाइटचा कुबडवजा उंचवटा वगळीत, टाळीत. थोड्याच वर्षांमागें, फ्रेमपॉटनें 'कोलोरॅडो-रॉकीज' मधून पार जाण्याचा प्रयत्न केला होता आणि शेवटीं तीं माणसें भुकेनें अर्धमेल्या स्थितींत परत ताओसला आलीं होतीं. जवळचीं खेचरेंदेखील त्यांना मारून भक्षण करावीं लागलीं होतीं. परंतु गेल्या वर्षभरांत सारेंच पालटलें होतें. चेरी क्रीकच्या टापूंत नशीब काढीत फिरणाऱ्या भटक्या लोकांना सोन्याच्या मोठ्या खाणी सांपडल्या होत्या आणि वर्षांमागें निर्मनुष्य असलेल्या त्या डोंगराळ भागांत माणसांची आतां दाटी उडाली होती. मिसुरी नदीकडून मधला गवताळ भाग पार करून पश्चिमेकडे गाड्यांची नुसती रीघ लागून राहिली होती.

लीव्हेनवर्थच्या बिशपनें फादर लत्रूरला लिहिलें होतें कीं, तो स्वतः नुक्ताच कोलोरॅडोच्या त्या भागाला भेट देऊन परतला होता. छावण्या करून तंबूंतून आणि तात्पुरत्या निवाऱ्यांतून रहाणारीं हजारों माणसें, सुरुंगांनीं काळ्या पडलेल्या खोल खोल दरडी, चैन मौजेच्या आणि जुगाराच्या साधनांनीं गजबजलेलें डेन्व्हर

शहर, या साऱ्या स्वार्थसाधू वातावरणांत आढळलेले शेंकडो प्रामाणिक कॅथॉलिक्स आणि त्याबरोबरच एकाद्या धर्मगुरूचा या भागांत असलेला अभाव, या साऱ्याचें वर्णन त्या बिशपनें त्याच्या पत्रांत केलें होतें. कोणत्याही आध्यात्मिक मार्गदर्शनाविना त्या बकाल वातावरणांत तरुण मुलें वहावत असल्याचें त्यानें म्हटलें होतें. म्हातारे कोतारे उघड्या हवेनें, डोंगरी न्युमोनियानें मरत होते आणि धर्मांत सांगितल्या रीतीनें त्यांचें शेवटचें कर्म उरकण्याला कोणी नव्हतें, असेंहि त्यानें लिहिलें होतें.

ही नवी, वाढती वसाहत सध्यांपुरती फादर ल्तूरनें आपल्या अखत्यारांत घ्यावी असें कन्सासच्या त्या बिशपचें म्हणणें होतें. पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे हजारों चौरस मैलांनी आधींच वाढलेल्या आपल्या 'डायकोज' मध्यें फादरनें कोलोरॅडो रॉकीजमधली ही निनावी परंतु आकस्मिकपणें महत्त्व पावलेली वस्तीहि जमा करावी असें त्यानें सुचविलें होतें. शक्य तितक्या त्वरित त्या भागांत एक धर्मगुरू पाटवा असें त्यानें शेवटीं कळकळीनें विनवलें होतें. अर्थातच हा धर्मगुरू केवळ धर्मपरायण असून चालणार नव्हतें, तर तो चतुर, बुद्धिमान आणि सर्व प्रकारच्या माणसांशीं जमवून घेऊं शकणारा असणें अवश्य होतें. तसेंच त्यानें बरोबर अंथरुणें पांघुरणें, मुक्कामाचीं साधनें, औषधें, खाण्यापिण्याच्या व इतर आवश्यक वस्तु आणि कडक हिंवाळ्याच्या दृष्टीनें जरुर तितके कपडे घेणें आवश्यक होतें. कॅम्प डेन्व्हरला तंबाकू आणि व्हिस्कीपलिकडे दुसरें कांहींहि विकत मिळत नव्हतें. तिकडे स्त्रिया नव्हत्या आणि स्वैपाकाचीं रीतसर साधनेंहि नव्हतीं. अर्धकच्च्या भाकऱ्या आणि दारू यावर तिथें माणसें जगत होतीं डोंगरावरचें पाणीहि त्यांनीं निर्मळ राखलें नव्हतें आणि त्यामुळें तापानें अनेकजण मरत. तिथली सारीच रहाणी मोठी भयानक होती.

संध्याकाळीं, जेवण झाल्यावर, फादर ल्तूरनें फादर व्हेलंटला तें पत्र वाचून दाखवलें त्याचें वाचून संपल्यावर त्यानें बारीक अक्षरांत लिहून काढलेले ते कागद खालीं ठेवले.

"काम नाहीं म्हणून तक्रार करतोस तूं, फादर जोसेफ. हें तुला काम."

पत्र ऐकत असतां अधिकाधिक अस्वस्थ होत असलेला फादर जोसेफ यावर फारसें कांहीं म्हणाला नाहीं. तो इतकेंच बोलला : "तर मग आतां पुन्हा मी इंग्रजी बोलायला लागायचें ! तुमची परवानगी असेल तर उद्यांच निघतों."

बिशपनें मान हलवली. "इतकी घाई करण्याचें प्रयोजन नाहीं." तो म्हणाला. "प्रवासाखेरीज तुझें स्वागत करायला इथल्यासारखे तिथें आतिथ्यशील मेक्सिकन नाहींत. बरोबर बरीच चीजवस्त घ्यायची आहे तुला. प्रथम एक गाडी

साधवून घेऊं या. तुझ्याकरतां काय काय लागेल तेंहि नीट ठरवून जमवूं. ऑक्विलिनोचा भाऊ साबिनो तुझा गाडीहांक्या होईल. आतांपर्यंतच्या तुझ्या धर्मगुरूच्या आयुष्यांत हें नवें काम जास्त अवघड ठरेल असा माझा कयास आहे."

बराच काळ ते दोघे असे बोलत होते. आरिझोनाचाहि विचार क्रमप्राप्त होता. फादर व्हेलंटचें कार्य पुढें चालविण्याकरतां तिथें कुणाला तरी धाडणें जरूर होतें. फादर व्हेलंटनें अनेक प्रदेश आणि तिथले लोक पाहिले होते; परंतु आरिझोनाचा त्याचा भाग आणि तिथला समाज त्याला फार पसंत पडला होता, आवडला होता. परंतु बंध, पाश तोडणें, ऋणानुबंध न जुमानणें हीच त्याच्या पेशाची शिस्त होती. कोणत्याहि क्षणीं कुणालाही रामराम ठोकून कोणत्याहि अज्ञात स्थळाकडे चालू लागणें हेंच तर त्याचें ब्रीद होतें.

त्या रात्रीं झोपीं जाण्याआधीं फादर जोसेफनें बुटांना तेल लावलें, जुन्या वस्त्र्यानें पायांवरच्या कैसाळ जागा स्वच्छ केल्या. टकास डोंगरांतल्या चिमायो गांवचे धर्मनिष्ठ मेक्सिकन रहिवासी त्यांच्या चर्चमधल्या सानतिआगोच्या एका मूर्तीविषयीं भारी भक्ति बाळगून होते. दर कांहीं महिन्यांनीं या मूर्तीला ते बुटाचा नवा जोड चढवीत. रात्रीं हा सानतिआगो बाहेर पडून लांबलांबवर जातो आणि तो घोड्यावर बसलेला असला तरी त्याचे बूट या फिरण्यानें झिजतात असें त्यांचें म्हणणें असे. तिथें असताना फादर जोसेफ त्यांना नेहमीं म्हणे कीं, धर्मगुरूंच्या केवळ हातांनाच विशेष सामर्थ्य देणाऱ्या देवबाप्पानें त्याच्या पायांनाहि तें दिलें असतें तर फार बरें झालें असतें.

चिमायोच्या या सानतिआगोसंबंधांतला एक प्रसंग तो नेहमीं सांगे. कांहीं वर्षांमागें फादर जोसेफला सांता फेच्या 'कोलोबोझो'ला भेट देण्याचा हुकूम झाला. चिमायोच्या एका खुनी माणसाची त्यानें तिथें जाऊन भेट घ्यायची होती. तो खुनी वीस वर्षांचा पोर असल्याचें त्याला प्रत्यक्ष भेटींत दिसून आलें. चेहरामोहरा सात्त्विक वाटावा असा. वागणेंहि असेंच. त्याचें नांव होतें. रेमॉन आर्माजिह्लो. कोंबड्यांच्या लढतीचा तो फार नादी होता आणि तेंच त्याला बाधलें होतें. एक मोठा तगडा कोंबडा त्यानें पाळला, जोपासला होता. एकहि लढत हा कोंबडा हरत नसे. उलट भोंवतालच्या गांवांतल्या अनेक कोंबड्यांचे कंठ त्यानें फोडले होते. अखेर सांता फेच्या एका प्रसिद्ध कोंबड्याशीं लढत खेळण्याकरतां रेमॉननें त्याचा कोंबडा सांता फेला आणला... लढतीच्या वेळीं चिमायोची पाच सहा इतर मुलेंही आलीं आणि स्वतःजवळचें होतें नव्हतें सारें त्यांनीं त्या कोंबड्यावर लावलें. दोन्ही बाजूंनीं फार मोठ्या रकमा हरेला पडल्या आणि प्रेक्षकांच्या तिकिटाच्या पैशांची रक्कम

विजेत्या कोंबड्याच्या मालकाला मिळायची होती. जरा अनिश्चित अवस्थेंतच लढतीला आरंभ झाला; परंतु पुढें रेमॉनच्या कोंबड्यानें प्रतिस्पर्ध्याची धमनी अचूक तोडली आणि लढत जिंकली. यावर कोणाच्याहि लक्षांत येण्याआंत पराभूत कोंबड्याचा मालक रिंगणांत घुसला आणि रेमॉनच्या कोंबड्याची मान त्यानें साफ मुरगळली. त्यानें हातांतून पिसांचें तें निर्जीव गाठोडें खालीं टाकण्याआंत रेमॉनचा चाकू त्याच्या उरांत खोलवर घुसला. क्षण दोन क्षणांत सारें घडून गेलें—कोणी तर म्हणत होतें कीं तो कोंबडा आणि त्याला मारणारा तो माणूस, दोघांचेहि मृत्यू एकदमच घडून आले. मात्र सर्वांचें एकमत होतें कीं मनगटाची हालचाल आणि चाकूची झेंप या दरम्यान श्वास घ्यायलाहि त्या माणसाला उसंत सांपडली नव्हती. दुर्दैवानें स्थानिक अमेरिकन न्यायाधीश फारच निर्बुद्ध निघाला. त्याला साऱ्या मेक्सिकन लोकांविषयीच द्वेष होता आणि कोंबड्यांच्या लढती थांबविण्याचाहि त्याचा निश्चय होता. खुनी माणसाच्या मित्राच्या बढान्या खऱ्या मानून त्यानें रेमॉननें वारंवार त्या माणसाला खुनाची धमकी पूर्वीं दिली होती हें खरें मानलें आणि त्याला फांशी सुनावली.

फादर व्हेलंट त्याच्या भेटीला गेला तेव्हां त्या मुलाच्या आयुष्याचे मोजकेच दिवस बाकी होते. फादर गेला तेव्हा तो एकाद्या बाहुलीला पुरतील एवढेच छोटेसे नाजुक बूट बनवीत बसला होता. फादरनें विचारलें, तेव्हां तो म्हणाला, "हे आपल्या चर्चमधल्या सानतिआगोसाठीं." फांशीच्या वेळीं उपस्थित रहाण्याकरतां त्याच्या घरची सारी मंडळी सांता फेला येणार होती आणि तेव्हां तो त्यांच्याकडे हे बूट देणार होता. मग ते बूट त्यांच्या सानतिआगोच्या पायीं शोभणार होते आणि त्याचा सानतिआगो त्याच्यासाठीं परलोकीं कांहीं रदबदली करण्याचाहि संभव होता.

मेणबत्तीच्या प्रकाशांत हातच्या बूटांना तेल लावीत असतां फादर व्हेलंटनें उसासा सोडला. कोलोरॅडोमध्यें त्याला भेटणार होते ते गुन्हेगार या प्रकारचे नक्कीच असणार नव्हते, असें त्यानें स्वतःला सांगितलें.

## ३.

फादर व्हेलंटकरतां गाडी तयार होण्याला महिना लागला. बरेंच ओझें या गाडींतून जायचें होतें आणि तरीहि ती हलकी आणि निरुंद असणें अवश्य होतें.

कारण वाट पक्की नव्हती. एरवीं झरे वहात त्या चाकोरीवजा दरडींतून तिला वाट काढीत जायचें होतें. त्या दृष्टीनें तिची बनावट कांहीं वेगळीच असणार हें उघड होतें. गाडीचें बांधकाम चाललें असतांना फादर जोसेफ काळजीपूर्वक, तिकडे सोबत न्यायचें साहित्य निवडत होता. कॅंप डेन्व्हरला पोंचतांच तिथें तो वासे आणि कॅनव्हासच्या सहाय्यानें एक तात्पुरतें 'चॅपेल' उभारणार होता; त्यांत असणें आवश्यक असें सामानहि तो निवडत होता. त्याशिवाय पदकें, क्रूस, रोजरीज, रंगीत चित्रें आणि धर्मविषयक पुस्तिका यांनीं भरलेल्या त्याच्या थैल्या होत्याच. स्वतःकरतां त्याला एक ' ब्रेव्हिअरी ' सोडून आणखी कोठल्या पुस्तकाची जरूर नव्हती.

बिशपच्या अंगणांत तो वारंवार निवड करीत होता, कांहीं गोष्टी बाजूला टाकीत होता. आणि प्रत्येक वेळीं हें नव्यानें घडायचें टळत नव्हतें. कांहीं ना बदल सुचेच. त्याला मदत करण्याकरतां फ्रुक्तोसा आणि मॅग्डालेनाला वारंवार बोलावून घेण्यांत येई आणि अखेर एक पेटारा एकदाचा पूर्ण भरला कीं तो बंद करण्यांत येई आणि फ्रुक्तोसा तो उचलून नेऊन लांकडाच्या ' शेड 'मध्यें ठेवी. बिशपला त्याच्या फिरण्याजेवण्याच्या जागेंत हे पेटारे दिसले कीं त्याच्या भुंवया आकुंचित होत, कपाळावर आंठी पडे हें तिला दिसत असे. जुन्या मेक्सिकन रहिवाशांकडून आणलेल्या कातडी पिशव्यात अंथरूण पांघरुणें आणि कपडालत्ता बांधण्यांत आला, या पिशव्या आतां जुनाट झाल्या होत्या परंतु त्याआधीं अशी पिशवी हीच गरीब माणसाची ट्रंक असे.

या काळांत बिशप लतूरहि बराच कामांत होता. क्लेरमॉंटच्या एका नव्या धर्मगुरूला तो या भागांतल्या कामाकरतां तयार करीत होता. लांबलांबच्या 'पॅरिशेस'कडे तो त्याला घेऊन जाऊन या भागांतल्या माणसांची जाण त्याला येईल म्हणून झटत होता. बिशप म्हणून त्याला फादर व्हेलंटच्या जाण्याविषयींच्या, त्या पोटच्या कष्ट उपसण्याविषयींच्या उताविळीचें कौतुकच करणें भाग होतें; परंतु माणूस म्हणून मात्र आपल्या या जुन्या सहकाऱ्यानें खंत खेद न मानता इतक्या तत्परतेनें आपल्यापासून लांब जाऊं पहावें, हें त्याला लागलें होतें त्याला माहीत होतें, साक्षात्कार घडावा तसें कळत होतें, कीं हा वियोग शेवटचा होता. इथें त्यांचीं आयुष्यें अलग व्हायचीं होतीं आणि फिरून तीं एकत्र येण्याचा योग नव्हता. घरांतली फादर जोसेफच्या प्रस्थानाची धामधूम पाहून त्याला त्रास होत होता आणि म्हणून लांब लांबच्या कुठल्या तरी ' पॅरिशेस'कडे धांव घेणें त्याला सोयीचें वाटत होतें.

एक दिवशीं बिशप अल्बुकर्कहून नुकाच परतला असता, फादर व्हेलंट मोठ्या उल्हसित मनानें जेवणाला येऊन हजर झाला. त्याच्या नव्या गाडींतून त्यानें फेरफटका केला होता आणि गाडी त्याला समाधानकारक वाटली होती. साबिनोची निघण्याची तयारी झालेली होती आणि बहुधा एक दिवसाच्या अवकाशानें त्यांचें निघणें होणार होतें. पुढ्यांतल्या टेबल-क्लॉथवर त्यानें आपला मार्ग काढून दाखवला, बरोबर बांधून घेतलेल्या वस्तूंची यादी ऐकवली. बिशप थकलेला होता आणि अन्नावर त्याची वासना दिसत नव्हती, परंतु फादर जोसेफनें मात्र पोटभर खाल्लें. कांहीं नवा बेत, नवी योजना पुढें असली कीं तो खूप चवीनें खाई.

फ्रुक्तोसानें कॉफी आणल्यावर खुर्चीत तो मागें रेलला आणि उजळ मुद्रेनें आपल्या मित्राकडे वळला. म्हणाला, " जीं, मला नेहमीं वाटतें कीं मला तुम्ही ड्स्कॉनहून परत बोलावलेंत तेव्हां केवळ विधीच्छेनरहुकूम तुम्ही वागलांत. तिथें मला वाटत होतें कीं माझ्या आयुष्यातलें फार मौल्यवान् काम मी करतों आहे आणि तसें कांहींच कारण नसतांना तुम्ही मला परत बोलावलेंत. का तें तुम्हांलाही माहीत नव्हतें आणि मलाही माहीत नव्हतें. अंधारांत कांहीं तरी हालचाली केल्या आपण. परंतु प्रभूला ' चेरी क्रीक 'वर घडणारें सारें दिसत होतें आणि बुद्धिबळांतल्या सोंगट्यांसारखा तो आपल्याला हलवीत होता. आणि पाचारण आलें तेव्हां साद द्यायला मी इथें मोकळा हजर होतों--चमत्कारच म्हणायचा. "

फादर लतूरनें कॉफी पितां पिता चांदीचा पेला खालीं ठेवला. तो म्हणाला, " जोसेफ, चमत्कार ठीक आहेत. परंतु इथें मात्र तसा एकादा घडल्यासारखें मला वाटत नाहीं. तुला मी बोलावून घेतलें कारण तुझ्या संगतीची तेवढी गरज मला भासली. माझ्या व्यक्तिगत इच्छेच्या पूर्तीकरतां मी माझा बिशपचा अधिकार वापरला, हें वाटलें तर स्वार्थी म्हण, पण नैसर्गिकहि होतें. आपण एका देशांतले आहों. कांहीं सामायिक स्मृतींनीं एकत्र गुंफले गेलेलों आहों. आणि एकत्र आलेल्या, राहिलेल्या दोन मित्रांनीं पुन्हा आपापल्या स्वतंत्र मार्गानें लांब जावें, हेंहि तसें म्हटलें तर नैसर्गिकच होय. मला वाटतें, खरेंच याचा खुलासा शोधण्याकरतां याला चमत्कार म्हणण्याची जरूर नाहीं. "

सोन्यामागें देशोधडीं येऊन मुक्काम टाकलेल्या माणसांच्या उद्धाराचाच विचार आणि तयारी करण्यांत अष्टौप्रहर गुंतलेल्या फादर जोसेफला बाकी कांहींच दिसलें, जाणवलें नव्हतें. आतां त्याच्या मनांत लख्खपणें जाणवलें कीं त्याच्या धाप्या लगबगींत. तयारींत, धामधुमींत बिशप अलिप्तच राहिला होता. त्याला

जाऊं देणें फादर लतूरला फार अवघड वाटत होतें. वाटणार होतें. पुढल्या एकटेपणाचें दडपण त्याच्या मनावर आतांपासून पडलें होतें.

आपल्या खोलीकडे जातांना त्यानें मनाशीं कबूल केलें कीं त्याच्या वृत्तीपेक्षां बिशपची वृत्ति फारच वेगळी होती. तो स्वतः जाई तिथें स्वदेशाची भावना जागवून घेई, कुटुंबाचें वातावरण निर्माण करी. परंतु जीं कोणत्याहि समाजांत मिसळूं शकणारा आणि सर्वांना प्रिय होणारा माणूस होता तितका नवनवीन ऋणानुबंध नव्यानें जोडूं शकणारा नव्हता. असें नेहमींच होत आलें होतें. पोरवयांतहि तो असाच होता. सर्वांशीं त्याचें वर्तन चांगलें, परंतु त्याच्याभोंवतीं घोळका फारसा नसे. कोणीहि म्हटलें असतें, तें असें कीं फादर लतूरसारखा असामान्य गुणांचा माणूस असा वनवासांत पाठवण्याऐवजीं त्याला त्याची विद्वत्ता, देखणें व्यक्तिमत्व, आणि हळुवार वागणें यांचा योग्य उपयोग होईल अशा जगाच्या एकाद्या भागांत धाडणेंच योग्य झालें असतें. या ओसाड भागांत एकादा अधिक निबर, राकट, हडम्भडस वृत्तीचा बिशप योग्य ठरला असता. बिशप लतूरनंतरचे इथले बिशप्स त्याच्यासारखे असणार नव्हते हें उघडच होतें. मग हाच तेवढा या भागांत कां पोंचावा? परंतु प्रत्येक गोष्टीला ईश्वराघरीं कांहीं कारण असतें हें फादर व्हेलंटला मंजूर होतें. कदाचित् या विस्तीर्ण प्रदेशांतल्या नव्या 'डायोसेज'च्या आरंभाला अशी एकादी भूषणास्पद व्यक्ति उपस्थित असणें परमेश्वराला उचित वाटलें असेल. आणि कदाचित् असेंहि असेल कीं पुढल्या कित्येक वर्षांत या व्यक्तीची कांहीं ना कांहीं परंपरा, आदर्श, स्मृति या भागांत राहूनहि जाईल.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं, गाडी भरून झाली. अंगणांत, निघण्याच्या तयारीनें ती उभी करण्यांत आली. फादर व्हेलंट बिशपच्या मेजाशीं बसला होता. फ्रान्सला कांहीं पत्रें लिहून पाठवीत होता. मारिअसला एक छोटें पत्र, आवडत्या फिलोमेनला लांबलचक पत्र—आपल्या नव्या हालचालींची माहिती देणारें, आपल्याला यश येवो म्हणून प्रार्थना करण्याला सांगणारें, भराभर आणि लेखणीला हिसके देत तो लिहीत होता. बोटांबरोबर त्याचे ओठहि हालत होते. बिशप तिथें आला तेव्हां तो उठून हातांत ते कागद धरून उभा राहिला.

"तुझ्या लिहिण्यांत व्यत्यय यावा म्हणून नाहीं आलों मी, जोसेफ. पण एक विचारायचें होतें कीं, कॉण्टेण्टोला तूं तुझ्याबरोबर कोलोरॅडोला नेणार आहेस कां?"

फादर जोसेफच्या डोळ्यांची उघडझांप झाली. "हो तर, नक्कीच त्यावरून मी निघणार होतों. पण तो तुम्हांला इथें हवा असेल तर..."

" छे छे, अगदीं नाहीं. परंतु कॉण्टेण्टोला नेणार असशील तर ॲंगेलिकालाहि ने असें मी तुला सांगणार होतों. दोघांचा जीव आहे एकमेकांवर. तर मग अनिश्चित कालपर्यंत त्यांचा वियोग कां घडवायचा ? त्यांना सांगतां तर कांहीं येणार नाहीं. समजावतां येणार नाहीं. फार काळ एकत्र राहिले आहेत, राबले आहेत दोघे."

फादर व्हेलंटनें जबाब केला नाहीं. हातांतल्या कागदाकडे तो डोळे ताणून पहात राहिला. त्या कागदावर पाण्याचा एक थेंब ठिबकला आणि सांकळला तो बिशपनें पाहिला. तो तात्काळ वळला आणि कमानीच्या दारावाटें बाहेर नाहींसा झाला.

दुसऱ्या दिवशीं सूर्योदयाला फादर व्हेलंट निघाला. साबिनो गाडी हांकीत होता. त्याचा सर्वांत मोठा मुलगा ॲंगेलिकावर स्वार होता आणि फादर जोसेफ स्वतः कॉण्टेण्टोवर बसला होता. ईशान्येकडचा जुना रस्ता त्यांनीं धरला. सर्वभर लाल रंगाच्या वाळूच्या टेकड्या होत्या. अशा एका टेकडीच्या माथ्यावर रस्ता वळण मारी त्या वांकणापर्यंत बिशप या मंडळींना पोंचवण्याकरतां आला. सांता फेचें अखेरचें दर्शन त्यांना त्यानें घडवलें. एका डोंगराला पाठ लावून बसलेलें कोंवळ्या उन्हांत गुलाबी दिसणारें तें गांव एकदां पाहून घेण्याकरतां फादर जोसेफ घोड्याचा लगाम खेंचून मागें वळला. बाहूंची कव घालावी तशी टेकड्यांनीं या गांवाला वेढलें होतें.

या परिचित जगाकडे पाठ वळवतांना तो पुटपुटला, " Auspice, Maria ! "

बिशप परत फिरला,—एकांताकडे. आतां वय झालें होतें सत्तेचाळिशीचें. वीस वर्षें 'नव्या जगां'त व्यतीत झालीं होतीं. त्यांतलीं दहा न्यू मेक्सिकोंत. तो स्वदेशीं धर्मगुरू असता तर या काळांत त्याचे भाचे, पुतणे लॅटिनमधले अवघड भाग समजावून घेण्याकरतां, खाऊला पैसे मागण्याकरतां त्याच्याकडे आले असते; भाच्या, पुतण्या बागेंत बागडल्या असत्या, कांहींतरी शिवणकाम घेऊन येऊन त्याच्या घराच्या निगेवर देखरेख करीत राहिल्या असत्या. पन्नाशीला आलेल्या कोणाहि अविवाहित माणसासारखा तो या कल्पनांत रंगून घरापर्यंत पोंचला.

परंतु घरांत पाऊल टाकतांच वास्तव्याचें भान त्याला आलें, कर्तव्याचें आलें. त्याला सोबत वाटली, दारावरचा पडदा पाठीशीं खालीं येतांच एकलेंपण लोपलें.

आणि हानीच्या भावनेची जागा पूर्वस्थितीच्या प्राप्तीच्या जाणीवेनें घेतली. आपल्या मेजाशीं तो बसला, चिंतनांत गर्क झाला. या विशिष्ट एकाकीपणांतच एखाद्या धर्मगुरूचें जीवन त्यांच्या प्रभूच्या जीवनाप्रत पोंचलें असतें. हें एकाकी-पण झिजविणारें, नाकारणारें नव्हतें; तें होतें अखंडपणें फुलणारें बहरणारें. व्हर्जिन-मातेच्या आस्तित्वानें भरलेल्या जीवन निष्प्राण, अचेतन, ऐहिक अर्थानें अर्थहीन कसें होईल? साधेसोपेपणांत लहान मुलांच्या एखाद्या गोष्टीला मातेनें मागें टाकलें असतें तसें अगाधतेंत उत्तमोत्तम अध्यात्मवाद्यांना हरवलें असतें.

इथें, सांता फेमधल्या त्याच्याच चर्चमध्यें तिची मूर्ति होती. छोटी लांकडी बनावटीची. फार जुनी आणि सर्वांना प्रिय वाटणारी. दोनशें वर्षामागें स्पेन-कडून शहर ड व्हार्गाजनें परत जिंकून घेतलें तेव्हां तिचा मान म्हणून वर्षा-तल्या एका दिवशीं मिरवणूक काढण्याची प्रतिज्ञा त्यानें वाहिली होती. आणि आजतागायत सांता फेंत या सोहळ्याला फार महत्त्व होतें. त्या मूर्तीची उंची होती सुमारें तीन फूट. दिसायला, राजस. सुंदर, तरीहि धारदार अशी स्पॅनिश मुद्रा. तिचे कपडेलत्ते बरेच होते, हक्काचें वैभव होतें. इथल्या स्त्रियांना तिच्या-करतां कपडे शिवणें आवडे आणि सोनारांना तिच्याकरतां अलंकार घडवणें आवडे. खुद्द इंग्लंडच्या राणीकडे किंवा फ्रान्सच्या सम्राज्ञीकडे देखील एवढे पोषाख नसतील असें आपल्याला वाटत असल्याचें फादर लतूर म्हणाला. तेव्हां ह्या साध्या भाबड्या माणसांना केवढें बरें वाटलें होतें. ती त्यांची बाहुली होती तशी त्यांची राणी होती. कौतुकाचें आणि आदराचें स्थान होती. मेरीचा मुलगा तिच्याशीं असाच तर वागला असेल.

फादर लतूरला वाटलें कीं अशा साध्या भाबड्या पद्धतीनें उरांतल्या भक्तीला, प्रेमाला मोकळी वाट देणारे हे दरिद्री मेक्सिकन्सच एकटे नव्हते. त्यांच्या काळांत चित्रकार राफेलनें आणि टिटिअननें हेंच केलें होतें. मोठमोठ्या स्थापत्यविशारदांनीं हेंच केलें होतें. कोणी तिचीं चित्रें रेखाटलीं होतीं तर कोणी मंदिरें बांधलीं आणि कोणी तिचीं गीतें गायिलीं होतीं. तिचा अवतारहि घडण्याआधीं 'पेगन' शिल्पकारांनीं देवता आणि तरीही स्त्री असलेली एक मूर्ति घडविण्याचे केवढे अविरीत प्रयत्न केले होते.

बिशप लतूरचें भाकित खरें ठरलें. नव्या मेक्सिकोंतलें आपलें कार्य पुढें चाल-वण्याला फादर व्हेलंट कधींही परतला नाहीं. तसा तो एकदां परत आला, संधि

मिळे तेव्हां वारंवार येत असे, परंतु येई तो केवळ आपल्या जुन्या स्नेह्यासोब-त्यांना भेटण्यासाठीं. मात्र त्यांच्या आयुष्याचें ध्येय आतां पक्कें ठरलें होतें आणि तें होतें कोलोरॅडो रॉकीजमध्यें. दक्षिणेकडले निळे डोंगर त्याला आवडत तसे हे डोंगर त्याला आवडले नव्हते. वाटेंतल्या अनेक अपघातांत आणि आजारांत झालेली शारीरिक हानि भरुन काढण्यासाठीं तो प्रथम सांता फेला परतला; मग बिशप ल्दूरला 'आर्चबिशप' करण्यांत आलें, तेव्हां पोपच्या प्रतिनिधीसमवेत आला. परंतु त्याचें कार्यक्षेत्र होतें कुंद डोंगराळ प्रदेशांत, कोणतीही सुखयोय नसलेल्या खाणींभोंवतालच्या छावण्यात—चुकलेलीं मेंढरें मार्गावर आणणें, हें.

क्रीड, ड्युरॅंगो, सिलव्हर सिटी, सेंट्रल सिटी, कॉण्टिनेंटल डिव्हाइडवरून उटाहमध्यें--या साऱ्या ग्रॅनाइटच्या ओबडधोबड टापूंत त्याची 'एपिस्कोपल' गाडी हळूं हळूं प्रसिद्ध झाली होती, नेहमींची झाली होती.

तिला छप्पर होतें आणि रात्रीं झोंपण्याकरतां त्याला ती पुरत असे-- मुळांत फादर जोसेफ खुरटाच होता. मागल्या बाजूला सामानाची पेटी होती --खुल्यावर एखाद्या पाइन वृक्षाखालीं 'मास' साजरा करण्याची वेळ येई तेव्हां हिचा 'आल्टर' होत असे, तो म्हणे कीं डोंगरातले धबधबे हे तिथल्या रस्त्यांचे आद्य प्रवर्तक; आणि ते जातील तिकडे तिकडे त्याला रस्ता मिळत असे. त्याचा ड्रायव्हरमागून ड्रायव्हर बदलला. अनेकवार आणि मोठ्या प्रमाणावर त्याची गाडी दुरूस्त करावी लागली--इतकी कीं ती त्यानें टाकून दिली, तेव्हां तिचा एकहि भाग मूळचा नव्हता.

घांवा मोडणें, आंस मोडणें, या गोष्टींचें त्याला कांहींच वाटत नसे. दोन खेपांना अख्खी गाडी फादरसकट चाकोरींतून उलटून डोंगरावरून उताराकडे घरंगळत, गडगडत गेली. असल्या अगदीं पहिल्या अपघातांतून फादर व्हेलंट किमान शारीरिक हानीनिशीं बाहेर आला. असें झालें याला कारण आर्च-एंजल राफेलची कृपा. कारण त्यांचेंच ध्यान आपण त्या दिवशीं सकाळीं विशेष मनःपूर्वक केलें होतें असें त्यानें बिशप ल्तूरला लिहिलेल्या पत्रांतून कळवलें. दुसऱ्या खेपेला अपघात झाला तो सेंट्रल सिटीनजीक; या वेळीं त्याच्या मांडीचें हाड सांध्यांच्या जरा खालीं मोडलें. वेळींच तें व्यवस्थित जोडलें गेलें, परंतु लंगडणें मात्र कायमचें चिकटलें आणि पुन्हां केव्हाहि त्याला घोड्यावर बसतां आलें नाहीं.

मात्र हा अपघात होण्याआधीं, तो नुक्ताच सांता फे आणि अल्बुकर्कला जाऊन जुन्या इष्टमित्रांना भेटून, नवी उमेद घेऊन बऱ्याच दिवसांनीं परत आला होता.

त्यानें डेन्व्हर सोडलें तेव्हां त्याच्या 'कॉंग्रेगेशन'ला त्यानें सांगितलें होतें कीं मेक्सिकनांकडे आपण पैशांची याचना करण्याकरतां जात आहों. डेन्व्हरचें चर्च तसें बंद इमारतींतच होतें परंतु खिडक्यांना तावदानें नव्हतीं. तीं आणण्याकरतां घस सोसण्याला कोणीच तयार नव्हतें. वास्तविक या भागांत खाणमालक होते, लांकूड पिसण्याच्या गिरण्यांचे धनि होते, सुस्थितींतले व्यापारी होते. परंतु त्यांचा सारा पैसा त्यांच्या व्यवसायांच्या विकासार्थच कारणीं लागत होता. मेक्सिकन्स दरिद्री होते, मातीचें घर आणि खेचर यापलीकडे त्यांच्याकडे मालकीचें कांहीं नसे, तरीहि फादरला त्यांच्यांत नेहमींच पैसे जमवतां येत; जवळ असेल तें ते देत असत.

त्याच्या या प्रवासाला तो 'भीक मागण्याची यात्रा' असें प्रांजळपणें संबोधित होता आणि काय मिळेल ते घेऊन येण्याकारता या 'यात्रे'ला तो आपल्या गाडीनें निघाला, तो ताओसपर्यंत पोंचला आणि त्याच्या आयरिश गाडीहाक्यानें पुढें येण्याचें साफ नाकारलें. असल्या या रस्त्यावर 'आपण एक मैलहि जास्त येणार नाहीं, असें त्यानें बजावले. त्याचा टापू त्याला माहीत होता परंतु या भागांत मात्र त्यानें आपला आणि पॅड्रेचा जीव पणाला लावण्याचें नाकारलें. त्या काळांत ताओस ते सांता फे असा गाडीचा रस्ताच नव्हता. पुढें पंधरवड्याभरानें फादर व्हेलंटला या प्रवासाकरतां नवा गाडीवान मिळाला. तो सराईत होता; असल्या गाड्याचा त्याला अनुभव होता; आणि कुदळ फावडीं बरोबर घेऊन त्यानें फादर लतूरची गाडी एकदांची सुखरूप, सांता फेमध्यें, बिशपच्या अंगणांत आणून उभी केली.

पुन्हा एकवार, आपल्या माणसांत घेऊन, ( तो या लोकांना असें म्हणे. ) फादर जोसेफनें आपली 'भिके'ची मोहीम उघडली. दरिद्री मेक्सिकन्स येऊन आपल्या कपड्यांतून, जोड्यांतून ( इथें ते पैसे ठेवीत. ) डॉलर्स काढून डेन्व्हरच्या चर्चच्या दुरुस्तीकरतां फादरच्या पदरांत टाकू लागले. फादर तिथेंच थांबला नाहीं. सांता फेच्या आणि अल्बुकर्कच्या दर्याद्र स्त्रीवर्गाला त्यानें डेन्व्हरमधल्या त्याच्या अकारण उद्भवणाऱ्या अनेक गैरसोयी विदित केल्या. डेन्व्हरमध्यें गवताच्या थप्प्यांवर तो झोंपत होता, ओबडधोबड फळ्यांवर मेणकापड टाकून त्यानें जेवणाचें मेज बनवलें होतें. टेबल-क्लॉथ, टॉवेल्स, रुमाल याअभावी जुन्या कपड्यांचा तत्सम उपयोग करावा लागत होता. त्या मेक्सिकन बायांना हें सारें ऐकणेंहि अशक्य झालें. फादर व्हेलंटनें असेंहि सांगितलें कीं कोलोरॅडोमध्यें बागा करण्याचीहि पद्धत नव्हती. सोन्याविना दुसऱ्या

कोठल्या हेतूनें जमिनीवर कुदळ मारण्याची कोणाचीहि तयारी नसे. तिथें नव्हतें लोणी, नव्हतीं अंडीं, नव्हतीं फळें मिळेल तें खाऊन तो तिथें जगत होता.

आल्यापासून कांहीं आठवड्यांत बिशपच्या घरीं फादर व्हेलंटकरतां लोकांनीं पराच्या सहा गाद्या पाठवल्या. त्याशिवाय अंथरुणें पांघरुणें, उशाचे भरलेले अभ्रे, टेबलक्लॉथ, नॅपकिन्स, मिरच्यांच्या माळा आणि सुकवलेल्या फळांच्या पेट्या बिशपच्या निवासस्थानीं जमल्या. चिमायोच्या छोट्याच वस्तींतून दोन उत्कृष्ट ब्लँकेट्स् आलीं होतीं.

या साऱ्या भेटी जमत असतां फादर जोसेफ त्या एकीकडे ठेवून देत होता. कारण भेटी स्वीकारण्याची त्याची तत्परता बिशपला नेहमींच संकोचवित आली होती. परंतु एक दिवशीं सकाळीं फादर लतूरच्या नजरेला या वस्तू आल्याच.

त्यानें सुनावलें, " फादर जोसेफ, डेन्व्हरला या साऱ्या वस्तू नेणें तुला जमणार नाहीं, हें सारें घेऊन जायचें तर बैलगाडीच लागेल ! "

फादर जोसेफ म्हणाला, " ठीक आहे. देव मला बैलगाडीहि पाठवून देईल."

आणि खरोखर तसेंच झालें. बैलगाडी मिळाली इतकेंच नव्हे तर प्युएब्लो-पर्यंत ती नेण्याला गाडीवानहि गवसला.

परत निघण्याच्या दिवशीं सकाळीं, गाडी भरून सुसज्ज झाल्यावर, भल्या पहांटेपासून सर्वांना तयारींत गुंतवून घाई करणारा फादर व्हेलंट एकदम मंदा-वला. बिशपच्या खोलींत तो गेला आणि कांहीं बिनमहत्त्वाच्या गोष्टी बोलत त्याच्यासमोर बसला. कांहींतरी राहून जात असल्यासारखें त्याचें वागणें, बोलणें रेंगाळतें होतें.

मग किंचित् स्तब्ध राहून तो एकदम म्हणाला, " जीं, आतां आपलें वय होत चाललें. "

बिशप किंचित् हंसला. म्हणाला, "हो हो. आतां तरुण राहिलों नाहीं आपण. अशाच एकाद्या ताटातुटीनें सारें संपेल. "

फादर व्हेलंटनें मान हलवली. " ईश्वराची मर्जी. मी तर तयारच आहे. " तो उठला आणि खोलींत फेऱ्या मारूं लागला. बिशपकडे, त्याच्या या जिवलग स्नेह्याकडे न पहातां तो पुढें बोलत राहिला. " पण जीं, मला वाटतें, झालें तें सारें तेवढेंसें वाईट नव्हे. सेमिनरींत असतांना फार पूर्वीं आपण जें मनांत योजलें तें सारें—निदान त्यांतलें कांहीं--हातून घडलें आहे. तारुण्यांतलीं, पोरवयांतलीं स्वप्नें साकार होणें, याहून माणसाच्या जीविताचें साफल्य तें आणखी काय ! कोणतेंहि ऐहिक यश त्याची बरोबरी करूं शकणार नाहीं. "

बिशप उठत म्हणाला, " माझ्यापेक्षां वेगळा आहेस, उजवा आहेस तूं. अभिमान वा लज्जा न ठेवतां तुझें कार्य जोरानें केलें आहेस तूं. मी त्या मानानें नेहमींच थोडाफार स्थितप्रज्ञ रहात आलों आहे. मागें पडत आलों आहे. यानंतर तूंच मला आशीर्वाद द्यायला हवास. "

तो वांकला. आणि त्याला आशीर्वाद दिल्यावर फादर व्हेलंटनें वांकून लागलींच त्याचा आशीर्वाद ग्रहण केला. दोघांनीं एकमेकांना आलिंगन दिलें — भूत आणि भविष्य यांना सारखेंच व्यापून, बुडवून, टाकणारें तें आलिंगन होतें.

# खण्ड नववा

.१.

धर्मशील जोगीण, मदर सुपरिअर फिलोमेन तिच्या मूळगांवीं, रिओममध्यें बऱ्याच दीर्घ हयातीनंतर मृत्यु पावली तेव्हां तिच्या कागदपत्रांत आर्चबिशप लतूरकडून तिला आलेलीं अनेक पत्रें मिळालीं. त्यांतलें एक १८८८ च्या डिसेंबरमधलें. म्हणजे आर्चबिशप लतूर यांच्या अवसानापूर्वीं केवळ कांहीं थोडे महिनेच आधीं लिहिलेलें होतें. त्यांत त्यांनीं तिला लिहिलें होतें, "तुमच्या भावाला प्रभुचरणीं स्थान लाभलें तेव्हांपासून मला तो जास्त निकट भासूं लागला आहे. गेलीं अनेक वर्षें परस्परांच्या कर्तव्यांनीं आमची ताटातूट झाली होती. परंतु मृत्यूनें आम्हांला जोडलें आहे. आतां थोड्याच काळांत मी त्याच्याप्रत जाईन. दरम्यान, कृतिशील जीवनाचें सर्वोत सुखद साफल्य म्हणजे पूर्णतया चिंतनांत काल घालविण्याचा मनसोक्त आनंद--तो मी लुटीत आहे."

हा चिंतनाचा अंतिम काल आर्चबिशपनीं सांता फेच्या उत्तरेकडे चार एक मैलावरच्या हक्काच्या छोट्याशा जमिनीवर, हक्काच्या घरांत घालवला. 'डायोसेज'च्या कारभारापासून मुक्त आणि निवृत्त होण्याच्या खूप आधींच त्यांनीं ही जमीन विकत घेऊन ठेवलेली होती. तेसुक गांवाजवळच्या लाल वाळूच्या टेकड्यांच्या टापूंत ही होती. तिथें त्यांनीं एक ऑर्चर्डचें रोप लावलें. त्यांची अंतिम विश्रांतीची वेळ येईल तेव्हां हें बहरायचें होतें. या टापूंतली ही जागा त्यांनीं निवडली ती इष्टमित्रांच्या सल्ल्याविरुद्ध. कारण फळांच्या लागवडीला त्यांना ही सोयिस्कर वाटत होती.

एक दिवशीं तेसुकच्या चर्चकडे ते घोड्यावरून जात असता एका झऱ्याचा मागोवा घेत ते या जागीं पोंचले होते. इथें त्यांना एक छोटेंसें मेक्सिकन घर आणि त्यालगत, मागें कधींहि न पाहिलेल्या आकाराचें 'ॲप्रिकॉट'चें झाड दिसलें होतें. त्याला दोन फांद्या होत्या. यांतली प्रत्येक फांदी मानवी देहाहून

झाड होती, भरीव होती. आणि झाड तसें बरेंच जुनाट असलें तरी फळांनीं लहडलें होतें. फळें मोठीं, सुंदर रंगाचीं आणि फारच रुचकर होतीं. टेकडीच्या बाजूला हें झाड पाहून आर्चबिशपनीं मनाशीं हिशेब केला कीं, ही हवा फळझाडांना उत्तम असली पाहिजे. सूर्याची ऊष्णता टेकडीच्या खडकाळ उतारावर परावर्तित होऊन या झाडांना मिळते आणि त्यामुळें उत्तम फळांना हवें तें समतोल उष्णतामान कायम रहातें, दोन्ही बाजूंनीं ऊब कायम टिकते आणि फ्रान्समध्यें 'पीच' फळांची एक उत्तम जात अशा प्रकारें काढली जाते तशीं इथेंहि फळें उत्तम दर्जाची होत असावीं.

तिथें रहाणाऱ्या म्हाताऱ्या मेक्सिकनानें सांगितलें कीं तें विशिष्ट झाड दोनशें वर्षांचें जुनें होतें. त्याचा आजा पोरवयांत होता तेव्हांहि तें असेंच होतें. आणि न चुकतां त्याला वारंवार फार रुचकर 'ॲप्रिकॉट' फळें लागत. ती जमीन, तें घर विकून टाकून सांता फेंत रहायला जायला तो म्हातारा बिशपना उत्सुक दिसला आणि कांहीं दिवसांत त्यांनीं तें सारें खरेदीहि केलें. पुढल्या वसंत ऋतूंत त्यांनीं त्यांच्या हातानें 'आर्चर्ड' चें झाड आणि 'ॲकासिया' चीं कांहीं झाडें लावलीं. कांहीं वर्षांनीं त्यांनीं त्या जागेत स्थानिक पद्धतीचें एक छोटें घर उभारलें, एक 'चॅपेल' बनवलें. हें टेकडीच्या वरच्या बाजूला बिशपांच्या ऑर्चर्डकडे तोंड करून होतें. विश्रांतीकरतां किंवा एकाद्या विशेष व्रताच्या वेळीं त्यांचें वास्तव्य तिथें असें. निवृत्तीनंतर, तिथेंच ते कायमचे रहायाला आले. परंतु तरी नव्या आर्चबिशपच्या निवासातील आपली खोली त्यांनीं कायमच ठेवली.

निवृत्तीच्या काळांत फादर लतूर यांचें प्रमुख कार्य, फ्रान्सहून येणाऱ्या नव्या धर्मोपदेशकांना शिकवून तयार करणें हें होतें. त्यांचा वारस, दुसरा आर्चबिशप, हा देखील फादर लतूरच्याच कॉलेजांतून आलेला होता. आणि उत्तर न्यु मेक्सिकोंतल्या धर्मगुरूंचें प्रमाण एकंदरीनें अधिकतर फ्रेंचच राहिलें. जेव्हां जेव्हां नव्या धर्मोपदेशकांचा जथा येई ( ते एकेकटे कधींच येत नसत.) तेव्हां तेव्हां नवा आर्चबिशप त्यांना फादर लतूरच्या सहवासांत कांहीं महिने रहाण्याकरितां, स्पॅनिश शिकण्याकरतां, 'डायोसेज'च्या इतर रीतीभाति अवगत करण्याकरतां आणि त्या मर्यादेतल्या गांवागांवांची वैशिष्ट्यें जाणून घेण्याकरितां पाठवीत असे.

फादर लतूर त्याचा छंद एक : बागकाम. कॅलिफोर्नियाच्या जुनाट बागांतूनहि मिळणार नाहींत अशीं टपोरीं, रसाळ फळें ते आपल्या बागेत काढीत.

यांत चेरीज असत, ॲपल्स असत, ॲप्रिकॉट्स असत--आणखीहि कित्येक जाती. जाल तेथें फळझाडें लावा आणि मेक्सिकनांना त्यांच्या आहारांत फळांचा समावेश करायला शिकवा असें ते नव्या धर्मोपदेशकांना सांगत. फ्रेंच धर्मोपदेशक जिथें जिथें असेल तिथें तिथें फळांची बाग, पालेभाज्यांचे वाफे आणि फुलझाडांची शोभा दिसलीच पाहिजे असें तें बजावीत. पॅस्कलचें एक वाक्य ते या तरुण माणसांना ऐकवीत : माणसांची अधोगति आणि उन्नति एका बागेतच झाली.

स्थानिक रानफुलांच्या जाती हेरून त्यांनीं त्यांचा आपल्या बागेत विकास चालवला. त्याचे विविध रंग बागेला अष्टौप्रहर शोभा देत.

१८८५ सालात, न्यु मेक्सिकोंत सेमिनरींपैकींच एक तरुण माणूस, बर्नार्ड ड्युक्रॉट आला. फादर ल्तूरशीं त्याचें पितापुत्राचेंच नातें जडलें. आर्चबिशपांच्या जीवनाची मॉंटफेरॅंडमधल्या वर्गावर्गांतून सांगितली जाई ती कहाणी ऐकूनच त्यानें त्यांच्याविषयीं एक ओढ निर्माण करून घेतली होती आणि बरींच वर्षे तो त्यांच्याप्रत येण्याची संधि शोधत होता. बर्नार्डचें व्यक्तिमत्व देखणें होतें आणि वृत्तीनें तो चारचौघांहून वेगळा, वरच्या पातळीवरचा होता. फादर ल्तूर यांच्या दरेक चांगल्या वैशिष्ट्याची भक्ति करण्याइतकी उमदी वृत्ति त्याच्याकडे होती. आणि फादर ल्तूर यांची कोणताहि इच्छा, अपेक्षां तो आगाऊ समजूं शके, त्यांच्या विचाराशीं सहमत होई, त्यांच्या पूर्वस्मृति आपल्या मानून जतन करी.

बिशप धर्मगुरूंकडे म्हणत, "या सरत्या काळांत आधार म्हणूनच जणूं प्रभूनें हा तरुण माणूस माझ्याप्रत धाडला आहे."

१८८८ चा सारा शरदृऋतूभर बिशपांची प्रकृति खडखडीत होती. त्यांच्याबरोबर पांच फ्रेंच धर्मगुरू रहात होते आणि नजीकच्या मिशन्सना भेटी देण्याकरतां ते अद्याप त्यांच्यासमावेत घोड्यावरून जात. ख्रिसमसच्या आधींची मध्यरात्रींची 'मास' त्यांनीं सांता फेच्या कॅथेड्रलमध्यें साजरी केली. जान्युआरींत बर्नार्डबरोबर ते सांताक्रुझला गेले, तेथल्या स्थानिक धर्मगुरूची भेट त्यांनीं घेतली, कारण तो आजारी होता. काम उरकून ते परत फिरले असतां वाटेंत हवेंत मोठा पालट पडला आणि मोठें वादळ होऊन मुसळधार पाऊस कोसळला. उघड्या बगींत ते यावेळीं होते आणि एकाद्या मेक्सिकन घराचा निवारा घेण्यापूर्वींच ते भिजून ओलेचिंब होऊन गेले.

घरीं आल्यावर तात्काळ फादर लतूर झोंपी गेले. रात्रभर त्यांना सुस्त झोंप आली नव्हती आणि तापकऱ्यासारखें वाटत होतें. कुणालाहि त्यांनीं हांक मारली नाहीं कीं कांहीं कळवलें नाहीं. नेहमींप्रमाणें उजाडण्याआधीं घटकाभर ते बिछान्यांतून बाहेर आले आणि चिंतनाकरतां प्रार्थनेकरतां 'चॅपेल'मध्यें निघून गेले. प्रार्थनेंतच त्यांना हुडहुडी भरली. कसे बसे ते स्वयंपाकघराकडे आले. त्यांची जुनी स्वैपाकीण फ्रुस्तोसा हिच्या लक्षांत तात्काळ त्यांची अवस्था आली आणि तिनें त्यांना बिछान्यांत निजवून ब्रँडी पाजली. हुडहुडीनंतर ताप भरला होता आणि मग छाती दुखविणारा खोकलाहि सुरू झाला.

कांहीं दिवस बिछान्यांत निमूट पडून काढल्यावर बिशपनें एकदां सकाळचें बर्नार्डला आपल्यापाशीं बोलावून घेतलें आणि ते म्हणाले :

"बर्नार्ड, आज सांता फेला जाऊन माझ्याकरतां जरा आर्च बिशपची गांठ घेशील का ? थोडे दिवस मी त्यांच्या घरच्या माझ्या खोलींत रहायला आलों तर त्यांना चालेल का तें विचारून ये अखेर तिथें व्हावी असें वाटतें."

"तात्काळ जाऊन येतों, फादर. पण धीर सोडूं नका. नुसत्या थंडीतापानें कांहीं माणूस जात नाहीं."

फादर हसले. म्हणाले, ' बेटा, थंडीतापानें नाहीं जात मी. मी जीवन जगून जाणार आहे."

त्या क्षणापासून, भोंवतालच्यांशीं ते केवळ फ्रेंचमध्यें बोलत आणि आणखी कशापेक्षां त्यांनींच घातलेल्या दंडकाच्या या त्यांनींच केलेल्या भंगामुळें घरांत सर्वत्र त्यांच्या तब्बेतीविषयीं चिंता पसरली. घरून कोणा धर्मगुरूला अशुभ वर्तमान कळलें किंवा तो आजारी पडला तर फादर लतूर त्याच्या स्वतःच्याच भाषेंत त्याच्याशीं संभाषण करीत, परंतु एरवीं त्यांचा असा दंडक होता कीं, घरांतलें नेहमीचें संभाषण स्पॅनिश किंवा इंग्रजींत चाललें पाहिजे.

बर्नार्ड त्या दिवशीं दुपारीं आर्च बिशपांचा निरोप घेऊन परत आला कीं, उरलेल्या हिंवाळ्यांत फादरचा सहवास लाभल्यास त्यांना फार आनंद वाटणार होता. मॅग्डालेनानें तर तिकडे त्यांच्या खोलीची साफसफाई चालूहि केली होती. त्यांच्या तिथल्या वास्तव्याची ती फादरकडे स्वतः लक्ष पुरवणार होती. आर्चबिशप आपली नवी गाडी फादरना आणविण्याकरतां पाठवणार होते; कारण फादरची बग्गी उघडी होती. फादरना उघड्या हवेचा त्रास होण्याचा संभव होता.

बिशपनीं म्हटलें, "आज नको. जरा बरें वाटूं लागलें, ताकद वाढूं लागली कीं, दिवस ठरवूं. आणि त्यादिवशीं हवाहि बरी असायला हवी; कारण आपण आपल्या

बग्गींतूनच जाणार आहों. तूं मला ने. उतरत्या दुपारीं—अगदीं सूर्यास्तालाच एकाद दिवशीं निघूं.''

बर्नार्ड समजला.कारण त्याला ठाऊक होतें; खूप वर्षांमागें असाच सूर्यास्ताच्या वेळेला एक तरुण बिशप अल्बुकर्कच्या रस्त्यानें दौडत आला होता आणि प्रथमच त्याला लांबून साता फेचें पहिलें दर्शन घडलें होतें...आणि दोघे मिळून बरोबर गांवांत शिरतांना बहुतेक वेळां त्या विशिष्ट टेकडीच्या माथ्यावर थबकून, सांता फेचें दर्शन क्षणभर घेतल्याविना पुढें सरकत नसत. उरलेले आयुष्य कारणीं लावणाऱ्या आणि अखेर बिशपचा मान प्राप्त करून देणाऱ्या कामाकरतां कोलोरॅडो निघालेल्या फादर व्हेलंटने याच टेकडीवर थबकून, मागें वळून सांता फेचा निरोप घेतला होता.

त्या जुन्या काळांत तें गांव पहायला फार बरें होतें असें फादर लतूर बर्नार्डला नेहमीं निःश्वसून सांगत. जुन्या काळांत त्याचें स्वतंत्र व्यक्तिमत्व त्याला होतें, वेगळेंपण होतें. 'कार्नेलियन' च्या रंगाच्या टेकड्यांच्या अर्धवर्तुळांत,कांहीं थोडया हिरव्यागार झाडांच्या छायेंत विसावलेलें मातीच्या घरांचें तें जुनें गांव एवढेंच तें होतें. त्याला नव्हती कसली जिल्हई कीं नव्हती कृत्रिम शोभा. परंतु १८८० पासून गांवांत आकारहीन, ऐसपैस अमेरिकन धर्तीचीं घरें उभीं राहूं लागलीं. आतां निम्में गांव मातीच्या घरांचें होतें आणि उरलेल्यांत होतीं दुहेरी 'पोर्च' चीं घासूनपुसून गुळगुळीत केल्यासारखीं वाटणारीं प्रशस्त बांधणीचीं तकलादू लांकडी घरें. फादर लतूर म्हणत कीं, ओहिओत त्यांना नकोशीं वाटणारीं हीं लांकडीं घरें त्यांची पाठ धरून आता सांता फेंतहि पोंचलीं होतीं. ही अलिकडली सुधारणा फादरनीं अनेक वर्षें नेट धरून बांधलेल्या कॅथेड्रलच्या दृष्टीनें योग्य ठरली नव्हती. कॅथेड्रलला फादरच्या उरल्या जीवनांत फादर व्हेलंटचें स्थान होतें. फादर व्हेलंट कोलोरॅडोला निघून गेल्यानंतर तोच फादरचा विरंगुळा होता.

फादर लतूरनीं सांता फेंत अखेरचा प्रवेश केला तो फेब्रुवारींतल्या एका झगझगीत संध्याकाळीं. सूर्यास्ताची वाट पहात बर्नार्डनें ठराविक उंचवट्याशीं कांहीं वेळ गाडी थांबवून धरली होती.

इंडियन ब्लँकेटांत लपेटलेल्या स्थितींत, माजी आर्चबिशपांनीं आपल्या बग्गींत बसून दीर्घ काल सूर्यास्ताचा देखावा आणि त्यांत आपलें सोन्याचें पाणी प्यायल्या-सारखें दिसणारें कॅथेड्रल डोळे भरभरून पाहिलें. त्यांच्या मनांतलेंच कॅथेड्रलचें चित्र जणूं त्यांच्या तरुण स्थापत्यविशारदानें मनकवडें होऊन तिथें साकार केलें होतें ! बांधणींत कांहींहि नखरा नव्हता, होती ती साधी, भरीव बांधणी आणि दगडांवरचें नितळ काम. 'मिडि रोमानस्क' पद्धतीचें, साध्यांत साधें कॅथेड्रल.

आणि आतां या थंडींत दारचीं 'ॲकासिया'चीं झाडें झडलीं असूनहि तें किती इथलें वाटत होतें ! जणूं इथेंच तें उगवलें ! इथल्या मातीचा धर्म तें सांगत होतें !

खरें म्हणजे खुद्द स्थापत्त्यविशारद मोल्नी आणि ते स्वतः यापलिकडे कोणालाच त्या कॅथेड्रलचें हें सौंदर्य प्रतीत झालें नव्हतें. पुढेंहि कोणाला उमगणार नव्हतें. परंतु या दोघांनीं मात्र त्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्यांत तासन् तास व्यतीत केले होते. बिशपची बग्गी उभी होती तिथून त्या कॅथेड्रलला मागल्या टेकड्यांच्या उताराची पार्श्वभूमि पडद्यासारखी लाभली होती. उतारावर पाइनचीं काळसर हिरवळ तुरळकपणें विखुरलीं होतीं. बर्नार्ड धीम्या गतीनें गाडी घेऊन जवळ पोंचला तसतसा मागला टेकड्यांचा पडदा खालीं खालीं दबत, बुडत गेला आणि कॅथेड्रलचे मनोरे निळ्या आभाळांत स्वच्छ रेखले गेले. कॅथेड्रलची मुख्य इमारत मात्र अद्याप टेकड्यांच्या पडद्यावर उठून दिसत होती.

तो तरुण स्थापत्त्यविशारद मोल्नी सांगे कीं, केवळ इतालींत किंवा संगीत नाटकांतूनच चर्चेस अशीं डोंगरपठारांतून वर उठून आभाळाला टेकूं पहात. आभाळांत वादळ दाटत असतां अनेक वेळां मोल्नीनें फादरना त्यांच्या घराबाहेर बोलावून तें अपुरें बांधलेलें कॅथेड्रल दाखविलें होतें. त्यावेळीं आभाळ काळें पडे, टेकड्यांच्या खडकांना 'लव्हेण्डर'चा दाट रंग मिळे, पाइनचीं झाडें दाट किरमिजी होत, टेकड्या जवळ सरकल्याचा भास होई आणि सारी पार्श्वभूमि एकाद्या काळ्या संकटासारखी चाल करून येत असल्याचा प्रत्यय मिळे.

मोल्नी फादर लतूरना म्हणे, "स्थळाचा योग जमून येणें हा अपघातच. एक तर एकादी इमारत एकाद्या प्रदेशाचा भाग असते तरी किंवा नसते तरी. मुळांत ही सांगड असेल तर कालान्तरानें ती दृढच होत जाते."

मोल्नीचे हे एकेक उद्‌गार मनांत घोळवीत असतां वर्तमानकाळांतील एक आवाज बिशपच्या कानीं आला. तो बर्नार्डचा होता.

"फार सुंदर सूर्यास्त आहे, फादर. डोंगर पहा किती लाल पडताहेत ते."

परंतु सूर्यास्ताची गुलाबी उधळण मोठी असली तरी त्या लाल टेकड्या 'व्हर्मिलियन' होत नव्हत्या. त्या कार्नेलियनच्याच रंगाच्या परंतु गडद पडत होत्या. बिशपना वाटलें, त्या टेकड्यांचा रंग सळसळत्या रक्ताचा नाहीं, तर रोमच्या पुरातन चर्चेसमधून जतन करण्यांत येणाऱ्या हुतात्म्यांच्या, संतांच्या रक्ताचा आहे.

दुसऱ्या दिवशीं फादर लतूर जागे झाले तेच आपल्या कॅथेड्रलच्या जवळिकीनें

सुखावून. त्याच्या छायेंत त्यांना फार सुरक्षित वाटत होतें; जणूं नाव बंदराला लागली होती. त्यांच्या जुन्या अभ्यासिकेंत ते आतां होते. विद्यालयाच्या सिस्टर्सनीं त्यांच्याकरतां लोखंडाचा एक पलंग आणि संग्रहींचें उत्तमोत्तम अंथरूण पांघुरणें पाठवलीं होतीं. इथें असण्यांत एक मनस्वी आनंद होता. इथेंच तर ते तरुण वयांत प्रथम आले होते आणि इथेंच कष्टले होते. खोलींत मोठेसे कांहींच बदल घडलेले नव्हते. तेच रग्ज, तींच मातीच्या जमिनीवरचीं कातडीं, तेंच मेज, त्यावर तशाच मेणबत्त्या, बाहेरचा कोलाहल रोखणाऱ्या, जगापासून आंतल्या माणसाला अलग करणाऱ्या, आत्म्याला शांति मिळवून देणाऱ्या, त्याच त्या जुन्या जाडजूड, उंचसखल पांढऱ्या भिंती.

दिवस फटफटला. हिंवाळ्यांतली धूसर प्रातःकाल उगवली. बिशप अंथरुणांत पडून चर्चच्या घंटांची प्रतीक्षा करीत होते. आणखीहि एका आवाजाची अपेक्षा त्यांच्या मनांत होती. इथें असताना नेहमींच त्या आवाजाची त्यांना मोठी मौज वाटत आली होती. तो आवाज : रेल्वे इंजिनाची शीट. होय, ते इथें आले ते बैलगाडी घेऊन आणि साता पैंतून रेल्वे गाड्या पळतांना पहायला उरले होते. एका ऐतिहासिक महत्त्वाच्या उत्क्रांतीला साक्ष रहाण्याचें भाग्य त्यांना लाभलें होतें.

फ्रान्समधले त्यांचे आप्तेष्ट आणि न्यू मेक्सिकोंतले स्नेहीसोबती, अशा सर्वांनाच वाटलें होतें कीं भूतपूर्व आर्चबिशप आपला अखेरचा काळ फ्रान्समध्यें, बहुधा क्लेरमॉंटमध्यें व्यतीत करतील. त्यांच्या जुन्या कॉलेजांत त्यांना प्राध्यापकाचें स्थान मिळण्याजोगें होतें. त्यांच्या मतें हेंच योग्य ठरलें असतें आणि बिशपनींहि यावर बराच विचार करून आपला अंतिम निर्णय घेतला होता. आर्चबिशप-पदावरून निवृत्त होण्याच्या थोडें आधीं गेल्या खेपेस औव्हर्नमध्यें गेले असतां, अशी कांहीं व्यवस्था करून ठेवावी असें त्यांच्या मनाला थोडेंबहुत वाटलेंहि होतें. परंतु तेथल्या त्या जुन्या जगांत त्यांना करमलें नव्हतें, नव्या जगाची ओढ लागली होती. या ओढीचा, न करमण्याचा, बेचैनीचा कांहीं खुलासा नव्हता मात्र यामागें, पुय-ड-डोममध्यें म्हातारपणाचें दडपण माणसाच्या मनावर रहातें तेवढें तें न्यु मेक्सिकोंत रहात नाहीं, हा समज होता. आणि याचाहि खुलासा त्यांच्याकडे नव्हता.

वास्तविक त्यांच्या जन्मभूमींतल्या मोठमोठ्या डोंगरांचीं उंच उंच शिखरें, खेड्यांतली स्वच्छता, टापटीप, त्यांचें कॉलेज, हें सारें त्यांना आवडे, क्लेरमॉंट सुंदर नक्कीच होतें; परंतु त्यांना मात्र तिथें चैन नसे. कसली उमेद नसे, उत्साह नसे. मन दगडासारखें निश्चेतन राही. अफाट भविष्यकाल हें कदाचित् याचें कारण असेल...तेथल्या बागांतून वसंतांतला वायु 'लिलॅक्स' चे झेले

डोलवी, 'हॉर्स चेस्टनट्स्'चा बहर गदगदा हलवून खालीं ढाळी तेव्हां कित्येकदां फादर ल्तूर डोळे मिटीत आणि त्यांना ऐकूं येई नॅव्हॅजो जंगलांतल्या सरळसोट पाइनच्या राईतून धांवणाऱ्या वाऱ्याची शीळ...

दिवसभरांत ही बेचैनी ओसरे आणि रात्रीच्या जेवणापर्यंत त्याचा मागमूसहि उरलेला नसे. जेवणाचा आस्वाद फादर मनापासून घेत, मद्याची रुचि मजेनें चाखीत, उच्च संस्कारांतल्या स्नेह्यासोबत्यांच्या सहवासांत मजेनें काळ घालवीत, आणि एकटे उरत, झोपीं जात ते एका उमेदींत परंतु पुन्हा भल्या पहांटे उठावें तों उरांतली ती कळ नव्यानें उठत असे. नव्यानें एक वेदना, एक बेचैनी जाणवत राही. लौकर जाग येण्याशीं याचा कांहींतरी संबंध होता. इथें ही धूसर पहांट फार काळ रेंगाळते असें फादरना वाटे. इथलें हें जग जागें व्हायला फार काळ घेतें असें त्यांना वाटे. बागा, शेतें ओलीं असत. दाट धुकें डोंगरदऱ्यांतून ओठंगून राही, त्यांत डोंगर दिसत नसत. तें सारें धुकें विरून उबदार सूर्यप्रकाशानें सारा टापू स्वच्छ होण्यास अनेक तास लागत.

असें न्यू मेक्सिकोंत नव्हतें. सकाळीं उठावें तों नवा उत्साह, नवी उमेद वाटे. उठून दाढी करण्याला उभें राहीपर्यंत, आपलें वय होतें आहे हें मुळीं कळतच नसे. जाग येई तेव्हां प्रथम जाणवे ती खिडकीवाटें येणारी कोरड्या वाऱ्याची मंद झुळूक. तिला एक विशिष्ट गंध असे. अनेक गंधांच्या मिश्रणानें तयार झालेला सुगंध. उन्हाचा, गवताचा, फुलाचा. त्या वाऱ्यानें अंग कसें पिसांचें वाटे आणि मन एकाद्या अर्भकासारखें चित्कार, "आज! आज!"

रमणीय वातावरण, विद्वज्जनांची संगत सोबत, घरंदाज स्त्रियांची माया, कलांचा व्यासंग, इतकें सारें असूनहि फादरना भल्या पहांटेची ती बेचैनी तिथें सतत जाणवली होती. नव्या जगाची आठवण सतत चाळवली होती. तेथला अंग पिसांचें आणि मन तरुण बनविणारा तो पहिला वारा त्यांना हवा होता. त्यांचा असा अनुभव होता कीं नव्या प्रदेशांतल्या हवेचा हा गुण माणसांच्या, सुधारणांच्या संस्कारांनीं गढूळतो, हरवतो. टेक्सास, कॅन्सासचे त्यांच्या माहितींतीले मोकळे भाग त्यांच्या पहाण्यांतच शेतीचे संपन्न प्रदेश बनले होते आणि तेथल्या हवेचा मूळचा ताजेपणा, माणसाला टवटवीत करण्याचा गुणधर्म, तो विशिष्ट विलक्षण गंध, नेमका हरवला होता. नांगरल्या जमिनीचा ओलावा, कष्टांपोटचें जाड्य आणि पिकांची वाढ, धान्यांचा बहर यामुळें सारें नष्ट होई. तें होतें काय तें या नव्या जगांत, मानवी संस्कारांनीं फारशा न गढूळलेल्या न्यू मेक्सिकोच्या वाळवंटांतून, टेकड्यांवरून.

कांहीं काळांत साऱ्या पृथ्वीवरूनच कदाचित् हें सारें नष्ट व्हायचें असेल; परंतु

सुदैवानें तो काळ फादरना दिसणार नव्हता. फादरच्या उरल्या आयुष्यांत हें सारें उपलब्ध असणार होतें——सांता फेमध्यें. हें एवढें केव्हांपासून आपल्याला हवेंसें वाटूं लागलें हें त्यांनाहि माहित नव्हतें, परंतु या वनवासांत याच्याच आवडीनें ते पुन्हा परतले होते. कांहीं तरी मृदु, मुक्त, अनिर्बंध; उशीवर कानांत फुंकर घालणारें; मन हलकें करणारें; हळूवारपणें—अगदीं अचळपणें कुलूप खोलणारें, कल्याकोयंडे काढून आणि अडसर दूर करून माणसाच्या बंदिवान् आत्म्याला वाऱ्यावर सोडणारें, निळ्या रंगांत आणि सुवर्णाच्या पाण्यांत बुडविणारें, नव्या दिवसाच्या उजाडत्या प्रातःकालात नेणारें, अगदीं एकजीव करणारें!

आपल्या अखेरच्या दिवसाकरतां फादरनीं एक व्यवस्था आंखून टाकली. तब्बेत उत्तम असतांना शिस्त हवीशी वाटली, आणि या आजारांत तर ती जास्तच आवश्यक होती. भल्या सकाळचा बर्नार्ड गरम पाणी घेऊन येई, फादरची दाढी करी, त्यांना स्नानाला मदत करी. घरून त्यांनीं आपल्याबरोबर फार पूर्वीं ऑलिव्हेर्सनीं दिलेलीं चांदीचीं भांडीं आणि कांहीं आवश्यक कपडे वगळले तर कांहींच आणलें नव्हतें. त्याच एका ठरलेल्या चांदीच्या तस्तांत बिशपनीं गेलीं तीस वर्षे हात धुतले होते. सकाळची प्रार्थना संपली कीं मॅग्डालेना न्याहारी घेऊन येई. ती बिछायत नीट करीतोंवर आणि केरवारा उरकेतोंवर बिशप एका आरामखुर्चीत पडत. मग कुणाचीहि भेट घ्यायची असल्यास त्यासाठीं त्यांची तयारी झालेली असे. नवे आर्चबिशप घरींच असले कीं थोडा वेळ इथें येऊन जात; मग येई मदर सुपीरिअर. मग अमेरिकन डॉक्टर. उरलेल्या वेळात बर्नार्ड कांहीं ना कांहीं वाचून दाखवी. यांत कधीं सेंट ऑगस्टाइनचें लिखाण असे तर कधीं मादाम द सेव्हिनचीं पत्रें असत तर कधीं बिशपच्या लाडक्या पास्कलचे विचार असत.

केव्हां, केव्हां सकाळच्या वेळीं 'डायोसेज'मधल्या जुन्या मिशन्सविषयींची कांहीं महत्त्वाची माहिती सांगून ती बर्नार्डकडून लिहून घेण्यांत बिशपचा वेळ जाई. ही त्यांना योगायोगानें समजलेली आणि नोंदविली न गेल्यास त्यांच्याबरोबरच हरवेल अशी असे. हें अधिक व्यवस्थितपणें व्हावें असें बिशपना फार वाटे; परंतु तेवढें बळ जवळ नव्हतें. अज्ञातांत जमा होऊं पहाणाऱ्या एका महत्त्वपूर्ण काळाच्या या महत्त्वपूर्ण खुणा होत्या. हे एका नव्या युगाच्या प्राचीचे साक्षीपुरावे होते. आणि हे महत्त्वाचे ठरणार होते. परंतु आतांच यांतल्या एकेक जुन्या दंतकथा, रीती-भाती, समजुती, कुचकामाच्या ठरून नष्ट होत चालल्या होत्या. हें सारें लिहून

काढायला मागेंच सवड मिळायला हवी होती, तशी ती काढायला हवी होती, असें बिशपना आतां राहून राहून वाटे. हळूवार, लवचिक फ्रेंच भाषेंत हें सारें तेव्हांच निबद्ध होतें तर असें हरवलें नसतें.

या भागांत 'क्रिश्चॅनिटी'चा ध्वज प्रथम नेणाऱ्या आद्य स्पॅनिश धर्मगुरूंच्या कठोर कर्तव्यनिष्ठेचा आणि आत्यंतिक सोशिकपणाचा खडतर आदर्श बिशप नव्या धर्मोपदेशकांपुढें नित्य ठेवीत आले होते. ते नेहमींच सांगत कीं त्या मानानें या भागांतला आपल्या कार्याचा ऐन आरंभहि फार सुखाचा, कमी कष्टांचा होता. कष्ट अनेकदां पडले असतील, उपासमार झाली असेल, पाण्याविना दिवसचे दिवस काढावे लागले असतील, उघड्यावर झोंपावें लागलें असेल आणि शरीराच्या स्वच्छतेलाहि दिवसचे दिवस पारखें व्हावें लागलें असेल—परंतु एक हमी तरी नक्कीच होती कीं आपण स्नेहाची भावना बागवणाऱ्या जगांत आहोंत; कोणाच्याहि शेकोटीशीं पहिल्या संधीला आपलें स्वागत होईल.

परंतु 'झुनि'ला आलेले, पुढें उत्तरेकडे नॅव्हॅजोंच्या भागात, पश्चिमेला होपकडे, पूर्वेला अल्बुकर्क ते ताओसच्या टापूंत पसरलेले पहिले स्पॅनिश फादर्स हे वैरभावानें पहाणाऱ्या जगांत, जवळ कसलें संरक्षण न बाळगतां केवळ 'ब्रेव्हिअरी' आणि 'क्रूस' मिरवीत आले होते. इंडियनांनीं त्यांचीं खेचरें नित्य चोरवींत आणि अन्नपाण्यावांचून विश्रांतीविना या महात्म्यांनीं उरली मजल पायींच रखडपट्टी करीत मारावी असें वारंवार घडलें होतें. असले कष्ट युरोपीय माणसाला कल्पना ताणूनहि समजण्याजोगें नव्हते. जुन्या जगांतल्या प्रदेशांना माणसानें नमवले होते, वाकवले होते, आपल्या सोयींनुसार घडवले, मोडले होते, आपला दुसरा देह बनविले होते. तेथल्या रानटी वनस्पति, फळें, कंदमुळें भक्षणीय असत. झऱ्यांतून गोड पाणी वाहे. झाडें छाया देत, निवारा देत. परंतु या जगांत मिळे तें पाणी बहुधा विषानें गढूळलेलें असे; वनस्पति खाण्यायोग्य नसत. सारें कांहीं निःसत्त्व, वाळलेलें, सुकलेलें, काटेरी, धारदार. स्पॅनिश बेयॉनेट, ज्युनिपर, ग्रीजवुड, कॅक्टस, विषाच्या दाढा असलेले जिवाणू. आणि या साऱ्या दुष्ट वातावरणानें दुष्ट बनवलेली माणसें. राक्षसांचीहि कसोटी ठरावी अशा त्या कठोर हृदयाच्या दगडी, कांटेरी प्रदेशावर त्या आद्य मिशनऱ्यांनीं स्वतःला उघडेंनागडें भिरकावून दिलें होतें. त्यांतल्या वाळवंटांत ते तहानेनें व्याकूळ झाले, कडेकपारींतून भुकेनें कळवळले, रक्तबंबाळ पायांनीं त्याचे ओबडधोबड डोंगर चढले आणि उतरले, नासक्या, कुबट अन्नानेंहि त्यांनीं त्यांचीं उपोषणें सोडलीं आणि व्रतें साजरीं केलीं—सेंट पॉलच्या आणि त्यांच्या बांधवांच्या कल्पनेंतहि नसेल एवढ्या

प्रमाणांत हें सारें त्या महाभागांनीं करून दाखवलें. आद्य क्रिश्चन्सनीं हाल काढले ते मेडिटरेनियनच्या छोट्या, सुरक्षित जगांत; नित्यपरिचित संस्कृतींत, जीवनपद्धतींत. त्यांनीं हौतात्म्य सोसलें त्यांच्याच बांधवांच्या सहवासांत. त्यांच्या अस्थि श्रद्धेनें जतन करण्यांत आल्या, त्यांचीं नांवें धर्मनिष्ठांच्या तोंडीं राहून गेलीं.

पूर्वी, मायदेशीं हौतात्म्याविषयीं प्रसिद्ध अशा जुन्या जुन्या मिशन्सना सहाध्यायांबरोबर भेटी देताना बिशप त्यांना वारंवार स्मरण देत कीं अनेक पाखंड्याच्या समुदायांत एका गौरवर्णीयाला छळ आणि मृत्यु पत्करावा लागला होता, अशा या जागीं श्रद्धेचे केवढे उदात्त विजय प्रस्थापित झाले होते तें कोणालाहि कळण्याजोगें नव्हतें. या एकाकी श्रद्धावानांच्या छळाच्या, मरणकालच्या यातना हलक्या व्हाव्यात म्हणून प्रभूनें त्यांना कोणते साक्षात्कार घडविले असतील आणि कोणतीं दर्शनें घडविलीं असतील तें आज कळणें अशक्य होतें.

तरुण असता, ड्युरँगोच्या बिशपकडून आपल्या 'सी'चा ताबा मिळवण्याकरतां फादर लतूर प्रथम जुन्या मेक्सिकोंत गेले तेव्हां त्याना वाटेंत सोनोरा आणि कॅलिफोर्नियाच्या खालच्या टापूंतल्या मिशन्सचे धर्मगुरू भेटले होते. त्यानीं आद्य फ्रान्सिस्कन धर्मगुरूंच्या अनेक हकिकती फादरना कथन केल्या होत्या. छोट्या छोट्या चमत्कारांनीं त्या महात्म्यांचा वनवास जणूं बहरला होता. एकदां सुप्रसिद्ध फादर ज्युनिपेरो सेरा आणि त्याचे दोघे सहकारी अशा तिघांनीं एका धोक्याच्या ठिकाणीं नदी ओलांडण्याचा प्राणघातक प्रयत्न आरंभला होता तेव्हां एक अज्ञात इसम पल्याडल्या तीरावरच्या खडकाळ भागातून आला होता आणि त्यानें त्यांच्याशीं स्पॅनिशमध्यें बातचीत करून योग्य जागेवरून त्यांना नदीपार केलें होतें. त्यांनीं नांव जाणून घेण्याची उत्सुकता दर्शवितांच त्यानें त्यांना चुकवलें होतें आणि तो अदृश्य झाला होता. आणखी एकदां, एका मोठ्या सपाटीवरून ते अन्नान्न स्थितींत, थकून भागून मार्गक्रमणा करीत असतां, एक तरूण घोडेस्वार मागून आला, त्यानें त्यांना तीन रसाळ फळें दिलीं आणि तो दौडत दूर निघून गेला होता. या फळांनीं केवळ त्यांची तहान भागली होती इतकेंच नव्हे तर अत्यंत सकस आणि सुग्रास अन्न पोटांत जावें तशी नवी तरतरी, नवी उमेद त्यांच्या अंगीं आली होती. नव्या दमानें त्यांनीं मग आपला उर्वरित प्रवास संपवला होता.

एकदां रात्रीं, स्वतः फादर लतूर ड्युरँगोमधून प्रवास करीत असतां एका गांवीं मोठ्या जमीनजुमल्यावरल्या घरांत त्यांचा आदरसत्कार करण्यांत आला होता. येथला 'रेसिडेंट चॅप्लेन' हा योगायोगानें पाश्चिमात्य मिशन्सपैकीं एकाचा धर्मगुरू होता. त्यानें पूर्वापार त्याच्या मठांत चालत आलेली याच फादर

ज्युनिपेरोची एक हकिकत फादर ल्तूरला विदीत केली होती.

फादर ज्युनिपेरो एकदां एकुलत्या एका सहकाऱ्यासमवेत त्या मठांत पायीं येऊन पोंचला होता. त्याच्यापाशीं कांहींएक सामानसुमान नव्हतें. मठाच्या सेवकांनीं थक्क होऊनच त्यांचें स्वागत केलें. कारण दोन माणसें अशीं सडीं एवढें मोठें वाळवंट पार करून येतात हें त्यांना नवलाचें,अगदीं अशक्यप्राय वाटलें. "सुपीरिअर" नें त्यांना 'कोठून आलांत' म्हणून विचारलें आणि त्यांच्या जबाबावर असा अभिप्राय प्रकट केला कीं अशा तऱ्हेनें वाटाड्या अगर अन्न वगैरे जवळ न बाळगतां एवढ्या दूरच्या प्रवासाला निघण्याला वास्तविक त्यांच्या मिशननें त्यांना मनाईच करायला हवी होती. अशाही स्थितींत ते सुखरूप आलेच कसे याबाबतहि त्यानें आपलें आश्चर्य बोलून दाखविलें, परंतु फादर ज्युनिपेरो उत्तरला कीं, त्यांचा प्रवास चांगला झाला होता आणि वाटेंत एका मेक्सिकन कुटुंबानें त्यांचा उत्तम प्रकारें पाहुणचार केला होता. यावर; सेवकांकरतां लांकूडफाटा आणून टाकणारा एक नोकर हंसूं लागला आणि म्हणाला कीं, सलग बारा 'लीग्ज' च्या वाळवंटानें भरलेल्या अंतरांत कुठेंही वसतीच नव्हती, कोणी रहात नव्हतें. सेवकांनीं याला दुजोरा दिला.

मग फादर ज्युनिपेरो आणि त्याच्या सहकाऱ्यानें, अनुभवलेला सारा प्रकार निवेदला. एक दिवसाची भाकर आणि पाणी बरोबर घेऊन ते प्रवासाला निघाले होते. परंतु दुसऱ्या दिवशीं पहांटेपासून ते 'कॅक्टस' नें भरलेल्या ओसाड भागांतून एकसारखा प्रवास करीत होते आणि त्यांचा धीर खचूं लागला होता. तेवढ्यांत, सूर्यास्ताच्या सुमारास, कांहीं अंतरावर त्यांना 'कॉटनवुड'चीं तीन झाडें दिसलीं. मावळत्या संधिप्रकाशांत तीं फार उंच वाटत होतीं. त्या झाडांकडे ते घाईनें पोंचले, तेव्हां तीं त्यांना भरदार आणि हिरवीं वाटलीं. त्यांचा कापूस मोठ्या प्रमाणावर चौफेर विखुरला होता आणि नजीकच, वाळूंत, वर आलेल्या एका मोठ्या झाडाच्या वाळक्या खोडाला एक गाढव बांधलेलें त्यांना आढळलें. गाढवाच्या मालकाचा शोध घेतां एका छोट्या मेक्सिकन घराशीं ते आले. दाराशींच घरांतला चुलाणा होता. त्यांनीं हांका मारल्या तेव्हां 'बक्सिन' च्या कपड्यांतला एका मेक्सिकन बाहेर आला आणि त्यानें आपुलकीनें त्यांचें स्वागत केलें. रात्रीं मुक्काम आपल्याकडेच करण्याची विनंति त्यांना केली. त्याच्याबरोबर घरांत गेल्यावर त्यांच्या नजरेंत घरांतला नेटकेपणा, टापटीप भरली. त्या मेक्सिकनाची बायको देखणी होती, तरुण होती. चुलीशीं बसून ती स्वयंपाकाचें पहात होती. त्यांचें मूल फार लहान, अगदीं

तान्हें होतें आणि त्याच्या अंगावर एका छोट्या झबल्याखेरीज कांहीं नव्हतें. तिच्याजवळच जमिनीवर बसून तें एका कोंकराशीं खेळत होतें.

या दोघां पाहुण्यांना हीं माणसें सोज्ज्वळ, धार्मिक आणि शब्दाचीं गोडवीं वाटलीं. त्यापैकीं पुरुष म्हणाला कीं, त्यांचा धंदा मेंढपाळाचा होता. हे दोघे धर्मगुरू त्यांच्या मेजाशीं बसले, त्यांच्याच जेवणांतलें त्यांनीं भक्षण केलें आणि मग सायंकाळची प्रार्थना वाचली. या भागाबद्दल, त्या मेंढपाळाच्या एकूण जीवनमानाबद्दल, आणि या भागांत मेंढ्या पाळण्याला त्याला कुरण कुठें मिळालें याविषयीं, त्या पुरुषाला विचारण्याचें धर्मगुरूंच्या मनांत होतें परंतु त्यांच्यावर थकव्याची अतोनात गुंगी आली आणि देण्यांत आलेलें एकेक पांघरूण लपेटून दोघेहि जमिनीवर आडवे झाले आणि तात्काळ झोंपी गेले. सकाळीं ते उठले तेव्हां सारें रात्रीसारखेंच त्यांना दिसलें. त्यांचें जेवणहि मेजावर वाढून ठेवलेलें परतु तें कुटुंब कुठेंच दिसलें नाहीं. तें पाळलेलें कोंकरूदेखील कुठें सांपडलें नाहीं. बहुधा मेंढ्यांच्या कळपामागे तीं माणसें गेलीं असावीत असा निष्कर्ष त्या दोघां धर्मगुरूंनीं काढला.

मठांतल्या सेवकांनीं ही कहाणी ऐकली तेव्हां त्यांना मनस्वी नवल वाटलें. त्यांनीं बोलून दाखविलें कीं धर्मगुरूच्या म्हणण्याप्रमाणें, वाळवंटांत एकत्र वाढलेलीं तीन 'कॉटनवुड' चीं झाडें निश्चितच होतीं. त्या भागांतली ती एक खूण होती. परंतु कोणी रहिवासी तिथें आढळतच असेल तर तो अगदीं अलिकडेच रहायला आला असावा. आणि म्हणून घडलें तें खरें असल्याचें सिद्ध करण्याकरतां फादर ज्युनिपेरो आणि फादर आंद्रिआ यांनीं या मंडळीला आपल्यासोबत घेऊन पुन्हां परत मोर्चा वळवला. तीं तीन एकत्र वाढलेलीं झाडें आणि लगतचें एका मेल्या झाडाचें वाळकें खोडहि त्यांना सांपडलें. परंतु गाढव तिथें नव्हतें, घरहि नव्हतें आणि दाराजवळचा चुलाणाहि अर्थातच नव्हता. मग ते दोघे धर्मगुरू आदल्या दिवशींच्या चमत्काराच्या जाणीवेनें गहिंवरून खालीं वांकलें. विनम्र झाले, त्या पवित्र भूमीचीं त्यांनीं प्रेमानें चुंबनें घेतलीं.

घरांत शिरल्या क्षणापासून आपण त्या खेळत्या मुलाकडे कसे आकर्षिलो गेलो होतों, त्याला उचलून घ्यावें, खेळवावें असें आपल्याला कसें सारखें वाटत होतें आणि तो पोर त्याच्या आईलाच कसा चिकटून होता त्याबाबत आपल्या मनांत उसळत होतें तें सारें त्यांनीं सांगून टाकलें. फादर प्रार्थना करीत असता तो पोर आईच्या मांडीशीं बसून कोकराला कुरवाळीत होता आणि आपल्याला प्रार्थनेंतच गुंतवणें कसें त्यामुळें कठीण होत होतें तेंहि फादरनें सांगितलें. प्रार्थनेनंतर

घरांतल्या माणसांचा निरोप घेतल्यावर आशीर्वादाखातर तो त्या मुलाच्या माथ्यावर वाकला होता आणि त्या मुलानें हात वर करून बोटानें फादरच्या कपाळावर क्रूसाचें चिन्ह केलें होतें तेंहि सारें फादरनें एका उर्मीनें सांगितलें.

फादर ज्युनिपेरोच्या त्या कुटुंबाच्या या हकिकतीचा बिशपच्या मनावर, रात्रीं त्या मोठ्या घरीं पाहुणे म्हणून राहिले असता ती ऐकल्यावर फार परिणाम झाला होता. त्या हकिकतीविषयीं त्यांच्या मनीं खरोखर एवढा जिव्हाळा होता कीं फक्त दोनच प्रसंगीं त्यांनीं ती स्वतःच्या तोंडून आणखी कोणाला ऐकवली होती. एकदां रिओम-मधल्या मदर फिलोमेनच्या कॉन्व्हेण्टच्या जोगिणींना आणि एकदां रोममध्यें कार्डिनल माझुक्चीनीं मेजवानी दिली त्या वेळीं. देवत्वाच्या योग्यतेचें महान् व्यक्तिमत्व कोणाच्या तरी सहाय्यार्थ सामान्याच्या पातळीवर उतरतें, या कल्पनेंतच आधीं एक आकर्षकता होती. त्याहूनहि, प्रभूंनीं इतिहासाच्या इतक्या शतकांनंतर त्यांच्या मूळ भूमिका पुन्हा बजावण्यासाठीं परत यावें, एक अत्यंत गरीब, सामान्यांतलें सामान्य मेक्सिकन कुटुंब बनावें आणि अशा ओसाडींत उतरावें कीं देवदूतांनाहि त्याचा पत्ता लागणें दुरापास्त—ही कल्पना तर शतपटींनीं आकर्षक !

लेखन करवून घेण्याचें काम संपलें कीं आर्चबिशप झोंपेचा बहाणा करीत. जेवण तयार होईपर्यंत आपल्याला कोणी हटकूं नये असें सांगून ते डोळे मिटून स्वस्थ पडत. त्याचा पलंग खोलीच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत होता. इथल्या अंधाराचा त्यांना या एकाकी चिंतनांत उपयोगच होई. उघडिपीच्या दिवशीं खोलीचा दुसरा भाग झगझगीत उजळलेला असे आणि कुंद दिवशीं शेकोटीचा प्रकाश शुभ्र भिंतीवर वर खालीं नाचत राही. बिशप इतके निःस्तब्ध पडत कीं अंगावरचे कपडे अचेतन होत. हात दोन्ही बाजूंना वा छातीवर पूर्ण विसावलेले असत. अशा प्रकारें बिशप आतां आपलें पूर्वजीवन पुन्हा जगत होते. असे ते एरवीं निःस्तब्ध पडत तेव्हां उजव्या हाताचा अंगठा तर्जनींतल्या अंगठीला कांहीं वेळां हलूंच स्पर्श करीत असे. त्या अंगठीवर अक्षरें होतीं, Auspice Maria'. ही फादर व्हेलंटची 'सिग्नेट रिंग'. असें घडे तेव्हां नक्की समजावें कीं बिशप फादर व्हेलंटची, या खोलींतल्या त्यांच्या एकत्रित जीवनाची, ओव्हिओंतल्या ग्रेट लेक्सनजीकच्या काळाची, पॅरिसमधली तरुण असतांनाची, मॉंटफेरँडला पोरवयांत असतांनाची आठवण करताहेत. अशा कितीतरी सुखद, प्रिय, अवीट आठवणी त्यांच्यापाशीं होत्या——अगदीं आरंभापासूनच्या !

दोघे विशींतले तरुण होते. वयस्क धर्मगुरूंचे 'क्युरेट्स' म्हणून काम करीत होते. आणि ओहिओहून क्लेरमॉटला एक बिशप आला. हा औव्हर्नेचा रहिवासी. पश्चिमेंतल्या मिशन्सकरतां त्याला स्वयंसेवक हवे होते. सेमिनरींत त्याचें व्याख्यान झालें तें दोघांनीं ऐकलें आणि मग त्याच्याशीं व्यक्तिगत स्वरूपाच्या गोष्टीही केल्या. तो उत्तरेकडे परतण्याआधीं, एका ठराविक तारखेला त्याला पॅरिसमध्यें भेटण्याचे दोघांनीं प्रतिज्ञेवर ठरविलें होतें, बाहेरच्या, विशेषतः पश्चिमेंतल्या धर्मोपदेशकाच्या कामाच्या दृष्टीनें कांहीं आठवडे कॉलेज फॉर फॉरेन मिशन्समध्यें त्यांनीं अध्ययनहि करण्याचें योजलें होतें. आणि मग त्या बिशपबरोबरच चेरबर्गला जाण्याचा त्यांचा बेत होता.

या बेताला दोघांच्याहि घरून कडाक्याचा विरोध होणार हें त्यांना माहीत होतें. म्हणून हा बेत गुप्तच राखण्याचें दोघांनीं ठरवलें होतें. रीतसर कोणाचा निरोप न घेतां साध्या कपड्यांत इष्ट स्थळाकडे निघून जायचें अशी त्यांची योजना होती. सेंट फ्रान्सेस झेविअर भारताकडे मिशनरी म्हणून गेला तेव्हां तोहि याच प्रकारें सर्वांना फसवून गेला होता. शाळेंत असतांना माहीत झालेल्या या प्रसंगाची आठवण देऊन एकमेकांनीं एकमेकांचें सांत्वन चालवलें होतें. "अभिवादनही न करतां तो आईबापाच्या घरावरून पुढें निघून गेला" असे पुस्तकांतले शब्दच होते.

फादर व्हेलंटची परिस्थिति विशेष अवघड होती. त्याचे वडील शिस्तीचे भोक्ते आणि अबोल गृहस्थ होते. विधुर होते. मुलांवर त्यांचें अतोनात प्रेम होतें आणि त्यांच्याच आयुष्यांपलिकडे त्यांना वेगळें आयुष्य नव्हतें. जोसेफ हा त्यांचा सर्वांत मोठा मुलगा. निश्चय ठरवल्यापासून तो अंमलांत आणीपर्यंतचा कालखंड त्याला मनस्वी त्रासाचा आणि यातनांचा गेला. निघण्याची तारीख जवळ येत गेली तसतसा तो अधिकाधिक रुग्णाईत, फिक्कट, ओढलेला दिसूं लागला होता.

करारानुसार त्या तारखेला रिओमच्या वेशीबाहेरच्या एका विशिष्ट शेतावर भल्या पहाटे त्या दोघांनीं त्या बिशपला भेटायचें होतें. जीं लतूरनें एकदां निर्णय घेऊन निश्चय ठरवल्यानंतर आतां डळमळणें, कचरणें त्याला माहीत नव्हतें. ठरल्या दिवशीं पहांटे बहिणीच्या घरून तो गुपचूप बाहेर पडला आणि गांवाबाहेरच्या वाटेला लागला. गांव अद्याप जागें व्हायचें होतें. आभाळ ढगाळ होतें. हवा कुंदच होती. त्या ठरलेल्या शेतांत त्याला त्याचा मित्र अत्यंत दयनीय अवस्थेंत आढळला. रात्रभर तो त्याच भागांत होता, वेडावांकडा भटकत होता, या सगळ्या यातायातींतला हेतु शोधत होता. तो सांपडे आणि पुन्हां तात्काळ

गायब होई. रडून त्याचा चेहरा सुजला होता. हुडहुडीनें तो कांपत होता आणि त्याचा आवाज त्याच्या ताब्यांत नव्हता.

तो म्हणूं लागला, "काय करूं मी, जीं? काय करूं? मला सांग! माझ्या बाबांचें मन मोडायची इच्छा नाहीं माझी आणि देवाला स्मरून केली ती प्रतिज्ञाहि नाहीं मोडायची मला! यांतलें कांहीं करण्यापेक्षां मरण चालेल मला! या वेळीं या दुःखानें मी मरेन तर किती छान होईल रे!"

...वृद्ध आर्चबिशपांना अद्याप हा प्रसंग स्वच्छ स्मरत होता. त्या कुंद वेळीं ते दोन तरुण मुलगे त्या शेतांत उभे; जणूं कोणी गुन्हेगार आहेत असे लपून, छपून. धरून चोरून पळालेले. मित्राचें सांत्वन कसें करावें हें त्या वेळच्या जीं मारि लतूरला कळलें नव्हतें. सहनशक्तीपलिकडे जोसेफला त्रास होतो आहे, दोन परस्परविरुद्ध इच्छांनीं तो दुभंगून जातो आहे असें त्याला वाटलें. हातांत हात घालून ते दोघे तिथें पुढें मागें फेऱ्या घालीत असतां त्यांनीं एक आवाज ऐकला. डोंगरांतल्या वाटेनें त्यांची गाडी येत होती. जोसेफ निःस्तब्ध झाला, त्यानें तोंड हातांत लपवून घेतलें. गाडीचें शिंग वाजलें.

जीं मग अगदीं कांहीं न झाल्यासारखाच म्हणाला होता, "माझ्याबरोबर पॅरिसला चलणार तूं, जोसेफ! तूं चालणार! तिथें पोंचल्यावर तुझ्या वडिलांचा प्रश्न तरीही सुटलेला नसला तर मग आपण तुला तुझ्या प्रतिज्ञेतून मुक्त करण्याकरतां तेथल्या बिशपXXXना भेटूं. मग वाटल्यास तूं रिओमला परतूं शकशील. सोपें तर आहे."

रस्त्याच्या कडेला तो धांवला. गाडीहांक्याला त्यानें हातानें खुणावलें. गाडी थांबली. क्षणभरांत दोघे तिच्यांत चढून बसले. आणि थोड्याच वेळांत जोसेफ त्याच्या जागीं केवळ थकव्यानेंच गाढ झोंपी गेला. परंतु तो पुढें नेहमीं सांगे कीं, जीं लतूरनें त्याला त्या यातनामय वेळीं पाठिंबा, आधार दिला नसता तर आयुष्यभर तो पुय-ड डोममध्येंच धर्मगुरू म्हणून जगला असता.

त्या वसंतारंभींच्या सकाळीं रिओमहून निघालेल्या त्या दोघां तरुण धर्मगुरूंपैकीं जीं लतूर मिशनऱ्याच्या पेशांत अधिक यशस्वी होईल असेंच तेव्हां कोणीहि म्हटलें असतें. आणि खरोखरच त्याचें अंगपिंड आणि मन या पेशाला योग्य होते, भक्कम होतें. रू-ड-बॅकमधल्या 'कॉलेज ऑफ फॉरेन मिशन्स'मध्यें शिकण्याच्या कालांत जोसेफ या पेशांतलें खडतर जीवन कितपत धकवूं शकेल याबाबत कॉलेजच्या प्रमुखांना शंका होती. तरीहि पुढल्या प्रदीर्घ कसोटींत त्याच हाडकुळ्या शरीरानें अधिक सोसलें होतें, साधलें होतें.

फादर लतूर नित्य म्हणे कीं मैलांची वाढ सोडली तर त्याचें 'डायोसेज' फारसें बदललें नव्हतें. मेक्सिकन्स हे मेक्सिकन्सच रहात आले होते आणि इंडियन्स हे इंडियन्स. सांता फे एक सामान्य, संथ वळणाचें गांव होतें. इथें ना नैसर्गिक सुबत्ता कीं ना व्यापारउदीमाची बरकत. परंतु फादर व्हेलंटनें मात्र एका प्रचंड औद्योगिक विस्तारांत उडी घेतली होती. तिथें गुण आणि दुर्गुण एकत्र नांदत होते. मोठमोठ्या झेंपांनीं सुधारणा घडत होत्या—पीछेहाटहि तेवढीच पल्लेदार. पंगू झाल्यावरहि दर साल तो डोंगरभागांतल्या गांवांना भेटी देत प्रवासी बग्गीनें वा आपल्या गाडीनें हजारों मैल पालथें घाली. बोल्डर, गोल्ड हिल, कॅरिबु, केक–अ–ला–पौद्र, स्पॅनिश बार, साउथ पार्क, केक क्रीक, कॅलिफोर्निया गल्फ अशीं नाना ठिकाणें.

केवळ धर्मोपदेशक रहाण्यातहि फादर व्हेलंटनें समाधान मानलें नव्हतें. तो धर्मप्रसारक झाला. कोलोरॅडोमध्यें त्याच्या मतें चर्चला फार वाव होता. जवळ साध्या साध्या गरजांच्या वस्तू नसतांहि तो जमिनीचे मोठमोठे तुकडे चर्चच्या नांवें खरीदूं लागला. फार थोड्या पैशांत त्याला हें साधलें. परंतु हा थोडा पैसाहि त्याला राक्षसी व्याजानें बँकांकडून कर्जाऊ काढावा लागला. शाळा, कॉन्व्हेण्टस् बांधण्याकरताहि त्यानें कर्जें काढलीं. या साऱ्यांच्या व्याजांतच तो चिरडून जाऊं लागला. ओहिओ, पेनिन्सिल्व्हानिया, कॅनडा इथें त्यानें नित्यवर्धिष्णु व्याजाच्या पैशांकरता देणग्या जमवण्याकरता मोठमोठे दौरे काढले. त्यानें एक जमीनविषयक कंपनी स्थापन केली, तो परदेशीं गेला, फ्रान्समध्यें त्यानें पैसे उभारण्याकरतां शेअर्स काढले, अप्रामाणिक दलालांनीं त्याच्या नांवावर अनेक वाईटसाईट व्यवहार केले.

तो सत्तरीला आला तेव्हां, एका पायाहून दुसरा पाय चार इंचांनीं आखूड असलेल्या स्थितींत, त्याला त्याच्या गुंतागुंतीच्या अर्थकरणाचा खुलासा करण्याकरतां रोमला पेपल कोर्टापुढें बोलावून घेण्यांत आलें होतें आणि कार्डिनल्सचें समाधान करतांना त्याला अति सायास पडले होते.

फादर व्हेलंटच्या मृत्यूची वार्ता सांगणारी तार सांता फेंत पोंचली तेव्हां तात्काळ फादर लतूर नव्या रेल्वे गाडीनें डेन्व्हरकडे निघाले. मात्र तारेंतल्या मजकुराचा त्यांना विश्वास वाटत नव्हता. मागें अनेकदां अशाच वाईटसाईट वार्ता कानीं पडूनहि डोंगरदऱ्या मागें टाकून फादर व्हेलंटला गांठावें तों तो खडखडीत असायचा.

फादर व्हेलंटच्या शवयात्रेला आपण उपस्थित होतों हें फादर लतूरना नंतर कधींच पटलें नव्हतें. शवपेटिकेंतला तो म्हातारा, खुरटा, हाडकुळा देह—माक·

डोंच्या देहाहून थोडासाच मोठा--त्याचा फादर व्हेलंटशीं काय संबंध? बर्नार्ड त्यांना दिसत होता तितका स्वच्छ त्यांना फादर व्हेलंट दिसूं शकत होता--परंतु तो होता दोघे मिळून प्रथम या भागांत आले तेव्हाचा. ही भावनाविवशता नव्हती. स्मृतींत मुळीं फादर व्हेलंटचें दुसरें चित्रच नव्हतें. तो दफनविधि मात्र त्यांच्या लक्षांत राहिला होता. उघड्यावर, कॅन्व्हसच्या छताखालीं तो साजरा झाला. डेन्व्हरमध्यें-किंवा साऱ्या दूर पश्चिमेंतच-त्याच्या जोसेफच्या दफना-योग्य मोठी इमारत नव्हती. कारण त्या विधीआधीं दोन दिवस आसपासच्या टापूंतली जनता केवढ्या तरी प्रमाणावर डोंगरावरून येऊन जोसेफचें दर्शन घेत होती. दफनविधीला एकाद्या राष्ट्रीय मेळाव्याएवढी मोठी गर्दी जमली होती. आणि त्या दफनविधीच्या वेळीं एक विलक्षण घटना घडली :

त्यापूर्वी वीस वर्षांमागें फादर व्हेलंटबरोबर सांता फेहून कोलोरॅडेला आलेला आणि क्युरेट आणि व्हिकर म्हणून राहिलेला फादर रिव्हार्डी नांवाचा फ्रेंच धर्मगुरू बिशपच्या कांहीं कामाकरतां फ्रान्सला गेलेला होता. तिथें असतांना त्याच्या वैद्यानें त्याला सांगितलें होतें कीं, त्याला एक प्राणघातक व्याधि जडली होती, आणि तात्काळ बोट पकडून तो परत आला होता. बिशप व्हेलंटना त्यांच्या कामाचें काय झालें तें सांगून मरायला मोकळें व्हावें हा थामागला हेतु होता. तो शिकागोपर्यंत पोंचला आणि त्याचें दुखणें वाढलें, त्याला एका कॅथॉ-लिक इस्पितळांत दाखल करण्यांत आलें. एकदां सकाळीं एका नर्सनें त्याच्या बिछायतीशीं गाफीलपणें एक वर्तमानपत्र टाकलें. तें चाळतांना फादरच्या नजरेला कोलोरॅडोच्या बिशपच्या अवसानाची वार्ता आली. सिस्टर परतली तेव्हां तिला पेशंटनें कपडे चढवल्याचें आढळलें. तात्काळ आपल्याला रेल्वे स्टेशनवर पोंच-वण्यांत आलें पाहिजे याबाबत त्यानें तिची खात्री पटविली. डेन्व्हरला पोंचतांच एका गाडींत शिरून बिशपच्या दफनाकडे जाण्याची इच्छा प्रकट केली. तेथले विधि निम्मेअधिक पार पडले असतां तो तिथें पोंचला. गाडीवानानें आणि दोघां धर्मगुरूंनीं सांवरल्या स्थितींत गर्दींतून वाट काढीत शवपेटिकेशेजारीं गुडघ्यांवर नम्र झालेला तो मृत्युपंथांतला माणूस केवळ अविस्मरणीय होता! त्याच्या-करतां एक खुर्ची आणविण्यांत आली आणि उरलेल्या विधींत तो शवपेटिकेवर कपाळ टेकून विसावला होता. बिशप व्हेलंटला थडग्याकडे नेण्यांत आलें तेव्हांच फादर रिव्हार्डीला इस्पितळाकडे नेण्यांत आलें. थोड्याच दिवसांत तो मरण पावला. लाल, पिवळ्या, गौर अशा सर्व वर्णांच्या माणसांशीं ऋणानुबंध जोडून ते दीर्घकाल टिकविणाऱ्या फादर जोसेफच्या गुणाचें हें आणखी एक उदाहरण.

बिशपच्या आयुष्यांतल्या त्या अखेरच्या दिवसांत मृत्यूचा विचार त्यांनी तसा फार थोडा केला. वियोग ठरला होता तो भूतकाळाचा. भविष्याची चिंता कुणी करावी? परंतु मरणाच्या क्रियेविषयीं त्यांना एक बौद्धिक औत्सुक्य मात्र होतें, उत्सुकता होती. मरणानें माणसाच्या निष्ठा आणि मूल्यें यांत काय बदल घडतात तें त्यांना शक्य असतें तर जाणून घ्यायचें होतें. जीवन हा त्यांना उत्तरोत्तर 'अहम्'चा एक अनुभवच वाटत चालला होता–मात्र खुद्द 'अहम्' म्हणजे जीवन नव्हतें. हा नवा निष्कर्ष त्यांच्या धार्मिक जीवनापासून अलग आणि स्वतंत्र होता असा त्यांचा विश्वास होता. एक माणूस म्हणून, मानवी जीव म्हणून त्यांच्या मनीं तो आला होता, रुजला होता. त्यांच्या लक्षांत हेंहि आलें कीं आतां आपण साऱ्या गोष्टींकडे, आपल्या, इतरांच्या चालचलणुकी-कडे एका वेगळ्या दृष्टिकोनांतून पहातों. त्यांच्या जीवनांतल्या चुकांचीं विशेष क्षिति आतां त्यांना वाटेनाशीं झाली होती. गॅल्व्हॅस्टन बंदरांतलें जहाज फुटणें, न्यू मेक्सिकोच्या वाटेवर 'बिशोप्रिक'च्या शोधांत असता झालेला असलाच अपघात हे त्यांना क्षुल्लक भासूं लागले होते.

त्यांच्या एकूण स्मरणांतहि प्रमाणाची जाणीव उरली नव्हती. लांब जवळ कांहीं नव्हतें. जुनें नवें सारें सारखेंच स्पष्टपणें स्मरत होतें. मेडिटरेनियनवरचे पोरवयांतले पुतण्याबरोबरचे दिवस त्यांना दिसत, भासत होते तशीच रोम-मधली विद्यार्थीदशाहि स्मरत होती. आणि एम. मोल्नीचें सांता फेंतलें आग-मनहि याला अपवाद नव्हतें. कॅथेड्रलचें बांधकाम याचाच आणखी पुढला भाग होतें. कॅलेंडरांतले काळाचे विभाग त्यांच्या लेखीं उपयोगाचे राहिले नव्हते आणि त्यानींहि त्याची गणना टाकली होती. स्वतःच्या जाणीवेच्या मध्यभागीं ते बसून होते. मनाचीं जुनीं वाटा–वळणें सारीं कायम होतीं. तीं हाताशींच होतीं आणि हातीं घेतांहि येत होतीं. नीट अभ्यासतांहि येत होतीं.

केव्हां केव्हां मॅग्डालेना किंवा बर्नार्ड खोलींत येत, कांहीं विचारपूस करीत तेव्हां त्यांना नक्की काय आहे तें समजून घेण्यांत बिशपांचे कांहीं सेकंद जात. असें पुन्हा वर्तमानांत येऊन पडणें कष्टदायक होई. त्यांना कळत होतें कीं हे लोक आपली मानसिक कुवत कमी होत असल्याचें समजताहेत; परंतु त्यांना हेंहि कळत होतें कीं, ती इतरत्र कांहीं बाबतींत कमालीची वाढलीहि आहे —आणि त्यांना त्याची कल्पना नव्हती.

गरज निर्माण होई तेव्हां ते वर्तमानकाळांत परत येऊं शकत होते. परंतु खरसा वर्तमानकाळ शिल्लक नव्हता; फादर जोसेफ गेला होता, ऑलिव्हेर्स जोडपें

मेले होते, किट कार्सन गेला होता, आणि आयुष्यांतील कांहीं लहानसहान व्यक्ति तेवढ्या नांवाला उरल्या होत्या. सांता फेला आल्यावर कांहीं आठवड्यांनीं एकदां सकाळीं, जुन्या दिवसांतली एक समर्थ व्यक्ति उपस्थित झाली होती— स्मरणांत नव्हे, चिंतनांत नव्हे, प्रत्यक्षांत, वर्तमानाच्या उथळ प्रकाशांत. युसाबिओ. तो नॅव्हॅजो प्रमुख. लांब कोलोरॅडो चिकितोच्या भागांत त्याला बातमी कळली होती कीं जुने आर्चबिशप मृत्युशय्येवर आहेत; आणि तो सांता फेला आला होता. आतां तोहि फार म्हातारा झाला होता. पुन्हा एकवार दोघांचे बाहु एकमेकांत निबद्ध झाले. बिशपनीं डोळ्याकडेचा एक थेंब निपटून टाकला.

"मित्रा भेटायची फार इच्छा होती. बोलावून घेणार होतों पण अंतर फार."

तो म्हातारा नॅव्हॅजो हंसला. "नाहीं फादर, आतां लांब नाहीं. मी गाडीनें येतो, गाडीनें. गॅलपला मी गाडींत चढलों कीं त्याच दिवशीं इथें पोंचतों. आपण एकदां बरोबर आमच्या मुलखांतून इथें सांता फेला आलों होतों, आठवतें! किती दिवस लागले होते आपल्याला? जवळ जवळ दोन आठवडे. आतां प्रवास जलदीनें होतो. मात्र सारें बऱ्याकरतां चाललें आहे कीं काय तें माहीत नाहीं."

"भविष्यकाळ जाणण्याचा प्रयत्न नको, युसाबिओ. त्यांत फायदा नाहीं. मनुएलितोचें कसें काय?"

"चांगला आहे अद्याप तो. तो अजून त्याच्या जमातीचा म्होरक्या आहे."

युसाबिओ फार वेळ थांबला नाहीं, परंतु उद्या आपण पुन्हा येऊं असें मात्र म्हणाला. कांहीं दिवस सांता फेंतच कांहीं कामानिमित्त त्याला रहावें लागणार होतें. खरें तर कांहीं काम नव्हतें. पण फादर लतूरची अवस्था पाहून त्यानें हें ठरवलें होतें. एर्वीतेर्वीं फार दिवसांचा प्रश्न उरला नव्हताच.

तो निघून गेल्यावर बिशप बर्नार्डकडे वळले. 'दोन फार मोठ्या चुका दुरुस्त झालेल्या पहायला मी जगलों; काळ्या माणसांची गुलामगिरी संपलेली मीं पाहिली आणि नॅव्हॅजोंना त्यांचा मुलुख परत मिळालेला पाहिला.'

अनेक वर्षे फादर लतूरला वाटत आलें होतें कीं एक तरी ॲपेक किंवा नॅव्हॅजो अस्तित्वांत असेतोंवर या इंडियन लढायांचा शेवट कधीं तरी होणार आहे काय? या लढायांतून व्यापाऱ्यांचा आणि कारखानदारांचा फायदा झाला होता. आणि त्या चालू रहाव्यात म्हणून भरपूर राजकीय डाव आणि पैसा त्या भागांत वापरला जात होता.

न्यु मेक्सिकोंतल्या मधल्या काळांत नॅव्हॅजोंची दुरवस्था आणि त्यांच्याच मुलुखांत त्यांना सोसावा लागलेला वनवास बिशपना पहावा लागला होता. नव्या

'डायोसेज' चीं सूत्रें हातीं घेतल्यावर लौकरच युसाबिओशीं जडलेल्या स्नेहामुळें फादरना नॅव्हॅजो जमातीबाबत एक आपुलकी वाटूं लागली होती. त्यांना त्यांच्याविषयीं कौतुक वाटे, त्यांच्या कल्पनेला त्या लोकांचे युयुत्सु, मानी जीवन स्फुरण देई. घरेंदारें करून राहिलेल्या गांवागांवांतल्या इंडियनांच्या मानानें या जमातीनें गोरकायांच्या जीवनपद्धतीचा स्वीकार करण्याला किती तरी अधिक काळ घेतला होता. आणि गोरकायांचा धर्म, त्यांचे मिशनरी यांविषयीं ती उपेक्षाच दाखवीत आली होती. तरीहि फादर लतूरना तिच्यांत एका श्रेष्ठ सामर्थ्याचा प्रत्यय येई. त्याच्या तुटक वृत्तीमागें कांहीं हेतु होता, एक धारदार श्रद्धा होती. अज्ञात कालापासून त्यांच्या असलेल्या मुलुखाला त्यांना पारखें व्हावें लागलें तेव्हां फादरना तो अन्याय देवाघरीं ओरडून जाब विचारावा असा घोर अन्याय वाटला होता. हजारोंच्या संख्येनें त्यांना त्यांच्या प्रदेशांतून तीनशें मैलांवरच्या पेकॉस नदीशीं, बॉस्क् रेडोंडोकडे पिटाळण्यांत, होलपटण्यांत येत होतें. तो कडाक्याचा हिंवाळा फादरच्या स्मृतींत कायमचा घर करून राहिला होता. मार्गांत त्यांच्यांतलीं शेंकडों मुलेंबाळें, आयाबाया, म्हातारींकोतारीं आणि धट्टींकट्टीं माणसें भुकेनें, थंडीनें मरण पावलीं होतीं. डोंगर ओलांडताना त्यांच्या मेंढ्या आणि घोडयांनीं तडफडून प्राण टाकले होते. कोणीहि स्वेच्छेनें गेलें नाहीं: उपासमार आणि पारध अशा दोन साधनांनीं त्यांना घालवण्यांत आलें.

आणि या जमातींतल्या उरल्या मुरल्या अवशेषांचाहि निकाल त्या भागांत लावण्याचें काम त्यांच्या स्नेह्यानें किट कार्सननें केलें होतें. कॅन्यॉन ड चेलीमध्यें तो त्यांचा मागोवा घेत शिरला होता. आपल्या मुलखांत रहाण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून ते इथें जाऊन राहिले होते. ते होते मेंढपाळ. आपल्या कळपांपलिकडे स्वतःचें असें त्यांच्याकडे कांहीं नव्हतें. जवळ फारशीं शस्त्रें नव्हतीं, दारूगोळा नांवापुरता होता, आणि बायकापोरांचें पेगार पाठीवर होतेंच. परंतु हें 'कॅन्यॉन' गोरकाय फौजा पोंचण्याच्या दृष्टीनें तोंवर अवघड म्हणून नॅव्हॅजोंना वाटत होतें कीं तिथें तरी रहातां येईल. या भागांत आपल्या देवता वास करतात अशीहि त्यांची श्रद्धा होती.

कार्सननें त्यांना तिथें गाठलें. त्यांचे सांठे उध्वस्त केले. त्यांचीं शेतें जमीनदोस्त केलीं. तेथलीं फळझाडें कापून टाकलीं. अशा प्रकारें जवळचें अखेरचें सारें नष्ट होतांना पाहून त्या नॅव्हॅजोंनीं धीर सोडला. ते शरण आले नाहींत. त्यांनीं फक्त लढायचें बंद केलें आणि ते कैद झाले. कार्सन हुकुमाचा ताबेदार होता; त्यानें हुकुमान्वयें आपलें क्रूर लष्करी कर्तव्य बजावलें. परंतु नॅव्हॅजो

म्होरक्यांपैकीं सर्वांत शूर तो त्याच्या हातीं पडला नव्हता. कॅन्यॉन ड चेलींतल्या आपल्या जमातीच्या भयंकर पाडावानंतर तो म्होरक्या, मनुएलितो मुक्तच राहिला. त्यानंतरच्या काळांत युसाबिओनें सांता फेंत बिशप लतूरची गांठ घेऊन मनुएलितोची भेट झुनिला येऊन घेण्याची विनंति त्यांना केली होती. कायद्यानें बहिष्कृत ठरलेल्या या माणसाला भेटण्यास संमति देणें धर्मगुरू म्हणून बिशपना योग्य वाटलें नव्हतें. परंतु ते माणूसहि होते आणि शिवाय न्यायाचे चहाते होते. त्यांना विनंती करण्यांत आली ती अशा तऱ्हेनें कीं, ती अव्हेरणें त्यांना जमलें नाहीं. युसाबिओसमवेत ते गेले.

मनुएलितोकरतां त्याला जिवंत वा मृत स्थितींत पकडण्याकरतां सरकारनें मोठें इनाम जाहीर केलें होतें.तरीहि तो त्याच्या प्रदेशांतून झुनींत आला तो दिवसा ढवळ्या,डझनभर अनुयायी बरोबर घेऊन. सारे मरतुकड्या घोड्यावर स्वार होते. कोलोरॅडो चिकितो भागांतल्या युसाबिओच्या मुलखांत तो लपून छपून रहात होता.

मनुएलितोला आशा वाटत होती कीं. बिशप वॉशिंग्टनला जाऊन त्याच्या जमातीच्या बाजूनें, ती नष्ट होण्याआंत, कांहीं रदबदली करतील. तो म्हणाला, सरकारकडून त्यांना कांहीं नको होतें; फक्त त्यांना हवा होता त्यांचा धर्म आणि त्यांची वंशपरंपरागत भूमि. हा सारा भाग त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या धर्माचा भाग होता, याला धार्मिक महत्त्व होतें. आणि याच्यापासून त्याच्या जमातीची ताटातूट म्हणजे जिवाची देहापासून ताटातूट होती. हा भाग, कॅन्यॉन ड चेली, म्हणजे त्यांना वाढविणारी, पोसणारी त्यांची आई होती, इथें त्यांचे देवदेवता वास करीत होते. पॅड्रेचा देव जसा चर्चमध्यें तसा त्यांचा या प्रदेशांत होता.

आणि कॅन्यॉन ड चेलीच्या उत्तरेकडे 'शिप-रॉक' होता. उंचावर गेलेला एक सुळका. सपाट वाळवंटांत एकुलता एक. पन्नास एक मैलांवरून दिसूं शकणारा. लांबून तो एक शिडाची मच्छीमारी नाव वाटे. म्हणून गौरकाय लोकांनीं त्याला तसें नांव दिलें होतें. परंतु इंडियनांकडे त्याचें नांव वेगळेंच होतें. त्यांच्या मतें तो सुळका पूर्वी केव्हां तरी हवेत उडणारें जहाज होता. पुरातन काळीं तो सुळका हवेंतून उडत आला होता आणि त्याच्या टोकावर बसून नॅव्हॅजो जमातीचें आद्य जोडपें दूर उत्तरेकडून, सारींच माणसें जेथून आलीं तेथून इथें पोंचलें होतें. हा सुळका येथें जमिनीवर येईल तो त्या जोडप्याच्या वंशाचा प्रदेश ठरायचा होता. त्या वाळवंटांत तो खालीं आला. तिथें माणसांना जगणें मुष्कील होतें. परंतु त्या जोडप्याला मग कॅन्यॉन ड चेलीचा शोध लागला. इथें निवारा होता, पाण्याचा अखंड पुरवठा होता. तो कॅन्यॉन आणि हा 'शिपरॉक'चा सुळका या

जमातीला. गोरकायांना त्यांचीं चर्चेस प्रिय होती त्याहूनहि प्यार होता आणि यापासून तीनशें मैल लांब जाऊन कुठें तरी नव्यानें जगणें त्यांना अशक्य होतें.

शिवाय बॉस्क् रेडेण्डोचा प्रदेश तिकडे पॅकॉसकडे होता. रिओ ग्रँडच्या अति पूर्वेला होता. वाळूंत मनुएलितोनें एक नकाशा काढला आणि बिशपला समजावून सांगितलें कीं पूर्वेला ग्रँड, उत्तरेला रिओ सान वान, पश्चिमेला रिओ कोलोरॅडो त्याच्या जमातीनें ओलांडणें धर्माशेविरुद्ध होतें, तसें केल्यास जमात नष्ट होईल असें सांगून ठेवण्यात आलें होतें.

फादर ल्तूरसारखा मोठा धर्मगुरू वॉशिंग्टनला गेल्यास जमात सरकारनें त्याचें ऐकलें असतें असें मनुएलितोचें म्हणणें.

फादर ल्तूरनें त्याला समजावण्याचा प्रयत्न केला कीं प्रॉटेस्टंट देशांत रोमन धर्मगुरूला एकच गोष्ट अशक्य होती आणि ती म्हणजे सरकारी कामांत ढवळाढवळ. मनुएलितोनें तें आदरपूर्वक ऐकून घेतलें परंतु त्याला तें खरें वाटलें नाहीं हें बिशपला समजलें होतें. बिशपचें बोलून संपल्यावर तो नॅव्हेजो जागचा उठून म्हणाला :

" माझ्या लोकाची होलपट करणाऱ्या, त्यांना बॉस्क रेडोण्डोच्या डोंगरांत हुसकावणाऱ्या क्रिस्टोबलचे तुम्ही मित्र आहां. तुमच्या मित्राला जाऊन सांगा कीं, जिवंतपणीं मला तो कधींहि पकडूं शकणार नाहीं. मागें माझ्याजवळच्या मेंढ्या मला मोजतां येत नसत. आज उरल्या आहेत तीस मेंढ्या आणि थोडे थोडे अर्धपोटी घोडे. माझीं मुलें कंदमुळांवर जगताहेत आणि माझ्या जिवाची मला पर्वा नाहीं. परंतु माझी आई, माझे देव या पश्चिमेंत आहेत. आणि म्हणून प्राण गेला तरी मी रिओ ग्रँड ओलांडणार नाहीं. "

त्यानें हें खरें केलें होतें. त्याच्या हद्दपार जमातीच्या पुनरागमनापर्यंत तो लपून छपून पश्चिमेंतच राहिला. कारण एक अनपेक्षित घटना घडली होती :

बॉस्क रेडोण्डो नॅव्हॅजोंना फार गैरसोयीचा मुलुख ठरला. पाटबंधाऱ्यांनीं तो लागवडीला आणता आला असता परंतु ती जमात शेतकऱ्यांची नव्हती, मेंढवाळांची होती. त्यांच्या मेंढ्याकरता तिथें कुरणें नव्हतीं. जळणाला लाकूड नव्हतें. जमिनींतलीं मुळें काढून वाळवून त्याचें ते लोक जळण करीत. तो भाग 'अल्कलाइन'युक्त होता त्याणि गढूळ पाण्यानें शेकडों इंडियन्स मृत्युमुखीं पडले. अखेर वॉशिंग्टनच्या सरकारला आपली चूक उमगली—सरकारला सहसा असें कांहीं उमगत नाहीं पण एवढ्यापुरतें मात्र असें झालें खरें. पांच वर्षांच्या वनवासानंतर 'नॅव्हॅजो' पैकीं उरली सुरली माणसें त्यांच्या मूळ भूमीवर परतूं शकलीं.

१८७५त बिशपनीं त्यांच्या फ्रेंच स्थापत्य विशारदाला तो फ्रान्सला परतण्या-

आम्हीं आरिझोनाला नेऊन तो भाग थोडा फार दाखवला होता. तेव्हां त्या भागांत नॅव्हॅजो घोडेस्वार विमुक्तपणें संचार करीत असलेले बिशपनीं पाहिले होते आणि त्यांना आनंद वाटला होता. कॅन्यॉन ड चेलीपर्यंत ते दोघे तेव्हां पोंचले होते. पुन्हां एकवार तिथल्या खोलगटींत पिकें डुलत होतीं, मेंढ्यांचे कळप चरत होते, घरें वसलीं होतीं. तें जणूं इंडियनांचें 'गार्डन ऑफ एडन' होतें!

आणि आतां या म्हातारपणांत, रुग्णावस्थेंत, त्या गतकालांतले एकेक बरे वाईट प्रसंग बिशपच्या मनांत पुन्हा एकदां सरकत होते. रिओ गॅण्डवरच्या एका जागीं, नावेंतून पलिकडे वनवासांत जाण्याकरतां उभ्या असलेल्या इंडियनांचे भेसूर चेहरे. पुन्हां आपल्या मुलुखाकडे कळप हांकीत म्हातारीं कोतारीं आणि मुलेंबाळें घेऊन परत जाणाऱ्या उरल्यासुरल्या इंडियनांचे लांब लांब जथे. वसंतारंभीं लिटल कोलोरॅडोमध्यें युसाबिओसमवेत घालवलेल्या काळाचेंहि स्मरण होत होतें. त्या वेळीं, योग्य मेंढी सांपडेतोवर कोंकराच्या तोंडीं आपला स्तन देणारी फादरनीं पाहिलेली इंडियन स्त्री...पोरक्या कोंकरांना हातीं धरून वाळूंतून दौडणारे इंडियन घोडेस्वार...

"बर्नार्ड..." बिशप पुटपुटत. "त्या जुन्या अन्यायांचें परिमार्जन झालेलें पहाण्याला ईश्वरानें मला जगवलें हें फार बरें केलें. इंडियन्स नष्ट होतील असें मला मागें वाटे. आतां नाहीं तसें वाटत. ईश्वर त्यांना जगवील, वाढवील."

अमेरिकन डॉक्टर आर्चबिशप XXX आणि मदर सुपीरिअरशीं बोलत होते. "काळजीचा भाग आहे तो हृदयाचा. त्याची क्रिया चालू रहावी म्हणून सारखें ती उद्दीपित करणारें औषध देतों आहे मी. पण आतां त्याचा उपयोग होईनासा झाला आहे. बरें, डोसहि मी वाढवूं शकत नाही. ते तात्काळ प्राणघातक ठरण्याचा संभव. तुम्हांला त्यांच्यांत एवढा बदल दिसतो तो यामुळें."

बदल असा होता कीं, म्हाताऱ्या फादरची अन्नावर वासना उरली नव्हती आणि सर्वकाळ ते झोंपत होते व झोंपलेले वाटत होते. अखेरच्या दिवशीं त्याची अवस्था सर्वांना जवळ जवळ कळलेलीच होती. दिवसभर कॅथेड्रल माणसांनीं गजबजलें होतें. फादरकरतां प्रार्थना चालली होती. त्यांत जोगिणी होत्या, वृद्धा होत्या, तरुण पुरुष होते आणि मुलीहि होत्या. कोणी येत होते, कोणी जात होते. फादरनीं 'व्हिआटिकम'चें ग्रहण भल्या सकाळींच केलें होतें. तेसुक इंडियनांचे फादरचा शेजार केलेले अनेक लोक सांता फेस आले होते,

आर्चबिशपच्या निवासस्थानाच्या अंगणांत बसून फादरच्या तब्येतीच्या वार्ता ऐकत होते. त्यांच्याबरोबरच नॅव्हॅजो युसोबिओहि होता. फ्रुक्तोसा आणि त्रांक्विलिनो हे फादरचे जुने नोकर कॅथेड्रलमध्यें प्रार्थनेंत मग्न होते.

मदर सुपीरिअर मॅग्डालेना आणि बर्नार्ड फादरच्या उशाशीं होते. हातून कांहीं करण्याजोगें उरलें नव्हतें. शक्य होतें पहाणें, प्रार्थना करणें. फादर शांतपणें, कोणत्याहि यातनेविना स्वस्थ पडले होते. कांहीं वेळां ती निद्रा असल्याचें इतरांना त्यांच्या विश्रब्ध चेहऱ्यावरून कळे. कधीं कधीं डोळे मिटलेले असूनहि फादर जागृत असल्याचें जाणवे. त्यांच्या मुद्रेवरून तसें वाटे.

दिवस मावळला, दिवे-लागणी झाली. फादर बेचैन होताहेतसें दिसूं लागलें. थोडेफार चाळवूं लागले. पुटपुटूं लागले. ती पुटपुट फ्रेंचमधली होती परंतु तिच्यांतले कांहीं शब्द कळूनहि बर्नार्डला तिचा अर्थ लागत नव्हता. तो फादरच्या जवळ वांकला. म्हणाला, " काय फादर ? मी इथेंच आहे. "

फादर पुटपुटच होते. हात किंचित हलवत, चाळवत होते. मॅग्डालेनाला वाटलें, ते कांहीं तरी सांगताहेत. किंवा त्यांना कांहीं सांगायचें आहे. परंतु फादर मुळीं प्रत्यक्षांत तिथें नव्हतेच. ते त्यांच्या मायभूमींतल्या डोंगराच्या उतारावरच्या एका हिरव्यागार शेतांत भल्या प्रातःकालीं उभे होते; रहाण्याची आणि जाण्याची इच्छा यांच्या झगड्यांत विदीर्ण होऊं पहाणाऱ्या एका तरुण मुलाचें सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होते. धर्मार्पण मनाच्या त्या थकल्या, दुबळ्या धर्मगुरूंत नवी इच्छाशक्ति स्फुरविण्याचा खटाटोप करीत होते. वेळ थोडा उरला होता. लांब डोंगराच्या सडकेनें पॅरिसची गाडी दडदडा दौडत येत होती...

काळोख पडला. आणि किंचित्कालांत कॅथेड्रलची घंटा घणघणली. सांता फेचे मेक्सिकन रहिवासी आणि अमेरिकन कॅथॉलिक्स गुडघ्यावर नतमस्तक झाले. असे न वांकलेले कोणी मनच्या मनीं प्रार्थना करते झाले. युसाबिओ आणि तेसुक मुलें आपआपल्या लोकांना बातमी देण्याकरतां जड पावलांनीं निघून गेलीं. दुसऱ्या दिवशीं जुने आर्चबिशप, त्यांनींच बांधलेल्या चर्चच्या उंच ' आल्टर ' पुढें शांत पहुडले होते.

* * *

- कथा
- कादंबऱ्या
- नाटकें
- आचार्य अत्रे वाङ्मय

आणि
- अनुवादित विश्वसाहित्य

यांसाठीं

ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर

गोरेगांवकर चाळ क्र. २, मुंबई ४